
सूत्रधार मंडन विरजित

# प्रासाद मंडन



मराठी भाषांतर

डॉ. र.पु. कुळकर्णी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

सूत्रधार मंडन विरजित

# प्रासाद मंडन

मराठी भाषांतर
डॉ. र.प. कुळकर्णी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथम आवृत्ती
वर्ष – २००१

प्रकाशक:-
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रथ संग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई – ४०० ०१४

प्रकाशकाधीन –
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रक:-
शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स.
(शासन मुद्रण व लेखन सामग्री, संचालनालय अंतर्गत)
सुभाष रोड, नागपूर – ४४० ०१८

किंमत : ११४ रुपये

## अनुक्रमणिका

## — निवेदन —

"प्रासादमंडन" हा ग्रंथ अनेक शतकापूर्वी मूळ संस्कृतमध्ये लिहिलेल्या भारतीय वास्तुशास्त्रासंबंधी आहे. आजचे युग हे वैज्ञानिक युग आहे. वास्तुरचनेत विलक्षण प्रगती झालेली आहे. तरीही शास्त्र म्हणून वास्तुरचनेचा अभ्यास करताना त्याचे मूळ आपणाला अनेक शतकापूर्वी लिहिलेल्या वास्तुशास्त्रासंबंधीच्या "प्रासादमंडन" या ग्रंथात आढळते. या दृष्टिने "प्रासादमंडन" या ग्रंथाचे महत्व आहे, असे मला वाटते.

डॉ. श्री. र.पु. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या या ग्रंथाचे मराठी वाचक — विशेषतः वास्तुशास्त्राचे अभ्यासक भरघोस स्वागत करतील अशी मला आशा आहे.

**मुंबई**

**दि. १५ ऑक्टोबर, २००१** **(रा. रं. बोराडे)**

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

अनुक्रमणिका

**आकृत्यांची सूची**


| आकृती क्र. | अध्याय क्र. | श्लोक क्र. | आकृतीची माहिती |
|---|---|---|---|
| | | | **प्रस्तावनेतील आकृती** |
| अ | | | समोसण (चौरस) |
| आ | | | मूळ वर्तुळ |
| इ | | | अष्टकोनी कुण्ड |
| ई | | | अर्धवर्तुळाकार कुण्ड |
| उ | | | योनीकुण्ड |
| ऊ | | | पद्मकुण्ड |
| ए | | | त्र्यंग ते नवांग प्रसाद |
| ऐ | | | नागर उपपीठ |
| ओ | | | द्राविड उपपीठ |
| औ | | | भूमिज उघपीठ |
| १ | १ | १८ | वत्सचक्र, (नागवास्तु) |
| २अ | १ | २३ | ध्रुवावरून दिशा निश्चिती |
| २ आ | १ | २३ | शंकूच्या सावलीवरून दिशा निश्चिती |
| ३ | १ | २५ | कूर्मशिला |
| ४ | २ | ११ – १५ | जगतीचे थरविभाग |
| ५ | २ | १८ | तोरण |
| ६ | २ | २४ | अष्टापद |
| ७ | ३ | ८ – ११ | उपपीठाचे थरविभाग |
| ८ – अ | ३ | १२ | कामदपीठ |
| ८ – आ | ३ | १३ | कणीपीठ |
| ९ | ३ | ८ – ११ | सोमनाथ – पाटन येथील सूर्याच्या देवालयाचे कामदपीठ व मंडोवराचे थरविभाग |
| १० | ३ | ८ – ११ | भुसावळ (जिल्हा जळगांव) जवळील चांगदेवाचे देवालय, उपपीठ व मंडोवराचे थरविभाग |
| ११ | ३ | २४ – २७ | मेरू मण्डोवराचे थरविभाग |
| १२ | ३ | १९ – २८ | मेरू मंडोवर, औंढ्या नागनाथाचे मंदिर |
| १३ | ३ | ६१ | दरवाजा, अधोच्छन्द, ऊर्ध्वच्छन्द व पार्श्वच्छन्द, बलसाणे (जिल्हा धुळे) |


अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | ३ | ६६ | दरवाजा, नवशाख, काशीविश्वेश्वर, लक्कुंडी येथील |
| १५ | ४ | ५ – ६ | निरनिराळ्या देवमूर्तींचे दृष्टीस्थान |
| १६ | ४ | १६ – १८ | शिखराच्या रेखा |
| १७ | ७ | २२ | शिखराच्या पद्मकोशाची आखणी |
| १८ | ४ | २९ | नागर प्रासादाच्या शिखराचे अवयव |
| १९ | ४ | २९ | तिलक व कर्णकूट |
| २० | ४ | ३१ | स्कंधाच्या रथांना स्पर्श करणारा आमलसार |
| २१ | ४ | ३२ व ३८ | आमलसार व कळस यांचे थरविभाग |
| २२ | ४ | ३९ – ४४ | ध्वज व ध्वजदंड |
| २३ | ५ | १२, १६, १९ व २६ | प्रासादांची फालना |
| २४ | ६ | ७ | सर्वतोभद्र प्रासाद |
| २५ | ६ | २९ | भूमिज प्रासाद |
| २६ | ७ | १३ | मुख मण्डप |
| २७ | ७ | १४ | खांबाचे प्रकार |
| २८ | ७ | १५ | प्राग्ग्रीव मंडपांचे प्रकार |
| २९ | ७ | १७ – २० | गूढ मंडप |
| ३० | ७ | २३ | सुभद्रादि मुखमंडप |
| ३१ | ७ | २४ – २६ | नृत्यमंडप |
| ३२ | ७ | २८ – ३२ | शिखर |
| ३३ | ७ | ३४ | समतल वितान – गंजिगट्टी येथील देवालयाचे वितान |
| ३४ | ७ | ३४ | अक्षिप्तप्रकारचे वितान, वाघंळी (जिल्हा जळगांव) मुधाई देवीचे देवालय |
| ३५ | ७ | ३४ | उत्क्षिप्त वितानाचा प्रकार |
| ३६ | ७ | ४६ – ४९ | शिखरावरील संवरणा |
| ३७ | ८ | १०५ – ११४ | एकाशीति पद्वास्तु |
| ३८ | ८ | १०५ – ११४ | वास्तुपुरूष |

टीप : Medieval temples of the Dakhan-Henry Cousens (1931) या पुस्तकातून आ. क्र. १०, १३ व ३४ आणि

Rhe Chalukyan Architecture of the Kanarese Districts – Henry Cousens या पुस्तकातून आकृती क्र. १४ व ३३ साभार घेतल्या हेत.

अनुक्रमणिका

## अनुक्रमणिका

# प्रस्तावना

भारतात काश्मीरपासून तामीळनाडु पर्यंत व गुजराथ, कच्छ पासून आसाम राज्यापर्यंत सर्वत्र प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत बांधलेली अनेक सुंदर देवालये सर्वत्र विखुरलेली आढळतात. या मंदिरांच्या बांधकामांच्या पद्धतीविषयी, त्यांच्या वास्तुशास्त्रीय शैलीविषयी तसेच त्यांच्या निरनिराळ्या अवयवांची पूर्ण माहिती होण्यासाठी भारतीय वास्तुशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. नागर, द्राविड, उडिया वगैरे निरनिराळ्या वास्तुकामाच्या शैली वर्णन करणारे अनेक ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिलेले आढळतात. त्यांच्यापैकी सूत्रधार मंडनाने लिहिलेल्या नागर शैलीच्या प्रासादांची माहिती देणाऱ्या **'प्रासादमंडन'** या वास्तुशास्त्रावरील लहानशा ग्रंथाचे मराठी भाषेत भाषांतर केले आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने सौराष्ट्र, गुजराथ व महाराष्ट्रातील नागर शैलीत बांधलेल्या मंदिरांच्या वास्तुशास्त्राबद्दलची कांहीशी संक्षिप्त पण ठोस अशी माहिती मिळते.

सूत्रधार मंडन हा प्रसिद्ध शिल्पशास्त्री राजस्थानांतील मेवाड प्रांताचा असून त्याचे वडील सुप्रसिद्ध सूत्रधार श्रीक्षेत्र (खेता) हे होत. ते मूळचे पाटण येथील भगोरा जातीचे व भृगु पंथीय होते. सूत्रधार मंडन व सूत्रधार श्रीक्षेत्र हे चित्तोडच्या महाराणा कुंभकर्णाकडे (इ.स. १४३३ ते इ.स. १४६८) शिल्पशास्त्री म्हणून आश्रयास होते. राणा कुंभाने चित्तोडला ज्या अनेक वास्तु बांधल्या, त्यांत किल्ले, देवालये तसेच कीर्तिस्तंभ यांचा समावेश होतो. त्या श्रीक्षेत्र व मंडन सूत्रधार यांनी बांधलेल्या आहेत. चित्तोडच्या किल्यातील राणा कुंभाच्या विजयस्तंभाच्या सर्वात वरच्या मजल्यावरील भिंतीवर सूत्रधार मंडनाचे व इतरांचे चित्र कोरलेले आहे. मंडन हा सोमपुरा ब्राह्मणांपैकी होता असे म्हणतात. सौराष्ट्रातील सुप्रसिद्ध सोमपुरा जातीचे शिल्पशास्त्री हे विश्वकर्म्याच्या शिल्पशास्त्राच्या शैलीप्रमाणे मंदिरे बांधतात. विश्वकर्मा हा अष्टवसूंपैकी प्रभास वसूचा मुलगा असून त्याची आई भृगु ऋषींची मुलगी होती. भृगु ऋषींची महती ते अति प्राचीन तसेच आद्य शिल्पाचार्य म्हणून आहे. शिल्पशास्त्राच्या बाबतीत भृगु हे विश्वकर्म्याचे गुरु होते असे मानतात.

सूत्रधार मंडनाने शिल्पशास्त्रातील निरनिराळ्या विषयांवर लहान, सूत्ररूप मात्र ठोस माहिती देणारी अनेक पुस्तके संस्कृत भाषेत लिहिली आहेत. **प्रासादमंडन** हे पुस्तक प्रासादांच्या (मंदिरांच्या) वास्तु संबंधी माहिती देते. **राजवल्लभ** या पुस्तकांत राजवाड्यांच्या बांधकामासंबंधी माहिती दिली आहे. **वास्तुमंडन**, **वास्तुशास्त्र** व **वास्तुसार** ही पुस्तके इमारतींच्या बांधकामांसंबंधी आहेत. **आयतत्व** या पुस्तकात वास्तुचे आय, व्यय, नक्षत्र, तारा वगैरेंचे गणित दिलेले असून वास्तुच्या मालकाला त्याने बांधलेली वास्तु त्याला लाभकारक कशी होईल याबद्दलचा ऊहापोह केलेला आहे. **देवता मूर्ती प्रकरणम्** व **रूपमंडन** ही पुस्तके मूर्तीशास्त्रावर आहेत. असे म्हणतात की सूत्रधार मंडनाच्या काळी शिल्पशास्त्रावरील पुस्तके, - त्यांच्यातील माहिती - ही बरीच अव्यवस्थित स्वरूपात उपलब्ध होती व शिल्पशास्त्राच्या सर्व विषयांवर उत्तम पुस्तके लिहून त्या काळी भारतीय शिल्पशास्त्राला जी उतरती कळा लागली होती ती नाहीशी करून या शास्त्राचे त्याने पुनरुज्जीवन केले. याचे श्रेय सूत्रधार मंडनास दिले जाते.

'प्रासादमंडन' हा ग्रंथ त्याच्या नांवात दिल्याप्रमाणे प्रासादांची - देवमंदिरांची - माहिती देतो, व हा प्रासादांवरील श्रेष्ठ ग्रंथ आहे. दुसऱ्या पक्षी तो मंडनाने लिहिलेला आहे - अशा अर्थाने या ग्रंथाचे नांव दिले आहे. यात एकूण आठ अध्याय असून पहिल्या अध्यायांत प्रासादांचे प्रकार. देवमंदिर बांधण्यासाठी योग्य जागा प्रासाद बांधण्यासाठी, त्याच्या आखणीसाठी योग्य काळ, तसेच प्रासादाच्या मालकाला प्रासाद

अनुक्रमणिका

शुभकारक होण्यासाठी आय, व्यय इत्यादी ज्योतिषविषयक माहिती दिली आहे. प्रासाद कोणत्या निरनिराळ्या द्रव्यांनी बांधला म्हणजे किती पुण्याची प्राप्ती होते वगैरे माहिती देखील येथे दिली आहे. प्रासादाच्या पायातील कूर्मशीलेची माहिती आली आहे.

दुसऱ्या अध्यायात प्रासादाची जगती (उपपीठ), तोरण वगैरेंची माहिती देऊन नाभिवेधासंबंधी चर्चा केली आहे. विष्णू, देवी, सूर्य इत्यादी देवांच्या मंदिराभोवती चार उप-दिशांना जी लहान देवालये बांधतात त्या देवालयांत कोणत्या दिशेच्या मंदिरांत कोणत्या देवाची स्थापना करावी याबद्दल माहिती दिली आहे. तिसऱ्या अध्यायात पीठ, भिंत (मंडीवर) यांची मापे व त्यांचे निरनिराळे थर विभाग तसेच गर्भगृहाच्या दरवाजांची त्रिशाख, पंचशाख ते नवशाख पर्यंतची माहिती दिली आहे. चवथ्या अध्यायात शिखर, शुकनास, आमलसार, कलश, ध्वज वगैरेंची मापे व त्यांच्या निरनिराळ्या अवयवांची माहिती दिली आहे. पांचव्या व सहाव्या अध्यायात निरनिराळ्या प्रकारच्या प्रासादांचे वर्णन केले आहे. त्र्यंग, पंचांग ते नवांग प्रकारचे प्रासाद, त्यांची नांवे व वर्णन पांचव्या अध्यायात येते. सहाव्या अध्यायात केसर्यादि प्रासाद तसेच निरनिराळे मेरु प्रकारचे प्रासाद यांच्या विषयी माहिती आली आहे. सातव्या अध्यायात मुखमण्डप, नृत्यमण्डप, गूढमण्डप वगैर अनेक प्रकारच्या मंडपांची माहिती दिली असून मंडपांच्या शिखराचे व त्यावरील संवरणेचे वर्णन केले आहे. प्रासाद संपूर्ण बांधून झाल्यावर जी धार्मिक कृत्ये करावयाची त्यांचे वर्णन आठव्या अध्यायाते येते. तेथेच वास्तुप्रतिष्ठा - विधीच्या अनुषंगाने वास्तुपदमंडल व वास्तुपुरूष यांचीही माहिती दिली आहे.

प्रासाद मंडनाच्या मराठी भाषांतरात जागोजागी टीपा देऊन या ग्रंथात वापरलेल्या शास्त्रीय शब्दांचा अर्थ विशद केला आहे. परंतु त्यातील कांही विषयांसंबंधी ज्यांचा केवळ टीपा देऊन निर्वाह लागत नाही, त्यांची माहिती खाली दिली आहे.

**लोकपाल** किंवा **दिक्पाल** हे दिशांचे संरक्षक असून प्रत्येक दिशेकरीता एक असे एकूण आठ आहेत. त्यांची माहिती खाली सारणीत दिली आहे.

**सारणी १**
**दिक्पालांची माहिती**

| **नांव** | **दिशा** | **शरीराचा वर्ण** | **हातांतील आयुधे** | **वाहन** |
|---|---|---|---|---|
| इन्द्र | पूर्व | पिवळा | वज्र व स्तन (?) | ऐरावत नांवाचा हत्ती |
| यम | दक्षिण | काळा | ढण्ड व शूल | रेडा |
| वरुण | पश्चिम | पांढरा | नागपाश व शंख | मकर |
| कुबेर | उत्तर | पिवळा | अंकुश व गदा | मनुष्य |
| अग्नि | आग्नेय्य | लाल | स्रुक व कमंडलू | बोकड |
| निर्ऋति | नैर्ऋत्य | निळा | तलवार व खेटक | शव |
| वायू | वायव्य | - | - | हरिण |
| ईशान | ईशान्य | नीळकंठ | कपाल व त्रिशूल | नन्दी |

अनुक्रमणिका

मत्स्यपुराणांत चार मुख्य दिशांचे संरक्षक पूर्वे कडून अनुक्रमे सुधर्मा, शंखपाल, केतुमान व हिरण्यरोमा हे आहेत असा उल्लेख आहे.

बुद्ध धर्माप्रमाणे चार मुख्य दिशापालकांची नांवे वेगळी आहेत. पूर्व दिशेच्या लोकपालाचे नांव धृतराष्ट्र असून तो वीणा वाजवीत आहे असा दर्शवितात. दक्षिणेकडील लोकपाल विरूढक असून तो दैत्याला पायाखाली तुडवीत आहे असा दाखवितात. पश्चिमेकडील व उत्तरेकडील दिशापालांची नांवे अनुक्रमे विरुपाक्ष व वैश्रवण अशी आहेत. विरूपाक्षाच्या उजव्या हातात रत्न व डाव्या हातात सर्प धारण केलेले असतात. वैश्रवणाच्या उजव्या हातात ध्वज असून डाव्या हातात लहान स्तूप असतो.

वज्रयान बुद्ध पंथीयांच्या निष्पन्नयोगावली या ग्रंथात एकूण दहा दिशापालांचे वर्णन दिले आहे. हे सर्व नेहमी त्यांच्या शक्तीसह दाखवितात. त्यांना प्रत्येकी तीन मुख व सहा हात असतात. यापैकी दोन हातांनी त्यांनी त्यांच्या पत्नींना आलिंगन दिलेले असते. उरलेल्या चार हातात धारण केलेल्या आयुधांची माहिती खाली सारणीत दिली आहे.

**सारणी २**

**दिशापालांची माहिती**

| **नांव** | **दिशा** | **शरीराचा वर्ण** | **हातातीत आयुधे** |
|---|---|---|---|
| यमान्तक | पूर्व | निळा | काळे वज्रमुद्गर, खड्ग, मणी, कमळ |
| प्रज्ञान्तक | दक्षिण | पांढरा | वज्रांकित शुभ्रदण्ड, तलवार, मणी, कमळ |
| पद्मान्तक | पश्चिम | लाल | तांबडे कमळ, तलवार, मणी, चक्र |
| विघ्नान्तक | उत्तर | हिरवा | कराल वज्र, तलवार, मणी, कमळ |
| तक्किराज | आग्नेय | निळा | निळा दण्ड, खड्ग, मणी, कमळ |
| नीलदण्ड | नैऋत्य | निळा | निळा दण्ड, खड्ग, मणी, कमळ |
| महाबल | वायव्य | निळा | त्रिशूल, तलवार, मणी, कमळ |
| अचल | ईशान्य | निळा | खड्ग, वज्र, मणी, कमळ |
| उष्णीष | उर्ध्व | पिवळा | पिवळे चक्र, खड्ग, मणी, कमळ |
| सुम्भराज | अधः | निळा | वज्र, खड्ग, मणी, कमळ |

जैनमताप्रमाणे दहा दिशापालांची नांवे निराळी आहेत. पूर्व दिशेचा लोकपाल इन्द्र, आग्नेय दिशेचा वायू, दक्षिणेचा यम, नैऋत्येचा पितृ, पश्चिमेचा वरुण, वायव्येचा महाराज, उत्तरेचा सोम, ईशान्येचा दिशापाल महेन्द्र, पाताळाकडील वासुकी व आकाशाकडील ब्रह्मा.

अष्ट दिक्पालांच्या मूर्ती बादामी, गन्जिगट्टी (जिल्हा धारवाड), नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील ऐरेश्वर मंदिराच्या मंडपाच्या वितानावर व खजुराहो येथील मंदिरात कोरलेल्या आढळतात.

अनुक्रमणिका

दिशापालांची कल्पना ही वैदिक काळानंतरची आहे असे समजतात. भारतात, मौर्य, वगैरे राजांनी जेव्हा जवळ जवळ अखिल भारत जिंकून साम्राज्ये निर्माण केलीत तेव्हा सर्व भारतभर सर्व दिशांना त्यांच्या वतीने कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांची, राज्यपालांची गरज निर्माण झाली. हीच कल्पना भारतीयांनी देवांच्या संपूर्ण विश्वाच्या राज्याला लावून दिशापालांची संकल्पना निर्माण केली. ग्रहमखांत मुख्य ग्रहांना आहुती दिल्यानंतर दिशापालांना देखिल आहुती दिल्या जातात. लहान किंवा मोठ्या विहिरी, तलाव वगैरेंच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी या दिशापालांना बळी देतात.

**क्षेत्रपाल** हा गावाचा संरक्षक असतो. ऋग्वेदांत त्यास 'क्षेत्रस्य पति' : म्हणून संबोधिले आहे. वेदांमध्ये त्याने गाई, घोडे यांचे संरक्षण करावे म्हणून प्रार्थना केलेल्या आढळतात. शेताच्या नांगरणीपूर्वी व बीजारोपणापूर्वी क्षेत्रपालाला बळी देतात, तो भैरवाप्रमाणे समजला जातो, त्यामुळे त्याच्याबरोबर नेहमीच कुत्रा दाखवितात. तो नग्न असून त्याच्या कंबरेभोवती सर्प गुंडाळलेला दाखवितात. त्याच्या उजव्या हातात मुद्‌गर व डाव्या हातात नरकपाल असते.

प्रासादमण्डनाच्या पहिल्या अध्यायात वास्तु बांधावयास सुरुवात करताना शुभ मुहूर्त, योग, तिथी, करण इत्यादी बघावयास हवी असा उल्लेख आहे. या ज्योतिषविषयक शब्दांचे अर्थ खाली दिले आहेत.

**तिथी** पांच प्रकारच्या आहेत. १) नंदा २) भद्रा ३) जया ४) रिक्ता व ५) पूर्णा. प्रथमा, षष्ठी व एकादशी या नंदा तिथी समजतात; द्वितीया, सप्तमी व द्वादशी या भद्रा तिथी; तृतीया, अष्टमी व त्रयोदशी या जया तिथी; चतुर्थी, नवमी व चतुर्दशी या रिक्ता तिथी; व पंचमी, दशमी व पौर्णिमा या पूर्णा तिथी होत.

**योग**- सूर्य व चंद्राच्या गतींची बेरीज १३ अंश, २० कला म्हणजेच ८०० कला होण्यास जो वेळ लागतो त्यास योग म्हणतात. सूर्य चंद्राचा भ्रमणमार्ग ३६० अंशाचा आहे. त्यांच्या कला ३६० × ६० = २१,६०० होतात, व ८०० कला बेरीज झाली की एक योग होतो. तेव्हा २१६०० ÷ ८०० = २७. तेव्हा योग २७ आहेत. त्यांची नांवे आहेत. १) विष्कम्भ २) प्रीति ३) आयुष्मान ४) सौभाग्य ५) शोभन ६) अतिगण्ड ७) सुकर्मा ८) धृति ९) शूल १०) गण्ड ११) वृद्धि १२) ध्रुव १३) व्याघात १४) हर्षण १५) वज्र १६) सिद्धी १७) व्यतिपात १८) वरीयान् १९) परिघ २०) शिव २१) सिद्धी २२) साध्य २३) शुभ २४) शुक्ल २५) ब्रह्मा २६) ऐन्द्र व २७) वैधृति. हे सत्तावीस योग आपल्या नांवाप्रमाणे फल देतात. ३, ४, ५, ११, १६, २१, २२ व २३ हे शुभ; २, ७, १२, २०, २४, २५ व २६ हे मध्यम व बाकीचे योग अशुभ फल देतात.

**करण**- चंद्र व सूर्यामध्ये सहा अंश अंतर पडण्यास जो काळ लागतो त्यास करण म्हणतात. दररोज दोन करणे येतात. एकंदर करणे ११ आहेत. त्यांची नांवे आहेत १) बव २) बालव ३) कौलव ४) तैतिल ५) गरज ६) वणिज ७) विष्टी किंवा भद्रा किंवा कल्याणी ८) शकुनि ९) चतुष्क १०) नाग आणि ११) किस्तुघ्न.

**योग**- अमृतसिद्धी योग हस्त नक्षत्र रविवारी असले की होतो. तसेच सोमवारी मृग अथवा श्रवण नक्षत्र, मंगळवारी अश्विनी, बुधवारी अनुराधा, गुरुवारी पुष्य, शुक्रवारी रेवती व शनिवारी रोहिणी नक्षत्र आले तर तेव्हां तेव्हां अमृत सिद्धी योग होतो. हा योग शुभ मानतात. निरनिराळ्या योगांची माहिती खाली सारणींत दिली आहे.

अनुक्रमणिका

**सारणी 3**
**योगांची माहिती**

| **योगाचे नांव** | **रविवार** | **सोमवार** | **मंगळवार** | **बुधवार** | **गुरुवार** | **शुक्रवार** | **शनिवार** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अमृतसिद्धी | हस्त | मृग/श्रवण | अश्विनी | अनुराधा | पुष्य | रेवती | रोहिणी |
| यमघंटा | मघा | विशाखा | आद्रा | मूळ | कृतिका | अनुराधा | हस्त |
| मृत्यु | अनुराधा | उत्तराषाढा | शततारका | अश्विनी | मृग | आश्लेषा | हस्त |
| चर | पूर्वाभाद्रपदा | आर्द्रा | विशाखा | रोहिणी | पुष्य | मघा | मूळ |
| उत्पात | विशाखा | पूर्वा | धनिष्ठा | रेवती | रोहिणी | पुष्य | उत्तरा |
| यमदंष्ट्रा | मघा | मूळ | कृतिका | रेवती | उत्तराषाढा | रोहिणी | श्रवण |
| | धनिष्ठा | विशाखा | भरणी | पुनर्वसू | अश्विनी | अनुराधा | शततारका |
| मुसलवज्र | भरणी | चित्रा | उत्तराषाढा | धनिष्ठा | उत्तरा | ज्येष्ठा | रेवती |
| दग्ध | द्वादशी | एकादशी | पंचमी | तृतीया | षष्ठी | अष्टमी | नवमी |
| क्रकच | द्वादशी | एकादशी | दशमी | नवमी | अष्टमी | सप्तमी | षष्ठी |

**कपिला षष्ठी**- भाद्रपद शुद्ध षष्ठी मंगळवारी अथवा रविवारी येऊन त्या दिवशी व्यतिपात किंवा रोहिणी नक्षत्र आले तर कपिला षष्ठीचा योग मानतात. हा सुमारे साठ वर्षांनी येतो.

**सिद्धीयोग**- मंगळवारी तृतीया, अष्टमी किंवा त्रयोदशी; बुधवारी द्वितीया, सप्तमी किंवा द्वादशी; गुरुवारी पंचमी, दशमी किंवा पौर्णिमा; शुक्रवारी प्रतिपदा, षष्ठी किंवा एकादशी; शनिवारी चतुर्थी, नवमी किंवा चतुर्दशी या तिथी असल्या म्हणजे सिद्धीयोग होतो.

**अर्धोदय पर्व**- पौष वद्य अमावस्या रविवारी असून श्रवण नक्षत्र व व्यतिपात असेल तर अर्धोदय पर्व मानतात. यांत काही न्यून असेल तर महोदय पर्व मानतात.

**घबाड मुहूर्त**- सूर्य नक्षत्रापासून चंद्र नक्षत्रापर्यंत नक्षत्रे मोजावीत व त्या अंकाची तिप्पट करून त्यात शुक्ल पक्षापासून वर्तमानकाळी जी तिथी असेल तो अंक मिळवावा व बेरजेस सातानी भागावे, बाकी तीन उरली तर 'घबाड' आहे असे समजावे.

**आय व व्यय**- आय म्हणजे आवक व व्यय म्हणजे खर्च. वास्तूचा आय, व्यय कसा काढावा याची थोडक्यात माहिती प्रासादमंडनाच्या पहिल्या अध्यायात दिली आहे. मनुष्याच्या बाबतीत देखील आय, व्यय काढतात. नक्षत्राचे किंवा राशीचे आय, व्यय पंचागांत दिलेले असतात. त्यात दोन प्रकार आहेत. मनुष्याचे आयुष्य १०८ वर्षे किंवा १२० वर्षे कल्पून आय, व्यय काढतात, ते अर्थातच भिन्न असतात.

**राशीचा आय**- वर्ष स्वामी आणि राशि स्वामी यांच्या दशावर्ष संख्यांची बेरीज करून तिला तिनाने गुणावे व गुणाकारांत पांच मिळवून, बेरजेस १५ ने भागावे, जी बाकी राहील ती त्या राशीचा आय.

अनुक्रमणिका


**राशीचा व्यय**- आय काढतांना १५ ने भागून तो भाग बसला असेल त्यास तिनाने गुणून पांच मिळवावे आणि त्या बेरजेस, १५ ने भागून जी बाकी उरेल ती त्या राशीचा व्यय.

ज्यावर्षी व्ययापेक्षा आयाची संख्या मोठी असेल त्या वर्षी नफा पुष्कळ, सुख लाभेल. या उलट व्ययापेक्षा आयाची संख्या लहान असेल त्या वर्षी कष्ट, नुकसान, दुःख.

एखादी वास्तू तिच्या मालकाला शुभदायक की अशुभकारक असेल हे त्या वास्तूचे आय, व्यय व मालकाचे आय, व्यय यांचा मेळ घालून ठरवितात.

जैन धर्मीयांच्या मंदिरात समोसरण (समवसरण) व अष्टापद असतात. त्यांचा उल्लेख प्रासाद मंडनात केला आहे. त्यांची माहिती थोडक्यात देतो.

**समोसरण**- (आकृती अ.) सूत्रधार मंडनाच्या मताने समोसरणाची रचना कैलास पर्वताप्रमाणे असते.ते चौरस किंवा वर्तुळाकार असते. सगळ्यांत वरती आदिनाथ, नेमनाथ, पार्श्वनाथव महावीर यांच्या मूर्तीअनुक्रमे पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर दिशांकडे तोंड करून ठेवलेल्या असतात. तसेच या समोसरणात चक्रेश्वरी, अम्बिका, पद्मावती व सिद्धायका या चार देवींच्या मूर्ती, सिंहासनावर बसलेल्या, अशा ठेवण्यात येतात. या सिंहासनावर मध्यभागी धर्मचक्र कोरलेले असून त्याच्या दोन्ही बाजूंना इंद्र (किंवा कउसग्ग) कोरलेले असतात. सर्वात वरती छत्राच्या आकाराप्रमाणे दिसतील अशी पानांची रचना असलेला अशोक वृक्ष दाखवितात (आकृती पहा) समवसरणाबद्दल भांडारकरांनी विस्तृत माहिती दिली आहे. (द इंडियन अँटिक्वेरी, जून १९११) त्यांत त्यांनी समवसरण-स्तवन या हस्तलिखितावरून संपूर्ण माहिती दिली आहे.




**आकृती - अ**

अनुक्रमणिका

**अष्टापद**- हा एक लहानसा मंडप असून त्याला आठ पायऱ्या असतात. सर्वात वरच्या पायरीवर जिनतीर्थंकरांच्या मूर्ती ठेवलेल्या असतात या मंडपाला पीठ असून ते गजथर, अश्वथर, नरथर इत्यादी थरांनी भूषविलेले असते. राजसेनक, केदिका आसनपट्ट इत्यादी थरविभाग देखील या पीठात असतात. सगळ्यात वरती चोवीस जिनतीर्थंकरांच्या मूर्ती असतात. त्यांची रचना विशिष्ट प्रकारची केलेली असते. या मूर्तींपैकी दोन मूर्तींची तोंडे पूर्व दिशेला असतात, चार मूर्तींची तोंडे दक्षिण दिशेला असतात. आठ मूर्ती पश्चिमाभिमुख असून दहा मूर्तींचे मुख उत्तर दिशेला असतात. सर्वात वरती सुंदर व सुशोभित असा स्तंभ असतो.

प्रासादमंडनाच्या आठव्या अध्यायात स्मार्त यज्ञकुण्डांची माहिती दिली आहे. त्यास अनुषंगून कुंडांची आखणी कशी करतात याची माहिती खाली दिली आहे.

**यज्ञकुण्डासाठी माप**- यजमानाची उंची मोजतात. ही उंची जमिनीपासून वर उभ्या केलेल्या हातांच्या मधल्या बोटाच्या टोकापर्यंत घेतात. ही उंची एक पुरुषाइतकी मानतात. पुरुष मापाच्या एक पंचमांशा इतके हाताचे प्रमाण घेतात. २४ अंगुलांनी एक हात होतो, आठ यवांनी एक अंगुल, आठ यूकांनी एक यव व आठ लिक्षांनी एक यूका होते. कुंडांची मापे घेताना या कोष्टकाप्रमाणे मिळालेल्या यूका, यव, अंगुल व हात यांच्या प्रमाणांनी घेतात. कुंडाची मापे लिक्षांपर्यंतच्या अचूकतेने घेतात.

कुंडमंडपाच्या पुस्तकात अनेक आकाराच्या कुंडांची माहिती दिलेली असते. येथे फक्त त्याच कुंडांची माहिती दिली आहे ज्यांचा उल्लेख प्रासादमंडनात केला आहे. आहुतींच्या संख्येनुसार कुंडांचे क्षेत्रफळ ठरते. सामान्यतः कुंड हे एक चौरस हात क्षेत्रफळाचे व एक हात खोलीचे असते. जेव्हा अनेक आकाराच्या कुंडांचा यज्ञासाठी उपयोग केला जातो तेव्हा सर्व कुण्डांची क्षेत्रफळे व खोली एकच असावयास हवी. यासाठी भूमितीच्या ज्ञानाची गरज लागते. प्रासादमंडनात उल्लेखलेली व सामान्यतः वापरात असलेली कुण्डे ही खाली दिलेल्या आकाराची असतात. १) चौरस २) त्रिकोणी ३) पंचकोनी ४) षड्कोनी ५) सप्तकोनी ६) अष्टकोनी ७) वर्तुळाकार ८) अर्धवर्तुळाकार ९) योन्याकार व १०) पद्माकार

कुंडांच्या आखणीसाठी वापरण्यात येणारी सर्वसामान्य पद्धत म्हणजे ही कुण्डे निरनिराळ्या व्यासांच्या वर्तुळात बसविलेली असतात. व या वर्तुळांतील कुंडांचे क्षेत्रफळ अचूक एक चौरस क्षेत्रफळ येईल असे पाहतात. याबद्दलची माहिती खाली सारणीत दिली आहे.


**सारणी ४**

एक चौरस हात क्षेत्रफळाच्या कुंडांची माहिती.

| कुंडाचा आकार | वर्तुळाचा व्यास | | | कुंडाच्या बाजूची लांबी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अंगुले | यव | यूका | अंगुले | यव | यूका |
| चौरस | ३३ | ७ | ४ | २४ | ० | ० |
| त्रिकोणी | ४२ | १ | ० | ३६ | ४ | ० |
| पंचकोनी | ३१ | १ | ० | १८ | २ | ३ |
| षड्कोनी | २९ | ६ | ० | १४ | ७ | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सप्तकोनी | २९ | ० | ० | १२ | ५ | ० |
| अष्टकोनी | २८ | ४ | ० | १० | ७ | ५ |
| वर्तुळाकार | २७ | ५ | ० | - | - | - |
| अर्धवर्तुळाकार | ३८ | २ | ३ | - | - | - |
| योन्याकार | ३० | २ | ० | - | - | - |
| पद्माकार | ३० | २ | ० | - | - | - |

वर्तुळासंबंधी माहिती प्रथम देऊन मग कुंडांच्या आखणीची माहिती देतो. सोबत दाखविलेल्या वर्तुळाकृतीत बिंदु १ व २ यांना अनुक्रमे सुख व पुच्छ म्हणतात, बिंदु ३ व ४ हे अनुक्रमे उत्तर व दक्षिण बिंदु आहेत. बिंदु ५ व ६ यांना अनुक्रमे उत्तर व दक्षिण अंस म्हणतात व बिंदु ७ व ८ यांना अनुक्रमे उत्तर व दक्षिण श्रोणी म्हणतात. (आकृती आ)




**आकृती (आ) मूळ वर्तुळ**

**चौरस कुंड**अंगुल ३३) दिलेल्या व्यासाचे - , ७ यव व ४ यूका लांबीचे५बिंदु .वर्तुळ आखा (, ७, ८ व ६ सरळ रेषांनी जोडा चौरस प्राप्त होतो.अंगुले म्हणजे एक हात आहे २४त्याच्या प्रत्येक बाजूची लांबी .

**त्रिकोणी कुण्ड**- दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. बिंदु १ पासून सुरूवात करून कंपासने ३६ अंगुल, ४ यव लांबीने वर्तुळ परीघाचे तीन भाग करा. हे तिन्ही बिंदु जोडून एक चौरस हात क्षेत्रफळाचा त्रिकोण मिळतो.


**पंचकोनी व सप्तकोनी कुण्डे**- दिलेल्या व्यासांची वर्तुळे आखा, बिंदु 1 पासून दिलेल्या लांबीनी वर्तुळांच्या परीघाचे अनुक्रमे पांच व सात भाग करा. हे पांच व सात बिंदु जोडून अनुक्रमे समभुज पंचकोन व सप्तकोन मिळतात.

**षट्कोनी कुण्ड**- दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. वर्तुळाच्या परीघाचे त्याच्या त्रिज्येइतक्या लांबीने सहा भाग करा. हे सहा बिंदु जोडून षट्कोन मिळतो.

**अष्टकोनी कुण्ड**- (पहिली रीत) दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. वर्तुळाच्या परीघाचे दिलेल्या लांबीने आठ भाग करा. बिंदु १ ते ८ मिळतील ते बिंदु जोडून अष्टकोन मिळतो.

अनुक्रमणिका


**अष्टकोनी कुण्ड**- (रीत दुसरी) - दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. त्यावर बिंदु १ ते ८ वर दिलेल्या रीतीने निश्चित करा. बिंदु ५, ७, ८ व ६ जोडा म्हणजे उपदिशांकडे बाजू असलेला चौरस मिळेल. बिंदु १, ४, २, व ३ जोडा म्हणजे मुख्य दिशांकडे कोपरे असलेला चौरस मिळेल. आकृतीत दिल्याप्रमाणे कोपरे आखा म्हणजे सुंदर अष्टकोन आकृती तयार होईल. हिचे क्षेत्रफळ एक चौरस हात आहे. (आकृती इ)



आकृती (इ) अष्टकोनी कुण्ड

**वृत्ताकार कुण्ड**- दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. याचे क्षेत्रफळएक चौरस हात आहे.


**अर्धवर्तुळाकार कुण्ड**- केंद्रबिंदु 'अ' घेऊन दिलेल्या व्यासाचेवर्तुळ आखा. बिंदु १ व २ निश्चित करा. अंतर १-२ याच्या ⅛ अंतरावर बिंदु १ पासून खूण 'आ' करा. 'आ' केंद्र बिंदु घेऊन दिलेल्या व्यासाचे वर्तुळ काढा. या वर्तुळाचे पश्चिमेकडील अर्धवर्तुळ कुंड तयार करण्यासाठी वापरा. (आकृती ई)




**आकृती (ई) अर्धवर्तुळाकार कुण्ड**


**योन्याकार कुण्ड**- दिलेल्या व्यासाचे वर्तुळ आखा. बिंदु १, ७ व ८ जोडा. बिंदु २ व ७ व बिंदु २ व ८ जोडा. बिंदु ७ व २ त्याच्या अंतराइतक्याच व्यासाच्या अर्धवर्तुळाने जोडा. त्याचप्रमाणे बिंदु ८ व २ अर्ध वर्तुळाने जोडा. एक चौरस हात क्षेत्रफळाचे योन्याकार कुण्ड मिळते. (आकृती उ)

अनुक्रमणिका




**आकृती (ऊ) पद्‌मकुण्ड**

**पद्‌माकार कुण्ड-** २४ अंगुले, ४ यव, ३ यूका या व्यासाचे वर्तुळ आखा. तोच केंद्रबिंदु घेऊन ३१ अंगुले, १ यव, ५ यूका व्यासाचे दुसरे वर्तुळ पहिल्या वर्तुळाच्या बाहेरच्या बाजूस आखा. आतल्या वर्तुळाच्या परीघाचे आठ भाग करून  अष्टकोन मिळवा. हा कमळाचा मधला भाग झाला कमळाच्या आठ पाकळ्या आखण्याची रीत अशी - अष्टकोनाच्या प्रत्येक बाजूवर ती बाजू पाया असलेले व शिरोकोन बाहेरील वर्तुळावर असतील असे त्रिकोण काढा. त्रिकोण अ, आ, इ च्या बाजू अ, आ चा मध्यबिंदु ई. बिंदु ई वर लंब टाका. व त्या लंबावर बिंदु उ असा मिळवा की ई उ = अ आ. उ केंद्रबिंदु घेऊन, २ ई उ लांबीच्या त्रिज्येने वर्तुळखण्ड अ, ई आखा. लंब २ ई उ इ उ बाजू अ आ च्या दुसऱ्या बाजूस वाढवा व वर दिलेल्या रीतीने वर्तुळखंड ई आ मिळवा. हीच रीत बाजू अ इ वर वापरून कमळाच्या पाकळीचा आकार मिळवा. ही रीत अष्टकोनाच्या आठही बाजूवर असलेल्या त्रिकोणाच्या बाजूंवर वापरून आठ पाकळ्या आखा. एक चौरस हात क्षेत्रफळाचा पद्‌माकार मिळतो. या सर्व कुण्डांची खोली एक हात असावी. (आकृती ऊ)




**आकृती (उ) योनीकुण्ड**

**कुंडाभोवतीच्या मेखला-** कुण्डाच्या कडेच्या बाहेरच्या बाजूस एक अंगुल रूंदीची (चौरस कुण्डाच्या बाजूचा १⁄२४ भाग इतक्या रूंदीची) पट्टी मोकळी सोडा. नंतर तीन मेखला बांधाव्यात. सर्वात आतल्या मेखलेची उंची सर्वात जास्त असते. मेखलांची उंची जमीनीपासून अनुक्रमे ९, ६ व ३ अंगुले असून त्यांची रूंदी अनुक्रमे ४, ३ व १ अंगुले असावी. मेखलांचा आकार कुंडांच्या आकाराप्रमाणे असतो.

अनुक्रमणिका

कुंडाच्या तळापाशी कुंडाच्याच आकाराची नाभी असते. तिची रूंदी दोन अंगुले व उंची एक अंगुल असते, किंवा सर्व आकाराच्या कुंडांची नाभी कमळाच्या आकाराची ठेवतात. पद्माकार कुंडाला मात्र नाभी नसते. प्रत्येक कुंडाच्या मेखले वरती लहानशी योनी ठेवतात. तीची लांबी आठ अंगुले, रूंदी बारा अंगुले व उंची एक अंगुल असते. ती मेखलेच्या लांबीच्या मध्यभागी अशी ठेवलेली असते की तिची अरूंद बाजू कुंडाकडे असून ती कुंडाच्या बाजूस थोडी झुकलेली असते. योनी ही कुंडाच्या पश्चिम किंवा दक्षिण बाजूच्या मध्यावर ठेवतात. चौरस कुंडाला योनी ठेवत नाहीत.+ [कुंडमण्डपावर लेखकाचे 'Engineering Geometry of Yajn akundas and Yajn amandapas', पुस्तके पहावे. प्रकाशक - ज्ञानप्रबोधनी पुणे.].

## अपराजितपृच्छा प्रमाणे प्रासादांचे वर्गीकरण

प्रासादमंडन हा ग्रंथ अपराजितपृच्छा या भुवनदेवाचार्य यांच्या ग्रंथाला अनुसरून लिहिलेला आहे असे मण्डनाने म्हटले आहे. अपराजितपृच्छा हा शिल्प शास्त्रावरील ग्रंथ बाराव्या शतकांतील असून त्यात सूत्ररूपाने माहिती दिली आहे. मंडनाने प्रासादांच्या निरनिराळ्या जातींची, नागर, द्राविड, भूमिज इत्यादींची त्रोटक माहिती दिली आहे. त्याबद्दलची जास्त माहिती अपराजितपृच्छावरुन खाली दिली आहे.

प्रासादाचे वर्गीकरण करतांना प्रासादाच्या (गर्भगृहाच्या) शिखराचाच प्रामुख्याने विचार केला जातो. प्रासादाला जोडलेले मुखमण्डप, गूढमण्डप यावर प्रासादांचे वर्गीकरण अवलंबून नसते. प्रासादाच्या शिखराच्या प्रकारावरून त्याचे वर्गीकरण ठरते. अपराजितपृच्छात दिल्याप्रमाणे प्रासादाचे १५ प्रकार आहेत. त्यातील आठ प्रकार शुद्ध (मूळ) प्रकारचे असून उरलेले सात प्रकार हे या मूळ प्रासादावरुन निर्माण झाले आहेत. प्रासादाचे मूळ आठ प्रकार आहेत. १) नागरच्छन्द २) द्राविड ३) मिश्रक ४) विमान ५) भूमिज ६) सान्धार ७) वराट व ८) लतिन. उरलेले सात प्रकार आहेत. ९) वलभी १०) फांसनाकार ११) सिंहावलोकन १२) दारुज १३) विमान नागरच्छन्द १४) विमान पुष्पक व १५) रथारुह.

## प्रासादाचे अवयव

प्रासादात सहा मुख्य अवयव (षड् वर्ग) असतात. १) पीठ २) मंडोवर अथवा जंघा म्हणजे भिंत ३) मंच किंवा उत्तर ४) शिखर ५) आमलसार व ६) कळस. प्रासादांच्या वर्गीकरणासाठी या षड्वर्गांचाही अंतर्भाव केला जातो.

## प्रासादाचे आकार

मुख्यतः पांच आकाराचे प्रासाद असतात १) चौरस २) आयताकार, ३) वर्तुळाकार ४) अंडाकृती व ५) अष्टकोनी.


नागर, मिश्रक व लतिन प्रकारचे प्रासाद या पांचही आकारांचे असू शकतात. द्राविड, भूमिज व फांसनाकार प्रकारचे प्रासाद चौरस, वर्तुळाकृती किंवा अष्टकोनी असतात. ते आयताकार अथवा अंडाकृती नसतात. सान्धार, वराट सिंहावलोकन, दारुज, विमान नागर व विमान पुष्पक या प्रकारांचे प्रासाद फक्त चौरस आकाराचे असतात. वलभी प्रासाद हा नेहमीच आयताकार असून याची मागची बाजू अर्धवर्तुळाकार

अनुक्रमणिका

असते. याच्या छप्पराचा आकार गजपृष्ठाप्रमाणे असतो. या विशिष्ट आकारावरून व शिखराच्या प्रकारावरून वलभी प्रकारचा प्रासाद सहज ओळखता येतो.


**प्रासादाची फालना**

प्रासादाच्या अधोच्छन्दांत भद्र, रथ, कर्ण असे विभाग दाखवितात. त्यांना प्रासादाची फालना म्हणतात. प्रासादांचे वर्गीकरण या फालनांच्या संख्येनुसार देखील होते. जेव्हा अधोच्छन्दात फक्त कर्ण व भद्र असतात तेव्हा त्यास त्र्यंगप्रासाद म्हणतात. ज्या प्रासादाला भद्र, उपरथ व कर्ण असतात त्यास पंचांग प्रासाद म्हणतात. भद्र, दोन उपरथ व कर्ण असलेला तो सप्तांग प्रासाद व भद्र, तीन उपरथ व कर्ण असलेल्यास नवांग प्रासाद म्हणतात. (आकृती ए)





**आकृती – ए : त्र्यंग ते नवांग प्रासाद**


अनुक्रमणिका




आकृती – ऐ नागर उपपीठ





प्रकार १





प्रकार २

आकृती – ओ : द्राविड उपपीठ




प्रकार १




प्रकार २

**आकृती – औ : भूमिज उपपीठ**

अनुक्रमणिका

**प्रासादाचे उपपीठ**

उपपीठाचे प्रासादांच्या प्रकारावरून तीन मुख्य प्रकार होतात । (१) नागर (२) द्राविड व (३) भूमिज प्रकारचे उपपीठ. नागर प्रकारचे उपपीठ नागर, लतिन, सांधार, मिश्रक, विमान व रथारुह प्रासादांसाठी वापरतात. लतिन प्रकारच्या प्रासादाला नागर प्रकारचे उपपीठ असले तरी त्याच्या थरविभागांचे अंतर्गमन व बहिर्गमन असे ठेवलेले असतात की उपपीठाचा सगळ्यांत खालचा थर व सगळ्यांत वरचा थर हे एकाच लंबरेषेत येतात. मिश्रक प्रकारच्या प्रासादाच्या उपपीठाच्या थरांचे अंतर्गमन व बहिर्गमन हे नागर उपपीठा प्रमाणे असतात. विमान प्रासादाच्या उपपीठाच्या थरांचे अंतर्गमन किंवा बहिर्गमन हे त्या थरांच्या उंचीइतकेच असते. सांधार प्रकारच्या प्रासादाच्या उपपीठांच्या थरांचे अंतर्गमन व बहिर्गमन हे नागर प्रासादाच्या उपपीठाच्या अंतर्गमन व बहिर्गमनांपेक्षा जास्त असतात. आकृती ऐ मध्ये नागर प्रकारच्या उपपीठाचा एक प्रकार दाखविला आहे.

द्राविड प्रकारच्या उपपीठाचे थरविभाग आकृती ओ मध्ये दाखविले आहेत. फांसनाकार प्रकारच्या प्रासादांच्या उपपीठांचे थरविभाग द्राविड प्रकारच्या उपपीठा प्रमाणे असतात.

आकृती औ मध्ये भूमिज प्रकारच्या उपपीठाचे थरविभाग दिले आहेत. वराट, वलभी, दारुज व सिंहावलोकन प्रकारच्या प्रासादांना भूमिज प्रकारचे उपपीठ ठेवतात.

**उपपीठाची उंची**

नागर प्रासादाच्या उपपीठाची उंची प्रासादाच्या रुंदीवर अवलंबून असते. त्याची माहिती सारणी ५ मध्ये दिली आहे. लतिन, सांधार, मिश्रक, विमान व रथारूह या प्रकारच्या प्रासादांच्या उपपीठांची उंची सारणीत दिल्याप्रमाणे प्रासादाच्या रुंदीच्या प्रमाणात असते.

द्राविड व फांसनाकार प्रकारच्या प्रासादांच्या उपपीठांची उंची ही त्या प्रासादांच्या रुंदीच्या निम्मे असते. भूमिज प्रासादाच्या उपपीठाची उंची त्याच्या शिखराच्या उंचीच्या निम्मे असते; किंवा प्रासादाची उंची दहा भागांत विभागली तर उपपीठाची उंची १ ½ भाग असते. उपपीठाच्या थरविभागांचे एकूण निर्गमन प्रासादाच्या उंचीच्या १/१० असते. वलभी व दारुज प्रासादांच्या उपपीठांची उंची भूमिज प्रासादाच्या उपपीठा प्रमाणे असते.

वराट प्रासादाच्या बाबतीत जर प्रासादाची उंची २० भाग असेल तर उपपीठाची उंची ५, ६ अथवा ७ भाग असते. वराट प्रासादाच्या उपपीठाची उंची भूमिज उपपीठापेक्षा जवळ जवळ दुप्पट असते.

**प्रासादाची भिंत**

नागर प्रासादाच्या भिंतीची उंची प्रासादाच्या रुंदीवर अवलंबून असते. त्यांचे प्रमाण सारणी ६ मध्ये दिले आहे. मिश्रक, सांधार, लतिन, विमान-नागर, विमानपुष्पक, दारुज व रथारुह प्रकारच्या प्रासादांची भिंत त्यांच्या रुंदीच्या प्रमाणात या सारणीत दिल्या प्रमाणेच असते.

अनुक्रमणिका

**सारणी ५**

**नागर प्रासादाची रुंदी व उपपीठाची उंची यांचे प्रमाण**

| प्रासादाची रुंदी (क्ष) हात | उपपीठाची उंची अंगुले | शेरा |
|---|---|---|
| १ | १२ | |
| २ | १६ | |
| ३ | १८ | |
| ४ | - | |
| ५ | ३० | |
| ६ | ३६ | उपपीठाची उंची = |
| : | : | |
| १० | ६० | ३० + ६ (क्ष - ५) |
| ११ | ६३ | |
| १२ | ६६ | |
| १३ | ६८ | उपपीठाची उंची = |
| : | : | |
| ३६ | ११४ | ६६ + २ (क्ष - १२) |
| ३७ | ११५ | उपपीठाची उंची = |
| : | : | |
| ५० | १२८ | ११४ + (क्ष - ३६) |

**सारणी ६**

**नागर प्रासादाची रुंदी व भिंतीची उंची यांचे प्रमाण**

| प्रासादाची रुंदी (क्ष) हात | भींतीची उंची हात-अंगुले | शेरा |
|---|---|---|
| १ | १-९ | |
| २ | २-७ | |
| ३ | ३-५ | |
| ४ | ४-३ | |
| ५ | ५-१ | |
| ६ | ५-१५ | |
| : | : | } भिंतीची उंची = ५ हा १३अं + १४ (क्ष -५) अं |
| ७ | ६-५ | |
| ८ | ६-१९ | |
| ९ | ७-९ | |
| १० | ८ | |
| : | : | } भिंतीची उंची = ७ हा - ९अं + १२(क्ष -१०)अं |
| १९ | १२-१२ | |
| २० | १३-७ | |
| : | : | } भिंतीची उंची = १३ हा - ७अ + १२(क्ष -२०)अ |
| ३० | १८-७ | |
| ३१ | १८-१६ | } भिंतीची उंची = १८ हा - १६अं + ९(क्ष -३०)अं |
| ५० | २५-१९ | |

अनुक्रमणिका

द्राविड, भूमिज, विमान व वराट प्रकारच्या प्रासादांच्या भिंतीची (तळमजल्याच्या) उंची प्रासादाच्या रुंदीइतकी असते. वलभी प्रासादाच्या भिंतीची उंची याच नियमाने ठरविली जाते.

सिंहावलोकन प्रासादाच्या भिंतीची उंची त्याच्या रुंदीच्या निम्मे असते.

**भिंतीवरील थरविभाग**

नागर प्रासादाच्या मंडोवरातील थरविभागांची व त्यांच्या उंचीची मापे सारणी ७ मध्ये दिली आहेत. ज्या प्रकारच्या प्रासादांच्या भिंतीच्या उंचीचे प्रमाण नागर प्रासादाच्या भिंती प्रमाणेच घेतले जाते त्या प्रासादांच्या भिंतीचे थरविभाग व त्यांचे परस्पर प्रमाण सारणी ७ मध्ये दिल्याप्रमाणेच असते.

भूमिज प्रासादाच्या भिंतींच्या थरविभागांची माहिती सारणी ८ मध्ये दिली आहे. हे थरविभाग नागर प्रासादाच्या भिंतीच्या थर विभागाप्रमाणेच असतात मात्र उद्‌गम व कपोतालि (आ) हे थरविभाग येथे नसतात. त्यामुळे थर विभागांची परस्पर प्रमाणे नागर प्रासादाहून वेगळी आहेत.

द्राविड व फांसनाकार प्रासादांच्या भिंतीवर असे थरविभाग नसून तेथे निरनिराळ्या देवदेवतांचे पुतळे बसविलेले असतात.

**सारणी ७**
**नागर प्रासादाची भिंत**

**सारणी ८**
**भूमिज प्रासादाची भिंत**

| थरविभाग | भाग | प्रमाण | भाग | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| खुरक | ५ | | १.२५ | |
| कुम्भक | २० | २०/१३९ = ०.१४४ | १ | १ ÷ ६·२५ =०·१६ |
| कलश | ८ | ०· ०५७ | ½ | ०·०८ |
| अंतः पट्ट | २·५ | ०·०१८ | ⅛ | 0·0४ |
| कपोतालि (अ) | ८ | ०·०५७ | ½ | ०·०८ |
| मञ्चिका | ९ | ०·०६४ | ½ | ०·०८ |
| जंघा | ३५ | ०·२५२ | २ | ०·३२ |
| उद्‌गम | १५ | ०·१०८ | - | - |
| भरणी | ८ | ०·०५७ | ½ | ०·०८ |
| शिरावटी | ५ | ०·०३६ | ½ | ०·०८ |
| पट्ट | ५ | ०·०३६ | ½ | ०·०८ |
| कपोतालि (आ) | ८ | ०·०५७ | - | - |
| पट्ट | २·५ | ०·०१८ | ½ | ०·०८ |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कूटच्छाद्य | १३ | ०·०९३ | ¾ | ०·१२ |
| एकूण | १४४ | | ७·५ | |

**दरवाजांची मापे**

निरनिराळ्या प्रकारच्या प्रासादांच्या दरवाजांची मापे निरनिराळी असतात. नागर, द्राविड व भूमिज प्रकारच्या प्रासादांच्या दरवाजांची मापे प्रासादाच्या रूंदीवर अवलंबून असतात. मात्र प्रासादाच्या प्रकाराप्रमाणे दरवाजाच्या उंचीचे प्रासादाच्या रुंदीशी प्रमाण निरनिराळे असते, त्याची माहिती सारणी १ मध्ये दिली आहे. दरवाजाची रुंदी ही सरासरी दरवाजाच्या उंचीच्या निम्मे व जास्तीत जास्त (½ + १/१६) उंची इतकी असते. नागर प्रासादाच्या दरवाजाची मापे ही मिश्रक, लतिन, सांधार, सिंहावलोकन, विमाननागर व विमानपुष्पक प्रकारच्या प्रासादांच्या दरवाजांसाठीही वापरतात. फांसनाकार प्रासादाच्या दरवाजाचे माप द्राविड प्रकारच्या प्रासादाच्या दरवाजाच्या मापाप्रमाणे असते. विमान, वराट आणि वलभी प्रासादांच्या दरवाजांचे माप भूमिज प्रासादाच्या दरवाजाप्रमाणे असते.

**सारणी ९**

**दरवाजाची उंची व प्रासादाची रुंदी यांचे प्रमाण**

**दरवाजाची उंची (अंगुले)**

| प्रासादाची रुंदी | प्रासादाचा प्रकार | | |
|---|---|---|---|
| हात | नागर | द्राविड | भूमिज |
| १ | १६ | १० | १२ |
| २ | ३२ | २० | २४ |
| ३ | ४८ | ३० | ३६ |
| ४ | ६४ | ४० | ४८ |
| ५ | ६७ | ५० | ६० |
| ६ | ७० | ६० | ७२ |
| ७ | ७३ | ६५ | ८४ |
| ८ | ७६ | ७० | ९० |
| ९ | ७८ | ७५ | ९६ |
| १० | ८० | ८० | ९८ |
| ११ | ८२ | ८२ | १०० |
| १५ | ९० | ९० | १०८ |
| २० | १०० | १०० | ११८ |
| २५ | ११० | ११० | १२८ |
| ३० | १२० | १२० | १३८ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | १३० | १३० | १४८ |
| ४० | १४० | १४० | १५८ |
| ४५ | १५० | १५० | १६८ |
| ५० | १६० | १६० | १७८ |

**प्रासादाचे शिखर**

नागर प्रासादाच्या शिखराची उंची उपपीठ व भिंत यांच्या उंचीच्या बेरजेच्या सव्वापट असते. तसेच प्रासादाच्या उंचीचे २० भाग केले तर भिंतीची उंची ८, ८·५ किंवा ९ भाग ठेवतात. त्यावरुनही शिखराची उंची काढता येते. मिश्रक, सांधार, लतिन व बहुधा विमान नागर व विमान पुष्पक या प्रकारांच्या प्रासादांच्या शिखराचे माप याप्रमाणेच घेतात.

द्राविड प्रासादांत उपपीठ ते शिखराचे वरचे टोक (कळस वगळून) ही उंची प्रासादाच्या रुंदीच्या १·४ पटीत असते. हा शिखराच्या उंचीचा नियम भूमिज, वराट विमान तसेच वलभी व फांसनाकार प्रकारच्या प्रासादांनाही लागू होतो.

**प्रासादाची घंटा**

द्राविड प्रासादात मजल्यांच्या शिखराच्यावर जो घुमटाकार भाग असतो त्याला घंटा म्हणतात. द्राविड प्रासादाच्या घंटेची रुंदी १६ भाग असेल तर उंची १० भाग असते. वराट प्रासादाच्या घंटेची रुंदी १२ भाग असेल तर उंची नऊ भाग असते, व ही घंटा मंदारपुष्पा सारखी दिसते. सिंहावलोकन प्रासादाची घंटा अशीच असते मात्र घंटेच्या उंचीचे तीन भाग करून सगळ्यात खालचा भाग अष्टकोनी, मधला भाग १६ कोनी व वरचा भाग ३२ कोनी असतो. वलभी प्रकारच्या प्रासादाच्या छप्पराची रुंदी आठ भाग असेल तर उंची सहा भाग असते.

**आमलसार**

द्राविड, फांसनाकार वराट, सिंहावलोकन व दारुज प्रासाद सोडून इतर सर्व प्रकारच्या प्रासादांना आमलसार असतो. आमलसाराचा व्यास शिखराच्या स्कन्धावरील परस्परांसमोर असलेल्या उपरथांमधील अंतराइतका असतो. त्याची उंची त्याच्या व्यासाच्या निम्मे असते. आमलसाराचे थरविभाग आहेत ग्रीवा, अण्डक, चन्द्रिका व आमलसारिका, असे थरविभाग असलेला आमलसार नागर, लतिन, सांधार आणि मिश्रक प्रकारच्या प्रासादांना असतो. विमान, विमानपुष्पक, भूमिज व विमाननागर प्रासादांच्या आमलसारांची मापे वर दिल्याप्रमाणेच असतात. मात्र त्याचे थरविभाग आहेत कंठ, ग्रीवा कुड्मल, पद्मच्छत्र व उपच्छत्र.

अनुक्रमणिका

**कळस**

कळसाची मापे प्रासादाच्या रुंदीवर अवलंबून असतात. कळसाच्या अंडकाची रुंदी प्रासादाच्या रुंदीच्या १/८ असते किंवा शिखराची पायथ्यापाशी जी रुंदी तिच्या १/५ असते. याहून वेगळे माप म्हणजे अंडकाची रुंदी आमलसाराच्या १/४ × १·२५ व्यास इतकी असावी. कळसाची उंची अंडकाच्या रुंदीच्या दीडपट असते. या मापाचा कळस नागर, मिश्रक, सांधार, लतिन, दारुज, विमाननागर, विमानपुष्पक व बहुधा सिंहावलोकन तसेच रथारुह प्रासादाला असतो.

द्राविड प्रासादाच्या कळसाच्या अंडकाची उंची प्रासादाच्या रुंदीच्या १/६ असते. कळसाची उंची बहुधा अंडकाच्या रुंदीच्या दीडपट असते. विमान, भूमिज, वराट, वलभी व बहुधा फांसनाकार प्रकारच्या प्रासादांना अशा मापाचा कळस बसवितात.

**प्रासादाची वर्गीकरणासाठी ठळक लक्षणे**

**नागरप्रसाद** -

(अ) शिखराची उंची, उपपीठ व भिंत यांच्या उंचीच्या बेरजेपेक्षा जास्त असते. शिखर प्रहार थरापासून सुरु होऊन आमलसारापर्यंत असते.

(आ) शिखराला उरुश्रृंग, श्रृंग, तिलक प्रत्यंग, रथिका वगैरेंनी अलंकारिलेले असते. नागर प्रासादांच्या शिखरांत हे सर्व अवयव असावेतच असे नाही. पण एक, दोन तरी असतातच.

(इ) शिखरावर पुढच्या भद्रावर शुकनासिका असते. तिची उंची शिखराच्या उंचीच्या निम्मे अथवा पाऊण पट असते.

(ई) नागरप्रसादाचे वर्णन करताना दिलेले थरविभाग भिंतींवर असतात.

**द्राविडप्रासाद** -

(अ) यात एक ते बारा मजली व कांही वेळेला सोळा मजल्यापर्यंत मजले असतात.

(आ) सर्वात वरती घंटा असते. ती चौरस, अष्टकोनी अथवा वर्तुळाकार असते. तिच्या खाली वेदीचा थरविभाग असतो.

(इ) एक मजली प्रासादाची फालना त्र्यंग प्रकारची असते. तीन मजली प्रासादाला पंचांग प्रकारची तर पांच मजली प्रासादाला सप्तांग प्रकारची फालना असले. सात मजली प्रासादाला नवांग प्रकारची फालना असते.

(ई) नागरप्रासादाप्रमाणे तळमजल्याच्या भिंतीचे थरभागांत विभाग केलेले नसतात.

अनुक्रमणिका

**मिश्रकप्रासाद**

निरनिराळ्या प्रासादाच्या अवयवांचे मिश्रण यात केलेले असते म्हणून यास मिश्रकप्रासाद म्हणतात. (सारणी १०)

**सारणी १०**
**मिश्रकप्रासाद निरनिराळ्या प्रासादांच्या अवयवांच्या मिश्रणाने होतो.**

| अधोच्छंद | उपपीठ | भिंत | शिखर |
|---|---|---|---|
| नागर | - | नागर | विमान |
| नागर | नागर | द्राविड (मजले असतात) | विमान |
| द्राविड | द्राविड | वराट | भूमिज |
| भूमिज | - | भूमिज | द्राविड |
| भूमिज | - | भूमिज | वराट |

**विमानप्रासाद**

(अ) भूमिज प्रासादाप्रमाणे याच्याही शिखरावर अनेक 'भूमी' असतात. या भूमी शिखराच्या कर्णावर असतात. भूमिज प्रासादा प्रमाणे शिखराच्या सर्व भागावर नसतात.

(आ) शिखर जणू काही फुलांच्या हारांनी सजविलेले असते. त्यावर सुंदर वेलबुट्या असतात.

(इ) भूमिज प्रासादाप्रमाणे या प्रासादाला सर्वात वरती घण्टा नसते. या प्रकारच्या प्रासादाचे उदाहरण म्हणजे ओरिसा शैलीची मंदिरे.

**भूमिजप्रासाद- (आकृती २६)**

(अ) शिखरावरती अनेक भूमी किंवा कूटे एकावर एक कोरलेली असतात.

(आ) शिखरावरील भूमींची संख्या व फालनांची संख्या एक असते. एकावर एक असलेल्या भूमी पांच असतील तर प्रासाद पंचांग प्रकारचा असतो; सात असतील तर प्रासाद सप्तांग प्रकारचा असतो.

(इ) दोन भूमींच्या मधल्या जागी जंघेचा थरविभाग असतो.

**सांधारप्रासाद.**

(अ) या प्रासादाचे प्रमुख लक्षण म्हणजे याला प्रदक्षिणा मार्ग असतो. हा प्रामुख्याने नागर प्रासाद असतो.

(आ) त्याची कमीत कमी रुंदी दहा हात असते

(इ) ते पर्वताकार असतात.

**वराटप्रासाद-**

(अ) भूमिज प्रासादाच्या शिखराप्रमाणे शिखर असते. मात्र एकमेकावर असलेल्या भूमिच्या मध्ये जंघेचा थर नसतो.

(आ) शिखराचा आकार मंदार फुलाप्रमाणे असतो.

(इ) भूमिज व वराटप्रासाद यांत नागर व द्राविडप्रासादांच्या शिखरांचे मिश्रण झालेले असते. शिखराचा आकार नागरप्रासादाप्रमाणे असतो. परंतु उरुश्रृंग, श्रृंग वगैरे शिखरावर नसून तेथे भूमी असतात आणि द्राविडप्रासादातल्या प्रमाणे सर्वात वर घंटा असते.

**लतिनप्रासाद-**

लतिन आणि नागर प्रकारच्या प्रासादांच्या शिखरात फरक म्हणजे या शिखराला वेलबुट्यांची नक्षी असते. श्रृंग, तिलक वगैरेंनी अलंकरण केलेले नसते.

**वलभीप्रासाद-**

हा प्रासाद आयताकार असून मागची बाजू अर्धवर्तुळाकार असते व शिखर हस्तिपृष्ठाकृती असते.

**फांसनाकार अथवा नपुंसक प्रासाद-**

याचे शिखर पायऱ्या पायऱ्यांनी बनविलेले असते. कोनार्क येथील सूर्यमंदिराच्या मंडपाचे शिखर या प्रकारचे आहे.

**सिंहावलोकन प्रासाद-**

(अ) यावर अनेक सिंहकर्णाकृती असतात.

(आ) सर्वात वरती घंटा असते.

**दारूज प्रासाद-**

हा सिंहावलोकन प्रासादाप्रमाणे असतो, मात्र लाकडाचा तयार करतात.

अनुक्रमणिका

**रथारुह प्रासाद**-

तीन चाकाच्या आधारावर उभा आहे असा दाखविलेला नागरप्रासाद, विमाननागर व विमानपुष्पकप्रासाद.

हे प्रासाद नागरप्रासादाहून कसे भिन्न प्रकारचे असतात याचा उलगडा होत नाही. विमानपुष्पकप्रासादाचे उरुश्रृंग फुलाप्रमाणे असून त्याची घंटा अर्का (रुई) च्या फुलाप्रमाणे असते.

**महाशिवरात्र** **र. पु. कुळकर्णी**

**१३-२-९९**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

— निवेदन — ........................................................................................... ४

प्रस्तावना .............................................................................................................८

प्रथमोऽध्यायः । अध्याय एक .................................................................... ३१

द्वितीयोऽध्यायः। अध्याय दोन........................................................................४८

तृतीयोऽध्यायः । अध्याय तीन........................................................................ ६७

चतुर्थोऽध्यायः। अध्याय चार ........................................................................ ९६

पञ्चमोऽध्याय । अध्याय पाच ......................................................................११२

षष्ठोऽध्यायः। अध्याय सहा..........................................................................१२२

सप्तमोऽध्यायः । अध्याय सात ....................................................................१३६

संदर्भ ग्रंथ सूची ........................................................................................... १८१

स्थपत्य विषयक शब्दांचे अर्थ ...................................................................... १८२

प्रासादमण्डन — सूची.................................................................................... १८६

# प्रासादमण्डनम्

## प्रथमोऽध्यायः । अध्याय एक

### मंगलाचरणम्

**गणेशाय नमस्तस्मै निर्विघ्नं सिद्धिहेतवे ।**
**आदिगौरी समुद्भूतः तेजसं शंभवाय वै ॥१॥**

मूळ गौरीपासून निर्माण झालेल्या तेज (स्वरूप) गणपतीला तसेच शंकराला (हाती घेतलेले ग्रंथकार्य) निर्विघ्नपणे सिद्धीस जावे म्हणून मी नमस्कार करतो. (१)

**महामायेति या गीता चिन्मयी मुनिसत्तमैः ।**
**तनोतु वाग्विलासं मे जिव्हायां सा सरस्वती ॥२॥**

ऋषिश्रेष्ठांनी जिची महामाया व चिन्मयी म्हणून स्तुती गाईली आहे त्या सरस्वतीने माझ्या जिभेवर वाग्विलासाची उभारणी करावी. (२)

**श्री सृष्टा सूत्रधारस्य प्रासादा विश्वकर्मणा ।**
**प्रासादमण्डनं ब्रूते सूत्रधारेषु मण्डनः ॥३॥**

सूत्रधार विश्वकर्म्याच्या कृपेने सृष्टीची (जगाची) निर्मिती झाली. मण्डन नावाचा सूत्रधार (दुसऱ्या पक्षी सूत्रधारांमध्ये श्रेष्ठ असलेला) प्रासादमण्डन (हा ग्रन्थ) सांगत आहे. (३)

**गृहेषु यो विधिः पोक्तो विनिवेशे प्रवेशने।**
**स एव विधिना कार्यो देवतायतनेष्वपि ॥४॥**

(प्रथम) गृहप्रवेशासाठी तसेच रहाण्यासाठी जो (धार्मिक) विधी सांगितला आहे त्याच (पूजा-) विधीने देवालयाच्या प्रवेशाचा व देवाच्या (देवमूर्तीच्या) स्थापनेचा विधी करावा. (४)

**हिमाद्रेरुत्तरे पार्श्वे चारुदारुवनं परम्।**
**पावनं शंकरस्थानं तत्र सर्वैः शिवोऽर्चितः ॥५॥**

हिमालय पर्वताच्या उत्तरेकडील बाजूस सुंदर व मोठे वृक्षारण्य आहे. ते महादेवाचे पवित्र स्थान असून तेथील सर्व (वस्तू) महादेवाच्या पूजेस योग्य आहेत. (५)

अनुक्रमणिका

**प्रासादानां जात्युद्देशः ।**

**प्रासादाकार पूजाभिर्देवदैत्याभिः क्रमात्।**
**चतुर्दश समुत्पन्नाः प्रासादानां च जातयः ॥६॥**

प्रासादांच्या जातींचे (निरनिराळे प्रकार होण्याचे) कारण-

प्रासादांच्या त्यांच्या आकारानुसार, देव, दैत्य इत्यादिंना अनुसरून तसेच त्याच्यात केल्या जाणाऱ्या पूजांना अनुसरून अनुक्रमाने चौदा जाती निर्माण झाल्या आहेत. (६)

[अपराजित पृच्छात (१०६. ११-१६) प्रासादांच्या चौदा जातींबद्दल जास्त माहिती दिली आहे. **१) नागर** प्रासाद देवांचा असतो, **२) द्राविड** प्रासाद श्रेष्ठ दानवांचा, **३) लतिन** प्रासाद गंधर्वांचा व **४) विमान** प्रासाद यक्षांचा असतो. विद्याधरांचा **५) मिश्रक** प्रासाद, वसूंचा **६) वराटक** प्रासाद तसेच नागदेवतांचा **सांधार** प्रासाद व नरेन्द्रांचा **७) भूमिज** प्रासाद असतो. सूर्यलोकात **९) विमाननागरच्छन्द** व नक्षत्रांचा मुख्य म्हणजे चंद्रलोकांत **१०) विमान पुष्पक** जातीचे प्रासाद तयार झाले. पार्वतीपासून **११) वलभी** आकाराचा प्रासाद व हरसिद्धि इत्यादी देवतांपासून **१२) सिंहावलोकन** प्रासाद तयार झालेत. व्यन्तर. स्थानी असलेल्या देवांपासून **१३) फांसनाकार** प्रासाद व इन्द्रलोकांत निरनिराळे **१४) रथ (रथारूह)** प्रासाद तयार झाले.

**उत्तम जात्यष्टकम् ।**

**नागरा द्राविडा चैव भूमिजा लतिनास्तथा।**
**सावधारा विमानादि नागराः पुष्पकान्तिता ॥७॥**

**उत्तम जातींचे आठ प्रकार**

नागर, द्राविड व भूमिज तसेच लतिन, सावधार (प्रदक्षिणा मार्ग असलेले) व विमान (जातीच्या प्रासादांपासून पुष्पक प्रासादांपर्यंत हे) नागर प्रकारचे प्रासाद आहेत. (७)

[पुष्पकान्तिता हा शब्द घेतल्यावर एकंदर नागर ते विमानपुष्पकापर्यंत दहा प्रासादांची नोंद होते. श्लोक ६ ची टीप पहा. तसेच हे सर्व प्रासाद नागर जातीचे नव्हेत. तेव्हा पुष्य-कान्तिता हा शब्द पुष्पकान्विता असा सुधारून घेतल्यास खाली दिल्याप्रमाणे प्रासादांचे आठ प्रमुख प्रकार होतात.

१) नागर २) द्राविड ३) लतिन ४) भूमिज ५) सांधार ६) विमान ७) विमाननागरच्छन्द व ८) विमान पुष्पक.]

**प्रासादमिश्रकाश्चैवमष्टौ जातिषु चोत्तमाः।**
**सर्वदेवेषु कर्तव्यः शिवस्यापि विशेषतः ॥८॥**

अनुक्रमणिका

तसेच मिश्रक प्रासाद अशा (प्रासादांच्या) आठ उत्तम जाती आहेत. हे प्रासाद देवांसाठी व त्यातल्या त्यात विशेषतः शंकाराच्या (देवालयासाठी) योग्य आहेत. (८)

[नागर, द्राविड, भूमिज व लतिन असे प्रासादांचे चार प्रमुख प्रकार आहेत. त्यात नागर-भूमिज, नागर-लतिन, द्राविड-भूमिज व द्राविड-लतिन असे मिश्रप्रासाद होतात.]

**प्रासादानां च सर्वेषां जातयो देशभेदतः।**
**चतुर्दश प्रवर्तन्ते ज्ञेया लोकानुसारतः ॥९॥**

सर्व प्रकारच्या प्रासादांच्या जाती ह्या (निरनिराळ्या) देशांप्रमाणे वेगवेगळ्या आहेत. लोकरीतीप्रमाणे प्रासादांचे (एकंदर) चौदा प्रकार झाले आहेत.

[नागर जातीचे प्रासाद गुजराथ सौराष्ट्र, माळवा इत्यादि प्रदेशात प्रामुख्याने आहेत. वेण्णा नदीच्या खाली कृष्णा कुमारी पर्यंत द्राविड प्रासादांचे प्राबल्य आहे. लतिन प्रासाद विदर्भ व मध्यप्रदेशांत प्रचलित आहेत तर विमान प्रासाद ओरिसा राज्यात बांधले जातात. अशारितीने प्रासादांच्या निरनिराळ्या जाती या देशपरत्वे निर्माण झाल्या आहेत.]

**लक्ष्यलक्षणतोऽभ्यासाद् गुरुमार्गानुसारतः।**
**प्रासादभवनादीनां सर्वज्ञानमवाप्यते ॥१०॥**

(देव-) प्रासाद व मनुष्यांसाठी भवन इत्यादी बद्दलचे पूर्ण ज्ञान हे त्यांच्या विशिष्ट लक्षणांचा अभ्यास करुन व गुरुपदेश अनुसरून मिळवावे लागते. (१०)

**सुलग्ने शुभनक्षत्रे पंचग्रहबलान्विते ।**
**मास संक्रादि वत्सादि (?) निषेधेकालवर्जिते ॥११॥**

चांगल्या लग्नी, शुभ नक्षत्र असताना, पाच ग्रह बलवान असताना, महिना, संक्रान्त, वत्स इत्यादी (शुभ असताना) तसेच निषिद्ध काल वर्ज्य करून [जमीनीची पहाणी इत्यादी करावेत). (११)

**अथ भूमिनिरूपणम्।**

**सर्वदिक्षुप्रवाहां वा प्रागुदकशंकरप्लवम् ।**
**भुवं परीक्ष्य सिंचेत पंचगव्येन कोविदः ॥१२॥**

**जमीनीबद्दलची माहिती-**

सर्व दिशांकडे पाण्याचा ओघ वाहतो अशी (म्हणजे उंचावर असलेली) किंवा पूर्वेकडे, उत्तरेकडे अथवा ईशान्य दिशेकडे उतार असलेली जमीन निवडून तेथील जमीनीची परीक्षा करावी (व नंतर) शहाण्या- (शिल्पी-) ने तेथे पंचगव्याचा सडा घालावा. (१२)

अनुक्रमणिका

[जमीनीचा उतार दक्षिण दिशेकडे किंवा तिच्याकडील उप-दिशांकडे म्हणजे आग्नेय्य व नैऋत्य दिशांकडे असल्यास अशी जमीन शुभ मानत नाहीत कारण दक्षिण ही पितरांची, यमाची दिशा आहे.

जमीनीची परीक्षा अनेक तऱ्हेनी करता येते. तिचा थोडक्यात परिचय खाली करून दिला आहे.

अपराजितपृच्छांत (५१.१३-२४) **जमीनीच्या उतारावरून** तिची त्याज्यात्याज्यता ठरविली आहे. पूर्व दिशेकडे उतार असलेली जमीन श्रेष्ठ समजली जाते. प्रासादासाठी अशी जमीन निवडल्यास आयुष्य, लक्ष्मी व बल यांची वाढ होते. आग्नेय्य दिशेकडे उतार असलेली जमीन आगीचे भय दर्शविते. दक्षिण दिशेकडे उतार असलेली जमीन नेहमीच धनाचा नाश करणारी व रोगानी पीडा देणारी असते. नैऋत्य दिशेकडे उतार असलेली जमीन ही अशुभ असते कारण अशी जमीन मृत्युदायक संपत्तीची हानी करणारी व रोगदायक असते. जी जमीन पश्चिमेकडे उतरती असते ती मालकाची शेती, धन व धान्याचा नाश करणारी असते. वायव्य दिशेकडे उतार असलेली जमीन शत्रुत्व निर्माण करते, वैराग्य आणते व कुलाचा क्षय करणारी असते. तेव्हा अशी उतार असलेली जमीन देखील अशुभ मानतात. या उलट उत्तर दिशेकडे उतार असलेली जमीन नेहमीच लाभदायक, पुत्र, पौत्र यांची वाढ करणारी, काम, भोग व धन देणारी असते. ईशान्य दिशेकडे उतरती असलेली जमीन शुभ मानतात कारण ती सौख्य व सौभाग्य देणारी, तसेच ऐश्वर्य व संपत्ती देणारी असते.

जमीन प्रासादांसाठी योग्य की अयोग्य आहे हे ठरविण्यासाठी तिच्यावर कांही प्रयोग करतात; त्यातील महत्वाचे दोन प्रकार खाली दिले आहेत.

(अ) एक हात खोल व तितक्याच लांबी व रुंदीचा खड्डा खोदावा. खड्डा खोदतांना बाहेर काढलेली माती पुन्हा खड्ड्यात भरावयाची. सर्व माती भरून देखील जर खड्डा भरला नाही तर ती कनिष्ठ जमीन, माती घालून जर खड्डा पूर्ण भरला तर ती मध्यम प्रतीची जमीन व खड्डा भरून माती उरली तर ती उत्तम प्रकारची जमीन समजतात. थोडक्यात ज्या जमीनीतील मातीची घनता जास्त आहे ती जमीन उत्तम समजतात (अपराजित पृच्छा ५१· ७-८) या प्रयोगाची माहिती शतपथब्राह्मणांत देखील (३·६·१·१६-१७) मिळते. यावरून हा प्रयोग वैदिक काळाइतका प्राचीन असावा असे म्हणता येते.

(आ) एक हात खोल व तितक्याच लांबी व रुंदीचा खड्डा खोदावा. तो पाण्याने काठोकांठ भरावा व खड्ड्यापासून शंभर पावले अंतर चालत जाऊन परत खड्ड्यापाशी सावकाश यावे या कालावधीत खड्ड्यामधील पाण्याची पातळी अजिबात कमी झाली नसेल तर ती उत्तम जमीन, जर एक-चतुर्थांश हाताने पाण्याची पातळी कमी झाली असेल तर ती मध्यम जमीन व अर्ध्या हाताने पाण्याची पातळी कमी झाली असेल तर ती कनिष्ठ जमीन समजली जाते. (अपराजित पृच्छा ५१·९)

अपराजित पुच्छांत (५१·१२) भूमीची तिचा रंग, गंध, चव वगैरेनीही परीक्षा करावी असे सांगितले आहे. याविषयीची माहिती तक्त्यात दिली आहे.

अनुक्रमणिका

**तक्ता १·१**

**मातीचे वर्गीकरण**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **मातीची जाती** | | | |
| **गुणधर्म** | **ब्राह्मण (सर्वोत्कृष्ट)** | **क्षत्रिय (उत्कृष्ट)** | **वैश्य (चांगली)** | **शूद्र (त्याज्य)** | **जमीन** |
| रंग | पांढरा | तांबडी | पिवळी | काळी | |
| गंध | तुपाप्रमाणे | रक्ताप्रमाणे | मिठाप्रमाणे | विष्ठेप्रमाणे | |
| चव | मधुर | कषाय | खारट | कडू | |

**मणिना स्वर्णरूप्येण विद्रुमेण फलेन वा।**
**चतुःषष्टिपदैर्वास्तुं लिखेद्वापि शतांशकैः ॥१३॥**

(जमीन निवडल्या नंतर) स्फटीक मण्याने, सोने, चांदी, विद्रुम अथवा फळीने वास्तूचे ६४ पदांमध्ये किंवा १०० पदांमध्ये (घरांमध्ये) विभाग पाडावेत. (१३)

[काडीच्या टोकाला स्फटीक मणी किंवा विद्रुम बसवून अथवा सोन्याच्या किंवा चांदीच्या काडीने, ज्या जागेवर प्रासाद बांधावयाचा, तिच्यावर रेघा मारून ६४ अथवा १०० घरांचे वास्तुपद मण्डल आखावे. अध्याय ८ श्लोक १०१ ते ११४ त वास्तुपद मण्डलाची जास्त माहिती दिली आहे]

**पिष्टेन वाक्षतैरुर्ध्वं ततो वास्तुं समर्चयेत्।**
**पूर्वोक्तेन विधानेन बलिपुष्पादि पूजनैः ॥१४॥**

पीठाने किंवा अक्षतांनी या रेघा भरून नंतर वास्तूची (वास्तु पुरुषाची ?) पूजा करावी. पूर्वाचार्यांनी सांगितलेल्या पद्धतीने (धार्मिक विधीने) बली देऊन व फुले वाहून ही पूजा करावी. (१४)

**इन्द्रो वन्हिः पितृपतिनैर्ऋतो वरुणो मरुत् ।**
**कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशां क्रमात् ॥१५॥**

पूर्व दिशेपासून सुरुवात करून इंद्र, अग्नी, पितरांचा प्रमुख (यम), नैऋति, वरूण, वायू, कुबेर व ईशान हे अनुक्रमे दिक्पाल आहेत. (१५)

| **दिशा** | **दिक्पाल** | **दिशा** | **दिक्पाल** | **दिशा** | **दिक्पाल** |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व | इन्द्र | नैर्ऋत्य | निर्ऋति | उत्तर | कुबेर |
| आग्नेय्य | अग्नि | पश्चिम | वरूण | ईशान्य | ईशान |
| दक्षिण | यम | वायव्य | वायु | | |

अनुक्रमणिका

**दिक्पालाः क्षेत्रपालाश्च गणेशश्चण्डिका तथा।**
**एतेषां विधिवत् पूजां कृत्वा कर्म समाचरेत् ॥१६॥**

दिक्पाल, क्षेत्रपाल, गणपति तसेच चण्डी यांची विधिपूर्वक पूजा करून (मग पुढील) कामास सुरुवात करावी. (१६)

**निषिद्धकालकथनम् ।**

**धनुर्मीनस्थिते सूर्ये गुरू शुक्रेऽस्तगे विधौ। +त्रि**
**वैधृतौ व्यतिपाते च दग्धे नेष्टं कदाचन ॥१७॥**


**निषिद्ध कालाची माहिती -**

सूर्य धनू (किंवा) मीन राशीत असताना, गुरु व शुक्र (हे ग्रह) अस्तंगत असताना, विधृति, व्यतिपात, दग्ध तसेच नष्ट तिथीला कधीही (प्रासादाच्या बांधणीस) सुरुवात करू नये. (१७)

**कन्यादि त्रित्रिर्गे सूर्ये द्वारं पूर्वादिषु त्यजेत्। +भे**
**सृष्ट्या वत्स मुखं तत्र स्वामिनो हानिकृद् यतः ॥१८॥**

कन्यादि तीन तीन राशीत (म्हणजे कन्या, तूळ व वृश्चिक राशीत) सूर्य असतांना (प्रासादाचे) दार पूर्वेकडे असू नये. (कारण) त्या वेळेस वत्साचे तोंड निसर्गतःच पूर्वेकडे असते व ते (पूर्वे कडील दार) प्रासादाच्या मालकास हानिकारक असते. (१८)

कल्पना अशी की पृथ्वी शेष नागाच्या डोक्यावर आहे व तो नाग वर्षारंभी ईशान्येकडून प्रदक्षिणा क्रमाने स्वतः भोवती फिरण्यास सुरुवात करतो व ही एक फेरी तो एका वर्षांत पुरी करतो. नागाचे तोंड व शेपटी ही विरुद्ध दिशांना असतात. प्रासाद बांधावयास सुरुवात करतांना त्या काळी ज्या दिशेला नागाचे तोंड असेल त्या दिशेला प्रवेशद्वार असू नये (राजवल्लभ १·२२-२४)




**आकृति (१) वत्सचक्र, (नागवास्तु) श्लोक १·१८**

**अनुक्रमणिका**

याबाबत ठक्कुर फेरुने 'वास्तुसार प्रकरणम्' (१·२०) या पुस्तकात चांगली माहिती दिली आहे. नाग ईशान्येकडून सुरुवात करून वर्षांत एक फेरी पूर्ण करतो. म्हणजेच हा नाग दर दिवशी सरासरी एक अंश फिरतो. पण ठक्कुर फेरुच्या मते नागाचा फिरण्याचा वेग हा कमी जास्त आहे. वर दिलेल्या आकृतीवरून हे समजून येईल. एका चौरसात नाग मध्यभागी असतो. या चौरसाच्या बाजूंचे सात सात भाग करावयाचे. या भागात ईशान्येकडून सुरुवात करून अनुक्रमे नागाचे मुख अनुक्रमे ५, १०, १५, ३०, १५, १० व ५ दिवस असते. याच हिशोबाने नागाचे मुख इतर मुख्य दिशांकडे असते. वत्सचक्राच्या शुभाशुभाबद्दल ठक्कुर फेरुने (१·२१) दिलेली माहिती खाली तक्त्यांत दिली आहे.

| **राशी** | **महिना** | **नागाच्या अवयवाची दिशा** | | | | **प्रासाद बांधावयास सुरुवात केल्यास मिळणारे फळ** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **तोंड** | **पोट** | **पाठ** | **शेपटी** | |
| कन्या | भाद्रपद | पूर्व | उत्तर | दक्षिण | पश्चिम | घर मालकाचा अपमृत्यु होतो. |
| तूळ | अश्विन | | | | | |
| वृश्चिक | कार्तिक | | | | | |
| धनू | मार्गशीर्ष | दक्षिण | पूर्व | पश्चिम | उत्तर | सुखदायी |
| मकर | पौष | | | | | |
| कुंभ | माघ | | | | | |
| मीन | फाल्गुन | पश्चिम | दक्षिण | उत्तर | पूर्व | धननाश ओढवतो |
| मेष | चैत्र | | | | | |
| वृषभ | वैशाख | | | | | |
| मिथुन | ज्येष्ठ | उत्तर | पश्चिम | पूर्व | दक्षिण | सुखदायी |
| कर्क | आषाढ | | | | | |
| सिंह | श्रावण | | | | | |

**आयो व्ययर्क्षमंशस्य भित्तिबाह्ये सुरालये।**
**ध्वजायो देवनक्षत्रं व्ययांशौ प्रथमौ शुभौ ॥१९॥**

देवप्रासादाचा आय, व्यय, नक्षत्र व अंश काढावयाचे असल्यास त्यासाठी घ्यावयाची (लांबी, रुंदीची) मापे (प्रासादाच्या) भिंतीच्या बाहेरून-बाहेरून घ्यावीत. ध्वज आय असावा, देव नक्षत्र असावे, व्यय व अंश ही पहिली असणे शुभकारक असते (१९).

[प्रासादाची भिंतींबाहेरची लांबी व रुंदीची मापे घ्यावीत, व खाली दिल्याप्रमाणे आय, व्यय इत्यादि काढावीत

आय = ⅛ (प्रासादाची लांबी × रूंदी) यांचा शेष,

अनुक्रमणिका

व्यय = $^{१}/_{८}$ (नक्षत्र) याचा शेष,
अंश = $^{१}/_{३}$ (प्रासादाचे क्षेत्रफळ + प्रासादाच्या नांवातील अक्षरांची संख्या + व्यय) याचा शेष,
नक्षत्र = $^{८}/_{२७}$ (प्रासादाचे क्षेत्रफळ) याचा शेष.

**आय** आठ प्रकारांचे आहेत. (१) ध्वज (२) धूम्र (३) सिंह (४) कुत्रा (५) बैल (६) गाढव (७) हत्ती व (८) कावळा. विषम संख्येचे आय शुभ व सम संख्येचे आय अशुभ समजतात. देव प्रासादासाठी नेहमी ध्वज आय असावा.

**व्यय** आठ आहेत (अपराजित पृच्छा ६६·६) - (१) शान्त (२) पौर (३) प्रद्योत (४) श्रियानन्द (५) मनोहर (६) श्रीवत्स (७) विभव व (८) चिन्ता.

आय व्ययापेक्षा जास्त असेल तर त्यास **यक्ष** म्हणतात. आय व व्यय यांची संख्या सारखीच असेल तर त्यास **राक्षस** म्हणतात व आय व्ययाहून लहान असेल तर त्यास **पिशाच** म्हणतात. देवालयासाठी आय नेहमीच व्ययापेक्षा जास्त असावा, म्हणजेच यक्ष असावा.

अपराजित पृच्छा (६६·१६-२०) अनुसार कोणत्या व्ययाला कोणता आय शुभ असतो. ते खाली दिले आहे.

| **व्यय** | **शुभ आय** |
|---|---|
| शान्त | सर्व आयांना शुभ |
| पौर | ध्वज व धूम्र आय सोडून इतर आयांना शुभ |
| प्रद्योत | ध्वज, धूम्र व सिंह आय सोडून इतर आयांना शुभ |
| श्रियानन्द | वृष, खर, गज व ध्वांक्ष (म्हणजे कावळा) यांना शुभ |
| मनोहर | खर, गज व ध्वांक्ष यांना शुभ |
| श्रीवत्स | गज व ध्वांक्ष या आयांना शुभ |
| विभव | ध्वांक्ष आयास शुभ |
| चिन्ता | कोणत्याही आयाला शुभ नाही. |

**अंश** तीन असतात. इन्द्र, यम व राजा. शेष एक असल्यास तो इन्द्रांश, दोन असल्यास यमांश व तीन असल्यास राजांश. देवालयासाठी पहिला म्हणजे इन्द्रांश असावा.

**देवनक्षत्रे** - (१) अश्विनी, (५) मृग, (७) पुनर्वसु, (८) पुष्य, (१२) हस्त (१५) स्वाती, (१७) अनुराधा, (२२) श्रवण व (२७) रेवती.

[कंसातले आकडे नक्षत्राच्या सूत्रातील शेषाची संख्या आहे. (१) अश्विनी म्हणजे शेष १ आला तर नक्षत्राचे नांव अश्विनी असते. हे देवनक्षत्र असल्याने देवप्रासादाला शुभ असते.]

अनुक्रमणिका

**केषां च मरुतां गेहे वृषसिंहगजाः शुभाः ।**
**हीन आयाद् व्ययः श्रेष्ठः पिशाचस्तु समो ऽ धिकः ॥२०॥**

काहींच्या मताने वायुच्या (?) प्रासादाला वृषभ, सिंह अथवा हत्ती हे आय शुभ असतात. आयापेक्षा व्यय लहान असणे उत्तम, सारखे असणे (शुभाशुभ कोणतेच फल देत नाहीत). व्यय आयापेक्षा जास्त असल्यास, त्यास पिशाच म्हणतात (२०).

[अपराजित पृच्छांत (६४·१० ½) वृषभ, सिंह तसेच गज आय देखील देवालयांसाठी योग्य समजतात असे म्हटले आहे.]

**देवतानां गृहे चिन्त्यमायाद्यङ्गंचतुष्टयम् ।**
**नवाङ्गं नाडिवेधादि स्थापकामरयोर्मिथः ॥२१॥**

देवप्रासादासाठी (वर दिलेल्या) आय इत्यादि चार अंगांचाच विचार करावयास हवा. नाडी, वेध इत्यादि नऊ अंगांचा विचार स्थापकाने देवालयासाठी करु नये. (२१)

उरलेली पाच अंगे खालील प्रमाणे-
१) राशी २) तारा ३) योनी ४) लग्न व ५) वर्ण.
**१) राशी** = ३५/८ (प्रासादाचे क्षेत्रफळ) याचा शेष (अपराजित पृच्छा ६५. ९-१०)
**२) तारा** = १/९ (घराचे नक्षत्र- घरमालकाचे नक्षत्र) याचा शेष.

तारा नऊ आहेत १) शान्ता २) मनोहरा ३) क्रूरा ४) विजया ५) कलिका ६) पद्मिनी ७) राक्षसी ८) वीरा व ९) आनन्दा.

**शान्ता** तारा शान्तिकारक असते. **मनोहरा** मनाला आल्हाद देणारी असते. **क्रूरा** तारा नेहमी त्यागावी, तिच्यामुळे चोरीचे भय असते. **विजया** जय देऊन कल्याण करणारी असते. **कलिका** भांडण लावते. **पद्मिनी** सौख्यदायी असते, तसेच महातीर्थाचे पुण्य देणारी असते. **राक्षसी** घोरस्वरुप असून भीतीदायक असते. **वीरा** सौम्य असून निरनिराळे भोग देणारी असते व **आनन्दा** तारा आनन्द देणारी असते. (अपराजित पृच्छा ६६. ३२-३९)

**३) योनी**- नक्षत्रावरून योनी ठरते.

| **नक्षत्रे** | **योनी** | **नक्षत्रे** | **योनी** |
|---|---|---|---|
| अश्विनी, शतभिषा | अश्व | उत्तरा भाद्रपदा, उत्तरा फाल्गुनी | गाय |
| भरणी, रेवती | हत्ती | स्वाति, हस्त | महिषी |
| कृतिका, पुष्य | बकरी | चित्रा, विशाखा | वाघ |
| रोहिणी, मृगंशीर्ष | सर्प | ज्येष्ठा, अनुराधा | हरीण |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| मूल, आर्द्रा | कुत्री | पूर्वाषाढा, श्रवण | वानर |
| आश्लेषा, पुनर्वसू | मांजर | उत्तराषाढा, अभिजित | मुंगुस |
| पूर्वाफाल्गुनी, मघा | उंदीर | पूर्वाभाद्रपदा, धनिष्ठा | सिंह |

घराचे नक्षत्र व घरधन्यांचे नक्षत्र यात वैर नसावे. (राजवल्लभ ३·१७-१८)

**४) लग्न** = $\frac{1}{12}$ (आय + नक्षत्र + तारा + व्यय + अंशक) याचा शेष (राजवल्लभ ३·१९).
**५) वर्ण**- राशीवर अवलंबून असतो (अपराजित पृच्छा ६५·१४-१६)

| **राशी** | **वर्ण** |
|---|---|
| वृश्चिक, कर्क, मीन | ब्राह्मण |
| धनु, मेष, सिंह | क्षत्रिय |
| वृषभ, कन्या, मकर | वैश्य |
| मिथुन, तुला, कुम्भ | शूद्र |

**आयादिचिन्तनं भूमिलक्षणं वास्तुमण्डलम्।**
**मासनक्षत्रलग्नादि चिन्तनं पूर्वशास्त्रतः ॥२२॥**

आय (व्यय) इत्यादींचा (शुभाशुभ) विचार. जमीनीची लक्षणे, वास्तुपदमण्डल (६४ किंवा १०० घरांचे मण्डल), (शुभ) महिना, नक्षत्र, लग्न इत्यादींचा विचार पूर्वापार आलेल्या शास्त्राने (म्हणजे ज्योतिषशास्त्रानुसार) करावा. (२२)

**दिङ्निर्णयप्रकारः ।**

**रात्रौ दिक्साधनं कुर्यात्, दीपसूत्रध्रुवैक्यतः ।**
**समे भूमि प्रदेशे तु शङ्कुना दिवसेऽथवा ॥२३॥**

**दिशा निश्यितीच्या पध्दति** -

रात्री ध्रुव (तारा) व दिवे एका सूत्रात येतील अशा रीतीने दिशा निश्चिती करावी. किंवा दिवसा समतल जमीनीवर शंकुच्या सहाय्याने (दिशा निश्चित कराव्यात). (२३)


[रात्रीच्या वेळेला ध्रुव व सप्तर्षी मधील दोन तारे यांना जोडणाऱ्या रेषेत येतील असे जमीनीवर दिवे ठेवून उत्तर-दक्षिण दिशा निश्चित करतात. त्यावरुन पूर्व-पश्चिम दिशा निश्चित करता येतात. (आकृती २ अ)

अनुक्रमणिका




**आकृती २ अः ध्रुवाच्या सहाय्याने दिशानिश्चिती**

दिवसा १२ अंगुले (२२·८ सें. मी.) उंचीचा शंकू २४ अंगुले व्यासाच्या वर्तुळाच्या केन्द्रस्थानी ठेवून त्याची सावली वर्तुळाला सकाळी व संध्याकाळी जेथे स्पर्श करते ते बिंन्दु अनुक्रमाने पश्चिम व पूर्व दिशा दाखवितात. (आकृती २ आ)




**आकृती (२) आः शंकूच्या सावलीवरून दिशानिश्चिती**

**खातविधिः ।**

**नागवास्तुं समालोक्य कुर्यात् खातविधिं सुधीः।**
**पाषाणान्तं जलान्तं वा ततः कूर्मं निवेशयेत् ॥२४॥**

**पाया खणणे-**

नागवास्तु (वत्सा?) ची स्थिती बघून त्याप्रमाणे शहाण्याने पाया खणण्यास सुरूवात करावी. पाया मजबूत दगडापर्यंत (पाषाणापर्यन्त) किंवा (भूगर्भान्तर्गत) पाण्याच्या (पातळी) पर्यंत खोल खणावा व तेथे कूर्माची स्थापना करावी. (२४)

अनुक्रमणिका


[पाया खणण्यास कुठल्या दिशेकडून सुरूवात करावी याबद्दल राजवल्लभांत (१·२२) नियम दिला आहे; म्हणून त्या नियमाचा येथे केवळ ओझरता उल्लेख केला आहे.

कन्या राशीत सूर्य असताना वत्साचे मुख ईशान्य कोणाकडे, शेपटी नैर्ऋत्य कोणाकडे व शरीर आग्नेय कोणाकडे असते. (श्लोक १८ पहा). तेव्हा हे तीनही कोण सोडून वायव्य कोणापाशी पाया खणण्यास सुरूवात करावी. हे खात चक्र पुढे दिल्याप्रमाणे लिहिता येईल.

| **राशि** | **वत्साच्या मुखाची दिशा** | **पाया खणावयाची दिशा** |
|---|---|---|
| कन्या, तुला, वृश्चिक | पूर्व | वायव्य |
| धनु, मकर, कुंभ | दक्षिण | ईशान्य |
| मीन, मेष, वृषभ | पश्चिम | आग्नेय्य |
| मिथुन, कर्क, सिंह | उत्तर | नैर्ऋत्य.] |

**अर्धांगुलो भवेत् कूर्म एक हस्ते सुरालये।**
**अर्धांगुला ततो वृद्धिः कार्या तिथिकरावधिः ॥२५॥**

एक हात (रुंदीच्या) देवालयाच्या कूर्माची (लांबी व रुंदी) अर्धा अंगुल असावी. नंतर १५ हात रुंदी पर्यंत (देवालयाच्या प्रत्येक हात रुंदीच्या वाढीसाठी) कूर्माची (लांबी व रुंदी) अर्ध्या अंगुलाने वाढते.(२५)(आकृती ३)




**आकृती ३ : कूर्मशिला श्लोक १·२५**

**एकत्रिंशत्करान्तं च तदर्धा वृद्धिरिष्यते।**
**ततोऽर्धापि शतार्धान्तं कूर्मो मन्वंगुलोत्तमः ॥२६॥**

(सोळा ते) एकतीस हाता पर्यंत (रुंदीच्या प्रासादाच्या प्रत्येक हात वाढीला) त्याच्या निम्मे (म्हणजे १/४ अंगुले) कूर्माची वाढ करणे ईष्ट असते. तेथून (३२ हातापासून) ५० हातापर्यंत वाढ त्याच्या निम्मे असते. (म्हणजे प्रासादाच्या रुंदीच्या प्रत्येक हात वाढीस कूर्माच्या लांबी व रुंदीत १/८ अंगुलाने वाढ असते.) अशा रीतीने ५० हात रुंदीच्या प्रासादासाठी उत्तम कूर्म १४ अंगुलांचा असावा. (२६)

अनुक्रमणिका

[खाली तक्त्यांत वरील माहिती गणिती सूत्रांसह दिली आहे.

| प्रासादाची रुंदी | | कूर्माची रुंदी | | |
|---|---|---|---|---|
| (हात) (१) | (मिटर) (२) | (अंगुले) (३) | (सें.मी.) (४) | |
| १ | ०·४५ | ०·५० | ०·९५ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर कूर्माची रुंदी = १/२ क्ष अंगुले |
| २ | ०·९० | १·० | १·९० | |
| ३ | १·३५ | १·५ | २·८५ | |
| : | | | | |
| १५ | ६·७५ | ७·५ | १४·२५ | |
| १६ | ७·२० | ७·७५ | १४·७२५ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर कूर्माची रुंदी = ७·५+१/४ (क्ष-१५) समजा क्ष = ३१ हात तर कूर्माची रुंदी =७·५ + १/४ (३१-१५) |
| १७ | ७·६५ | ८·० | १५·२० | |
| १८ | ८·१० | ८·२५ | १५·६७५ | |
| : | | | | |
| ३१ | १३·९५ | ११·५० | २१·८५ | |
| ३२ | १४·४० | ११·६२५ | २२·०८ | प्रासादाची रूंदी क्ष हात असेल तर कूर्माची रुंदी =११·५ + १/८ (क्ष-३१) समजा क्ष = ५० हात तर कूर्माची रुंदी = ११·५ + १/८ (५०-३१) |
| ३३ | १४·८५ | ११·७५ | २२·३२५ | |
| : | | | | |
| ५० | २२·५ | १३·८७५ | २६·३६ | |

[१ हात = ४५ सें.मी., १ अंगुल = १·९ सें.मी. ]

तेव्हा ५० हात रुंदीच्या प्रासादाला कूर्म १३·८७ अंगुलांचा असतो, १४ अंगुलांचा नाही.

अपराजित पृच्छा (१५३.१-३) ला अनुसरून मण्डनाने ही माहिती दिली आहे. मात्र अपराजित पृच्छांत १ ते १६ हात रुंदीच्या प्रासादाच्या प्रत्येक हात वाढीसाठी कूर्माची वाढ अर्ध्या अंगुलाने होते असे सांगून १६ हातापासून ३१ हातापर्यंत नव्हे तर ३२ हातापर्यंत कूर्माची रुंदी पाव अंगुलाने वाढवावी म्हणून सांगितले आहे. या दुरूस्तीमुळे ५० हात रुंदीच्या प्रासादाला १४ अंगुले रुंदीचा कूर्म हा हिशोब बरोबर येतो.

अपराजित पृच्छा (५२·२४-२७) प्रमाणे एक हात रुंदीच्या प्रासादासाठी कूर्म चार अंगुलाचा असावा असे दुसरे माप दिले आहे. दहा हात रुंदीच्या प्रासादापर्यंत कूर्माची रुंदी १/२ अंगुलाने वाढते. ११ हात ते २० हातापर्यंत, प्रत्येक हात वाढीला, कूर्माची रुंदी १/४ अंगुलाने वाढते; २१ हातापासून ३० हातापर्यंत, प्रत्येक हात वाढीला, कूर्माची रुंदी १/८ अंगुलाने वाढते व ३१ हातापासून ५० हातापर्यंत, ही वाढ १/१२ अंगुले असते. हीच माहिती सूत्रांसह खाली दिली आहे.

अनुक्रमणिका

| प्रासादाची रुंदी (हात) | कूर्माची रुंदी (अंगुले) | |
|---|---|---|
| १ | ४ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर |
| २ | ४·५ | कूर्माची रुंदी = ४ + (क्ष - १) × १/२ अंगुले. |
| : | : | क्ष = १० हात तर, कूर्माची रुंदी = ४ + ४·५ = ८·५ अंगुले |
| १० | ८·५ | |
| ११ | ८·७५ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर, कूर्माची रुंदी = |
| १२ | ९ | ८·५ + (क्ष - १०) × १/४ अंगुले, क्ष = २० हात तर |
| : | : | कूर्माची रुंदी = ८·५ + २·५ = ११ अंगुले |
| २० | ११ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर कूर्माची रुंदी = ११ + (क्ष – २०) × १/८ अंगुले |
| २१ | ११·१२५ | |
| २२ | ११·२५ | क्ष = ३० हात तर, |
| : | : | कूर्माची रुंदी = ११ + १·२५ = १२·२५ अंगुले |
| ३० | १२·२५ | प्रासादाची रुंदी क्ष हात असेल तर, कूर्माची रुंदी = |
| ३१ | १२·३७५ | १२·२५ + (क्ष - ३०) × १/१२ अंगुले, |
| ३२ | १२·५० | |
| : | : | क्ष = ५० हात |
| : | : | तर, कूर्माची रुंदी = १२·२५ + १·६६६ = १३·९१६ |
| ५० | १४·०० | अंगुले = १४ अंगुले |

[१ हात = ४५ से.मी., १ अंगुल = १·९ से.मी.]

**चतुर्थांशाधिको ज्येष्ठः कनिष्ठो हीनयोग्यतः।**
**सौवर्णो रूप्यजो वापि स्नाप्य पंचामृतेन हि ॥२७॥**

वर दिलेल्या मापाहून सवापटीच्या मापाचा कूर्म ज्येष्ठ असून त्या मापाच्या पाऊणपट मापाचा कूर्म कनिष्ठ समजतात. हा कूर्म सोन्याचा अथवा चांदीचा करून त्याला पंचामृताने स्नान घालतात. (२७)

**तिथ्यैर्यवैस्तथा होमं पूर्णां चैव प्रदापयेत्।**
**ईशानाद्वाग्निकोणाद्वा शिलाः स्थाप्याः प्रदक्षिणाः ॥२८॥**

तीळ व यवांच्या दाण्यांनी होम करावा तसेच पूर्णाहुती अर्पण करावी. (नंतर) ईशान्य किंवा आग्नेय्य कोणांपासून (पायाच्या) शिला प्रदक्षिणक्रमाने बसवाव्यात. (२८)

अनुक्रमणिका

[तिथ्यैः च्या ऐवजी तिलैः हा शब्द घेऊन अर्थ केला आहे]

**मध्ये कूर्मशिला पश्चाद् गीतवादित्रमंगलैः**
**बलिदानं च नैवेद्यं विविधान्नं घृतप्लुतम्॥**
**देवताभ्यः सुधीर्दद्यात् कूर्मन्यासे शिलासु च ॥२९॥**
**इति कूर्मस्थापनम्।**

मध्यभागी कूर्मशिला स्थापावी. नंतर गायन वादन इत्यादी मंगल गोष्टींसह शहाण्या माणसाने देवांना बली द्यावा व तुपाने माखलेल्या निरनिराळ्या अन्नप्रकारांचा नैवेद्य. दाखवावा. हा विधी कूर्मशिला व तिच्या सर्व बाजूस बसविलेल्या इतर शिलांच्या स्थापनेच्या वेळी करावा. (२९)

कूर्मशिलेच्या स्थापनेचा विधी संपला.

**अथ सूत्रारम्भकालकथनम्।**

**सूत्रारम्भो गृहादीनामुत्तरायां करत्रये।**
**ब्राह्मे पुष्ये मृगे मैत्रे पौष्ण वासव वारुणे ॥३०॥**

**आखणी सुरू करावयासाठी शुभ कालाची माहिती-**

घर (प्रासाद) इत्यादी वास्तूंच्या आखणीसाठी तिन्ही उत्तरा नक्षत्रे (उत्तरा भाद्रपदा, उत्तरा फाल्गुनी व उत्तराषाढा) हस्त, चित्रा, स्वाती, ब्राम्ह (रोहिणी) पुष्य, मृग, मैत्र (अनुराधा), पौष्ण (रेवती), वासव (धनिष्ठा) व वारूण (शतभिषा) ही नक्षत्रे (शुभकारक आहेत).

**शिलान्यासकालः ।**

**शिलान्यासस्तु रोहिण्यां श्रवणे हस्तपुष्ययोः।**
**मृगशीर्षे च रेवत्यां उत्तरात्रितये शुभः ॥३१॥**

**शिला स्थापनेसाठी (शुभ) काल-**

शिला स्थापनेसाठी रोहिणी, श्रवण, हस्त, पुष्य, मृगशीर्ष, रेवती व तीनही उत्तरा नक्षत्रे ही शुभकारक असतात. (३१)

**देवमन्दिरस्थाननिर्वचनम्।**

**नद्यां सिद्धाश्रमे तीर्थे पुरे ग्रामे च गव्हरे ।**
**वाटी-वापी तडागादि स्थाने कार्यं सुरालयम् ॥३२॥**

अनुक्रमणिका

**देवमन्दिरासाठी (उत्तम) जागेची निवड -**

नदी तीरावर, सिद्धाश्रम, तीर्थक्षेत्र, तटबंदीचे शहर, गांव व पर्वतावर, उद्यानांत, मोठ्या विहिरीपाशी, तलावाजवळ इत्यादि जागी देवालय करावे. (३२)

**स्वशक्त्या काष्ठमृत्स्नेष्टशैलधातुजरत्नजम्।**
**देवतायतनं कुर्यात् धर्मार्थकाममोक्षदम् ॥३३॥**

जसे स्वतःचे (द्रव्य -) बल असेल त्याप्रमाणे लाकडी, मातीचे, विटांचे दगडांचे, धातूंचे (किंवा) रत्नमय देवालय करावे. ते धर्म, अर्थ, काम व मोक्ष (या चारी पुरुषार्थांचा) लाभ करुन देणारे असते. (३३)

**देवतास्थापनं पूजा पापहृद् दर्शनादिकम् ।**
**धर्मवृद्धिर्भवेदर्थः कामो मोक्षस्ततो नृणाम् ॥३४॥**

देवमूर्तीच्या स्थापनेने, तिची (नित्य) पूजाअर्चा केल्याने व देवदर्शनादी इतर गोष्टींनी पापांचा नाश होतो. त्यामुळे धर्मभावनेची वाढ होऊन मनुष्यांना अर्थप्राप्ती, काम व नंतर मोक्ष यांचा लाभ होतो. (३४)

**कोटिघ्नं तृणजे पुण्यं मृन्मये दशसंगुणम्।**
**इष्टके शतकोटिघ्नं शैलजे तु फलं ग्रहैः ॥३५॥**

गवताचे (देवालय बांधल्यास) एक कोटी पुण्याचा लाभ होतो. मातीचे (देवालय बांधल्यास) त्याच्या दहापट, विटांचे (देवालय बांधल्यास) त्याच्या शंभरपट व पाषाणांचे (देवालय बांधल्यास) आकाशात जितके तारे आहेत तितके (म्हणजे अगणित) पुण्य (देवालय बांधणाऱ्यास) मिळते. (३५)

**कूर्मसंस्थापने द्वारे पद्माख्यायां तु पौरुषे।**
**घटे ध्वजे प्रतिष्ठायामेवं पुण्याहसप्तकम्॥३६॥**

कूर्मशिलेच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी, (प्रमुख) दार, पद्मशिला, कनकपुरुष (अमलसारा - खाली ठेवतात तो), घट (कलश), ध्वज व देवमूर्ती यांच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी असे सातवेळा पुण्याहवाचन करावे. (३६)

**भूम्यारम्भे तथा कूर्मे शिलायां सूत्रपातने ।**
**+खु पुरे द्वारोच्छ्रये कुम्भे पट्टे पद्मशिलासु च ॥३७॥**
**शुकनासे च पुरुषे घण्टायां कलशे तथा।**
**ध्वजे च्छाद्ये च कुर्वीत शान्तिकानि चतुर्दश ॥३८॥**

जमीनीची निवड केल्यानंतर, कूर्मशिला (स्थापनेच्या विधीच्या वेळी) आखणीच्या वेळेस, खुर (उपपीठाचे) स्थापनेच्या वेळी, दार उभे करताना, कुम्भ, पट्ट, पद्मशिला, शुकनास, (कनक-) पुरुष

अनुक्रमणिका

तसेच घण्टा, कलश, ध्वज व छाद्य यांच्या स्थापनेच्या वेळी (अशी एकंदर) १४ वेळा शान्ती करावी. (३७·३८)

[येथे घण्टा हा प्रासाद शिखराचा एक भाग आहे. नेहमीच्या देवळातील घण्टेचा हा उल्लेख नाही.]

**एकहस्तादि प्रासादो यावद् हस्तशतार्धकम् ।**
**प्रमाणं कुम्भके मूले नासिके भित्तिबाह्यतः ॥३९॥**

एका हातापासून ५० हातांपर्यंत रुंदीच्या प्रासादाचे रुंदीचे माप (जगतीच्या) कुंभाच्या किंवा मूल नासिकांच्या (म्हणजे कोनांच्या) ठिकाणी भितींच्या बाहेरून बाहेरून घ्यावे. (३९)

**कुंभादि स्थावराणां च निर्गमः समसूत्रतः ।**
**पीठस्य निर्गमो बाह्ये तथैव च्छाद्यकस्य च ॥४०॥**

(जगतीच्या) कुंभ इत्यादि थरविभागांचे निर्गमन समसूत्रापर्यन्त असते. पीठाचे (उपपीठाच्या निरनिराळ्या थर विभागांचे?) तसेच च्छाद्याचेही निर्गमन समसूत्राच्या बाहेर असते. (४०)

[समसूत्र कोठे असते याची माहिती ३९ व्या श्लोकांत दिली आहे]

**त्रिपंचसप्तनवभिः फालनाभिर्विभाजयेत् ।**
**प्रासादमंगसंख्या च वारिमार्गान्तरस्थिता ॥४१॥**

तीन, पाच, सात (अथवा) नऊ फालनांनी (प्रासादाचा अधोच्छंद) विभागलेला असतो. पाणी जाण्याचे (उभे) मार्ग या अंगांच्या आंत (विभागणीपाशी) असतात. (४१)

[कोन (कर्ण), भद्र, उपरथ इत्यादि प्रासादाच्या अंगाना फालना म्हणतात.]

**फालना कर्णतुल्या स्याद् भद्रं तु द्विगुणं समम् ।**
**सामान्योऽयं विधिस्तुल्यो हस्तांगुलविनिर्गतः ॥४२॥**

प्रत्येक फालना (प्रतिरथ, उपरथ इत्यादि) कर्णाइतकी (रुंद) असून भद्र कर्णाच्या दुप्पट (रुंदीचा) असावा. या फालनांचे निर्गमन प्रासाद जितक्या हातांचा असेल तितक्या अंगुलांनी असते, असा हा फालनेच्या मापाच्या बाबतीत सामान्य नियम आहे. (४२)

इति सूत्रधारमण्डन विरचिते प्रासादमण्डने वास्तुशास्त्रे मिश्रक लक्षणे प्रथमोऽध्यायः ।

सूत्रधार मण्डनाने रचलेल्या प्रासाद मण्डन (नावाच्या) वास्तुशास्त्रावरील (ग्रंथाच्या) मिश्रक लक्षण (मिश्रक प्रकारच्या प्रासादाची लक्षणे) नावाचा पहिला अध्याय संपला.

अनुक्रमणिका

# द्वितीयोऽध्यायः। अध्याय दोन

## अथ जगतीस्वरुपम्।

**प्रासादानामधिष्ठानं जगती सा निगद्यते ।**
**यथा सिंहासनं राज्ञा प्रासादस्य तथैव सा ॥१॥**

**जगतीचे स्वरूप -**

प्रासादाच्या अधिष्ठानाला जगती म्हणतात. राजाला जसे सिंहासन तशीच प्रासादाला जगती असते. (१)

**चतुरस्त्रायताष्टास्त्रवृत्तवृत्तायता तथा ।**
**जगती पंचधा प्रोक्ता प्रासादस्यानुरूपतः ॥२॥**

चौरस, आयत, अष्टकोनी, वर्तुळाकार, वृत्तायत असे प्रासादाच्या आकाराला अनुरूप असे जगतीचे पाच प्रकार सांगितले आहेत. (२)

[प्रासाद चौरस, आयत, वर्तुळाकार असा ज्या आकाराचा असेल त्याच आकाराची त्याची जगती असावी.]

**प्रासादमानभेदेन जगत्या मानभेदः।**

**प्रासादपृथुमानाच्च त्रिगुणा च चतुर्गुणा।**
**क्रमात् पंच गुणा प्रोक्ता ज्येष्ठा मध्या कनीयसी ॥३॥**

**प्रासादाच्या मापांच्या प्रकाराप्रमाणे जगतीच्या मापांचे प्रकार-**

प्रासादाच्या रूंदीच्या तिप्पट, चौपट व पाचपट रूंदीची जगती अनुक्रमे ज्येष्ठ मध्यम व कनिष्ठ असते. (३)

[हा प्रासादाच्या जगतीच्या ज्येष्ठ-कनिष्ठतेचा नियम अपराजित पृच्छा ११५·१० मध्ये पण दिला आहे.]

**कन्यसे कन्यसा ज्येष्ठा ज्येष्ठे मध्ये च मध्यमा ।**
**प्रासादे जगती कार्या स्वरूपा लक्षणान्विता ॥४॥**

कनिष्ठ प्रासादाला कनिष्ठ, मध्यम प्रासादाला मध्यम व ज्येष्ठ प्रासादाला ज्येष्ठ प्रकारची सर्व लक्षण संपन्न व स्वरूपवान अशी जगती असावी. (४)

अनुक्रमणिका

[अपराजित पृच्छा ११५·८ मध्ये मात्र श्रेष्ठ प्रासादाला कनिष्ठ, मध्यम प्रासादाला मध्यम व कनिष्ठ प्रासादाला श्रेष्ठ जगती असावी, असे म्हटले आहे. प्रदक्षिणामार्गांच्या संख्येवरून प्रासादाची ज्येष्ठ-कनिष्ठता ठरते. तीन प्रदक्षिणा मार्ग असलेला प्रासाद ज्येष्ठ, दोन प्रदक्षिणा मार्ग असलेला प्रासाद मध्यम व एक प्रदक्षिणा मार्ग असलेला प्रासाद कनिष्ठ समजतात (अपराजित पृच्छा ११५·९). ज्येष्ठ प्रासादाला तीन प्रदक्षिणा-मार्गांसाठी जास्त रूंदीची जगती पाहिजे म्हणजेच कनिष्ठ प्रकारची जगती असावी. या उलट कनिष्ठ प्रासादाला कमी रूंदीची म्हणजे ज्येष्ठ प्रकारची जगती पाहिजे. तेव्हा अपराजितपृच्छांत दिलेला प्रासाद व जगती यांच्यातील संबंध योग्य वाटतो.]

**रससप्तगुणाख्याता जिने पर्यायसंस्थिता।**
**द्वारकायां च कर्तव्या तथैव च पुरुषत्रये ॥५॥**

परिवारासह असलेल्या जिन (मूर्तीच्या) प्रासादासाठी जगती (प्रासादाच्या रुंदीच्या) सहा किंवा सात पट रूंद असते. द्वारका व त्रिपुरुषाच्या (मूर्तीच्या) मंदिरासाठी जगती तेवढीच (म्हणजे प्रासादाच्या रूंदीच्या सहा किंवा सात पट) असावी. (५)

[जिन प्रासादात जेथे २४ किंवा ५२ जिन मूर्तींची देवालये असतात तेथे त्या प्रासादाची जगति सहा ते सातपट रूंद असते. द्वारका नगरी जेथे बांधतात त्या प्रासादाच्या जगतीची रूंदी प्रासादाच्या रूंदीच्या सहा किंवा सातपट ठेवावी. ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्या त्रिमुर्तीला येथे त्रिपुरूष म्हटले आहे.]

**मण्डपानुक्रमेणैव सपादांशेन सार्धतः।**
**द्विगुणा वायता कार्या सहस्त्रायतने विधिः ॥६॥**

(चौरस) मंडपाकरीता (त्याच्या रूंदीच्या) सवापट किंवा दीडपट रूंदी असलेली जगती असावी. आयताकार मंडपाच्या (आयताकार) जगतीची रूंदी (मण्डपाच्या) रूंदीच्या दुप्पट असावी. हा नियम हजारो मण्डपांना लागू केलेला आहे. (६)

[मण्डपाच्या जगतीच्या रूंदीचा हा नियम हजारो प्रासादांच्या बाबतीत योग्य ठरला आहे.]

**त्रिद्व्येकभ्रमसंयुक्ता ज्येष्ठा मध्या कनीयसी ।**
**उच्छ्रयः सत्रिभागेन भ्रमणीनां समुच्छया** (?) **॥७॥**

तीन, दोन व एक प्रदक्षिणा मार्ग असलेल्या देवालयाला अनुक्रमे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ प्रकारची जगती असावी. (जगतीच्या) उंचीच्या १.३३ पट प्रदक्षिणामार्गाची उंची असावी (?) (७)

[अपराजितपृच्छांत (११५·१५) प्रदक्षिणा मार्गाची उंची मूळ प्रासादाच्या उंचीच्या एक-तृतीयांश असावी असे म्हटले आहे, व तोच अर्थ येथे अभिप्रेत असावा.]

**चतुःकोणैस्तथा सूर्यकोणैर्विंशतिकोणकैः।**
**अष्टाविंशति-षट्त्रिंशत्-कोणैः स्युः पंच फालना ॥८॥**

अनुक्रमणिका

चार कोनी, १२ कोनी, २० कोनांची, २८ व ३६ कोनी असे फालनेचे पाच प्रकार आहेत. (८)

[या विषयी जास्त माहिती अध्याय पांच मध्ये दिली आहे]

**प्रासादार्धार्कहस्तान्तं त्रिंशे द्वाविंशति च सा ।**
**द्वात्रिंशती चतुर्थांशो भुजांशोच्च्या शतार्द्धके ॥९॥** + **भूताशौचा**

वरील श्लोक पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीवरून खालील प्रमाणे सुधारला.

**प्रासादार्द्धार्कहस्तान्ते त्र्यंशा द्वाविंश त्रिकरे ।**
**द्वात्रिंशे चतुर्थांशा भूतांशोच्चा शतार्द्धके ॥९॥**

एक हात ते १२ हात रूंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची निम्मे असते. १३ ते २२ हातापर्यंत (रूंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची प्रासादाच्या रूंदीच्या) ⅓ असते. २३ ते ३२ हातापर्यंत ती ¼ व ३३ ते ५० हातां पर्यंत रूंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची) ⅕ असते. (९)

[निरनिराळ्या रूंदीच्या प्रासादाला जगतीची उंची काय असावी याची सूत्रे खाली दिल्याप्रमाणे येतात. प्रासादाची रूंदी क्ष समजू.

| **प्रासादाची रूंदी** | | **जगतीची उंची** | | |
|---|---|---|---|---|
| **(हात)** | **(मीटर)** | **(हात)** | **(मीटर)** | |
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | |
| १ | ०·४५ | ०·५० | ०·२२५ | जगतीची उंची = क्ष/२ हात |
| २ | ०·९० | १·० | ०·४५ | |
| : | | | | |
| १२ | ५·४ | ६·० | २·७ | |
| १३ | ५·८५ | ६·३४ | २·८५३ | |
| १४ | ६·३ | ६·६७ | ३·० | जगतीची उंची = ६ + (क्ष - १२) × ⅓ हात = ६ + ३·३३ = ९·३३ हात |
| १५ | ६·७५ | ७·० | ३·१५ | |
| : | | | | |
| २२ | ९·९ | ९·३४ | ४·२० | |
| २३ | १०·३५ | ९·५८ | ३·४१ | जगतीची उंची = ९·३३ + (क्ष - २२) × ¼ हात |
| २४ | १०·८० | ९·८३ | ४·४२५ | |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | १४·४० | ११·८३ | ५·३२ | |
| ३३ | १४·८५ | १२·३४ | ५·५३ | |
| ३४ | १५·३ | १२·५३ | ५·६४ | जगतीची उंची = ११·८३३ + (क्ष -३२) × ⅕ |
| : | | | | |
| : | | | | |
| ५० | २२·५ | १७९·४३ | ६·९४५ | |

**एकहस्ते करेणोच्चा साध्यर्थं सा चतुःकरे।**
**+ जै सूर्यजेनं शतार्धान्तं क्रमाद् द्वित्रियुगांशकैः॥१०॥**

**(जगतीच्या उंचीचे दुसरे माप)**

एक हात रूंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची एक हात असावी. चार हात रूंदी पर्यंतच्या प्रासादाच्या जगतीची उंची दीड हात असावी. १२, २४ व ५० हात रुंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची (प्रासादाच्या रूंदीच्या) अनुक्रमे ½, ⅓ व ¼ असावी. (१०)

[अपराजित पृच्छांत (११५·२३-२६) जगतीच्या उंचीची हीच माहिती दिली आहे. मात्र चार हात रूंदीच्या प्रासादाच्या जगतीची उंची २·५ हात असते असे तेथे दिले आहे. तेव्हा ही दुरुस्ती करून जगतीची उंची काढण्याची सूत्रे खाली दिली आहेत. या दुरूस्तीमुळे १ ते ४ हात व ५ ते १२ हात रूंदीच्या प्रासादांच्या जगतीच्या उंची साठी दोन वेगळे विभाग केले असले तरी एकच सूत्र लागू पडते.

| **प्रासादाची रूंदी** | | **जगतीची उंची** | | |
|---|---|---|---|---|
| **(हात)** | **(मीटर)** | **(हात)** | **(मीटर)** | |
| १ | ०·४५ | १ | ०·४५ | प्रासादाची रूंदी = क्ष हात |
| २ | ०·९० | १·५ | ०·६७५ | |
| ३ | १·३५ | २ | ०·९० | जगतीची उंची = १ + (क्ष - १) × ½ |
| ४ | १·८० | २·५ | १·१२५ | |
| ५ | २·२५ | ३ | १·३५ | |
| : | : | : | : | |
| १२ | ५·४ | ६·५ | २·९२५ | |
| १३ | ५·८५ | ६·८३३ | ३·०७५ | जगतीची उंची = ६·५ + (क्ष - १२) × ⅓ |
| : | : | : | : | |
| : | : | : | : | |
| २४ | १·८० | १०·५ | ४·७२५ | |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | ११·२५ | १०·७५ | ४·८३७ | जगतीची उंची = १०·५० + (क्ष - २४) × ¼ |
| : | : | : | : | |
| : | : | : | : | |
| ५० | २२·५० | १७ | ७·६५ | |

**तदुच्छ्रायं भजेत् प्राज्ञस्त्वष्टाविंशतिभिः पदैः।**
**त्रिपदो जाड्यकुम्भश्च द्विपदं कणकं तथा ॥११॥**

**(जगतीचे थर विभाग)**

बुद्धीमान (शिल्पीने) तिच्या (जगतीच्या) उंचीचे २८ विभाग करावेत. तीन भाग उंचीचा जाड्यकुंभ, तसेच दोन भाग कणी असावी. (११)

**पद्‌मपत्रसमायुक्ता त्रिपदा सरपत्रिका । +त्ति**
**द्विपदं खुरकं कुर्यात् सप्तभागं च कुम्भकम् ॥१२॥**

तीन भागांची कमळ व पाने यांची (नक्षी) असलेली सरपत्रिका असावी. खुर दोन भाग करावा व कुंभ सात भाग असावा. (१२)

**कलशस्त्रिपदा प्रोक्तो भागेनान्तरपत्रकम् ।**
**कपोतालिस्त्रिभागे च पुष्यकण्ठो युगांशकैः ॥१३॥**

कलश तीन भागाचा सांगतात, अंतरपत्र एक भाग असते. कपोतालि तीन भाग व पुष्पकण्ठ चार भाग असतो. (१३)

**पुष्पका (त्?) जाड्यकुम्भश्च निर्गमश्चाष्टभिः पदैः ।**
**कर्णेषु च दिशापालाः प्राच्यादिषु प्रदक्षिणाः ॥१४॥**

पुष्पकण्ठाच्या बाहेर जाड्यकुंभाचे आठ भाग असावे. कोनांपाशी पूर्व दिशेकडून प्रदक्षिण क्रमाने दिक्पालांच्या मूर्ती असाव्यात. (१४)

[मुख्य दिशाकडील दिक्पालांच्या मूर्ती भद्र मध्यावर म्हणजेच जगतीच्या बाजूंच्या मध्यावर असतात तर उप दिशांकडील दिक्पालांच्या मूर्ती जगतीच्या कोणावर असतात.]

**प्राकारैर्मण्डिता कार्या चतुर्भिर्द्वारमण्डपैः ।**
**मकरैर्जलनिष्कासैः सोपानैस्तोरणादिभिः ॥१५॥**


अनुक्रमणिका

(चार दिशांना) चार जगतीद्वार व जगतीमण्डप अलंकारिलेल्या प्राकारांसह करावेत. मकरमुख असलेली पाणी बाहेर नेण्याची नाली (जगतीत) असावी. पायऱ्या व तोरण यांनी ती (जगती) भूषवावी. (१५)

[आकृति ४ वरून जगती द्वार व जगती मंडपाची कल्पना येते. ही जगतीवर केलेली केवळ नक्षी आहे. जगतीवर देवमूर्ती त्यांच्या प्रासादासह (म्हणजे देवकुलासह) असतात व त्याला प्राकार म्हणतात.

प्राकारांचे अपराजित पृच्छांत (११५.१८-२१) सहा प्रकार वर्णिले आहेत. १) कर्णजा २) भ्रमजा ३) भद्रजा ४) गर्भजा ५) मध्यजा व ६) पार्श्वजा.

देवालयाच्या जगतीच्या कोनांवर देवकुलासह मूर्ती असली म्हणजे ती कर्णजा; देवालयाच्या भ्रमणी (प्रदक्षिणा) मार्गावर असलेली **भ्रमजा;** जगताच्या भद्रावर असलेली मूर्ती ती **भद्रजा;** गर्भागाराच्या मापाच्या काही प्रमाणांत (गर्भमानतः) असलेली मूर्ती ती **गर्भजा.** प्रदक्षिण मार्गाच्या मध्यभागी असते ती **मध्यजा** व मध्यजाच्या चारी बाजूंना असलेली मूर्ती ती **पार्श्वजा;** यातील कर्णजा व पार्श्वजा तसेच भद्रजा व मध्यजा या मूर्ती स्थानपरत्वे एकच आहेत पण त्या अनुक्रमे प्रदक्षिणा मार्ग नसलेल्या व प्रदक्षिणा पथ असलेल्या देवालयांसाठी असतात.]




**आकृती ४ : जगतीचे थरविभाग श्लोक २·११-१५**

**मण्डपाग्रे प्रतोल्यग्रे सोपानं शुण्डिकायतः ।**
**तोरणं कारयेत् तस्य पट्टं पट्टानुसारतः ॥१६॥**

मंडपाच्या पुढे व प्रतोलीच्या पुढे असलेल्या पायऱ्यांना हत्तीच्या सोंडेच्या आकाराचा कठडा असावा. (मंडोवराच्या) पट्टाच्या समपातळीत पट्ट असतील असे तोरण करावे. (१६)

अनुक्रमणिका

**तोरणविधिः।**

**तोरणस्योभयस्तंभविस्तरं गर्भमानतः ।**
**भित्तिगर्भ प्रमाणेन तयोर्मध्येऽथवा भवेत् ॥१७॥**


**तोरणाचे विधान**

गर्भागाराच्या प्रमाणांत तोरणाच्या दोन्ही खांबामधले अंतर असावे. हे अंतर गर्भागाराच्या भिंतीइतके (भिंतीच्या बाहेरून बाहेरून इतके) किंवा त्यांच्या मध्यभागा इतके असावे. (१७)

[गर्भागाराच्या आतल्या रूंदीइतके तोरणाच्या खांबांमध्ये अंतर असावे; किंवा गर्भागाराच्या भिंतीच्या बाहेरून बाहेरून घेतलेल्या रूंदी इतके तोरणाच्या खांबामध्ये अंतर असावे; किंवा हे अंतर गर्भागाराच्या भिंतीच्या जाडीच्या मधोमध असावे.]

**वेदिकापीठरूपैश्च शोभाभिर्बहुभिर्युतां (?)।**
**विचित्र तोरणं कुर्यात् दोला देवस्य तत्र च ॥१८॥**

नक्षी व अलंकार यांनी खूप सुंदर सजविलेली वेदिका व पीठ यांच्यासह व निरनिराळ्या आकृत्यांनी चित्रित असे तोरण करावे. तेथे (तोरणाच्या) दोलाभागामध्ये देवाची मूर्ती असते. (१८)



**आकृती (५) तोरण (श्लोक २-१८)**

तोरण स्तंभांची माहिती दीपार्णवांत (३·२७-३१) दिली आहे. त्यावरून तोरण स्तंभांचे थर विभाग खाली दिल्याप्रमाणे असतात. खांबाच्या उंचीचे तेरा विभाग केले असता-

पीठ- १·७५ भाग (यात पीठ, जाड्यकुंभ, कणी व ग्रासपट्टी इतके उपथर येतात)

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| कुंभी | १ भाग | गडदी | १·७५ भाग |
| स्तंभ | ५ भाग | शीर्ष | १ भाग |
| भरणी | ½ भाग | पट्ट | १ भाग |
| शर (शीर्ष) | १ भाग | | |

तोरणाचा पट्ट व मंडोवराचा (भिंतीचा) पट्ट हे समपातळीत असतात. पट्टाच्या वर कूटच्छाद्य करावे. कूटच्छाद्याच्यावर स्तंभांवरती तिलक असतात. या तिलकांच्यां अंतरांत तीन, पाच, सात किंवा नऊ मोड (इलिकावलन) असलेले तोरण असून, त्याच्या मध्यभागी त्रिमूर्ती असावी. त्रिमूर्तीत सदाशिव मध्यभागी, ब्रह्मा त्याच्या उजव्या बाजूला व विष्णू डाव्या बाजूला असतो.]

**प्रासादाद्वाहनस्थानं करणीय चतुष्किका ।**
**एक-द्वि-त्रि-चतुःपञ्च-रस सप्तपदान्तरे ॥१९॥**

प्रासादापासून (प्रतोलीपासून) एक, दोन, तीन, चार, पाच, सहा किंवा सात पावलावर (देवाच्या) वाहनासाठी चौकी (चार खांबांची चौरस चतुष्किका) करावी. (१९)

**देवमन्दिरे वाहन निर्माणविधिः ।**

**+ मे अर्चायामनवांशे तु पंचषट्सप्तभागिकः ।**
**गुह्यनाभिस्तनान्तं वा त्रिविधो वाहनोदयः ॥२०॥**

**देवालयात वाहनाच्या निर्माणाचे विधान-**

देवमूर्तीच्या उंचीचे नऊ भाग केले असता पाचव्या, सहाव्या किंवा सातव्या भागापर्यंत किंवा (देवमूर्तीचा) गुह्यभाग, नाभी अथवा स्तनांपर्यंत अशा तीन प्रकारांनी (देव) वाहनाची उंची सांगितली आहे. (२०)

**पादजानुकटी यावदर्चाया वाहनस्य दृक् ।**
**वृषस्य विष्णुभागान्ते सूर्ये व्योमस्तनान्तकम् ॥२१॥**

वाहनाची दृष्टी देवमूर्तीच्या पायापाशी गुडघ्याशी किंवा कंबरेपर्यंत असावी. नंदीची दृष्टी (शिवलिंगाच्या) विष्णुभागाच्या (वरच्या) कडेपर्यंत असावी. सूर्याच्या वाहनाची दृष्टी त्याच्या स्तनभागापर्यंत असावी. (२१)

[शिवलिंगाच्या उंचीचे ब्रह्मा, विष्णु व शंकर असे अनुक्रमे खालून वर तीन समभाग असतात. ब्रह्म भाग पूर्णपणे जमीनीत गाडलेला असतो. विष्णु भाग पाण्याच्या नालीने झाकलेला असतो व फक्त शिव भाग, सर्वांत वरचा भाग दृग्गोचर असतो.

अनुक्रमणिका

सूर्य मूर्तीत त्याच्या शेजारी व्योमाची (आकाशाची) मूर्ती असते. व्योम स्तनान्तकम् चा अर्थ कदाचित या व्योमाच्या मूर्तीच्या स्तनभागा पर्यंत सूर्याच्या वाहनाची, रथाच्या घोड्यांच्या, दृष्टीची उंची असावी असाही असू शकेल.]

**जिनाग्रे संवरणाग्रे शुकाग्रे गूढमण्डपे ।**
**गूढस्याग्रे चतुष्काद्यास्तदग्रे नृत्यमण्डपम् ॥२२॥**

जिनदेवाच्या प्रासादापुढे समवसरण करावे. शुकनासिकेच्या पुढे गूढमण्डप, गूढमण्डपाच्या पुढे चौकी मण्डप व त्याच्या पुढे नृत्यमंडप बांधावा. (२२)


[पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीत हा श्लोक खालील प्रमाणे दिला आहे व त्याला अनुसरून वर अर्थ दिला आहे.

**जिनाग्रे समोसरणं शुकाग्रे गूढ मण्डपः ।**
**गूढस्याग्रे चतुष्किका तदग्रे नृत्य मण्डपः ॥२२॥**]

**द्विसप्तत्या द्विबाणैर्वा चतुर्विंशतितोऽपि वा ।**
**जिनालये चतुर्दिक्षु सहितं जिनमंदिरम् ॥२३॥**

७२, ५२ किंवा २४ जिनालये जिन मंदिराच्या चारी दिशांना (प्रमुख) जिन मंदिरासह असावीत. (२३)

[मध्यभागी इष्ट जिनतीर्थंकराची मूर्ती असलेले मुख्य देवालय असून त्याच्या चारी दिशांना ७१ किंवा ५१ किंवा २३ इतर जिनतीर्थंकरांच्या मूर्ती असलेली लहान लहान देवालये असतात. अशा रितीने मधल्या (मुख्य) देवालयातील जिनतीर्थंकराची मूर्ती धरून ७२, ५२ किंवा २४ तीर्थंकरांची देवालये होतात.]



**आकृती ६ : अष्टापद श्लोक २४**

अनुक्रमणिका

**मण्डपाद् गर्भसूत्रेण वामदक्षिणयोर्दिशौः ।**
**अष्टापदं प्रकर्तव्यं त्रिशाला वा बलाणकम् ॥२४॥**

गर्भसूत्राने मंडपाच्या डाव्या व उजव्या दिशांना अष्टापद किंवा त्रिशाला अथवा बलाणक करावे. (२४)

[आकृति ६ मध्ये अष्टापदाचा ऊर्ध्वच्छंद दाखविला आहे. बलाणकाची माहिती पुढे ७·३७-४५ मध्ये दिली आहे.]

**अपरे रथशाला च मठं याम्ये प्रकीर्त्तितम् ।**
**उत्तरे रथरन्ध्रं च प्रोक्तं श्रीविश्वकर्मणा ॥२५॥**

मागच्या बाजूला (पश्चिमेला) रथशाला असून दक्षिणेला (उजव्या बाजूला) मठ असावा असे सांगतात. विश्वकर्म्याने मात्र उत्तर दिशेला (डाव्या बाजूला) रथशाला असावी असे सांगितले आहे. (२५)

**जगती तादृशी कुर्यात् प्रासादो यादृशो भवेत् ।**
**भिन्नच्छन्दा न कर्तव्या प्रासादासनसंस्थिता ॥२६॥**

**इति प्रासाद जगति ।**

ज्या प्रकारचा (जातीचा) प्रसाद असेल त्याच प्रकारची (जातीची) जगती करावी. प्रासादाच्या आसनाप्रमाणे असलेली जगती (प्रासादाहून) निराळ्या जातीची करू नये. (२६)

प्रासादाच्या जगतीविषयीची माहिती संपली.

**अग्रतः पृष्ठतश्चैव वामदक्षिणतोऽपि वा ।**
**प्रासादं कारयेदन्तर्नाभिवेधविवर्जितम् ॥२७॥**

पुढील बाजूस, मागील बाजूस किंवा डाव्या, उजव्या बाजूस 'अंतर्नाभि' वेधाचा दोष वगळून (दुसरा) प्रासाद बांधावा. (२७)

[अंतर्नाभि वेधाचा अर्थ पुढच्या श्लोकांत दिला आहे.]

**लिंगाग्रे न तु कर्तव्या अर्चारूपेण देवता ।**
**प्रभा नष्टा न भोगाय यथा तारा दिवाकरे ॥२८॥**

शिवलिंगाच्या समोर पूजनीय अशा देवतेची स्थापना करू नये. तिचा (देवतेचा) प्रभाव, ज्याप्रमाणे सूर्यापुढे (इतर) ताऱ्यांचे तेज नष्ट होते त्याप्रमाणे, (शिवलिंग समोर असल्याने) नाहीसा होतो, व अशी देवता पावत नाही. (२८)

अनुक्रमणिका

**शिवस्याग्रे शिवं कुर्यात् ब्रह्माणं ब्रह्मणोऽग्रतः।**
**विष्णुरग्रे भवेत् विष्णुर्जिनो जैने रवे रविः ॥२९॥**

शंकराच्या समोर शंकर, ब्रह्मदेवाच्या समोर ब्रह्मा, विष्णूच्या समोर विष्णू, जिनाच्या समोर जिनतीर्थंकर व सूर्यापुढे सूर्य अशी असल्यास (अंतर्नाभिवेधाचा दोष येत नाही) (२९)

**ब्रह्मा विष्णुरेकनाभिर्द्वाभ्यां दोषो न विद्यते ।**
**शिवस्याग्रेऽन्यदेवस्य दृष्टिवेधे महद्भयम् ॥३०॥**

ब्रह्मा व विष्णु हे समोरासमोर असल्यास दोघांनाही एकनाभीचा दोष लागत नाही. (मात्र) शंकराच्या समोर दुसऱ्या देवाचा दृष्टिवेध झाल्यास (शंकर व दुसऱ्या देवाची मूर्ती समोरासमोर असल्यास) ते महाभयकारी असते. (३०)

**प्रसिद्ध राजमार्गस्य प्राकारस्यान्तरेऽपि वा ।**
**स्थापयेदन्यदेवश्व (श्च ?) तत्र दोषो न विद्यते ॥३१॥**

(परंतु शंकर व इतर देवमूर्ती यांच्यामध्ये) प्रसिद्ध राजमार्ग असल्यास अथवा त्यांच्यामध्ये प्राकाराच्या भिंतीमुळे अंतर असल्यास (शंकराच्या मूर्तीपुढे) दुसऱ्या देवता मूर्तीची स्थापना केल्यास ते दोषकारक नसते. (३१)

**स्नानोदकनिर्गम मार्गे विशेषः।**

**शिवस्नानोदकं गूढमार्गं चण्डमुखे क्षिपेत् ।**
**दृष्टं न लंघयेत् तत्र हन्ति पुण्यं पुरा कृतम् ॥३२॥**

**स्नानाचे पाणी बाहेर जाण्यासाठी ठेवलेल्या नालीची विशेष माहिती-**

शिवलिंगाच्या स्नानाचे पाणी गुप्त मार्गाने (झाकलेल्या नालीने) चण्ड (मूर्ती-) च्या तोंडात पडेल असे करावे. हे पाणी दिसले असता ते ओलांडून जाऊ नये; नाही तर पूर्वी केलेल्या पुण्याचा नाश होतो. (३२).

**एका चण्ड्या रवैः सप्त तिस्रो दद्यात् विनायके ।**
**चतस्रो वासुदेवस्य शिवस्यार्धा प्रदक्षिणा ॥३३॥**

चण्डीला एक, सूर्याला सात, गणपतीला तीन, वासुदेवाला चार व शंकराला अर्धी प्रदक्षिणा घालावी. (३३)

**अग्रतो जिनदेवस्य स्तोत्रमन्त्रार्चनादिकम् ।**
**कुर्यात् न दर्शयेत् पुष्टं संमुखं द्वारलंघनम् ॥३४॥**

अनुक्रमणिका

जिन तीर्थंकराची स्तोत्र, मंत्र, पूजा इत्यादी नेहमी पुढे राहून (एका बाजूला उभे राहून नव्हे) करावी. (तसेच बाहेर जातेवेळी जिनमूर्तीला) पाठ न दाखविता संमुख राहून दार ओलांडावे. (३४)

**प्रणालविधिः ।**

**पूर्वापरामुखे द्वारे प्रणालं शुभमुत्तरे ।**
**इति शास्त्रविचारोऽयं उत्तरेशान देवताः ॥३५॥**

**प्रणालाचे विधान-**

ईशान (शंकर) मूर्तीच्या (प्रासादाचे) दार पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे असल्यास प्रणाल उत्तर दिशेकडे (जाणारी करणे) शुभावह असते असे शास्त्रांचे मत आहे. (३५)

[तीर्थस्थानी नदी दक्षिणामुखी वाहते. तिच्या पूर्व व पश्चिम तीरावरील शंकराच्या देवालयांची मुखे अनुक्रमे पश्चिम व पूर्व दिशांना असतात. मात्र या देवालयांची प्रणाल उत्तरेकडे आणलेली असते.]

**मण्डपे ये स्थिता देवास्तेषां वामे च दक्षिणे ।**
**प्रणालं कारयेद् धीमान् जगत्यां च चतुर्दिशम ॥३६॥**

मण्डपात (मण्डपाच्या बाहेर मंडोवरावरती ? ) ज्या देवमूर्ती असतात. (त्यांचे स्नानाचे पाणी बाहेर नेण्यासाठी) त्यांच्या उजव्या अथवा डाव्याबाजूला बुद्धीमान् शिल्पीने प्रणाल करावी. जगतीवर (असलेल्या देवमूर्तींसाठी) चारी दिशांना (प्रणाली) कराव्यात. (३६)

[देवालय पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख असते. तेव्हां मण्डपाच्या मागच्या बाजूला गर्भागार असून पुढे दुसरा मंडप किंवा मुखमण्डप असतो. मण्डपाच्या फक्त उत्तर व दक्षिण दिशांकडील भिंतीवर देवतामूर्ती असतात. त्यांच्यासाठीची प्रणाल त्यांच्या डाव्या किंवा उजव्या बाजूना म्हणजेच पूर्व किंवा पश्चिम दिशांना करतात.

जगतीच्या चारी बाजूवर मूर्ती असतात म्हणून त्यांच्या प्रणाली चारी दिशांना असल्या तरी चालेल असे वरील नियमाला (श्लोक ३५) अपवाद मुद्दामहून सांगितला आहे.]

**देवतास्थापने दिङ् नियमः ।**

**पूर्वापरास्यं देवानां कुर्यान्नो दक्षिणोत्तरम् ।**
**ब्रह्मविष्णु शिवार्केन्द्र गुहाः पूर्वापराङ्मुखाः ॥३७॥**

अनुक्रमणिका

**देवाचे मुख कोणत्या दिशेला स्थापावे त्याबद्दलचा नियम-**

देव पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख असतात. त्यांचे मुख दक्षिण व उत्तर दिशांना असू नये (हा झाला सामान्य नियम). ब्रह्मा, विष्णू, शंकर, सूर्य, इन्द्र (वा) कार्तिकेय यांचे मुख पूर्व अथवा पश्चिमेकडे असावे. (३७)

**नगराभिमुखाः श्रेष्ठा मध्ये बाह्ये च देवताः ।**
**गणेशो धनदो लक्ष्मीः पुरद्वारे सुखावहाः ॥३८॥**

श्रेष्ठ देवांच्या (मूर्ती) शहराच्या मध्यभागी किंवा शहराबाहेर असोत त्या शहराभिमुख असाव्यात. गणपति, कुबेर (व) लक्ष्मी यांची स्थापना शहराच्या वेशीपाशी केल्यास ते सुख देणारे होतात. (३८)

**विघ्नेशो भैरवश्चण्डी नकुलीशो ग्रहास्तथा ।**
**मातरो धनदश्चैव शुभा दक्षिणादिङ मुखाः ॥३९॥**

विघ्नेश (गणपती), भैरव, चण्डी, नकुलीश तसे (शनि इत्यादी) ग्रह, मातृगण आणि कुबेर हे दक्षिणाभिमुख असल्यास शुभावह असतात. (३९)

**नैर्ऋत्याभिमुखः कार्यो हनुमान् वानरेश्वरः ।**
**अन्ये विदिङ् मुखा देवा न कर्तव्याः कदाचन ॥४०॥**
**इति देवतानां दृष्टिदोषदिग् विभागः ।**

वानरश्रेष्ठ हनुमानाचे तोंड नैर्ऋत्य दिशेला करावे. इतर कुठल्याही देवाचे तोंड उपदिशेकडे कधीही ठेवू नये. (४०)

देवमूर्तींचा दृष्टि दोष व मुखांची दिशा या विषयींची माहिती संपली.

**सूर्याद् गणेशो विष्णुश्च चण्डी शम्भुः प्रदक्षिणे ।**
**भानोर्गृहे ग्रहास्तस्य गणा द्वादशमूर्तयः ॥४१॥**
**इति सूर्यः ।**

सूर्य मूर्ती मध्यभागी व गणपति (आग्नेय्य दिशेला), विष्णु (नैर्ऋत्य दिशेला), चण्डी (वायव्य दिशेला) व शंकर (ईशान्य दिशेला) ही प्रदक्षिणक्रमाने त्याच्या भोवती असतात. सूर्य मूर्ती भोवती (सात) ग्रह तसेच सूर्याच्या (आदित्य इत्यादि) बारा मूर्ती म्हणजे त्याचे गण ते त्याच रीतीने ठेवतात. (४१)

**सूर्य पंचायतनाची माहिती संपली.**

अनुक्रमणिका

[सूर्याभोवती फिरणारे सात ग्रह - १) मंगळ २) बुध, ३) गुरु ४) शुक्र, ५) शनि, ६) राहू व ७) केतू. चंद्र देखील ग्रह मानला गेला आहे. त्यांची थोडक्यात माहिती खाली तक्त्यात दिली आहे. हे ग्रह दोन किंवा चार हातांचे असतात. खाली दिलेली माहिती दोन हात असलेल्या मूर्तींची आहे.

| | **ग्रहाचे नांव** | **हातात धारण केलेले पदार्थ** | **इतर माहिती** |
|---|---|---|---|
| १) | मंगळ | दण्ड आणि कमण्डलू | लाल रंगाचा, मेंढा वाहन असतो. |
| २) | बुध | अक्षमाला आणि कमण्डलू | पिवळ्या रंगाचा, सिंहासनावर बसलेला |
| ३) | गुरू | अक्षमाला आणि पुस्तक | पिवळ्या रंगाचा, हंसवाहन |
| ४) | शुक्र | अक्षमाला आणि कमण्डलू | पांढऱ्या रंगाचा, घोड्यावर बसलेला |
| ५) | शनि | दण्ड आणि कमण्डलू | काळ्या रंगाचा, महामहिषवाहन |
| ६) | राहू | फक्त डोके आहे, धड नाही | निळ्या रंगाचा, त्याचे डोके सिंहावर दाखवितात. |
| ७) | केतू | डोके नाही, फक्त धड असते अंजली मुद्रेत | काळ्या रंगाचा, शरीराचा खालचा भाग सापासारखा दाखवितात. |
| ८) | चंद्र | कमळ आणि अमृत कलश | पांढऱ्या रंगाचा, पांढरी वस्त्रे नेसलेला, व दहा घोड्यांनी वाहून नेलेला |
| ९) | सूर्य | दोन्ही हातात पांढरी कमळे | तांबळा रंगाचा, सात घोड्यांनी वाहून नेलेला. |

सर्व ग्रहांच्या मूर्ती मुकुट व दागिन्यांनी भूषविलेल्या असतात. सूर्याभोवती प्रदक्षिण क्रमाने, आग्नेय्य कोणापासून त्यांची मांडणी अशी- मंगळ, बुध, राहू, शुक्र, केतू, गुरू, शनि व चंद्र. (रूपमण्डन २·२५)

१२ आदित्यांची नावे व त्यांच्या हातातील पदार्थ यांची माहिती खाली दिली आहे. दीपार्णव १८·१-१४)

| | **नावे** | **हातातील पदार्थ** |
|---|---|---|
| १) | आदित्य | शंख आणि कमळ |
| २) | रवि | शंख आणि वज्रदण्ड |
| ३) | गौतम | दोन्ही हातात कमळ |
| ४) | भानुप्तान | कमळ व सहा पाकळ्यांचे कमळ (शदल ?) |
| ५) | शाचित्त | कमळ आणि शंख |
| ६) | दिवाकर | दोन्ही हातांत वज्रदण्ड |
| ७) | धूम्रकेतु | वज्रदण्ड आणि कमळ |
| ८) | संभवदेव | वज्रदण्ड आणि शंख |
| ९) | भास्कर | फळ व शंख |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १०) | सूर्य | फळ आणि दण्ड |
| ११) | सन्तुष्ट | चक्र आणि कमळ |
| १२) | सुवर्ण केतु | फळ आणि शंख |
| १३) | मार्कण्ड | दोन्ही हातात कमळ |

मण्डनाने लिहिलेल्या 'देवतामूर्तीप्रकरणम्' या पुस्तकात दिलेली माहिती काहीशी निराळी आहे. हे आदित्य चार हातांचे असून त्यांच्या प्रत्येकाच्या खालच्या दोन हातात प्रत्येकी एक कमळ धारण केलेले आहे.

| | नावे | उरलेल्या दोन हातातील पदार्थ |
|---|---|---|
| १) | सुधाता | कमळांची माळ आणि कमण्डलू |
| २) | मित्र | अमृत कलश आणि शूल |
| ३) | अर्यमा | चक्र आणि गदा |
| ४) | रूद्र | अक्षमाला आणि वज्र |
| ५) | वरुण | चक्र आणि पाश |
| ६) | सूर्य | कमंडलू आणि अक्षमाला |
| ७) | भग | शूल आणि चक्र |
| ८) | विवस्वान | त्रिशूल आणि चक्र |
| ९) | पूषा | दोन्ही हातात कमळ |
| १०) | सविता | गदा आणि चक्र |
| ११) | त्वष्ट्र | स्त्रुव आणि ? |
| १२) | विष्णु | चक्र आणि कमळ |

**गणेशस्य गृहे तद्वत् चण्डी शंभुर्हरी रविः ।**
**मूर्तयो द्वादशान्येऽपि गणाः स्थाप्या हिताश्व ये ॥४२॥**
**इति गणेशायतनम् ।**

गणपतीच्या देवालयाभोवती त्याच प्रमाणे (म्हणजे प्रदक्षिण क्रमाने) चण्डी, शंकर, विष्णु व सूर्य यांच्या मूर्ती असतात. तसेच बारा गणांच्या मूर्ती सभोवार ठेवणे हितावह असते. (४२)

**गणेश पंचायतनाची माहिती संपली.**

[हे बारा गण कोणते त्याची माहिती मिळत नाही. मात्र 'रूपमण्डना (५·१९-२०) मध्ये गणपती भोवती निरनिराळ्या दिशांना खाली दिलेल्या देवमूर्ती असाव्यात अशी माहिती दिली आहे.

अनुक्रमणिका

पूर्व दिशा- बुद्धिची मूर्ती, आग्नेय्य- सिद्धि, दक्षिण- सरस्वती. नैर्ऋत्य- धूम्रक, पश्चिम - यक्षराज (कुबेर), वायव्य- बालचंद्रमा, उत्तर - गौरी आणि ईशान्य- गजकर्ण

गणपतीचे प्रमुख प्रकार म्हणजे गजानन अथवा गणेश, हेरम्ब व वक्रतुण्ड.

**गजानन**- दात, परशू व मोदक हातात धारण केलेले असतात. उंदीर वाहन असते.

**हेरम्ब**- आठ हात असतात. वरदमुद्रा, अंकुश, दात व अभय मुद्रा हे उजव्या हातात असतात. डाव्या हातात कपाल, बाण (?) अक्षमाला, पाश व कौमोदकी गदा असतात. पाच तोंडे, तीन डोळे असून मूषक (उंदीर) वाहन असतो.

**वक्रतुण्ड**- लम्बोदर, तीन डोळ्यांचा असून वरील दोन हातात पाश व अंकुश धारण केलेले असतात. व खालील हात अनुक्रमे वरद व अभय मुद्रेत असतात. (रूपमण्डन ५·१५-१८)]

**विष्णोः प्रदक्षिणेनैव गणेशोऽर्कोऽम्बिका शिवः ।**
**गोप्य (प्या?) स्तस्यावतारस्यमूर्तयोः द्वारकां तथा ॥४३॥** + **ध्दा**
**इति विष्ण्वायतनम् ।**

विष्णूच्या बाबतीत प्रदक्षिण क्रमाने गणपति, सूर्य, अम्बिका व शंकर असतात. गोपींच्या व त्याच्या (विष्णूच्या) अवतारांच्या (अष्ट) मूर्ती व द्वारकेची मूर्ती (विष्णू मूर्ती भोवती) असतात. (४३)

**विष्णु पंचायतनाची माहिती संपली**

[विष्णूचे अवतार- १) मत्स्य, २) कूर्म, ३) वराह, ४) नृसिंह, ५) वामन, ६) परशुराम ७) दाशरथी राम ८) कृष्ण.

मंडनाच्या रूपमण्डन (३·२४-२६) म्हणून मूर्तीशिल्पावरील पुस्तकात विष्णूच्या दहा अवतारांची थोडक्यात माहिती दिली आहे.

**मत्स्य व कूर्म** हे अवतार त्या त्या स्वरूपात दाखवितात. **नृवराह** यात शरीर माणसाचे व तोंड वराहाचे दाखवितात. वराहाच्या हातात गदा व कमळ असतात. तोंडातील दंष्ट्रेने पृथ्वी (स्त्री रूपी) धरलेली आहे असे दाखवितात. **नृसिंह,** मुख खूप दंष्ट्रांनी भरलेले व शरीर माणसाचे असते. हिरण्यकशिपूचे हृदय दोन्ही हातांनी फाडत आहे असा दाखवितात. **वामन** शेंडी राखलेला सावळा (बुटका) व हातात छत्री व पाण्याचे पात्र असते. **परशुराम** परशु हातात धारण केलेला दाखवितात. जटा व वल्कले धारण केलेला **राम** असतो. तो सावळा, धनुष्यबाण हाती धरलेला असतो.

विष्णुचे २४ प्रकार आहेत व ते त्याच्या हातात असलेल्या आयुधावरुन ठरतात. खाली दिलेल्या माहितीत आयुधे उजव्या खालच्या व वरच्या हातात व डाव्या वरच्या व खालच्या हातात या अनुक्रमाने दिली आहेत (रूपमण्डन ३·९-२३)

**अनुक्रमणिका**

१) **वासुदेव** - गदा, शंख, चक्र,पद्म
२) **केशव**- कमल, शंख, चक्र व गदा
३) **नारायण** - शंख, पद्म, गदा, चक्र
४) **माधव** - गदा, चक्र, शंख, पद्म
५) **पुरुषोत्तम** - चक्र, पद्म, शंख, गदा
६) **अधोक्षज** - पद्म, गदा, शंख, चक्र
७) **संकर्षण** - गदा, शंख, पद्म, चक्र
८) **गोविन्द** - चक्र, गदा, पद्म, शंख
९) **विष्णु** - गदा, पद्म, शंख, चक्र
१०) **मधुसूदन** - चक्र, शंख, पद्म, गदा
११) **अच्युत** - गदा, पद्म, चक्र, शंख
१२) **उपेन्द्र** - शंख, गदा, चक्र, पद्म
१३) **प्रद्युम्न** - चक्र, शंख, गदा, पद्म
१४) **त्रिविक्रम** - गदा, चक्र, शंख, पद्म
१५) **नरसिंह** - चक्र, पद्म, गदा, शंख
१६) **जनार्दन** - पद्म, चक्र, शंख, गदा
१७) **वामन** - शंख, चक्र, गदा, पद्म
१८) **श्रीधर** - पद्म, चक्र, गदा, शंख
१९) **अनिरूद्ध** - चक्र, गदा, शंख, पद्म
२०) **हृषिकेश** - गदा, चक्र, पद्म, शंख
२१) **पद्मनाभ** - शंख, पद्म, चक्र, गदा
२२) **दामोदर** - पद्म, शंख, गदा, चक्र
२३) **हरी** - शंख, चक्र, पद्म, गदा
२४) **कृष्ण** - शंख, गदा, पद्म, चक्र

**चण्ड्याः शम्भुर्गणेशोऽर्को विष्णुः स्थाप्याः प्रदक्षिणाः ।**
**मातरो मूर्तयो देवा योगिन्यो भैरवादयः ॥४४॥**
**इति चण्डिकायतनम् ।**

चण्डीच्या बाबतीत प्रदक्षिण क्रमाने शंकर, गणपति, सूर्य व विष्णु यांची स्थापना करावी. मातृगणांच्या मूर्ती, योगिनी, भैरव इत्यादींचीही स्थापना करावी. (४४)

**चण्डी पंचायतनाची माहिती संपली.**

[रूपमण्डनांत चण्डीचे महिषासुर मर्दिनीचे स्वरूप वर्णिले आहे. ही कात्यायनी दहा हातांची असून तिच्या हातात उजवी कडून अनुक्रमे त्रिशूल, खड्ग, चक्र, बाण व शक्ति असतात. ढाल, धनुष्य, पाश, अंकुश व घण्टा डाव्या हातात असतात. ती त्रिभंग मुद्रेत असून तिचा उजवा पाय सिंहावर असतो व डाव्या पायाचा आंगठा महिषासुरावर असतो. महिषासुराची छाती शूलाने विदीर्ण केलेली असून त्याचे शरीर रक्ताने भरलेले असते.

अनुक्रमणिका

मातृगणांत प्रथम वीरेश्वर मध्ये नऊ माता व शेवटी विनायक असतो.

**ब्राहमी**- हंसावर बसलेली, खालच्या दोन हातात अक्षमाला व कमण्डलू व वरच्या दोन हातांत स्रुव व पुस्तक धारण केलेले असतात.

**माहेश्वरी**- वृषभावर बसलेली असते. कपाल, शूल, खट्वाङ्ग हातात धारण केलेली असतात. डावा खालचा हात वरद मुद्रेत असतो.

**कौमारी**- कार्तिकेयाच्या स्वरूपाप्रमाणे व मोरावर बसलेली असते. तांबडी वस्त्रे नेसलेली व हातात शूल, शक्ति व गदा धारण केलेली असतात.
**वैष्णवी**- विष्णू प्रमाणे रूप असलेली व गरूडावर बसलेली असते. उजवा खालचा हात वरद मुद्रेत असून इतर हातात शंख, चक्र व गदा धारण केलेली असतात.

**वाराही**- वराहा प्रमाणे मुख असलेली व महिषावर बसलेली असते. हातात चामर (?), गदा, चक्र व गदा (?) धारण केलेली असतात.

**नारसिंही**- रूपमण्डनांत वर्णन दिलेले नाही. नृसिंहाच्या रूपाची असते.

**इन्द्राणी**- इन्द्राच्या स्वरूपाची असते. हत्ती वाहन असते. वज्र, शूल व गदा हातात धारण केलेली असतात. शरीरावर पुष्कळ डोळे दाखविलेले असतात.

**चामुण्डा**- मोठ्या मोठ्या दाढा असलेली, कृश देहाची (बरगड्या दिसतात), खोल डोळे गेलेली, भयंकर रूपाची, बारीक कंबर असलेली व प्रेतावर बसलेली असते. दहा हात असून मुसल, चक्र, बाण, अंकुश व खड्ग उजव्या हातात धारण केलेली व डाव्या हातात ढाल, पाश, धनुष्य, दण्ड व कुऱ्हाड ही आयुधे असतात.

**शिवदूती**- चामुण्डेसारखीच असते.

**वीरेश्वर**- वृषभारूढ भगवानाची (कार्तिकेयाची) मूर्ती मातृगणांच्या प्रथम असून नंतर माता व शेवटी विनायक असतो. त्याच्या हातात धनुष्य, वीणा व त्रिशूल असतात.

बहुतेक ठिकाणी प्रथम वीरेश्वर मग सप्त माता त्यानंतर विनायकाची मूर्ती व त्याच्या नंतर चामुण्डा व शिवदूती यांच्या मूर्ती असतात. मण्डनाच्या मते सात माता असून त्यात नारसिंही नसते व चामुण्डा असते. मात्र मातृगणांची अशी मूर्ती पाहण्यात नाही.]

**शंभोः सूर्यो गणेशश्च चण्डी विष्णुः प्रदक्षिणे ।**
**स्थाप्याः सर्वे शिवस्थाने दृष्टिवेधविवर्जिताः ॥४५॥**
**इति शिवायतनम् ।**

अनुक्रमणिका

शंकराभोवती प्रदक्षिण क्रमाने सूर्य, गणपति चन्डी व विष्णू ही स्थापावीत. दृष्टिवेध होणार नाही अशा रीतीने हे सर्व देव स्थापन करावेत. (४५)

**शिवपंचायतनाची माहिती संपली**

**रुद्रस्त्रिपुरुषो मध्ये रुद्राद् वामगतो हरिः ।**
**दक्षिणांगे भवेद् ब्रह्मा विपर्यासे भयावहः ॥४६॥**

रुद्र प्रमुख असलेल्या त्रिमूर्ती मध्ये मध्यभागी शंकर, त्याच्या डाव्या बाजूला विष्णु व उजव्या अंगाला ब्रह्मदेव असावा. याच्या उलटे केले असता ते भयकारक होते. (४६)

**रुद्रवक्त्रत्रिभागेन हरिरर्द्धे पितामहः ।**
**तत्तुल्या पार्वती देवी सुखदा सर्वकामदा ॥४७॥**
**इति त्रिपुरुषन्यासः ।**

शंकराच्या मुखाचे तीन भाग करून त्यातील दोन भागापर्यंत विष्णूच्या मुखाची उंची असते. विष्णूच्या मुखाच्या निम्या उंचीपर्यंत ब्रह्मदेवाच्या मुखाची उंची असते. पार्वतीचे मुख ब्रह्मदेवाच्या मुखाइतके उंच असावे म्हणजे ती मूर्ती सुख व सर्व कामनापूर्ती करणारी असते. (४७)

**त्रिपुरुषाची मांडणी संपली**

[येथे रुद्रवक्त्रत्रिभागोने असा पाठ स्विकारून अर्थ केला आहे.]

इति प्रासादमण्डने जगती दृष्टि-आयतनाधिकारे द्वितीयोऽध्यायः ॥२॥

प्रासाद मण्डनातील जगती, दृष्टिदोष, पंचायतन या विषयी माहिती देणारा दुसरा अध्याय संपला. (२)

***

अनुक्रमणिका

# तृतीयोऽध्यायः । अध्याय तीन

## अथ आधारशिलाभिट्टादि निर्माणोपदेशः ।-

**अतिस्थूला सुविस्तीर्णा प्रासादाधारिणी शिला ।**
**अतीव सुदृढा कार्या इष्टकाचूर्णवारिभिः ॥१॥**

**आधारशिला, भिट्ट इत्यादि बांधावयाची माहिती -**

प्रासादाचा आधार असणारी शिला खूप जाड, लांब, रुंद व वीटांच्या भुकटीने आणि (कषाय इत्यादिंच्या) पाण्याने अत्यंत मजबूत बांधावी. (१)

**शिलोपरि भवेद् भिट्टमेकहस्ते युगांगुलम् ।**
**अर्धांगुला भवेद् वृद्धिर्यावद् हस्त शातर्धकम् ॥२॥**

आधारशिलेवर भिट्ट असते. एक हात (रुंदीच्या प्रासादाच्या भिट्टाची उंची) चार अंगुले असते. ५० हातापर्यंत प्रत्येक हाताच्या वाढीला ( भिट्टाची उंची) अर्ध्या अंगुलाने वाढते. (२)

| प्रासादाची रुंदी | | भिट्टाची उंची | | |
|---|---|---|---|---|
| हात | मिटर | अंगुले | सें.मी | प्रासादाची रूंदी = क्ष हात |
| १ | ०·४५ | ४ | ७·६० | |
| २ | ०·९० | ४·५ | ८·५५ | भिट्टाची उंची = ४ + (क्ष - १) × ½ अंगुले |
| ३ | १·३५ | ५ | ९·५० | |
| : | : | : | : | |
| ५० | २२·५ | २८·५ | ५४·१५] | |

**अंगुलेनांशहीनेन अर्धेनार्धेन च क्रमात्।**
**पंच-दिक्-विंशतिर्यावत् शतार्धं च विवर्धयेत् ॥३॥**

**(भिट्टाच्या उंचीचा दुसरा नियम)**

पाच ते दहा हात रूंदीच्या तसेच ११ ते २० व २१ ते ५० हात रुंदीच्या प्रासादांच्या भिट्टाची उंची अनुक्रमे प्रत्येक हात वाढीला एक, अर्धा व पाव अंगुलांनी वाढवावी. (३)

अनुक्रमणिका

| प्रासादाची रुंदी | | भिट्टाची उंची | | |
|---|---|---|---|---|
| हात | मीटर | अंगुले | सें.मी | प्रासादाची रूंदी = क्ष हात |
| १ | ०·४५ | ४ | ७·६ | भिट्टाची उंची = ४ + ½ (क्ष - १) अंगुले |
| ५ | २·२५ | ६ | ११·४ | |
| ६ | | ७ | १३·३ | भिट्टाची उंची = ६ + (क्ष - ५) अंगुले |
| १० | ४·५ | ११ | २०·९ | |
| ११ | ४·९५ | ११·५ | २१·८५ | भिट्टाची उंची = ११ + ½(क्ष - १०) अंगुले |
| २० | ९·० | १६ | ३०·४ | |
| २१ | ९·४५ | १६·२५ | ३·८७५ | भिट्टाची उंची = १६ + ⅛ (क्ष - २०) अंगुले |
| ५० | २२·५ | २३·५ | ४४·६५ | |

**एक द्वित्रीणि भिट्टानि हीनहीनाति (नि?) कारयेत् ।**
**स्व-स्वोदयप्रमाणस्य चतुर्थांशेन निर्गमः ॥४॥ इतिभिट्टः ।**

(भिट्टाची उंची फार असेल तर) एक, दोन किंवा तीन भिट्ट अनुक्रमे कमी कमी उंचीचे (एकावर एक) करावेत. त्यांचे निर्गमन त्यांच्या स्वतःच्या उंचीच्या पावभागाइतके असावे. (४)

**भिट्टाची माहिती संपली**

**अथ पीठ निर्माणोपदेशः ।**

**[श्रीः] पीठमर्धं त्रिपादांशैरेकद्वित्रिकरे गुहे ।**
**चतुर्हस्ते त्रिसार्धांशं पादांशं पंचहस्तके ॥५॥**

**पीठ बांधावयाची माहिती-**

एक हात रुंदीच्या प्रासादाच्या उपपीठाची उंची अर्धा हात, दोन व तीन हात (रुंदीच्या) प्रासादांच्या (उपपीठाची उंची अनुक्रमे रुंदीच्या) एक-तृतीयांश व एक-चतुर्थांश असते. चार हात (रुंदीच्या प्रासादाच्या उपपीठाची उंची) साडे तीन भाग व पाच हात (रुंदीच्या प्रासादाच्या उपपीठाची उंची प्रासादाच्या रुंदीच्या) एक चतुर्थांश असते. (५)

**दश-विंशति-षट्त्रिंशत्-शतार्धं हस्तकावधिः ।**
**वृद्धि वेंदत्रियुग्मैक संख्या स्यादङ्गुलेः क्रमात ॥६॥**

दहा, २०, ३६ व ५० हातापर्यंत (रुंदीच्या प्रासादाच्या उपपीठाच्या उंची साठी) अनुक्रमे चार, तीन, दोन व एक अंगुलांनी (प्रत्येक हातामागे) वाढ करावी. (६)

अनुक्रमणिका

| प्रासादाची रुंदी | | उपपीठाची उंची | | |
|---|---|---|---|---|
| हात (१) | मीटर (२) | हात-अंगुले (३) | मीटर (४) | प्रासादाची रूंदी = क्ष हात |
| १ | ०·४५ | १/२ | ०·२२५ | |
| २ | ०·९० | २/३ | ०·३० | २ × १/३ = २/३ |
| ३ | १·३५ | ३/४ | ०·३३७ | ३ × १/४ = ३/४ |
| ४ | १·८० | १·१४ | ०·५१४ | ४ × २/७ = ८/७ |
| ५ | २१/४ | ११/४ | ०·५६२ | ५ × १/४ = ५/४ |
| ६ | २·७ | (१·२५ + ४ = १·४१६)+ | ०·६३७ | |
| ७ | ३·१५ | १·२५ + ८ = १·५८३ हात | ०·७१२ | उपपीठाची उंची |
| ८ | ३·६ | १·२५ + १२ = १·७५ | ०·७८७ | = ५/४ + (क्ष - ५) × १/६ हात |
| ९ | ४·०५ | १·२५ + १६ = १·९१६ | ०·८६२ | |
| १० | ४·५० | १·२५ + २० = २·०८३ | ०·९३७ | उपपीठाची उंची |
| ११ | ४·९५ | २·८३ + ३ = २·२०८ हात | ०·९९४ | = २·०८३ + (क्ष - १०) × १/८ हात |
| : | : | | : | |
| २० | ९·० | = ३·३३ हात | १·५०३ | उपपीठाची उंची |
| २१ | ९·४५ | ३·३३ + २= ३·४१६ हात | १·५३७ | = ३·३३ +(क्ष - २०) × १/१२ हात |
| : | : | | : | |
| ३६ | १६·२ | = ४·६६ हात | | |
| ३७ | १६·६५ | ४·६६ + १ = ४·७०८ हात | २·११९ | उपपीठाची उंची = ४·६६ + (क्ष - ३६) × १/२४ हात |
| : | : | | : | |
| ५० | २२·५ | = ५·२५ हात | २·३६२ | |

\+ १·२५ हात + ४ अं = १·४१६ हात

**पञ्चाशहीन (?) माधिक्यमेकैकं तु त्रिधा पुनः ।**
**त्रिपञ्चाशत् समुत्सेधे द्वाविंशत्यंश निर्गमे ॥७॥**

(वरील नियमाने आलेल्या उपपीठाची) उंची १/५ ने कमी अथवा जास्त करून उपपीठाचे उंचीमुळे (उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे) तीन प्रकार होतात, व त्यांचे पुन्हा प्रत्येकी तीन प्रकार होतात. उपपीठाची उंची ५३ भागात व निर्गमन २२ भागात विभागले असता- (७)

अनुक्रमणिका

[समजा उपपीठाची उंची, क्ष आहे तर ज्या उपपीठाची उंची क्ष + ⅕ क्ष आहे ते उत्तम उपपीठ, क्ष आहे ते मध्यम व क्ष - ⅕ क्ष आहे ते कनिष्ठ उपपीठ, असे उंचीमुळे उपपीठाचे प्रमुख तीन प्रकार होतात. त्यांचे आणखी प्रत्येकी तीन उपप्रकार खाली दिल्याप्रमाणे होतात.

| **प्रकार** | **नाव** | **उंची** |
|---|---|---|
| १) उत्तमोत्तम | सुभद्र | क्ष +⅕क्ष + ⅕(क्ष + ⅕ क्ष)=१·४४क्ष=१·४४क्ष |
| २) उत्तम | सर्वतोभद्र | क्ष +⅕ क्ष = १ ⅕ क्ष =१·२क्ष |
| ३) उत्तमाधम | पद्मक | क्ष +⅕ क्ष – ⅕ (क्ष + ⅕ क्ष)=२४/२५क्ष=०·९६क्ष |
| ४) मध्यमोत्तम | वसुंधर | क्ष +⅕ क्ष = १ ⅕ क्ष =१·२क्ष |
| ५) मध्यम | सिंहपीठ | क्ष = क्ष = क्ष |
| ६) मध्यमाधम | व्योम | क्ष - ⅕ क्ष = ⅘ क्ष = ०·८क्ष |
| ७) अधमोत्तम | गरुड | क्ष - ⅕ क्ष +⅕ (क्ष - ⅕ क्ष)=२४/२५क्ष = ०·९६क्ष |
| ८) अधम | हंस | क्ष - ⅕ क्ष = ⅘ क्ष = ०·८क्ष |
| ९) अधमाधम | वृषभ | क्ष - ⅕ क्ष - ⅕ (क्ष - ⅕ क्ष)=१६/२५क्ष = ०· ६४क्ष |

उत्तम आणि मध्यमोत्तम (सर्वतोभद्र आणि वसुंधर) यांची उंची सारखीच म्हणजे १·२ क्ष आहे. उत्तमाधम आणि अधमोत्तम (पद्मक आणि गरुड) या उपपीठांची उंची सारखीच म्हणजे २४/२५ क्ष आहे. व मध्यमाधम व अधम (व्योम आणि हंस) यांची उंची ⅘ क्ष आहे. तेव्हां उपपीठाचे नऊ प्रकार न होता खरोखरी सहाच प्रकार होतात.]

**नवांशो जाड्यकुंभश्च सप्तांशं कुम्भकं भवेत् ।** + **कणकं**?
**सांतरं सकपोतालिः सप्तांशा ग्रासपट्टिकाः ॥८॥**

जाड्यकुंभाची उंची नऊ भाग व कुंभ (कणी ?) सप्त भागाचा असावा. अंतराल व कपोतालि यासह ग्रासपट्टी (ची उंची) सात भाग असावी. (८)

[अपराजित पृच्छा सूत्र १२४ मध्ये या प्रत्येक मुख्य थरविभागांचे उपथर दिलेले आहेत. जाड्यकुंभाची उंची = ९ भाग. तेथे **कर्ण** = १·५ भाग, **अंतरपत्रिका** = ½ भाग, स्कंध = ५·५ भाग व त्याच्या मध्यभागी **चिप्पिका** = २·५ भाग, व स्कंधाच्या वर **चिप्पिका** = १·५ भाग असे जाड्यकुंभाचे उपथर आहे. याचे निर्गमन ८·५ भाग आहे.

कणकाची उंची = ७ भाग व अंतरपत्र (अंतरपट्टी) व कपोतालि यासह ग्रासपट्टी = ७ भाग. यांचे उपथर खाली दिल्याप्रमाणे आहेत.

अंतरपत्रिका = ½ भाग, कर्णक = २·५ भाग, चिप्पिका = १ भाग, अंतरपट्टी = २ भाग, दोन पदिका = १·५ भाग, कर्ण = १ भाग, पट्टासह स्कन्ध = १ भाग, ग्रासपट्टी = ३·५ भाग, निर्वाण चिप्पिका =

अनुक्रमणिका

१ भाग. एकूण १४ भाग. या दोन थरांचे एकूण निर्गमन ८ भाग असते त्यापैकी कपोतालीचे निर्गमन = २·५ भाग, कर्णकाचे निर्गमन = १·५ भाग व चिप्पिकेचे निर्गमन = २ भाग असते.]

**सूर्यदिग्वसुभागैश्व गजवाजिनराः क्रमात् ।**
**वाजिस्थानेऽथवा कार्यं स्वं स्वं देवस्य वाहनम् ॥९॥**

गजथर, अश्वथर व नरथर हे अनुक्रमे १२, १० व ८ भाग असावेत. किंवा अश्वथराच्या जागी त्या त्या देवाच्या स्वतःच्या वाहनाचा थर असावा. (९). (आकृती ७)

[गजथराचे उपथर आहेत- अंतर पत्रिका = ½ भाग, कर्ण = १ भाग, पट्टासह स्कंध = १ भाग, गज = ८·५ भाग, कर्ण= १ भाग. एकंदर निर्गमन = ४ भाग. अश्वथराचे उपथर - अंतर पत्रिका = ½ भाग, कर्ण = ¾ भाग, स्कंध = ¾ भाग, अश्व = ७ भाग, ऊर्ध्व कर्ण = ¾ भाग


नरथराचे उपथर-अंतःपत्र = ¾ भाग, कर्ण = ¾ भाग, नर = ५, ऊध्वकर्ण = ·७५ भाग व स्कन्ध चिप्पिका = ¾ भाग.

शंकराच्या मन्दिराला अश्वथराऐवजी वृषभ थर असावा.]

**पञ्चांशा कणिकाग्रे तु निर्गमो जाड्यकुम्भकम् ।**
**त्रिसार्द्धे कणकं सार्द्धं चतुर्भिर्ग्रासपट्टिका ॥१०॥**


कणकाच्या पुढे जाड्यकुंभाचे निर्गमन पाच भाग असावे. कणकाचे ग्रासपट्टीबाहेर निर्गमन ३·५ भाग व ग्रासपट्टीचे गजथराबाहेर निर्गमन ४ भाग असावे. (१०)

[दुसऱ्या चरणातील सार्द्ध शब्द अर्थ करतांना गाळला आहे.]




**आकृती (७ अ) उपपीठाचे थरविभाग**

अनुक्रमणिका





**आकृती (७ आ) उपपीठाचे थरविभाग**

**कुंजरश्व (श्व?) नरा वेदा राम युग्मं च निर्गमः ।**
**अंतरालमधस्तेषांमूर्धाधः कर्ण युग्मकम् ॥११॥**

गज, अश्व व नर थरांचे निर्गमन (अनुक्रमे) चार, तीन व दोन भाग असावे. त्यांच्या (गज इत्यादि थरांच्या) खाली असलेल्या अंतरालाच्या खाली व वर दोन दोन कर्णिका असाव्यात. (११)


**गजपीठं विना स्वल्प द्रव्ये पुण्यं महत्तरम् ।**
**जाड्य कुम्भः कणाली च ग्रासपट्टी तथा भवेत् ॥१२॥**
**कामदं कणपीठं च जाड्यकुम्भः कणालिका ।**
**लतिने निर्गमे हीने साधारे निर्गमाधिकम् ॥१३॥**

गजपीठा शिवाय (फक्त) जाड्य कुम्भ, कणी व नंतर ग्रासपट्टी असलेले उपपीठ देखिल कमी खर्चात महान पुण्य देते. हे कामद पीठ. कणपीठांत (फक्त) जाड्यकुम्भ व कणी (हे दोनच) थर (विभाग) असतात. लतिन प्रकारच्या प्रासादात हे थर (दिलेल्याहून) कमी निर्गमनाचे असतात. (तर) सांधार (प्रकारच्या) प्रासादात त्यांचे निर्गमन (वर दिले त्याहून) जास्त असते. (१२, १३) आकृती ८ अ व आ)




८ आ : कणीपीठ

अनुक्रमणिका




**आकृती ८ कामद व कणीपीठ (९·१२-१३)**

**सर्वेषां पीठमाधारः पीठहीनं निराश्रयम् ।**
**पीठहीनं विनाशाय प्रासादभुवनादिकम् ॥१४॥**

पीठ हे सर्वांचे (सर्व वास्तूंचे) आधारभूत असून पीठाशिवाय (असलेली वास्तू) निराधार असते. प्रासाद, भुवन इत्यादी पीठाशिवाय असल्यास त्यांचा विनाश होतो. (१४)

**हस्तादि पंचपर्यंत विस्तारेणोदयः समः । + यादपः**
**सक्रमान्नवसप्तेषु रामचन्द्रोऽङ्गुलाधिकः ॥१५॥**

**(भिंतीच्या उंचीचा नियम)**

एक हातापासून पाच हातापर्यंतच्या रुंदीच्या प्रासादाच्या मंडोवराची उंची रुंदी इतकीच असते. (मात्र) ती (उंची) अनुक्रमाने नऊ, सात, पाच, तीन व एक अंगुलांनी वाढवावी. (१५)

**पंचादिदशपर्यन्तं त्रिंशाद्यावत्शतार्धकम् ।**
**हस्ते हस्ते क्रमाद् वृद्धिः मनुसूर्यनवाङ्गुला ॥१६॥**

पाच हातापासून दहा हातापर्यंत, तेथून ३० व नंतर ५० हातापर्यंत (प्रासादाच्या रुंदीच्या) प्रत्येक हाताच्या वाढीसाठी (मंडोवराची उंची) अनुक्रमे १४, १२ व नऊ अंगुलांनी वाढवावी. (१६)

अनुक्रमणिका

| प्रासादाची रुंदी | | मंडोवराची उंची | | | प्रासादाची रूंदी = क्ष |
|---|---|---|---|---|---|
| (हात) (१) | (मीटर) (२) | (हात-अंगुले) (३) | (हात) (४) | (मीटर) (५) | |
| १ | ०·४५ | १ - ९ | १·३७५ | ०·६१८ | |
| २ | ०·९० | २ - ७ | २·२९१ | १·०३ | |
| ३ | १·३५ | ३ - ५ | ३·२०८ | १·४४ | |
| ४ | १·८० | ४ - ३ | ४·१२५ | १·८६ | |
| ५ | २⅛ | ५ - १ | ५·०४१ | २·२७ | |
| ६ | २·७ | ५ -१५ | ५·६२५ | २·५३ | मंडोवराची उंची |
| : | : | : | : | : | =५·०४१ + (क्ष-५) × ७/१२ हात |
| १० | ४·५ | ५ - 71 | | ३३·५८ | |
| | | | ७ - २३ | ७·९५८ | |
| ११ | ४·९५ | ८ - ११ | ८·४५८ | ३·८१ | मंडोवराची उंची |
| : | : | | | : | =७·९५८ + (क्ष-१०) × ½ |
| ३० | १३·५ | | | १७ २३/२४ | हात |
| ३१ | १३·९५ | १८ ८ | १८·३३३ | ८⅛ | मंडोवराची उंची |
| : | : | | : | : | =१७·९५८ + (क्ष-३०) × ¾ |
| ५० | २२·५: | | २५·४५८ | ११·४६ | हात |

अपराजित पृच्छ १२६·१ — १० मध्ये हाच नियम थोड्या फरकाने दिला आहे.

| प्रासादाची रूंदी | मंडोवराची उंची | | प्रासादाची रूंदी-क्ष |
|---|---|---|---|
| (हात) | (हात०अंगुले) | (हात) | |
| १ | ०·३३ | १·३७५ | |
| २ | ० — ५५ | २·२९१ | |
| ३ | ० — ७७ | ३·२०८ | |
| ४ | ० - ९९ | ४·१२५ | |
| ५ | ० — १२१ | ५·०४१ | |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ५ — १५ | ५·६२५ | |
| : | : | : | =५·०४१ + (क्ष-५) × ५८ हात |
| १० | | ७·९५८+ | |
| ११ | ८-११ | ८·४५८ | मंडोवराची उंची |
| : | : | | |
| २० | | १३·६२५ ++ | =८ + (क्ष - १०) × ·५८ हात |
| २१ | | १४·१२५ | मंडोवराची उंची = १३·२९१ + (क्ष - २०) × १/२ हात |
| : | : | | |
| : | : | | |
| ३० | | १८·२९१ | |
| ३१ | | १८·६६६ | मंडोवराची उंची = १४·१२५ + (क्ष - ३०) × ३/४ हात |
| : | : | | |
| : | : | | |
| ५० | | २५·६२५ +++ | |

[+८ हात घ्यावेत. ++ १३·२९१ घ्यावेत +++ व २५·५ हात घ्यावेत.]

**एक हस्तादि पंचान्तं पृथुत्वेनोदयः समाः (मः ?) ।**
**हस्ते सूर्यांगुला वृद्धिर्यावत् त्रिंशत्करावधि ॥१७॥**

**(भिंतीच्या उंचीचा दुसरा नियम)**

एका पासून पाच हातापर्यंत (मंडोवराची उंची) प्रासादाच्या रुंदीइतकी असते. (६ हातापासून) ३० हातापर्यंत रुंदीच्या प्रासादाच्या (मंडोवराची उंची) प्रत्येक हात वाढीबरोबर १२ अंगुलांनी वाढते. (१७)

**नवाङ्गुला करे वृद्धिर्यावदहस्तशतार्धकम् ।**
**पीठोर्द्धे उदयश्चैवं च्छाद्य (द्या?) न्ते नागरादिकम् ॥१८॥**

(३१ हातापासून) ५० हातापर्यंत (प्रासादाच्या रुंदीच्या) प्रत्येक हात वाढीसाठी (मंडोवराची उंची) नऊ अंगुलांनी वाढते. पीठाच्या वर च्छाद्यापर्यंत नागर इत्यादी (प्रासादांच्या मंडोवराची) उंची समजतात (१८).

| प्रासादाची उंची | | मंडोवराची उंची | | | प्रासादाची रुंदी = क्ष हात |
|---|---|---|---|---|---|
| (हात)<br>(१) | (मी)<br>(२) | (हात-अंगुले)<br>(३) | (हात)<br>(४) | (मी)<br>(५) | |
| १ | ०·४५ | १-० | : | ०·४५ | |
| : | : | : | : | : | |
| ५ | २·२५ | ५-० | : | २·२५ | |
| ६ | २·७ | ६-१२ | ६·५ | २·९२५ | मंडोवराची उंची |
| : | : | : | : | : | = ५ + (क्ष - ५) × ½ हात |
| ३० | १३·५ | १७·१२ | १७·५ | ७·८७५ | |
| ३१ | १३·९५ | १७-२१ | १७·६७५ | ८·०४ | मंडोवराची उंची |
| : | : | : | : | : | =१७·५ +(क्ष - ३०) × ¾ हात |
| ५० | २२·५ | २५-० | २५·० | ११·२५ | |

नागरादि म्हणजे नागर, लतिन, सांधार, मिश्रक, विमाननागरच्छंद व विमानपुष्पक प्रासाद (अप. पृ. १२६.९)]

**एकविंशत् (?) पंचशते प्रासादस्य समुच्छ्रयः ।**
**पंचादिनवभागान्तं पीठस्य पंचधोदयः ॥१९॥**

प्रासादाच्या उंचीचे २१ भाग केले असता पाच भागापासून नऊ भागापर्यंत अशी पाच प्रकाराची पीठाची उंची असते. (१९).

[एकाविंशत्यंशभक्ते अशी दुरुस्ती करुन अर्थ दिला आहे. प्रासादाची उंची = पीठ + मंडोवर यांची उंची. येथे मंडोवराची उंची म्हणजे पीठाच्यावर व च्छाद्याच्या प्रहार थरापर्यंत असे अपराजित पृच्छात (१२६·१०) दिले आहे. मंडनाच्या मताने मात्र पीठाच्यावर च्छाद्यापर्यंत ही उंची धरली जाते.]

**वेदवेदेन्दुभक्ते तु छाद्यन्ते (?) पीठ मस्तकात् ।**
**खुरकः पंचभागं स्याद्विशती कुंभकस्तथा ॥२०॥**

पीठाच्या शीर्षापासून ते च्छाद्यापर्यंत (म्हणजे च्छाद्य धरुन) उंचीचे १४४ भाग केले असता. खुर पाच भाग तसेच कुंभ २० भाग असावा. (२०)

[अपराजित पृच्छा १२७·३-५ मध्ये खुर व १२७· ६-९ मध्ये कुंभाच्या उपथरांची माहिती दिली आहे.

**खुराची** उंची पाच भाग असून निर्गमन दोन भाग असते.

अनुक्रमणिका

अंतःपत्र = ½ भाग, खाली व वर दोन पट्टांसह टोकदार कर्ण = २ भाग, चिप्पिका = १·५ भाग व कर्णक = १·५ भाग असे एकूण ५·५ भाग होतात. चिप्पिका १ भाग घेतल्यास एकंदर पाच भाग होतील. पट्टिकेचे निर्गमन ⅛ भाग व कर्णकाचे निर्गमन १·२५ भाग असते. (½ भाग निर्गमन इतर उपथरांचे असते)

**कुंभ** २० भाग असतो. स्कंधपट्टी = ½ भाग, स्कंध वृत्ताकार असतो. व चिप्पिका = १ भाग. चिप्पिकेवर पानांची नक्षी करावी. कुंभ थरावर पूर्वेकडील भद्रावर ब्रह्मा, उत्तरे-कडील भद्रावर विष्णु व पश्चिमेकडील भद्रावर महेश्वर यांच्या मूर्ती असाव्यात.]

**कलशोऽष्टौ द्विसार्धं तु कर्तव्यं मन्तरालकम् ।**
**कपोतिकाष्टौ मंची स्यात् कर्तव्या नवभागिका ॥२१॥**

कलश आठ भाग व अंतराल २·५ भाग करावा. कपोतिका आठ भाग व मंची नऊ भागांची करावी. (२१)

[**कलश** = ८ भाग उंच (अपराजित पृच्छा १२७·११-१२). मध्यचिप्पिकेसह वृत्त = ६ भाग, मध्यचिप्पिका = १ भाग, ऊर्ध्वचिप्पिका= १ भाग, पट्टिका = १ भाग. एकंदर ८ भाग


**कपोतिका** = ८ भाग, (अपराजितपृच्छा १२७·१३-१६) ग्रासपट्टि = ½ भाग, स्कंध = २⅛ भाग, मुखपट्टि (स्कंधाचा एक भाग) = १⅛ भाग, कर्ण = २ भाग, स्कंध = २ ½ भागा, स्कंधपट्टि = ½ भाग, एकंदर ७ ⅜ भाग स्कंधावरती मुखपट्टीच्या खाली गगारकांची नक्षी करावी गगारकाची माहिती पुढे उंबऱ्याची माहिती दिली आहे तेथे पहावी.

**मंची** नऊ भाग उंचीची असते (अपराजितपृच्छा १२७·१७-२०).

अंतःपट्ट =१ ⅛ भाग, कामरुप =⅜ भाग, पट्टिका = १ ⅛ भाग, स्कंध =२ भागे, कर्ण = १ ⅛ भाग, स्कंध = १ ⅛ भाग, कपोतालि = १ ⅛  भाग एकंदर नऊ भाग

**पंचत्रिंशत् पदाजंघा तिथ्यंशैरुद्‌गमो भवेत् ।**
**वसुभिर्भरणी कार्या शिरापट्टी दशांशिका ॥२२॥**

जंघा ३५ भाग, उद्‌गम १५ भाग असावी, भरणी आठ भागांची करावी; शिरापट्टी १० भाग असावी. (२२) (आकृती ९, १० व ११)




**आकृती ९ सोमनाथ पाटण येथील सूर्याचे देवालय**

[**जंघा** ३५ भाग उंचीची असते (अपराजित पृच्छा १२७· २१ - २६) जंघेवरती नक्षी म्हणून हत्ती, सिंह, काळ व मकर यांच्या रांगा दाखवाव्यात. कोनांपाशी आठ दिक्पालांच्या मूर्ती असतात. भद्रावरती शंकराची नटेशमूर्ती असावी. गंधक मूर्ती दक्षिण दिशेकडील भद्रावर असावी. तसेच जंघेवर ब्रह्मा, विष्णु, महेश आणि इतर देवांच्या मुर्ती कोरतात. पाण्याची निष्कास नाली उत्तरेकडे बाहेर आलेली असते. तेथे चंडाची मूर्ती असावी. चंडाच्या उत्तरेस जंघेवर द्रंष्ट्रांनी शोभत असलेल्या देवीची मूर्ती असते. वीतराग व त्यांच्या शासन देवता यांच्या मूर्ती देखिल जंघेवर असतात. उभे वारिमार्ग असतात त्यांच्यापाशी समाधीत मग्न असलेले ऋषी मुनी दाखवावेत.

**उद्गम** १५ भाग असतो (अपराजित पृच्छा १२७·२७-३०) च्छाद्य = १ भाग, कपोतालि = ½ भाग, अंतरपत्र = ⅛ (½ ?) भाग, पहिला उद्गम = ५ ½ भाग व दुसरा उद्गम = ८ ½ भाग अंतःपत्र = ½ भाग, अंधारिका = ½ भाग व ग्रासपट्टी = ३ भाग, एकंदर १५ भाग.

**भरणी** ८ भाग असते (अपराजितपृच्छा १२७·३१-३७). एकंदर १३ उपथर असतात. कामरूप = ⅜ भाग, स्कन्धपट्टि = ⅛ भाग, चिघिका = ½ भाग, कर्णपालिका = १ ⅛ भाग, पट्टिका = ⅛ भाग, अंतरपट्टि =⅛ भाग, स्कन्ध = २ भाग, कर्णपालिका = ½ भाग, पट्टिका = ⅛ भाग, अंतरपट्टि = ⅛ भाग, स्कन्ध =½ भाग, कर्ण = ⅜ भाग, अंतःपत्र = ½ भाग, एकंदर आठ भाग कामरूपावर अशोकाच्या पानांची नक्षी असावी. स्कंधपट्टि वृत्ताकार असते.

**पट्टयुक्ता शिरावटी** दहा भाग असते (अपराजित पृच्छा १२७·३८-४०) भारपुत्रलिंकांचा उपथर = ३ भाग, स्कंध = ⅜ भाग, कर्ण = ⅜ भाग, अंतःपत्र = ½ भाग, पट्ट = ५ भाग.

**अष्टांशोर्धा कपोतालिः द्विसार्धं मन्तरालकम् ।**
**च्छाद्यं त्रयोदशांशोस्त्रं दशभागैर्विनिर्गमः ॥२३॥**

**इति मंडोवरः ।**

अनुक्रमणिका

वरची कपोतालि आठ भाग व अंतराल २ ½ भाग असावा. च्छाद्याची उंची १३ भाग असून निर्गमन दहा भाग असते. (२३)

मंडोवराची माहिती संपली.

[कपोतालि आठ भाग असते (अपराजितपृच्छा १२७·४१) तेथे **अंतराल** हा पट्ट २ ½ भाग असतो. कूट च्छाद्य १३ भागांचे असते. स्कंधपट्टि = ½ भाग, स्कंध = ३ भाग, मुखपट्टि = ½ भाग, च्छाद्य = ४ (३ ?) भाग दंडिका = १ भाग, अंतरपत्रिका = ½ भाग, कर्ण = १ ¼ भाग, स्कंध = २ भाग, स्कंधपट्टी = १ ¼ भाग एकंदर तेरा भाग.

**मेरूमण्डोवरे मञ्ची भरण्युर्द्धेष्वभागिका ।**
**पंचविंशातिका जंघा उद्‌ममश्व त्रयोदशः ॥२४॥**

मेरू प्रकारच्या प्रासादाच्या मंडोवरांत भरणीच्या वर मंची आठ भाग असते; जंघा २५ भाग व उद्‌गम १३ भाग असतो. (२४)


[वर दिलेल्या १४४ भागांच्या मंडोवरांत भरणीच्यावर जे शिरावटी, कपोताली, अंतराल व च्छाद्य हे थरविभाग दिले आहेत ते मेरूमंडोवरांत गाळले जातात. भरणीच्यावर मंची व मंचीवर दुसरी जंघा येते.]

**अष्टांशा भरणी शेषं पूर्ववत् कल्पयेत सुधीः ।**
**सप्तभागा अबेन्मंची कुटच्छाद्यस्य मस्तके ॥२५॥** + **कूट**


भरणी आठ भाग असून उरलेले थरविभाग शहाण्या (शिल्पीने) पूर्वी प्रमाणेच ठेवावेत. कूट च्छाद्याच्या शीर्षावर सात भागांची मंची करावी. (२५)

[दुसऱ्या जंघेच्यावर उद्‌गम व भरणी हे थरविभाग दिल्यानंतर पूर्वीचे शिरावटी (१० भाग), कपोताली (७ भाग), अंतराल २ ½ भाग व कूटच्छाद्य (१३ भाग) हे १४४ थर विभागांत सांगितलेले, पहिल्या जंघेवर दिलेले थर विभाग दुसऱ्या जंघेवर द्यावेत.]

अनुक्रमणिका



**आकृती (१०) भुसावळा (जिल्हा जळगांव) जवळील चांगदेवाचे देवालय, उपपीठ व मंडोवराचे थरविभाग ( श्लोक ३/८-११)**



**आकृती (११) मेरू मण्डोवराचे थरविभाग ( श्लोक ३/२४-२७)**

**षोडशांश पुनर्जंघा भरणी सप्तभागिका ।**
**शिरावटी चतुर्भागा पट्टः स्यात् पंचभागिकः ॥२६॥**


पुन्हा १६ भागांची जंघा असते व भरणी सात भाग असते, शिरावटी चार भाग व पट्ट पाच भागांचा असाते. (२६)

**सूर्यांशैः कूटच्छाद्यं च सर्वकामकलप्रदम् ।**
**कुंभकस्य युगांशेन स्थावराणां प्रवेशकः ॥२७॥**

**इति मेरूमण्डोवरः ।**

कूटच्छाद्य १२ भाग असून हे मंडोवर सर्व कामनाफलद्रूप करणारे असते. स्थावरांचे (म्हणजे थरविभागांचे) अंतर्गमन कुंभक थराच्या (उंचीच्या?) पावभागाइतके असते. (२७) आकृती १२ व १३)

अनुक्रमणिका



**आकृती (१२) मेरू मण्डोवर, औंढ्या नागनाथाचे मंदीर (श्लोक ३/१९-२८)**

**मेरूमण्डोवराची माहिती संपली**

[मेरूमंडोवराचे थरविभाग खालील प्रमाणे येतात. खुरक = ५ भाग, कुंभ = २० भाग, कलश = ८ भाग, अंतराल = २ ½ भाग, कपोतिका =८ भाग, मंची = ९ भाग, जंघा = ३५ भाग, उद्‌गम = १५ भाग, भरणी = ८ भाग, मंची = ८ भाग, जंघा = २५ भाग, उद्‌गम = १३ भाग, भरणी = ८ भाग, शिरावटी = १३ भाग, कपोताली = ८ भाग, अंतराल = २ ½ भाग, च्छाद्य = १३ भाग, मंची = ७ भाग, जंघा = १३ भाग, भरणी = ७ भाग शिरावटी = ४ भाग, पट्ट = ५ भाग, कूटच्छाद्य = १२ भाग, एकूण २४९ भाग.]

**शिरावटयुद्‌गमो भागे जंघारूपाणि वर्जयेत् ।**
**अल्पद्रव्ये महत्पुण्यं कथितं विश्वकर्मणा ॥२८॥**

**इति सामान्य मण्डोवरः ।**

शिरावटी व उद्‌गम या थरांत व जंघेवर मूर्ती वगळाव्यात. या (मंडोवराने) कमी खर्चात महापुण्याची प्राप्ति होते असे विश्वकर्म्याने सांगितले आहे. (२८)

**सामान्य मंडोवराची माहिती संपली**

[शिरावटी व उद्‌गम या थरविभागांत मूर्ती असाव्यात असे मंडन तसेच अपराजितपृच्छाकर भुवनदेवाचार्यही म्हणत नाहीत. तेव्हा वरील श्लोकाचा अर्थ शिरावटी व उद्‌गम या थरांत फार कोरीव काम करू नये ज्याच्या मुळे खर्चाचे मान वाढते ते करू नयेत असा असावा.].

**पीठतः च्छाद्यपर्यंतं सप्तविंशतिभाजिते ।**
**द्वादशानां खुरकादीनां भागसंख्या क्रमेण तु ॥२९॥**

अनुक्रमणिका

**स्यादेक वेदसार्धार्द्ध सार्धस्या धीष्ट भिस्त्रिभिः ।**
**सार्ध स्यार्धार्ध भागैः स्याद्विसार्धैद्व्यंश निर्गमः ॥३०॥**

पीठापासून छाद्यापर्यंत (मंडोवराच्या उंचीचे) २७ भाग केले असता खुरक इत्यादि बारा थरविभागांची अनुक्रमाने भागांची संख्या एक, चार, १ ½, ½, १ ½, १ ½, ८, ३, १ ½, (१ ½), १ ½, ½, व २ ½ भाग असून (एकूण निर्गमन) दोन भाग असते. (३०)

[येथे शिरावटीचा थर नाही. जो वरती कंसात १ ½ भाग म्हणून दाखविला आहे. तो जर धरला नाही तर एकंदर १२ थरविभागांची २७ भागांत विभागणी हा हिशोब बरोबर जमतो.

खुर = १ भाग, कुंभ = ४ भाग, कलश = १ ½ भाग, अंतरात ½ भाग, कपोतालि = १ ½ भाग, मंची = १ ½ भाग, जंघा = ८ भाग, उद्गम = ३ भाग, भरणी = १ ½ भाग, कपोतालि = १ ½ भाग, अंतराल = ½ भाग, च्छाद्या = २ ½ भाग, एकूण २७ भाग.]

**पादांशेनेष्टके पंचपंडशैः शैलदारुजे ।**
(?) **साधोरिष्टांशतो भित्तिर्दशांशैर्धातुरत्नजे ॥३१॥**

(प्रासादाच्या रुंदीच्या) ⅛ भागाइतकी वीटांच्या भिंतीची जाडी असते. दगडी व लाकडी भिंतींची जाडी अनुक्रमे (प्रासादाच्या रूंदीच्या) ⅕ व ⅙ भागाइतक्या असतात, सांधार प्रासादांत भिंत (प्रासादाच्या रुंदीच्या ⅛ भागा जाडीची असावी. धातूची किंवा रत्नमय भिंत असल्यास तीची जाडी (प्रासादाच्या रुंदीच्या) १/१० भाग असावी. (३१)

[साधोरिष्टांशतो भित्तिः या ऐवजी सान्धारे ऽष्टां शतो भित्तिः असा पाठभेद घेऊन अर्थ केला आहे.]

**मध्ये युगास्त्रं भद्राढयं सुभद्रं प्रतिभद्रकम ।**
**फालनीयं गर्भगृहं दोषदं गर्भमायतम् ॥३२॥**

**गर्भगृह चौरस असावे व त्याला भद्र, सुभद्र, प्रतिभद्र अशा फालना असाव्यात आयताकार गर्भगृह दोषा स्पद आहे. (३२)**

**[भद्र, उपरथ, प्रतिरथ वगैरे प्रासादाच्या अंगांना फालना म्हणतात.**

**अपराजित पृच्छात (१२६·२५) दारुज व वलभी प्रकार आयताकार ठेवल्यास दोष नाही असे म्हटले आहे. ]**

**कुम्भकेन समाकुम्भो स्तम्भप्रान्ते न तूद्गमाः।** + **जतु**
**भरण्या भरणं शीर्षं कपोताल्या समं भवेत् ॥३३॥**

अनुक्रमणिका

**खांबाचा कुम्भ (थर) व मंडोवराचा कुम्भ (थर) समपातळीत असतात. खांबाचा भरणीच्या खालचा भाग व मंडोवराचा उद्‌गम, खांबाची भरणी व मंडोवराची भरणी, खांबाचे शीर्ष (थर) व मंडोवराचा कपोतालीचा (थर) हे सर्व परस्परांच्या समपातळीत असतात. (३३)**

**+ पटेके पटेके कुठ (ट ?) च्छाद्यस्य कर्यात् पट्टस्य पेटकम् ।**
**सषडंश - सपादस्य सार्धो गर्भस्य विस्तरात् ॥३४॥**

(कूटच्छाद्य असे उतरते असते की) कूटच्छाद्याचा पट्ट व त्याच्या खाली (पुढच्या अंगाला असलेला) पट्ट ही समपातळीत असतात. प्रासादाच्या गाभाऱ्याची उंची गाभाऱ्याच्या रुंदीच्या १ १/६, १ १/४ किंवा १ १/२ इतकी असावी. (३४)

**बृहद्‌देवालये पट्टे पेटान्त हि त्रिदोदयः । + त्रियोदयः**
**भजेदष्टाभिरेकांशा कुंभिस्तम्भोर्द्धपंचभिः ॥३५॥**

मोठ्या देवालयांत अशी (तळापासून) कूटच्याद्याच्या खाली असलेल्या पट्टाच्या पेटाभागापर्यन्त तीन प्रकारची गाभाऱ्याची उंची सांगतात. या उंचीचे आठ भाग करून, कुंभि एक भाग व खांब ५ १/२ भाग असावा. (३५)

**अर्धेन भरणीशीर्षमेकपट्टस्तु सार्धकम् ।**
**व्यासार्धेन कराट स्याद द्वयो विषमाश्रुता ॥३६॥**

**इति गर्भगृहोदय प्रमाणम् ।**

भरणी १/२ भाग, शीर्ष एक भाग, पट्ट १ १/२ भाग असतात. करोट (म्हणजे घुमट) रुंदीच्या निम्मे (उंचीचा) असून त्याचे विषम संख्येने विभाग होतात. (३६)

[पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीप्रमाणे 'व्यासार्धेन करोटंस्थात् दर्दरी विषमा शुभा' असा दुसरा चरण आहे. व त्याप्रमाणे अर्थ केल्यास दर्दरी नांवाचा थर विषम संख्यांचा असावा असा होतो. अपराजितपृच्छांत (१२९·७) करोट हा शब्द नसून पद्‌मशिला तिच्या व्यासाच्या निम्मे उंचीची असते असे म्हटले आहे व पाच किंवा सात दर्दरिका कराव्यात असे दिले आहे.

तसेच गाभाऱ्याच्या तळापासून पट्टाच्या खालच्या उंचीचे आठ भाग करतात व त्याप्रमाणे कुंभि, खांब, भरणी व शीर्ष अर्थात शिरावटी एकंदर आठ भागांच्या होतात व त्यांच्या वर १ १/२ भागांचा पट्ट असतो असा श्लोक ३५ चा दुसरा चरण व श्लोक ३६ चा पहिला चरण यांचा अर्थ होतो.]

**मूलकर्णैश्च सूत्रेण कुम्भेनोदुम्बरः समः ।**
**तदधः पञ्च रत्नानि स्थापये (त्) शिल्पिजनात् ॥३७॥**

अनुक्रमणिका

मूळ कोनांच्या समसूत्रांत दाराचा उंबरठा असतो व त्याची उंची मंडोवराच्या कुंभाच्या थराच्या समपातळीत तो येईल इतकी असावी. उंबरठ्याच्या खाली पाच रत्ने ठेवावीत व शिल्पीची पूजा करावी. (३७)

[दाराचा उंबरठा हा प्रतिरथ किंवा उपरथ इत्यादी फालनांच्या ओळीत न येता कोनांच्या ओळीत असतो.]

**द्वारव्यासे त्रिभागेन मध्ये मन्दारको भवेत् ।**
**वृतं मन्दारकं कुर्यात् मृणालं पद्मसंयुतम् ॥३८॥**

दाराच्या रुंदीचे तीन भाग करून मधल्या भागी मन्दारक असावा. कमलनालासाहित कमळ यांच्यासह वर्तुळाकृती मन्दारक करावा (३८)

**जाडय कुम्भः कणाली च कीर्त्तिवक्त्रद्वयं तथा ।**
**उदुंबरस्य पार्श्वे च शाखायां स्तल रूपकम् ॥३९॥**

(उंबरठ्याच्या उंचीत) जाड्य कुंभ व कणाली (म्हणजे कणपीठ) करावे, तसेच (उंबरठ्याच्या दोन्ही बाजूंना) दोन कीर्तिमुख करावीत. उंबरठ्याच्या दोन्ही बाजूंना (दरवाजाच्या चौकटीच्या) शाखांच्या तळाप्रमाणे आकार घावा. (३९)

[शाखा अधोच्छन्दामध्ये जशा दिसतील तसा आकार उंबरठ्याच्या कीर्ति मुखांच्या नंतरच्या व शाखांच्या खाली येणाऱ्या भागाला द्यावा.]

**कुम्भस्थार्ध्दे त्रिभागे वा पादहीन उदुम्बरः ।**
**तद्वयं कंकणं मध्ये पीठके बाहयभूमिका ॥४०॥**

**इति उदुम्बरः ।**

(उंबरठ्याची उंची कुंभाइतकी ठेवावयाची नसल्यास ती) कुंभाच्या उंचीच्या निम्मे किंवा ⅓ ने अथवा ⅛ ने कमी इतकी ठेवावी. (उंबरठ्याच्या) अर्ध्या उंची इतका कणक (थर विभाग) ठेवावा. उंबरठ्याच्या बाहेरील मंडपाच्या जमीनीची उंची उपपीठाच्या पृष्ठभागाच्या समपातळीत असते.

**उंबरठ्याची माहिती संपली.**

[अपराजितपृच्छा १२९·११ प्रमाणे गर्भगृहाची जमीन कणीपीठाच्या वरच्या कडेच्या समपातळीत ठेवावी.]

**रवुरकेणसमं कुर्यादर्धं चन्द्रस्य चोच्छ्रितः ।** **+तिः**
**द्वाख्यासमं दैर्घ्यं निर्गमं च तदर्धतः ॥४१॥**

अनुक्रमणिका

खुराच्या समपातळीत येईल इतकी उंची अर्धचंद्राची असावी. त्याची (अर्धचंद्राची) रुंदी दाराच्या रुंदीइतकी असून दाराच्या बाहेर त्याचे निर्गमन त्याच्या (रुंदीच्या) निम्मे असावे. (४१)

**द्विभागमर्धचन्द्रं च भागेन द्वौ गगारिकौ । +र**
**शंखपत्र समायुक्तं पद्माकारैरलंकृतम् ॥४२॥**

**इति अर्धचन्द्रः ।**

(दाराच्या रुंदीचे तीन भाग केले असता) अर्धचन्द्र दोन भागांचा असून (त्याच्या दोन्ही बाजूंना) एक भागाइतके (प्रत्येकी ½ भाग) दोन गागारक असतात (गगारक व अर्धचन्द्र यांच्या मध्ये) कमळाच्या आकृतींनी अलंकारिलेले शंख व पाने दाखवविलेली असतात. (४२)

**अर्ध चन्द्राची माहिती संपली.**

**एक हस्ते तु प्रासादे द्वारं स्थात् षोडशांगुलम् ।**
**षोडशाङ्गुलिका वृध्दिर्यावद् हस्तचतुष्टयम् ॥४३॥**

एक हात रुंदीच्या प्रासादाच्या दाराची उंची १६ अंगुले असावी. चार हात रुंदीच्या प्रासादापर्यंत प्रत्येक हाताच्या वाढीला दाराची उंची १६ अंगुलांनी वाढते. (४३)

**अष्टहस्तांशकं यावत् दीर्धे वृद्धि र्गुणांगुला ।**
**द्व्यंगुला प्रतिहस्तं च यावद् हस्तशतार्धकम् ॥४४॥**

(पाच हातांपासून) आठ हातांपर्यंत (रुंदीच्या प्रासादांसाठी) प्रत्येक हात वाढीला दाराची उंची चार अंगुलांनी वाढते. (नऊ हातांपासून) ५० हातांपर्यंत (रुंदीच्या प्रासादांसाठी) प्रत्येक हात वाढीला दाराची उंची दोन अंगुलांनी वाढवावी. (४४)

| प्रासादाची रुंदी | | दारांची उंची | | प्रासादाची रुंदी = क्ष हात |
|---|---|---|---|---|
| (हात) (१) | (मी) (२) | (अंगुले) (३) | (सें.मी) (४) | |
| १ | ०·४५ | १६ | ३०·४ | |
| २ | ०·९० | ३२ | ६०·८ | |
| ४ | १·८० | ६४ | १२१·६ | |
| ५ | २·२५ | ६४ | १२९·६ | |
| ६ | २·७० | ७२ | १३६·८ | |
| ७ | ३·१५ | ७६ | १४४·४ | |
| ८ | ३·६ | ८० | १५२·० | |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | ४·०५ | ८२ | १५५·८ | |
| : | : | : | : | दाराची उंची = ८० + (क्ष - ८) × २ अंगुले |
| ५० | २२·५ | १६४ | ३११·६ | = १६४ अंगुले. |

**यान वाहन पर्यंक द्वार प्रासादसद्‌म नाम्।**
**दैर्घ्यार्धेन पृथुत्वे स्थात् शोभनं तत् कलाधिकम् ॥४५॥**
**इति नागर प्रासादद्वारम् ।**

यान (रथ, बैलगाडी इत्यादी), वाहन (शिबिका वगैरे), पलंग प्रासाद (व) घर यांच्या दाराची रुंदी उंचीच्या निम्मे असावी. (रुंदी) १/१६ भागांनी जास्त असल्यास ते (दार) अधिक शोभायमान दिसते. (४५)

**नागर प्रासादाच्या दाराची माहिती संपली.**

[दाराची रुंदी = ½ उंची, किंवा दाराची रुंदी = (½ + १/१६) उंची.]

**एक हस्ते सुरागारे द्वारं सूर्यांगुलोद्यम् ।**
**सूर्यांगुला प्रीतकरं वृद्धिः पंचकरावधिः ॥४६॥**

एक हात रुंदीच्या देवालयाच्या दाराची उंची १२ अंगुले असते. पाच हातापर्यंत (रुंदीच्या प्रासादासाठी), प्रत्येक हाताच्या वाढीला दाराची उंची १२ अंगुलांनी वाढते. (४६)

**पंचांगुला च सप्तान्तं दृवंगुला तु शतार्धके ।**
**नवान्तं स्थात् युगांगुलं वृद्धिः कार्या करं प्रति ॥४७॥**
**इति भूमिते द्वारम् ।**

(पाच हातांपासून) सात हातापर्यंत (रुंदीच्या प्रासादाच्या दाराची उंची, प्रत्येक हाताच्या वाढीसाठी) पाच अंगुलांनी वाढवावी व (सात हातांपासून) नऊ हातांपर्यंत (प्रत्येक हात वाढीला) चार अंगुलांनी वाढवावी. (नऊ हातांपासून) ५० हातापर्यंत (रुंदीच्या प्रासादाच्या दाराच्या उंचीत) प्रत्येक हाताच्या वाढीसाठी दोन अंगुलांनी वाढ करावी. (४७)

**भूमिज प्रासादाच्या दाराची माहिती संपली**

| **प्रासादाची रुंदी** | | **दारांची उंची** | | **प्रासादाची रुंदी = क्ष हात.** |
|---|---|---|---|---|
| **(हात)** (१) | **(मी)** (२) | **(अंगुले)** (३) | **(सें.मी.)** (४) | |
| १ | ०·४५ | १२ | २२·८ | |
| २ | ०·९० | २४ | ४५·६ | |
| ५ | २·२५ | ६० | ११४ | |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | २·७० | ६५ | १२३·५ | |
| ७ | ३·१५ | ७० | १३३ | |
| ८ | ३·६ | ७४ | १४०·६ | |
| ९ | ४·०५ | ७८ | १४८·२ | |
| १० | ४·५ | ८० | १५२·० | दाराची उंची = ७८ + (क्ष - ७) × २ |
| : | : | : | : | |
| ५० | २२·५ | १६० | ३०४·० | अंगुले |

**प्रासादे एक हस्ते तु द्वारं कुर्याद् दशांगुलम् ।**
**रसहस्तान्तकं यावत् तावता वृद्धिरिष्यते ।**
**पंचांगुलं दशान्तं च ध्वंगुलं वा शतार्धकम् ॥४८॥**
**इति द्राविडे द्वारम् ।**

एक हात रुंदीच्या प्रासादाच्या दाराची उंची दहा अंगुले असावी. सहा हातांपर्यंत (प्रासादाच्या रुंदीच्या प्रत्येक हात वाढीला दाराची उंची) तेवढ्याच (म्हणजे दहा) अंगुलांनी वाढवावी. (सात हातांपासून) दहा हातांपर्यंत पाच अंगुलांनी व (तेथुन म्हणजे ११ हातांपासून) पन्नास हातांपर्यंत (प्रासादाच्या रुंदीच्या प्रत्येक हात वाढीला) दोन अंगुलांनी वाढ करावी. (४८)

**द्राविड (प्रासादाच्या) दाराची माहिती संपली.**

| **प्रासादाची रुंदी** | | **दारांची उंची** | | **प्रासादाची रुंदी = क्ष हात** |
|---|---|---|---|---|
| **(हात)** | **(मी)** | **(अंगुले)** | **(सें.मी.)** | |
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | |
| १ | ०·४५ | १० | १९ | |
| २ | ०·७० | २० | ३८ | दाराची उंची = १० × क्ष अंगुले. |
| : | : | : | : | |
| ६ | २·७० | ६० | ११४ | |
| ७ | ३·१५ | ६५ | १२३·५ | दाराची उंची = (क्ष - ६) × ५ अंगुले. |
| ८ | ३·६ | ७० | १३३ | |
| ९ | ४·०५ | ७५ | १४२·५ | |
| १० | ४·५ | ८० | १५२ | |
| ११ | ४·९५ | ८२ | १५५·८ | |
| १२ | ५·४ | ७४ | १५९·६ | दाराची उंची = (क्ष - १०) × २ अंगुले. |
| २४ | १०·८ | १०८ | २०५·२ | |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | २२·५ | १६० | ३०४·० |

अपराजितपृच्छा १३०· २४ - २५ मध्ये हीच माहिती दिली आहे.]

**विमाने भौमिजेमानं विराटेषु तथैव च ।**
**मिश्रके लतिने चैव प्रशस्ते नागरो द्भवम् ॥४९॥**

विमान व विराट प्रकारच्या प्रासादांच्या दारांची मापे भूमिज प्रकारच्या दारांच्या मापाप्रमाणे असतात. मिश्रक व लतिन प्रकारच्या प्रासादांच्या दारांची मापे नागरप्रासादाच्या दाराच्या मापाप्रामणे ठेवणे योग्य असते. (४९)

**विमाननागरच्छन्दे कुर्याद् विमानपुष्पके ।**
**सिंहावलोकने द्वारे नागरं शोभनं मतम् ॥५०॥**

विमाननागरच्छन्द, विमान पुष्पक (त्याच प्रमाणे) सिंहावलोकन प्रासाद यांच्या दारांची मापे नागर प्रासादाच्या दाराप्रमाणे घेतली असता ते शोभादायक मानतात. (५०)

**वलभ्यां भौमजं मानं कासाकारेषु द्राविडः ।** + फा
**धातुजे रत्नजे चैव दारुजे च रथारुहे ॥५१॥**

**इति द्वार प्रमाणम्**

वलभी प्रासादाच्या (दाराचे माप) भूमिज प्रासादाच्या (दाराप्रमाणे) असते फासाकार प्रासादाच्या (दाराचे माप) द्राविड प्रासादाच्या (दारा प्रमाणे) असते. तसेच धातू, रत्न, दारुज व रथारुह प्रकारच्या प्रासादांच्या (दाराचे माप) द्राविड प्रासादाच्या (दारा प्रमाणे) असते. (५१)

**दारांच्या मापांची माहिती संपली.**

| **प्रासादाचा प्रकार प्रासादाची रुंदी** | | **नागर लतिन, सान्धार, मिश्रक, सिंहावलोकन, विमान नागर विमानषुष्पक** | | **भूमिज, विमान, वराट, वलभी** | | **द्राविड, फासनांकार** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (हात) | (मी) | (अंगुले) | (सें.मी.) | (अंगुले) | (सें.मी.) | (अंगुले) | (सें.मी.) |
| १ | ०·४५ | १६ | ३०·४ | १२ | २२·८ | १० | १९ |
| २ | ०·७० | ३२ | ६०·८ | २४ | ४५·६ | २० | ३८ |
| ३·१३५ | ४८ | ९१·२ | ३६ | ३८·४ | ३० | ५७ | |
| ४ | १·८० | ६४ | १२१·६ | ४८ | ९१·२ | ४० | ५७ |
| ५ | २·२५ | ६४ | १२७·६ | ६० | ११४·० | ५० | ९५ |

अनुक्रमणिका

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | २·७० | ७३ | १३३ | ६५ | १२३·५ | ६० | ११४ |
| ७ | ३·१५ | ७६ | १३८·७ | ७० | १३३·० | ६५ | १२३·५ |
| ८ | ३·६ | १४४·४ | ७४ | १४०·६ | ७० | १३३·० | |
| ९ | ४·०५ | ७८ | १४८·२ | ८७ | १४८.२ | ७५ | १४२.५ |
| १० | ४.५ | ८० | १५२.० | ८० | | ८० | |
| ११ | ४.९५ | ८२ | १५५.८ | ८२ | | ८२ | |
| १५ | ६·७५ | ७० | १७१ | ९० | | ९० | |
| २० | ९·० | १०० | १९० | १०० | | १०० | |
| २५ | ११·२५ | ११० | २०९ | ११० | | ११० | |
| ३० | १३·५ | १२० | २२८ | १२० | | १२० | |
| ३५ | १५·७५ | १३० | २४७ | १३० | | १३० | |
| ४० | १८·० | १४० | २६६ | १४० | | १४० | |
| ४५ | २०·२५ | १५० | १८५ | १५० | | १५० | |
| ५० | २२·५ | १६० | ३०४ | १६० | | १६० | |

**नवशाखं महेशस्य देवानां सप्तशाखिकः ।**
**पंचशाखं सार्वभौमे त्रिशाखं मण्डलेश्वरे ॥५२॥**

शंकरासाठी (च्या प्रासादाला) नऊ शाखांचे, (इतर) देवांसाठी सातशाखांचे, सार्वभौम राजासाठी पाच शाखांचे व मण्डलेश्वारासाठी (मांडलीक राजासाठी) तीन शाखांचे (दार असते). (५२)

**एक शाखं भवेद् द्वारं शूद्रे वैश्ये द्विजे सदा ।**
**समशाखं च धुमाये श्वानरा सभवायसे ॥५३॥**

शूद्र, वैश्य व ब्राह्मणांच्या (घरांची) दारे नेहमीच एक शाखेची असावीत. ज्या घरांचे आय धूम्र, कुत्रा, गाढव व कावळा आहेत त्यांची दारे समसंख्येच्या शाखांची करावी. (५३)

[अपराजितपृच्छा १३१·१० प्रमाणे शूद्र, वैश्य व ब्राह्मणांच्या घरासाठी दोन शाखांचे दार करावे. मंण्डनाने केलेली दुरुस्ती योग्य वाटते कारण समसंख्याच्या शाखांचे दार अशुभ असते.

शाखांच्या संख्येवरून त्यांना नावे दिली आहेत. (अपराजित पृच्छा १३१·२-१०)

**उत्तमा** शाखा - नवशाखा - **पद्मिनी, सप्ताशाखा - हस्तिनी**, पंचशाखा - **नन्दिनी.**
**ज्येष्ठ** शाखा - अष्टशाखा - **मुकुली**, षट्शाखा - **मालिनी**.
**मध्यम** शाखा चतुःशाखा - **गान्धारी,** त्रिशाखा - **सुभगा**

अनुक्रमणिका


**कनिष्ठ** शाखा - **द्विशाखा** - **सुप्रभा**, एकशाखा - **स्मरकीर्तित**
**घराच्या आयांप्रमाणे शाखांची संख्या :-**

| शाखांची संख्या | घराचा आय | घर मालक |
| --- | --- | --- |
| नऊ | ध्वज | महादेव |
| आठ | कावळा | पक्षी पाळणारे, पकडणारे |
| सात | गज | देव |
| सहा | गाढव | धोबी व तत्सम |
| पाच | वृषभ | सार्वभौम राजा |
| चार | कुत्रा | कामकरी |
| तीन | सिंह | मांडलीक राजा |
| दोन | धूम्र | अग्निवर उपजिवीका करणारे, लोहार, सोनार वगैरे. |
| एक | ध्वज | शूद्र, वैश्य व ब्राह्मण. |

**त्रिपंचसातनन्दाये शाखाः स्युरंगतुल्यका ।**
**हीनशाखं न कर्तव्यं अधिकाद्यं सुखा वहम् ॥५४॥**

तीन, पाच, सात व नऊ अंग (फालना) असलेल्या प्रासादांना तितक्याच संख्येच्या शाखा असलेले दार करावे. कमी संख्येच्या शाखा असलेले दार करू नये. अधिक संख्येच्या शाखा असलेले दार केल्यास ते सुखदायक होते. (५४)

[अपराजितपृच्छा १३१·१४-१५ नुसार त्र्यंग प्रासादाला तीन शाखांचे दार, पंचांग प्रासादाला पाच शाखांचे, सप्तांग प्रासादाला सातशाखांचे व नवांग प्रासादाला नऊ शाखांचे दार असावे असे म्हटले आहे व नंतर शाखांची संख्या प्रासादाच्या अंगांच्या संख्येपेक्षा जास्त असावी कमी असू नये असा सामान्य नियमही दिला आहे. आणि हाच अर्थ मण्डनाला अभिप्रेत्र असावा. तेव्हा 'त्रिपंचसप्त नन्दाये' हा शब्द 'त्रिपंचसप्तनन्दाङ् गे' असा सुधारुन वर अर्थ दिला आहे. शिवाय आयाची मोठ्यात मोठी संख्या आठ आहे तेव्हा नऊ आय हे योग्य वाटत नाही. असे वाटते की शाखांची संख्या प्रासादाच्या अंगांपेक्षा जास्त ठेवतांना ती संख्या विषमच असेल याची काळजी घ्यावयास हवी. समजा प्रासाद पंचांग प्रकारचा असेल तर दाराच्या शाखा पाच असाव्यात जास्त शाखांचे दार करावयाचे असल्यास सात किंवा नऊ शाखांचे दार असावे. समसंख्येच्या शाखा असलेले दार अशुभ मानतात म्हणून ही सूचना.]




**आकृती (१३) दरवाजा, अधोच्छन्द, ऊर्ध्वच्छन्द व पार्श्वच्छन्द, बलसाणे (जिल्हा धुळे) (श्लोक ३ – ६१)**

**अंगुलं सार्धमर्धं वा कुर्याद्धीनं तथाधिकम् ।**
**आयदोषविशुद्धार्थं -ह्रासो वृध्दिर्न दूष्यते ॥५५॥**

आयाच्या दोष नाहीसा करण्या करीता दाराचे माप १ ½ ते ½ अंगुलांपर्यंत कमी जास्त करावे. (दाराचे माप इतके) जास्त किंवा कमी केल्यास ते दोषकारक नसते. (५५)

अनुक्रमणिका

**चतुर्भागांकितं कुर्यात् शाखाविस्तार मानकम् ।**
**मध्ये द्विभागिकं कुर्यात् स्तम्भं पुरुषसंज्ञ कम् ॥५६॥**

शाखेच्या रुंदीचे चार (समान) भाग करून त्यांच्या रेघा आखाव्यात. मध्यभागील दोन भागांचा 'पुरुष' नावाचा खांब करावा. (५६)

**त्रिसंज्ञका भवेत् शाखा पार्श्वतो भाग भागिका ।**
**निर्गमे चैकभागेन रूपस्तम्भः प्रशस्यते ॥५७॥**

दोन्ही बाजूंना एक एक भाग (रुंदी) असलेल्या ह्या शाखेस त्रिशाखा म्हणतात. (मधल्या) रूप स्तम्भाचे निर्गमन एक भागाने असणे योग्य असते. (५७)

[अपराजित पृच्छा १३२·२ मध्ये दोन्ही बाजूंच्या शाखांना 'स्त्री' म्हणतात अशी माहिती दिली आहे ती बरोबर आहे कारण मधल्या रूपस्तंभाचे नाव पुरुष आहे व त्यांच्या दोन्ही बाजूंना 'स्त्री' नाव असलेल्या शाखा आहेत. तेव्हा 'स्त्री संज्ञका'च्या ऐवजी 'स्त्रीसंज्ञका' असा शब्द पाहिजे. व तेव्हां पहिल्या ओळीचा अर्थ सुधारावा लागतो.

दोन्ही बाजूंना एक एक भाग (रुंदी) असलेल्या हा शाखांना 'स्त्री' शाखा म्हणतात.]

**एकांशं सार्धभागं च पाशेन (?) द्वयमेव च ।**
**द्विभागं निर्गमं कुर्यात स्तंभ द्रव्यानु सारतः ॥५८॥**

(रूप-) स्तंभाचे निर्गमन एक भाग, दीड भाग, पाऊणे दोन किंवा दोन भाग जसे खांबाकरीता द्रव्य मिळेल त्याप्रमाणे असावे. (५८)

[पाशेनच्या ऐवजी पादोन अशी दुरुस्ती करून अर्थ केला आहे. येथे द्रव्याचा अर्थ काय घ्यावयाचा. दोन अर्थ संभवतात. लाकूड जसे कमी अधीक जाडीचे मिळण्यासारखे असेल त्याप्रमाणे मध्यल्या शाखेचे निर्गमन निश्चित करावे हा अर्थ, किंवा लाकडाचा दरवाजा असेल तर निर्गमन एक भाग, वीटाचा असल्यास. निर्गमन १ ½ भाग, दगडांचा दरवाजा असल्यास निर्गमन दोन भाग असाही अर्थ असू शकेल अपराजित पुच्छांत ही माहिती दिलेली नाही.]

**+ ठ पोठके विस्तरं कार्यं प्रवेशस्य युगांशकम् ।**
**कोणिका स्तंभमध्ये तु भूषणार्था हि पार्श्वतः ॥५९॥**

शाखेच्या पट्टा जवळील रुंदीच्या पावभाग शाखेचा प्रवेश (अंतर्गमन) असतो. मधल्या (रूप-) स्तंभाच्या दोन्ही बाजूंना अलंकरणार्थ कोणिका असाव्यात. (५९)

[अपराजितपृच्छा १३२·३ मध्ये 'पोटके' च्या ऐवजी 'पट्टके शब्द आहे. उरलेला श्लोक थोड्या फार फरकाने असाच आहे.]

अनुक्रमणिका

**द्वारवैर्ध्यं चतुर्थांशे द्वारपालो विधीयते ।**
**स्तंभशाखा द्विकं मध्ये त्रिशाखं विधिभाजयेत् (?) ॥६०॥**
**इति त्रिशाखम् ।**

दाराच्या उंचीच्या ⅛ भागाइतक्या (उंच) द्वारपालांच्या मूर्ती असतात. त्यांची रुंदी (रूप-) स्तंभाच्या दुप्पट असते. (शाखेचा) उरलेला (उंचीचा) भाग त्रिशाखेप्रमाणे विभागावा (६०)

**त्रिशाखेची माहिती संपली.**

**पत्रशाखा च गंधर्वा रूपस्तंभ तृतीयके ।**
**चतुर्थी स्वल्पशाखा च सिंह शाखा च पंचमी ॥६१॥**
**इति पंचशाखा ।**

पत्रशाखा, गंधर्वशाखा व तीसरा रूपस्तंभ, चवथी स्वल्पशाखा व पाचवी सिंह शाखा असते. (६१) (आकृती १३)

**पंचशाखेची माहिती संपली.**

दाराच्या चौकटीचे सहा भाग करून मधल्या दोन भागांचा रूपस्तंभ असतो. उरलेल्या चार भागांचे एका भागाची एक अशा रूपस्तंभाच्या दोन्ही बाजूंना दोन दोन शाखा असतात. रूपशाखेचे निर्गमन एक भाग असून तिच्या दोन्ही बाजूंना कोणिका असतात. गंधर्वशाखेचे निर्गमन एक भाग असून खल्वशाखा व सिंह शाखा या समसूत्रांत असतात. (अपराजित पृच्छा १३२·८-१०)


**प्रथमा पत्रशाखा च गंधर्वा रूपशाखि का ।**
**चतुर्थी स्तम्भशाखा च रूपशाखा च पंच मी ॥६२॥**
**षष्ठी तु खल्वशाखा च सिंह शाखा च सप्तमी ।**
**स्तम्भशाखा भवेन्मध्ये रूपशाखाग्रसूत्रतः ॥६३॥**
**इति सप्तशाखा ।**

पहिली पत्रशाखा, गंधर्वशाखा, रूपशाखा, चवथी स्तंभशाखा व पाचवी रूपशाखा, सहावी खल्वशाखा व सातवी सिंहशाखा असते. मध्यभागी असलेल्या स्तंभशाखेचे रूपशाखेच्या बाहेर निर्गमन असते. (६२, ६३)

**सप्तशाखेची माहिती संपली.**

(स्तंभशाखा दोन भाग रुंद व इतर शाखा प्रत्येकी एका भागाच्या असतात. त्यांच्या कोणिकांची रुंदी व निर्गमन पाव भाग असते. रूपशाखेचे निर्गमन ½ भाग आहे. गंधर्व शाखा व स्वल्पशाखा यांचे निर्गमन एक भाग व पत्रशाखा व सिंहशाखा यांचे निर्गमन अर्धा भाग असते, म्हणजेच सिंहशाखा कर्णाच्या बाहेर अर्धा भाग असते. (अपराजितपृच्छा १३२·१३ - १८)]

अनुक्रमणिका



आकृती (१४) दरवाजा, नवशाख, काशीविश्वेश्वर, लक्कुंडी येथील (श्लोक ३ – ६६)

पत्रगंधर्व संज्ञा च रूपस्तम्भ तृतीय के ।
चतुर्थी शल्पशाखा च गन्धर्वा त्वथ पञ्चमी ॥६४॥

रूपस्तम्भस्तथा षष्ठी रूपशाखा ततःपरा ।
शल्पशाखा च सिंहारका मूलकर्णेन संमिता ॥६५॥

अनुक्रमणिका

पत्रशाखा, गंधर्वशाखा आणि तीसरा रूपस्तंभ, चवथी स्वल्पशाखा व पाचवी गंधर्वशाखा, त्याच प्रमाणे सहावा रूपस्तंभ व त्यानंतर पुढची रूपशाखा असते. स्वल्पशाखा व सिंहशाखा या (प्रासादाच्या) मूलकर्णाच्या समसूत्रांत असतात. (६४, ६५)

[दाराच्या चौकटीचे ११ भाग करून दोन रूपस्तंभ त्यांच्या कोणिकासह प्रत्येकी दोन भाग असतात. इतर शाखांची रुंदी एक भाग.

**यस्य देवस्य या मूर्तिः सैव कार्योत्तरांगके ।**
**शाखायां च परीवारो गणेश श्चोत्तरांग के ॥६६॥**
**इति नवशाखा।**

ज्या देवाची मूर्ती (गर्भागारांत) असेल तीचीच मूर्ती (दरवाजाच्या) उत्तरंगावर असावी. शाखांवरती (त्या मूर्तीच्या) परीवार देवता (दाखविलेल्या) असतात व उत्तरांगावर गणेश मूर्ती असते. (६६) (आकृती १४)

**नवशाखेची माहिती संपली**

[उत्तरंगाची उंची उंबरठ्याचा उंचीच्या सवापट असते. त्याच्या उंचीचे २१ भाग पाडावेत. पत्रशाखा व त्रिशाखा यांची उंची २ ½ भाग असते. मालाधर दाखविलेले असतात अशी पट्टी तीन भाग उंचीची करावी. त्यावरून १ ¾ भाग उंचीचे छाद्यक असून त्यावर १ ¾ भाग उंचीची फालना असते. त्यावर रथिका (रथिकांची रांग ज्या थरावर असते तो थर) सात भाग करावा. त्यावर कण्ठ एक भाग व त्यावर सहा भागांचा उद्गम असतो.]

**इति प्रासादमण्डने वास्तुशास्त्रे पीठमण्डो ।**
**वरगर्मगृहोदुंबर प्रमाणं तृतीयो ऽ ध्यायः ॥३॥**

प्रासादमण्डन या वास्तुशास्त्राच्या ग्रंथातील पीठ, मंडोवर गर्भगृह व उंबरठा यांचे प्रमाणे (मापे) सांगणारा तिसरा अध्याय संपला. (३)

अनुक्रमणिका

# चतुर्थोऽध्यायः। अध्याय चार

**द्वारोच्छ्रायोऽष्टनवधा भागमेकं परित्यजेत्।**
**+ च्चा शेषे त्र्यंशे द्विभागार्चा त्र्यंशोना द्वारतोऽथवा ॥१॥ ++ त्र्यंशेना**

दाराच्या उंचीचे आठ किंवा नऊ भाग करून (वरचा) एक भाग गाळावा. उरलेल्या भागांचे तीन भाग करून दोन भागांची उभी मूर्ती (व एक भाग आसन) असावे. बसलेली मूर्ती एक भाग (व तीचे आसन दोन भाग) असावे (१)

[दाराची उंची क्ष मानली.

दाराच्या उंचीचे आठ भाग करून एक भाग वगळला, तर उंची = ७/८ क्ष
देवमूर्ती स्थानक मुद्रेत (म्हणजे उभी) असेल तर तीची उंची =२/३ × ७/८ क्ष =७/१२ क्ष
देवमूर्तीच्या आसनाची उंची = ७/८ क्ष - ७/१२ क्ष = ७/२४ क्ष
देवमूर्ती आसनस्थ (म्हणजे बसलेली) असेल तर तिची उंची = १/३ × ७/८ क्ष = ७/२४ क्ष
देवमूर्तीच्या आसनाची उंची = ७/८ क्ष - ७/२४ क्ष = ७/१२ क्ष
दाराच्या उंचीचे नऊ भाग करून एक भाग वगळला, तर उंची = ८/९ क्ष.
स्थानक मुद्रेतील देवमूर्तीची उंची = २/३ × ८/९ =१६/२७ क्ष.
देवमूर्तीच्या आसनाची उंची = ८/९ क्ष - १६/२७ क्ष = ८/२७ क्ष.
देवमूर्ती आसनस्थ असेल तर तिची उंची = १/३ × ८/९ = ८/२७ क्ष.
देवमूर्तीच्या आसनाची उंची = ८/९ - ८/२७ = १६/२७ क्ष.]

**द्वारदैर्घ्यं तु तिथ्यंशे तिथिशक्रकलांशकैः ।**
**+ अर्चाया ऊंर्ध्वार्धा आसनस्था च मुनिविश्वार्कभागतः ॥२॥**

दाराच्या उंचीचे ३२ भाग करून १५, १४ किंवा १६ भाग (उंचीची) उभी मूर्ती असते. बसलेली (आसनस्थ) मूर्ती १४, १३ किंवा १२ भाग उंच असावी. (२)

[तिथ्यंशेच्या ऐवजी द्वात्रिंशे अशी दुरुस्ती करून अर्थ केला आहे. दाराची उंची क्ष मानली तर स्थानकमुद्रेतील देवमूर्तीची उंची = ७/१६ क्ष, १५/३२ क्ष किंवा १/२ क्ष, देवमूर्ती आसनस्थ असेल तर तिची उंची = ७/१६ क्ष, १३/३२ क्ष किंवा ३/८ क्ष असावी.]

अप. पृच्छात (२०९·११) दाराच्या उंचीचे २५ भाग करावेत म्हणून सांगितले आहे. यामानाने मूर्तीची उंची = १५/२५ क्ष, १४/२५ क्ष किंवा १६/२५ क्ष (स्थानक) व आसनस्थ मूर्तीची उंची १४/२५ क्ष, १३/२५ क्ष किंवा १२/२५ क्ष असते.

**चतुरस्त्रीकृते क्षेत्रे दशभागविभाजिते ।**
**भितिर्द्विभागा कर्तव्या षड्भागं गर्भमन्दिरम् ॥३॥**

अनुक्रमणिका

चौरस आकाराच्या जागेचे (गर्भगृहाचे) दहा विभाग केले असता भिंत दोन भाग करावी व गर्भागार सहा भाग असावे. (३)

**तृतीयांशेन गर्भस्य प्रासादे प्रतिमोत्तमा ।**
**मध्यमा स्वदशांशोना पंचांशोना कनीयसी ॥४॥**

प्रासादाच्या गर्भगृहाच्या एक-तृतीयांश मापाची मूर्ती उत्तम समजतात. या मापातून त्याच्या १/१० ने मान कमी केले तर ती मध्यम मूर्ती व १/५ ने मान कमी केले तर ती कनिष्ठ मूर्ती समजावी. (४)

[गर्भगृहाची रूंदी = प्रासादाच्या भिंती मधील आतली आतली रूंदी = क्ष समजू.
उत्तम मूर्तीची उंची = १/३ क्ष मध्यम मूर्तीची उंची = १/३ क्ष - १/३ × १/१० क्ष = ९/३० क्ष.
कनिष्ठ मूर्तीची उंची =१/३ क्ष - १/३ × १/५ क्ष = ४/१५ क्ष.]

अपराजितपृच्छामध्ये (सूत्र २०९) प्रासादाची सीमा, गर्भ व दाराच्या मापांच्या प्रमाणात असे मूर्तीच्या मापांचे तीन प्रकार दिले आहेत. तसेच अंगुलातही हे माप दिले जाते. मूर्तीच्या मापाचा हा चौथा प्रकार.

सीमेच्या मापाच्या खाली दिलेल्या प्रमाणांत मूर्तीचे माप असावे.

| **प्रासादाची रूंदी** | **मूर्तीची उंची** | **प्रासादाची रूंदी = क्ष हात** |
|---|---|---|
| १ ते ४ हात | क्ष(१/२ – १/१२) = | ५/१२ क्ष हात. |
| ५ ते ७ हात | | १/३ क्ष हात. |
| ८ ते १० हात | क्ष(१/४– १/२४) = | ५/२४ क्ष हात. |
| ११ ते २० हात | क्ष(१/५ – १/२०) = | ३/२० क्ष हात. |
| २१ ते ३० हात | क्ष(१/६ – १/१८) = | १/९ क्ष हात. |
| ३१ ते ४० हात | क्ष(१/७ – १/१४) = | १/१४ क्ष हात. |
| ४१ ते ५० हात | क्ष(१/८ – १/२४) = | १/१२ क्ष हात. |


सीमा म्हणजे प्रासादाच्या भिंतीच्या बाहेरून बाहेरून माप. गर्भगृहाच्या मानाने मूर्तीचे माप या श्लोकांत (४·४) दिले आहे. दाराच्या मानाने मूर्तीचे माप (४·३) मध्ये दिले आहे. तेथील टिपेत अपराजितपृच्छाकारांचे मत दिले आहे. अंगुलांच्या मानाकरीता २०९·१३-१५ पहावे.]

**आयभागैर्भजेत् द्वारं अष्टमं तूर्ध्वतस्त्यजेत् ।**
\+ **दृष्टी सप्तमा सप्तमे षष्ठी वृषे सिंहे ध्वजे शुभा ॥५॥**

दाराच्या उंचीचे आयाइतके (म्हणजे आठ) भाग करावेत; वरचा आठवा भाग वगळावा, वरच्या सातव्या भागाचे पुन्हा आठ भाग करून त्याच्या सातव्या भागावर (देवमूर्तीची) दृष्टी असावी. तसेच (सातव्या

अनुक्रमणिका

भागाचे जे आठ भाग केले आहेत) त्यात वृषभ सिंह अथवा ध्वज आयांच्या स्थानी (म्हणजे वरून पाचव्या, तिसऱ्या किंवा पहिल्या भागावर) देवाची दृष्टी ठेवणे शुभकारक असते. (५)



**आकृती (१५) निरनिराळया**
**देवमूर्तीचे दृष्टीस्थान (श्लोक ४/५-६)**

**षष्ठभागस्य पंचांशे लक्ष्मीनारायणादिदृक् ।**
**शयनार्चांशलिंगानि द्वारार्धेन व्यतिक्रमात् ॥६॥**

(दाराच्या उंचीचे आठ भाग केले असता) सहाव्या भागाच्या (आठ भांगापैकी) पाचव्या भागी लक्ष्मी, नारायण इत्यादी देवतांची दृष्टी असावी. शेषशायी विष्णूच्या मूर्तीची तसेच शिवलिंग यांची दृष्टी दाराच्या निम्म्या उंचीवर असते. ती दृष्टी याहून जास्त उंचीवर असू नये. (६)

[ठक्कुर फेरुच्या 'वास्तुसारप्रकरणम्' या लहानशा ग्रंथात निरनिराळ्या देवमूर्तींची दृष्टी दाराच्या कोठल्या स्थानी असावी या बाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत; त्या आकृती १५ त दाखविल्या आहेत.

मूर्तीची उंची अशी असावी की ती गर्भागाराच्या दारातून, गूढ मंडपांत उभे राहिले असता ती संपूर्ण दिसेल, तसेच त्रिकमंडप, नृत्यमंडप मुखमंडप व प्रतोलीपाशी उभे राहिले असता देखील तो देवमूर्ती संपूर्ण दिसावयास हवी. एवढेच नव्हे तर देवालयाभोवती प्राकार असेल तर प्राकारात असलेल्या महाद्वारापाशी उभे असतांना सपूर्ण देवमूर्ती नीट दिसावयास पाहिजे. देवमूर्तीची दृष्टी गर्भागाराच्या दरवाजाच्या उंचीत कोठल्या स्थानी असावी हे सांगण्याचा उद्देश हा आहे.

गर्भगृहाच्या उंचीच्या मापांत मूर्ती किती उंच असावी ते वर ४·४ मध्ये दिले आहे व तिचे दृष्टीस्थान गर्भागाराच्या दरवाजाच्या उंचीवरुन ठरते; कीं मग उरलेल्या उंचीचे देवासाठी आसन करावे.]

**यदार्धे यक्षभूताद्या प (य ?) दाग्रे सर्वदेवताः ।**
**तदग्रे (तदाग्रे ?) वैष्णवं ब्रह्मा मध्ये लिङ्गं शिवस्य च ॥७॥**

अनुक्रमणिका

**इति प्रतिमाप्रमाणदृष्टिपदस्थापनम् । + पट्टाधोपिक्षभूताद्याः**

या श्लोकाचे शुद्ध स्वरूप दीपार्णव (पान १००) येथे पादटीपेत दिले आहे.

**पट्टाधो यक्षभूताद्याः पट्टाग्रे सर्वदेवताः ।**
**तदग्रे वैष्णवं ब्रह्मा मध्ये लिङ्गं शिवस्य च ॥७॥**

गर्भगृहाच्या पाठीमागील भिंतीपाशी यक्ष, भूत इत्यादींच्या मूर्तींचे स्थान असते; त्याच्यापुढे सर्व देवतामूर्ती स्थापन करतात. त्याच्या पुढे विष्णू, त्यापुढे ब्रहमाचे स्थान व शंकराचे लिंग मध्यभागी असते. (७)

[गर्भगृहाचे उत्तर दक्षिण रेघेने दोन भाग पाडावेत. गर्भगृहाच्या मागच्या अर्ध्या भागाचे तीन रेघांनी चार विभाग पाडावेत. गर्भगृहाच्या मागच्या भिंती जवळ असलेल्या रेघेवर यक्ष, भूत इत्यादींच्या मूर्ती स्थापन कराव्यात. दुसऱ्या रेघेवर विष्णु मूर्ती, तिसऱ्या रेघेवर ब्रह्मदेवाची मूर्ती असते व मध्यभागी शंकराचे लिंग स्थापन करतात.

दीपार्णव (८·९-२२) प्रमाणे गर्भगृहाची मागची भिंत व निम्मे खोली यांच्या मधील अंतराचे २८ भाग करतात. गर्भगृहाच्या मध्यभागी किंचित् ईशान्य दिशेला शिवलिंगाची स्थापना करावी. देवी लक्ष्मीची मूर्ती या अंतरात कोठेही स्थापन करतात. निरनिराळ्या वास्तूशास्त्र ग्रंथकारांच्या मताने निरनिराळ्या देवांचे स्थान निरनिराळे दिले आहे. त्यात एकवाक्यता नाही.

| भाग | देवमूर्ती | भाग | देवमूर्ती |
|---|---|---|---|
| १ (मध्य) | शिवलिंग | १६ | मातृगण |
| २ | ब्रह्मा, शाळीग्राम | १७ | गण (गणेश) |
| ३ | नकुलीश | १८ | भैरव |
| ४ | सावित्री | १९ | क्षेत्रपाल |
| ५ | रुद्र, अर्धनारीश्वर | २० | कुबेर |
| ६ | कार्तिक स्वामी | २१ | हनुमान |
| ७ | ब्रह्मा, सावित्री, सरस्वती | २२ | भृगु |
| ८ | विष्णूचे दशावतार, सोमास्कन्द, उमा | २३ | घोर, अघोर |
| ९ | जनार्दन, विष्णूचे दशावतार | २४ | दैत्य |
| १० | विश्वरूप | २५ | राक्षस |
| ११ | अग्नि | २६ | पिशाच |
| १२ | भास्कर | २७ | भूत |
| १३ | दुर्गा | २८ | कुठलीही मूर्ती नाही. |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १४ | गणपती, सावित्री, जिन तीर्थंकराच्या मूर्ती |
| १५ | शनि इत्यादी नवग्रह |

**च्छाद्यस्योर्द्धे प्रहारः (?) स्थात् श्रृंगे श्रृंगे तथैव च ।**
**प्रासादा (?) श्रृंगश्रृंगेषु अधोभागे तु च्छाद्यकम् ॥८॥**

च्छाद्याच्या वर प्रहार थर असतो व तो तसेच प्रत्येक श्रृंगाच्या खांली देखील असतो. प्रत्येक श्रृंगापाशी प्रहार थर असतो व त्याच्या खाली च्छाद्य उरावे. (८)

**मूलकर्णे रथादौ वा एकद्वित्रिक्रमान्न्यसेत् ।**
**निराधारे मूलभित्तौ साधारे भ्रमभित्तिषु ॥९॥**

मूल कर्णापाशी तसेच रथा (उपरथा -) दींवर अनुक्रमाने एक, दोन (अथवा) तीन श्रृंगे ठेवावीत. (ही श्रृंगे) निराधार (प्रदक्षिणामार्ग नसलेल्या) देवालयाच्या मूलभिंतीवर किंवा साधार (प्रदक्षिणामार्ग असलेल्या) देवालयाच्या प्रदक्षिणामार्गासाठी असलेल्या भिंतीवर असतात. (९)

**उरुश्रृंगाणि भद्रेषुरेकादिग्रहसंख्यया ।**
**त्रयोदशार्द्धे सप्तार्द्धे लुप्तानि चोरुश्रृंगके ॥१०॥**

भद्रांवरती एकापासून नऊ संख्यांपर्यंत उरुश्रृंग असतात. (एका उरुश्रृंगावर दुसरे उरुश्रृंग येत असल्याने पहिल्या उरुश्रृंगाच्या) साडेतेरा भागांपैकी साडेसात भाग झाकले गेलेले असतात. (१०)

**रेखाभागे च दिग्भागे कुर्यादग्रेषडंशकम् । +गं**
**षड्बाह्यं दोषदं प्रोक्तं पंच मध्ये न शोभनम् ॥११॥**

रेखामूलापाशी (शिखराच्या पायथ्याशी) दहा भाग केले असता वरच्या बाजूला (शिखराच्या स्कन्धापाशी) सहा भाग (रुंदी) असावी. (ही रुंदी) सहाभागाहून जास्त ठेवल्यास ते दोषकारक होते असे सांगतात व पाच भागाहून कमी ठेवल्यास ते सुंदर दिसत नाही. (११)

**शिखरनिर्माणोपदेशः ।**

**सपादं शिखरं कार्यं सकर्णं शिखरोदयम् । + ट**
**सपादकर्णयोर्मध्ये रेखाः स्युः पंचविंशातिः ॥१२॥**

**शिखर बांधावयासाठी माहिती -**

(गर्भगृहाच्या रूंदीच्या) सवापट शिखराची उंची असावी व शिखराची उंची कर्णाइतकी ($\sqrt{2}\times$ गर्भगृहाची रुंदी) असावी. शिखराचा सवापट भाग व कर्णा इतका भाग यांच्यात २५ रेखा असतात. (१२)

अनुक्रमणिका

[शिल्पशास्त्राच्या बहुतेक ग्रंथांत शिखराची उंची गर्भगृहाच्या रुंदीच्या (भिंतींच्या बाहेरून बाहेरून अंतर) १ १/४, १ १/३ किंवा १ १/२ पट सांगितली आहे. येथे सकर्ण म्हणजे शिखराची उंची किती घ्यावयाची ? या शब्दाचे दोन अर्थ होऊ शकतात. सकर्ण म्हणजे दोन कोनांमधील अंतराइतकी म्हणजे गर्भगृहाच्या रुंदीइतकी शिखराची उंची असावी. दुसरा अर्थ म्हणजे चौरसाच्या कर्णाची लांबी चौरसाच्या बाजूच्या २ पट असते. तेव्हां शिखराची उंची प्रासादाच्या रूंदीच्या √२×पट घ्यावी हा अर्थ. शिवाय दुसऱ्या ओळीचा अर्थ समजत नाही.]

**प्रोक्ता रेखाः कलाभेदैर्वलनैः पंचविंशतिः ।**
**पंचादिनवयुग्मान्तं खण्डानि तेष्वनुक्रमात् ।**
**अंशवृद्ध्या कला कार्या देघ्ये स्कन्धेऽपि तत् समाः ॥१३॥**

कलेच्या प्रकारानुसार वलना मध्ये २५ रेखा सांगतात (व) त्यांचे पायापासून २९ पर्यंत अनुक्रमे खण्ड होतात. एक एक अंशाने वाढवीत कला कराव्यात. स्कन्धापाशी लांबीने त्या तितक्याच (जितक्या शिखराच्या पायथ्यापाशी असतात तितक्याच) असतात. (१३)

[पहिल्या पाच खण्डात एक ते पाच कला, सहाव्यात सहा कला, सातव्यात सात या प्रमाणे एक एक कला प्रत्येक खंडात वाढवीत २९ खण्डात २९ कला होतात.]

**अष्टादावसुषष्ठ्यन्तं चतुर्वृद्ध्या तु षोडशम् ।**
**दैर्घ्यतुल्याः कलाः स्कन्धे एकाहीनास्तु षोडश ॥१४॥**

आठांपासून, चारांनी वाढवीत, ६८ पर्यंत सोळा विभाग होतात. कला लांबीने स्कंधापाशी सारख्याच (पायथ्याशी असतात तितक्याच असतात) मात्र एक एक अंश कमी करीत त्या सोळा होतात. (१४)

[एक जरी कला कमी केली तर ते असुंदर दिसते असा अर्थ एकही नास्तु अशोभनम् असा पाठभेद असल्याने करता येतो.]

**ऊर्ध्वा अष्टादशांशाः स्युस्तिर्यक् षोडश एव च ।**
**चक्रेऽस्मिन् संभवत्येव रेखा i षट्शतद्वयम् ॥१५॥ +र**

उभ्या १८ रेखा असून आडव्या १६ रेखा असतात; (तेव्हां) या रेखाचक्रांत २५६ रेखा होतात. (१५)

**+ षष्ठात्** **+ त्रिखण्डात् खण्डवृद्धिश्च यावदष्टादशैव हि ।**
**एकैकांशे कलाष्टौ च समार्चा यस्य षोडश ॥१६॥**


तीन खण्डांपासून एका एका खण्डाने १८ खंडापर्यंत वाढ करावी प्रत्येक खंडात पहिल्या समचाराच्या आठ आठ कला असतात, याप्रमाणे १६ समचार होतात. (.१६) (आकृती १६)

अनुक्रमणिका

[त्रिखण्डा रेखा ही पहिली रेखा व एका एका संख्येने वाढवीत १६ रेखा मिळवून १८ खंडापर्यंत वाढ होते. प्रत्येक रेखा खण्डांत आठ कला असतात. प्रत्येक खण्डातील कलांची (आडव्या रेखांची) संख्या तीच (आठ) असते म्हणून यास समचार रेखा म्हणतात.

**द्वितीय प्रथमे खण्डे कालाष्टौ द्वितये नव ।**
**+ तु तृतीये दशखण्डेषु शेषेषूर्ध्वेष्वयं क्रमात् ॥१७॥**

दुसऱ्या (प्रकाराच्या) प्रथम खण्डात आठ कला तर दुसऱ्या खण्डात नऊ (कला) असतात. तिसऱ्या खण्डांत दहा, अशा क्रमाने पुढल्या खंडात (कलांची) वाढ होते. (१७)



**आकृती (१६) शिखरांच्या रेखा (श्लोक ४/१६-१८)**

[या प्रकारच्या रेखा चक्रात पहिल्या खंडात आठ कला, दुसऱ्या खंडात, वर दिल्याप्रमाणे आठच कला नसून एक कला जास्त म्हणजे एकूण नऊ कला असतात. अशा रीतीने शिखराच्या पायथ्यापासून स्कंधाकडे जसजसे वर जाऊ तसतसे प्रत्येक खंडांत कलेची संख्या एकाने वाढत जाते. १८ व्या खण्डांत (१५ + ८ =) २३ कला असतात.]

**अष्टदिक् सूर्यभागैश्च त्रिखंडा तृतीया भवेत्।**
**अनेक क्रमयोगेन कोष्टानंकैः प्रपूरयेत् ॥१८॥**

तिसऱ्या त्रिखण्डांत आठ, दहा व बारा भाग (कला) असतात. (येथे प्रत्येक खंडाला कलांची वाढ दोनांनी आहे.) अशाच क्रमाने सर्व कोष्ठ कलांनी भरून काढावेत. (१८)

[पहिल्या त्रिखंडांत नेहमीप्रमाणे आठ कला असतात, मात्र दुसऱ्या खण्डात नऊ नसून दहा कला असतात. या हिशोबाने १८ व्या खण्डात (८ + १५ × २) = ३८ कला असतात.)

अनुक्रमणिका

**रेखा ां जायते संख्या षट्पंचाशत् शतद्वयम् ।**
**दैर्घ्ये भवति यावत्यः कलाः स्कन्धेऽपि तत्समाः ॥१९॥**

रेखांची संख्या २५६ होते. (शिखराच्या) उंचीत रेखांची जितकी (म्हणजे १६) संख्या असते तितकीच (म्हणजे १६ कला) ती स्कंधापाशी देखील असते. (१९)

**सव्यासं शिखरं कार्यं सक शिखरोदयम् ।**
**व्यासस्य क 'योर्मध्ये रेखाः स्युः पंचविंशतिः ॥२०॥**

शिखर व्यासाइतके (रुंद) व शिखराची उंची कर्णाइतकी (२ × शिखराची रुंदी) करावी. व्यास व कर्ण यांच्यामध्ये २५ रेखा असतात. (२०)

**विंशद्भिर्विभजेद् भागैः शिलान्तः कलशान्तकम् ।**
**+ शिलातः कलशान्तकम् ।**
**मण्डोवरेऽष्टसार्धाष्टनवांशैः शिखरोदयम् ॥२१॥ + खि**


(मण्डोवराच्या खुर-) शिलेपासून कळसापर्यंत (च्या उंचीचे) २० भाग करावेत. मंडोवराची (उंची) आठ, ८·५ किंवा नऊ भाग असून उरलेले भाग (अनुक्रमे १२, ११·५ किंवा ११ भाग) शिखराची उंची असते. (२१)

**रेखामूलस्य विस्तारे पद्मकोशं समालिखेत् ।**
**चतुर्गु ने सूत्रे सपादः शिखरोदयः ॥२२॥**

रेखामूलाच्या (शिखराच्या पायथ्याच्या) रुंदी प्रमाणे (रुंदीच्या प्रमाणात) पद्मकोश आखावा. (त्यासाठी त्या रुंदीच्या) चारपट लांबीच्या दोरीने (रुंदीच्या) सवापट शिखराची उंची काढावी. (२२) ( आकृती १७)

[रेखा, कलांचा उपयोग शिखराच्या वलनासाठी (म्हणजे शिखराचा पायथा ते स्कंध या उंचीमध्ये शिखराची रुंदी कमी होत जाते) त्यासाठी न करता या श्लोकात त्यासाठी सोपी युक्ती दिली आहे. तिचाच सर्वत्र उपयोग करतात. पण यामुळे रेखा व कला यांच्या सहाय्याने शिखराचे वलन कसे ठरवावयाचे ते आता माहिती नाही. मध्ययुगकालीन ग्रंथात जी याबाबत माहिती दिली आहे ती अधुनिक शिल्पशास्त्र्याला त्यामुळे समजत नाही.]

अनुक्रमणिका



**आकृती (१७) शिखरांच्या पद्मकोशाची आखणी (श्लोक ४-२२)**

**स्कन्धकोशान्तरे सप्त भक्ते ग्रीवा तु भारतः । +ग**
**सार्ध मामलसारं च पद्मपत्रं तु सार्धकम् ॥२३॥**

स्कन्ध व कोशाच्या रेखा जेथे मिळतात त्या अंतराचे सात भाग केले असता, ग्रीवा (ग्रीवेची उंची) एक भाग असावी, आमलसार दीड भाग व पद्मपत्र देखील दीड भाग असावे. (२३)

[श्लोक २० प्रमाणे शिखराची उंची त्याच्या पायथ्याच्या रुंदीच्या सवापट घेतली. श्लोक २१ ने शिखराची कळसासह उंची समजते. मंडोवराची उंची क्ष असेल तर शिखराची उंची २०/८ क्ष म्हणजेच २·५ क्ष इतकी असते. तेव्हा कळसासकट शिखराची उंची - स्कन्धापर्यंत शिखराची उंची = ग्रीवा + आमलसार + कळस वगैरेंची एकंदर उंची. उदाहरण द्यावयाचे झाले तर समजा प्रासादाची रुंदी १० हात आहे. तर श्लोक ३·१६ प्रमाणे मंडोवराची उंची ८ हात येते. शिखराची, पायथा ते स्कंध, उंची प्रासादाच्या रुंदीच्या समजा १·२५ पट घेतली तर ती येते १२·५ हात. शिखराची कळसापर्यंत उंची येते ८ × २·५ = २० हात. तर शिखराच्या स्कन्धाच्या वर कळसापर्यंत उंची २० - १२·५ = ७·५ हात येते.]

**कलश प्रमाणम् ।**

**त्रिभाग उच्च कलशो द्विभागं तस्य विस्तरम् ।**
**पासादस्याष्टमांशेन पृथुत्वं कलशान्तकम् ॥२४॥**

**कळसाचे माप ।**

कळसाची उंची तीन भाग असेल तर रुंदी (बीजपूरकाची रुंदी) दोन भाग असावी. प्रासादाच्या रुंदीच्या ⅛ रुंदी कळसाच्या अंडकाची असते. (२४)

[कलशान्तकं या शब्दाऐवजी कलशाण्डकम् ही दुरुस्ती करुन अर्थ केला आहे. अपराजितपृच्छा १४३·१० मध्ये दुसरी ओळ व येथील दुसरी ओळ एकच आहेत व तेथे कलशाण्डके हा शब्द कलशान्तकं च्या स्थानी आहे म्हणून तशी दुरुस्ती केली आहे]

अनुक्रमणिका

**च्छाद्यंतः स्कन्धपर्यन्तं एकविंशतिभाजिते।**
**अंक-दिक्-रूद्र-सूर्यांशैर्विश्वांशैस्तस्य चोच्छ्रयः २५॥ + वो**

च्छाद्याच्या वरपासून (शिखराच्या) स्कंधापर्यंत (ची उंची) २१ भागांत विभागली असता (शुकनासीची सुरुवात) नऊ, दहा, ११, १२ किंवा १३ व्या भागापासूनच्या उंचीपाशी असते. (२५)

[शुकनासी ९, १०, ११, १२ किंवा १३ व्या भागापासून सुरु होते.]

**शुकनासस्य संस्थानं च्छाद्योर्ध्वे पंचधा मतम् ।**
**एक-त्रि-पंच-सप्तांक सिंहमानानि कल्पयेत् ॥२६॥**

- अशी च्छाद्याच्या वर शुकनासीची जागा पाच प्रकारची मानली गेली आहे. (शुकनासीच्या या उंचीचे नऊ भाग करावेत) एक, तीन, पाच, सात व नवव्या भागी अशी सिंहाची मापे ठरवावीत. (२६)

(याबाबत ठक्कुर फेरुने (३·२९, ३१) स्पष्ट मत दिले आहे. च्छाद्य व शिखराचा स्कंध यांच्या मधील उंचीचे २१ भाग करावेत. शुकनासाची सुरवात नवव्या भागापासून होते व तिची उंची ९ ते ११ भाग किंवा ९ ते १३ भाग इतकी असावी व तेथे सिंहस्थान असते व हाच अर्थ मंडनाला विहित आहे. त्याने एवढेच अधिक म्हटले आहे की ९ ते १३ भाग यात शुकनासी असावी व या पाच भागांच्या उंचीचे नऊ भाग पाडून त्यातील एक, तीन, पाच, सात किंवा नवव्या भागी (या पैकी एका उंचीवर) सिंहाचे स्थान असावे.]

**द्वारस्य दक्षिणे वामे कपिलिः षड्विधा मता ।**
**तदूर्ध्वे शुकनासा स्यात् सैव प्रासादनासिका ॥२७॥**

(गर्भगाराच्या) दाराच्या उजव्या व डाव्या बाजूंना कपिली सहा प्रकारची असते असे मानतात. तिच्यावर शुकनासी असते. तीच प्रासादाचे नाक असते. (२७)

**प्रासादो दशभागश्र्य द्वित्रिवेदांशसम्मिताः ।**
**प्रासादेनार्धपादेन त्रिभागेनाथ निर्मिता ॥२८॥**


प्रासादाचे दहा भाग केले असता (कपिली) दोन, तीन किंवा चार भाग असते. किंवा प्रासादाच्या ½, ¼ किंवा ⅓ भाग (अशी सहा प्रकारची असते. (२८)

**शृंगोरुशृंगप्रत्यंगैः खण्डकात् गणयेत् सुधीः ।**
**तवंगं तिलकं कर्णं कुर्यात् प्रासादभूषणम् ॥२९॥**
**+ सूर्यांशं शिखरं कुर्यात् प्रासादभूषणम् ॥**


शृंग, उरुशृंग व प्रत्यंग ही शहाण्या शिल्पीने अंडक म्हणून मोजावीत. तवंग, तिलक, कर्ण यांनी प्रासादाचे अलंकरण करावे. (२९) (आकृती १८ व १९.)

अनुक्रमणिका

[सूर्यांशं - - - - ही ओळ संदर्भरहित आहे त्यामुळे तिचा अर्थ दिला नाही.]




**आकृती — १८ : नागर प्रासादाच्या शिखराचे अवयव**




**आकृती १९ : तिलक व कर्णकूट (४·२०)**

**दशांशे शिखरे मूले अग्र (?) तत्र नवांशकैः ।**
**सार्धांशकौ रथौ कोणौ द्वौ शेषं भद्रमिष्यते ॥३०॥**

शिखराच्या पायथ्याचे दहा भाग व अग्राचे (म्हणजे स्कंधापाशी) नऊ भाग करावेत. तेथे दोन रथ प्रत्येकी दीड भागाचे, दोन कोन प्रत्येकी दोन भागांचे असतात. उरलेल्या भागांचे (म्हणजे पायथ्‌याशी तीन भागांचे व स्कंधापाशी दोन भागांचे) भद्र असणे इष्ट असते. (३०)

**रधयोरूभयोर्मध्ये वृत्तमामलसारकम् ।**
**उत्सेधो विस्तरार्धेन चतुर्भागैर्विभाजयेत् ॥३१॥**

(स्कंधाच्या) दोन रथांच्या मध्ये वर्तुळाकार आमलसार असावा. (आमलसाराची) उंची त्याच्या रूंदीच्या निम्मे असून तिचे (उंचीचे)चार भाग करावेत. (३१) (आकृती २०)





**आकृती २० : स्कंधाच्या रथांना स्पर्श करणारा आमलसार ( श्लोक ४·३१)**

अनुक्रमणिका

**ग्रीवा चामलसारश्च्य पादोनं च सपादकम् ।**
**चन्द्रिका भागमानेन भागेना मलसारिका ॥३२॥**

आमलसाराची ग्रीवा (ग्रीवेची उंची) ¾ भाग, आमलसार १ ¼ भाग,चन्द्रिका एक भाग व आमलसारिका एक भाग असावी. (३२) (आकृती २१)




**आकृती २१ : आमलसार व कळस यांचे थर विभाग**

**घृतपात्रं न्यसेन् मध्ये ताम्रपात्रं सुवर्णजम् ।**
**सौवर्णं पुरुषं तत्र तुलीपर्यंकशायिनम् ॥३३॥**

(आमलसाराच्या) मध्यभागी तुपाने भरलेले तांब्याचे (किंवा) सोन्याचे भांडे ठेवावे. तेथेच पांढरे रेशमी वस्त्र घातलेल्या पलंगावर निजलेला असा सुवर्णपुरुष ठेवावा. (३३)

**प्रमाणं पुरुषं सार्धांगुलं कुर्यात् करं प्रति ।**
**त्रिपताकं करे वामे हृदिस्थं दक्षिणं करम् ॥३४॥**

प्रासादाच्या प्रत्येक हाताच्या रुंदीला १ ½ अंगुल लांबी या प्रमाणांत हा पुरुष असावा. डाव्या हातांत तीन शिखा असलेला ध्वज असतो व उजवा हात छातीवर ठेवलेला असतो. (३४)

[अपराजितपृच्छा (१५३·२४) प्रमाणे उजव्या हातात पद्म असते व डाव्या हातांत तीन शिखा असलेला ध्वज असून तो हात हृदयावर ठेवलेला असतो.]

**प्रासादपृष्ठदेशे तु दक्षिणे प्रतिरर्थके ।**
**ध्वजाधारस्तु कर्तव्य ईशाने नैर्ऋतेऽथवा ॥३५॥**
**इति प्रासादस्योर्द्धलक्षणम् ।**

अनुक्रमणिका

प्रासादाच्या पाठीमागच्या बाजूला दक्षिणेकडील प्रतिरथापाशी किंवा ईशान्य अथवा नैर्ऋत्य दिशेकडे ध्वजाच्या आधाराची योजना करावी. (३५)

**प्रासादाच्या वरच्या भागाच्या लक्षणांची माहिती संपली**

**क्षीरार्णवसमुत्पन्नं प्रासादस्याग्रजातकम्।**
**मंगलेषु च सर्वेषु कलशं स्थापयेद् बुधः ॥३६॥**

दुग्ध सागरातून उत्पन्न झालेला, प्रासादाच्या सर्वोच्च स्थानी असलेला व सर्वमंगल असा कळस शहाण्या शिल्पीने स्थापन करावा. (३६)

**पूर्वोक्तमानतो ज्येष्ठः षोडंशांशाधिको भवेत् ।**
**ग्रीवापीठं भवेत् भागं त्रिभागेनाण्डकं तथा ॥३७॥**

अगोदर सांगितलेल्या मापापेक्षा १/१६ मापाने जास्त असलेला कळस ज्येष्ठ असतो. ग्रीवा व पीठ (प्रत्येकी) एक भाग उंच असून तसेच अण्डक तीन भाग असावा. (३७)

[अगोदर म्हणजे श्लोक २४ त सांगितलेल्या मापापेक्षा. अपराजितपृच्छा १४३·१० प्रमाणे अगोदर सांगितलेल्या मापापेक्षा १/३२ मापाने मोठा असलेला कलश मध्यम प्रतिचा असतो व प्रथम दिलेल्या मापाचा कळस कनिष्ठ असतो.]

**कर्णिका भाग तुल्ये च त्रिभागं बीजपूरकम् ।**
**एकांशमग्रे द्वौ मूले वन्हिवेदांशकर्णिका। + के**
**ग्रीवा द्वौ पीठमर्धं द्वौ षडभागं विस्तराण्डकम् ॥३८॥**
**इति कलशः ।**

कर्णिका एका भागाइतकी असून, बीजपूरक तीन भाग असतो. बीजपूरक टोकापाशी एक भाग व मूळापाशी दोन भाग (रुंद) असावा. कर्णिका तीन किंवा चार भाग असावी. कंठ दोन भाग, पीठ २ १/२ भाग व अंडक सहा भाग रुंदीचा असतो. (३८)

**कळसाची माहिती संपली.**

[अपराजित पृच्छा १४३·१८ - २२ प्रमाणे कळसाच्या निरनिराळ्या थरभागांची मापे वर दिल्याप्रमाणे आहेत पण तेथे ही माहिती अधिक सुस्पष्ट दिली आहे. कळसाच्या उंचीचे नऊ समान भाग करावेत व रुंदीचे सहा समान भाग करावे. उंची/रुंदी = १ १/२. **उंचीची मापे** - अण्डक १ १/८ भाग, पद्मपत्रिका ३/८, ग्रीवा ३/८, दोन कर्णिका प्रत्येकी १ १/८ भागांच्या व मातुलिंग तीन भाग. येथे पादग्रही या थरविभागाचे माप दिले नाही. ते ३/८ भाग घेतले म्हणजे एकूण नऊ भागांचा हिशोब जमतो. **रुंदीची मापे** - पद्मपत्र तीन भाग व त्याचा कन्द दोन भाग. अण्डक मडक्याच्या आकाराचे असून ते सहा भाग रुंद असते. मध्यभागील ग्रीवा दोन

भागांची व कर्णिका चार भाग असते. बीजपूर मुळापाशी २ १/२  भाग व वर अग्राकडे निमूळते होत जाते. हे नागर प्रासादाच्या कळसाचे माप सांगितले.]

**दण्डः सूत्रीयांशेन शिलान्तः कलशान्तकम् ।**
**मध्येऽष्टांशेन हीनोऽसौ ज्येष्ठ पादोन्यकनसः ॥३९॥**
**[दण्डः स्थात् त्रितयांशेन शिलातः कलशान्तकम् ।**
**मध्योऽष्टांशेन हीनोऽसौ ज्येष्ठ पादेन कन्यसः ॥३९॥**

(खुर) शिला ते कळसापर्यंतच्या अंतराच्या १/३ लांबीचा ध्वजदण्ड ज्येष्ठ प्रकारचा असतो. ही लांबी १/८ भागाने कमी केली तर तो मध्यम ध्वजदण्ड व ज्येष्ठ ध्वजाची लांबी १/४ भागाने कमी केली तर तो कनिष्ठ प्रकारचा ध्वजदण्ड होतो. (३९) (आकृती २३)

[खुरशिला ते कळसापर्यंत अंतर = क्ष (समजू)
ज्येष्ठ ध्वजदण्डाची लांबी = १/३ क्ष
मध्यम ध्वजदण्डाची लांबी = १/३ क्ष - १/३ × १/८ क्ष = ७/२४ क्ष
कनिष्ठ ध्वजदण्डाची लांबी = १/३ क्ष - १/३ × १/४ क्ष = ३/१२ क्ष = १/४ क्ष]

**अथ दण्ड प्रमाणभेदे मतान्तरम् ।**

**प्रासादपृथुमानेन दण्डो ज्येष्ठः प्रकीर्तितः ।**
**मध्ये हीने दशांशेन पंचमांशेन कन्यसः ॥४०॥**

**दण्डाच्या मापासंबंधीचे निराळे मत** -

प्रासादाच्या रूंदीइतका लांब ध्वजदण्ड ज्येष्ठ प्रकारचा सांगतात. त्याच्याहून १/१० ने कमी लांबीचा मध्यम व १/५ ने कमी लांबीचा कनिष्ठ ध्वजदण्ड असतो. (४०)

**एकहस्ते तु प्रासादे दण्डः पादोनमंगुलम् ।**
**कुर्यादर्धांगुला वृद्धिर्यावत् पंचदशाहतम् ॥४१॥+ पंचाशदहस्तकम्**

एक हात रुंदीच्या प्रासादाचा ध्वजदण्ड ३/४  अंगुल (जाडीचा) करावा. (प्रासादाच्या रुंदीच्या) प्रत्येक हात वाढीला, ५० हातांपर्यंत ध्वजदण्डाची जाडी अर्ध्या अंगुलाने वाढवावी. (४१)

[प्रासादाची रुंदी = क्ष हात तर ध्वज दंडाची जाडी = ३/४ + (क्ष - १) × १/२ अंगुले. ५० हात रुंदीच्या प्रासादाच्या ध्वजदण्डाची जाडी = ३/४ + ४९ × १/२ = २५·२५ अंगुले.]

अनुक्रमणिका

**दण्ड प्रकारः ।**

> **सुवृत्तः सारदारुश्च ग्रन्थिकण्टकवर्जितः ।**
> **पर्वभिर्विषमैः कार्यः समग्रन्थिः (?) सुखावहः ॥४२॥**

**(ध्वज -) दण्डाचे प्रकार -**

पूर्ण वर्तुळाकार, मजबूत लाकडाचा, गांठी व काटे यांच्याशिवाय असलेला, विषम संख्येचे पर्व (गांठी मधील अंतरांची संख्या) असलेला व समसंख्येच्या गांठी असलेला (ध्वजदण्ड) सुखदायक असतो. (४२)

> **दीर्घदण्डषडंशेन मर्कप्यर्धेन विस्तरः ।**
> **अर्धचन्द्राकृतिः पार्श्वै घण्टे द्वे कलशस्तथा ॥४३॥**

(ध्वज-) दण्डाच्या लांबीच्या १/६ लांब व त्याच्या निम्मे (१/१२) रुंदीची मर्कटिका असून (तिच्या दोन्ही बाजू) अर्धचन्द्राकार असतात. तिच्या दोन्ही बाजूंना दोन (क्षुद्र -) घंटा असून (वर मध्यभागी) कळस असतो. (४३)

> **ध्वजो दण्डप्रमाणेन दैर्घ्येऽष्टांशेन विस्तरे ।**
> **नानावस्त्रविचित्राणि (?) त्रिपंचाग्रशिखोपमा ॥४४॥**

ध्वजाची लांबी दंडाच्या लांबी इतकी व रुंदी लांबीच्या १/८ असावी. निरनिराळ्या चित्रविचित्र रंगांच्या वस्त्रांचा (हा ध्वज) असावा. त्यास तीन किंवा पाच शिखा असतात. (४४) (आकृती २२)




**आकृती २२ : ध्वज व ध्वजदंड (श्लोक ४·३९-४४)**

> + प **पुरे च नगरे कोटे रथे राजगृहे तथा ।**
> **वापीकूपतडागेषु ध्वजाः कार्याः सुशोभनाः ॥४५॥**

अनुक्रमणिका

तटबंदीयुक्त शहर व नगर, कोट, रथ त्याचप्रमाणे राजवाडा, मोठ्या व लहान विहीरी, तलाव येथे सुदंर दिसणारे ध्वज उभारावेत. (४५)

**ध्वजारोपणविलम्बे दोषः ।**

**निष्पन्नं शिखरं दृष्ट्वा ध्वजहीनं न कारयेत् ।**
**असुरा वासमिच्छन्ति ध्वजहीने सुरालये ॥४६॥**

**ध्वज उभारावयास उशीर केल्यास होणारा दोष –**

ध्वज नसलेल्या देवालयांत रहावयाची असुर इच्छा करतात. तेव्हा (प्रासादाचे) शिखर बांधलेले दिसले की त्यानंतर ते ध्वजाशिवाय कधीही ठेवू नये. (४६)

**ध्वजोच्छ्रायेण तुष्यन्ति देवाश्च पितरस्तथा।**
**दशाश्वमेधिकं पुण्यं सर्वतीर्थधरादिकम् ॥४७॥**

(देवमंदिरावर) ध्वज लावला असतांना देव तसेच पितर संतुष्ट होतात. (तसेच) पृथ्वीवरील सर्व तीर्थे करून आल्याचे व दहा अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. (४७)

**पञ्चाशत् पूर्वतः प्रश्यात् आत्मानं च तथाधिकम् ।**
**शतमेकोत्तरं सोऽपि तारयेन्नरकार्णवात् ॥४८॥**
**इति ध्वजलक्षणं पुण्याधिकारः ।**

(ध्वज लावणाऱ्याच्या) पूर्वजांच्या व वंशजांच्या (प्रत्येकी) ५० पिढ्या व स्वतःची जास्तीची पिढी अशा १०१ पिढ्या नरक सागरातून तरून जातात. (४८)

**ध्वजाची लक्षणे व त्यामुळे मिळणारे पुण्य यांची माहिती संपली.**

इति श्री प्रतिमा दृष्टिपदस्थान शिखर ध्वज कलश लक्षणाधिकारः चतुर्थोऽध्यायः ॥४॥

श्रीमूर्तीच्या दृष्टीचे स्थान, मूर्तीचे गाभाऱ्यातील स्थान, शिखर, ध्वज, कळस यांच्या लक्षणांची माहिती देणारा अध्याय चार संपला. (४)

***

अनुक्रमणिका

## पञ्चमोऽध्याय । अध्याय पाच

**नानाविधमिदं विश्वं विचित्रं येन सूत्रितम् ।**
**सूत्रधारःस एव स्यात् सर्वेषां पालनक्षमः ॥१॥**

निरनिराळ्या प्रकारच्या (पदार्थांना) व चित्रविचित्र (वस्तुंना) या जगांत ज्याने एका सूत्रांत आणले (शिस्त लावली) तोच परमेश्वर खरा सूत्रधार आहे. तोच सर्वांचा पालनकर्ता असतो. (१).

**ग्रन्थस्य मान्यता याचनम् ।**

**न्यूनाधिकं प्रसिद्धं च यत् किंचित् मण्डनोदितम् ।**
**विश्वकर्मप्रसादेन शिल्पिभिर्मान्यतां वचः ॥२॥**

**ग्रन्थाला मान्यता द्यावी ही विनंती –**

सुप्रसिद्ध (असे वास्तुशास्त्र) विश्वकर्म्याच्या कुपेने जे काही थोडेफार मंडनाने सांगितले आहे त्याला शिल्पींनी मान्यता द्यावी. (२)

**चतुर्भागं समारभ्य यावत् सूयोत्तरं शतम् ।**
**+ भो भागसंख्येति विख्याता फालना कर्णबाह्यतः ॥३॥**

कर्णाच्या (कोनाच्या) बाहेर फालना चार भागांपासून सुरू होऊन ११२ भागांपर्यंत असते असे प्रसिद्ध आहे. (३)

**अष्टोत्तरशतं भेदा अंशवृद्ध्या भवन्ति ते ।**
**समांशैर्विषमं कार्यानन्तभेदैश्च फालना ॥४॥**

एक एक अंशाच्या वाढीने (फालनेचे) १०८ प्रकार होतात. या समसंख्ये प्रमाणे विषमसंख्येच्या देखील फालना असतात. अशा रीतीने फालनेचे अनंत प्रकार आहेत. (४)

**एकस्यापि तलस्योर्द्धे शिखराणि बहून्यपि ।**
**नामानि जातयस्तेषां मूर्द्धभागानुसारतः ॥५॥**

एकाच प्रकारच्या तळाच्या (अधोच्छंद असलेल्या प्रासादाच्या) वर खूप (प्रकारची, संख्यांची) शिखरे असतात. प्रासादांची नांवे व प्रकार (जाती) शीर्षभागावरून (शिखरांच्या प्रकारावरून व संख्येवरून) ठरविली जातात. (५).

अनुक्रमणिका

[प्रासादाचा अधोच्छन्द पंचांग प्रकारचा असला तरी जर केवळ एकच शिखर (मूलमंजिरी) असेल तर तो लतिन प्रकारचा प्रासाद. अधोच्छंद तोच (पंचांग प्रकारचा) पण मूळ शिखर, त्याच्यावर अनेक श्रृंगे व उरुश्रृंगे असतील तर तो नागर प्रासाद, अनेक मजली प्रासाद असेल तर तो द्राविड प्रासाद किंवा शिखरावरती अनेकशृंगे एकावर एक रचली असतील तर तो भूमिज प्रासाद असे केवळ वरच्या शिखरांमुळे, प्रासादाचा अधोच्छंद तोच असला, तरी प्रकार (जाती) बदलतात. तसेच नागर प्रकारचा प्रासाद असेल तर त्याची जाती तीच पण नांवे त्याच्यावर असलेल्या शृंगांच्या संख्येवरून बदलतात. यांची माहिती पुढे आलीच आहे.]

**दशहस्तादधो नास्ति प्रासादो भ्रमसंयुतः ।**
**नवाष्टदशभागेन भ्रमो भित्तिर्विधीयते ॥६॥**

प्रदक्षिणामार्ग असलेला प्रासाद दहा हातापेक्षा कमी (रुंदीचा) नसतो. प्रदक्षिणामार्गासाठी असलेली भिंत (प्रासादाच्या रुंदीच्या) १/९, ⅛ किंवा १/१० भागांची असावी. (६).

**ब्रह्मणो मन्दिरमाश्रित्य विश्वकर्ममतम् ।**

**वैराज्य चतुरस्रस्तु चतुर्द्वार चतुष्किका ।**
**प्रासादो ब्रह्मणः प्रोक्तो धीमता विश्वकर्मणा ॥७॥**

**ब्रह्मदेवाने सांगितलेल्या मंदिराबद्दल विश्वकर्म्याचे मत** –

ब्रह्मदेवाने सांगितलेल्या व बुद्धीमान विश्वकर्म्याच्या मताने वैराज्य प्रकारचा प्रासाद चौरस आकाराचा, चार दरवाजांचा व त्यांच्यापाशी (चार) चतुष्किकां (चौकीमंडपां-) सह असतो. (७).

[अपराजितपृच्छा (१५४·२-३) मध्ये वैराज्य प्रासादाची माहिती ब्रह्मदेवाने सांगितली असा उल्लेख आहे. ज्याअर्थी श्लोक ६ मध्ये प्रदक्षिणामार्गाची माहिती दिली आहे त्याअर्थी या प्रासादाला प्रदक्षिणामार्ग असावा. अपराजितपृच्छाच्या सूत्र १५५ मध्ये वैराज्य प्रासादाची सर्वसाधारण लक्षणे दिली आहेत. तेथे (१५५·३-४) प्रासादाच्या चौरसाकृती क्षेत्राचे १६ विभाग पाडावेत त्यापैकी मध्यभागील चार भाग गर्भगृह असून उरलेल्या १२ विभागांत भिंती असतात अशी माहिती दिली आहे. अप.पृच्छा (१५७·९) मध्ये वैराज्य प्रासादाला प्रदक्षिणा मार्ग असावा असे म्हटले आहे.]

**सपादं शिखरं कार्यं घण्टाकलशभूषितम् ।**
**चतुर्भिः शुकनासैस्तु सिंहकर्णैर्विराजितम् ॥८॥**

शिखर (प्रासादाच्या रूंदीच्या) सवापट (उंचीचे) असून ते घण्टा व कळस यांनी भूषविलेले असते. चार शुकनासी अमूल कोनांपाशी सिंह विराजमान झालेले असतात. (८).

अनुक्रमणिका

**एकद्वारादौ दिङ्नियमः ।**

**एक द्वारं भवेत् पूर्वं द्विद्वारं पूर्वपश्चिमम् ।**
**त्रिद्वारे मध्यजं द्वारं दक्षिणास्यं विवर्जयेत् ॥९॥**

(प्रासादाला एक दार असेल तर ते पूर्व दिशेकडे असावे. दोन दारे असल्यास पूर्व व पश्चिम दिशांना असावीत. तीन दारे असतील तर (तीसरे दार) उत्तरे कडे असावे. दक्षिणाभिमुख देवालय करू नये (९).

[अपराजितपृच्छा (१५७·२-७) मध्ये दारे कोणत्या दिशेला असावी त्याची माहिती दिली आहे. तीन दारे असलेल्या प्रासादाला ही दारे खाली दिलेल्या दिशांकडे असावीत.

पूर्व, उत्तर व दक्षिण, पूर्व, पश्चिम आणि उत्तर, दक्षिण, पश्चिम व उत्तर या दिशांना तीन दारे असावीत. येथे दक्षिण दिशेकडे दार दिले आहे त्याअर्थी भुवनदेवाचार्यांच्या मताने प्रासादाला तीन दारे असतांना त्यापैकी एक दार दक्षिण दिशेकडे असल्यास दोष नाही.

प्रासादाला दोन दारे असतील तर ती पूर्व व पश्चिम दिशांना असावीत. उत्तर व दक्षिण दिशांना असू नयेत. आणि तसे स्पष्ट म्हटलेले नसले तर दोन दारे असलेल्या प्रासादाला लंबरूप दारे नसून, म्हणजे पूर्व व दक्षिण किंवा पूर्व व उत्तर अशी दारे नसून, ती फक्त पूर्व व पश्चिम दिशांना म्हणजे समोरा समोर असावीत. प्रासादाला जर एकच दार असेल तर ते फक्त पूर्व दिशेला असावे; व चार दारे असतील तर ती चारी दिशांना असावीत. याचा आणखी अर्थ म्हणजे एकाच दिशेला दोन दारे नसावीत. शंकराच्या प्रासादाला जर एकच दार असेल तर ते पूर्वदिशेलाच असावे, त्याहून निराळ्या दिशांना असल्यास ते दोषकारक आहे. हा नियम योग्य वाटत नाही. तीर्थस्थानी म्हणजे जेथे नदी दक्षिण वाहिनी असते तेथे शंकराची देवालये दोन्ही तीरांवर असतात. व त्यांना एकच दार असेल तरी पूर्वे कडील किनाऱ्या वरील देवालयाला पश्चिमेकडे दार असते तर पश्चिमे कडील किनाऱ्यावरील देवालयाला पूर्वेकडे दार ठेवतात.

ब्रह्मा, विष्णू व सूर्य या देवांच्या प्रासादाला दारांच्या दिशाबाबत वर दिलेले नियम उपयुक्त आहेत. जिनतीर्थंकर असलेल्या देवालयांत जर समोसरण असेल तर मात्र पाहिजे त्या दिशेकडे दार ठेवता येते.]

**चतुर्द्वारं चतुर्दिक्षु शिव ब्रह्मजिनालये ।**
**होमशाला चतुर्द्वारा कश्चित राजगृहे तथा ॥१०॥**

चारी दिशांना चार दारे असलेला प्रासाद शिव, ब्रह्मा किंवा जिनतीर्थंकरांसाठी असावा. होमशाला चार दारांची असते व क्वचित् राजवाडा चार दारांचा बांधतात. (१०).

[राजाच्या संरक्षणाच्या दृष्टीतून राजवाड्याला चार दारे असणे योग्य नाही. तेव्हा शेवटल्या ओळीचा अर्थ राजवाड्याला क्वचित चार दारे असतात असा करणे अधिक सयुक्तिक दिसते.]

**वैराज्यादि समुत्पन्नाः प्रासादा ब्राह्मणार्चिता ।**
**एकत्रिपंचसप्तांक +शाखांतैः पंचविंशतिः ॥११॥** **+ खा**

अनुक्रमणिका

ब्रह्मदेवाला पूज्य असे जे वैराज्य इत्यादी प्रासाद निर्माण केले गेले आहेत त्यांचे एक, तीन, पाच, सात, नऊ अंगांप्रमाणे २५ प्रकार होतात. (११)

**चतुर्भक्ते भवेत् कोणो भोगो भद्रं द्विभागिकम् ।**
**भागार्धं निर्गमं भद्रे प्रकुर्यान्मुखभद्रकम् ॥१२॥**

(प्रासादाच्या तळाचे) चार भाग केले असता कोण एक भागांचा व भद्र दोन भागांचे असते, भद्राचे निर्गमन अर्धा भाग, असा हा **मुखभद्र** प्रासाद करावा. (१२).

[मध्ये भद्र व त्याच्या दोन्ही बाजूंना कर्ण असलेल्या प्रासादाला त्र्यंग प्रकारचा प्रासाद म्हणतात. मुखभद्र हा त्र्यंग प्रकारचा पहिला प्रासाद. वैराज्य प्रासादाच्या त्र्यंग प्रकारचे वर्णन अपराजितपृच्छा १५७·८-१३ त दिले आहे. प्रासादाच्या रुंदीचे १६ भाग कल्पावेत. मध्यभागील गर्भगृह चार भाग व भिंती प्रत्येकी एक भाग जाडीच्या कराव्यात; भिंतीची उंची चार भाग असते व शिखराची उंची प्रासादाच्या रुंदीच्या १·२५ पट असते. शिखराचा पद्मकोश प्रासादाच्या रुंदीच्या चार पट त्रिज्या घेऊन आखावा. जेथे पद्मकोशाच्या रेखा एकमेकास छेदतात ती शिखराची कळसासह उंची असते. शिखराचा स्कंध ते कळस या अंतराचे सात भाग करावेत. त्यात ग्रीवा एक भाग, आमलसारक दीड भाग, पद्मच्छत्र दीड भाग व कळस तीन भाग उंचीचा असतो.]

**श्रृंगमेकं भवेत् कर्णे द्वे द्वे भद्रे च नन्दनम् । इति नन्दनम् ।**

कर्णावर एक श्रृंग असून भद्रावर दोन दोन उरुशृंग असतात, असा नंदन प्रासाद असतो.

**नन्दन प्रासादाची माहिती संपली.**

**तथाचोक्तं**

**मुखभद्रे प्रतिभद्रमुद्‌गमो रथिकोपरि ।**
**कर्णश्रृंगे +सिंहकर्णे सिंहनामा स उच्यते ॥१३॥** + **कर्णं**

**तसेच सांगितले आहे की** –

मुखभद्र प्रासादाला प्रतिभद्र असून रथिकेवर उद्‌गम असल्यास (व) कर्णावर दोन शृंग (तसेच) कर्णावर सिंह असल्यास त्याला सिंह (प्रासाद) म्हणतात. (१३)

**देवानान्तु प्रकर्तव्यं सिंहस्तत्रैव शाश्वतः ।**
**तुष्यन्तु गिरिजा तुष्यं (?) सौभाग्यधनपुत्रकैः ॥१४॥**

(महा -) देवाच्या मंदिराकरीता शाश्वत असा सिंहप्रासाद करावा. त्याने पार्वती प्रसन्न होते व (प्रासाद बांधणाऱ्याला) सौभाग्य, संपत्ति व संतती ही तुष्टी इतकी मिळतात. (१४)

अनुक्रमणिका

**रथिका सिंह कर्णे च भद्रे श्रृंगे च सिंहकः । इति सिंहः ।**

रथिका असून कर्णावर श्रृंग व भद्रावर दोन उरुश्रृंगे असल्यास तो सिंह प्रासाद होतो.

**सिंह प्रासादाची माहिती संपली.**

**कर्णे (र्ण ?) शृंगन्तु पञ्चाण्डक श्रीनन्दन उच्यते ।**
**त्र्यंगा इति च षड्भागैश्चतुरश्रं विभाजयेत् ॥१५॥**

कर्णावरती असलेले शृंग जर पाच अण्डकांचे (शिखरांचे) असेल तर त्यास श्रीनंदन म्हणतात. येथे त्र्यंग प्रासादाची माहिती संपली. प्रासादाच्या चौरसाचे सहा भाग करावेत. - (१५)

**कर्णं प्रतिरथं कुर्यात् भद्रार्धं भागभागिकम् ।**
**+ य समनिर्गममस्माच्च भद्रं भागार्धनिर्गमः ॥१६॥**

कर्ण, प्रतिरथ व निम्मा भद्र प्रत्येकी एक भागाचे करावेत. त्यांचे (कर्ण व प्रतिरथांचे) निर्गमन तेव्हढेच (म्हणजे एक भाग) असून भद्राचे निर्गमन अर्धा भाग असावे. (१६).

**द्वे द्वे कर्णे तथा भद्रे चैकं च प्रतिरर्थकम् ।**
**+न्द मन्दिरं तृतीयं भद्रं मलयोर्भद्रजं त्यजेत् ॥१७॥**


कर्णावर दोन दोन शृंग तसेच भद्रावरती दोन उरुशृंग व प्रतिरथावर एक (अशी शृंगे असल्यास) **मन्दर** प्रासाद होतो. भद्रावरती तिसरे उरुशृंग असल्यास तो **मलय** प्रासाद होतो. भद्रावरील एक उरुशृंग कमी करून - (१७).

**प्रत्येकं तिलकं कुर्यात् प्रतिरर्थे विमानकः ।**
**भद्रोरुशृंगवैशाल प्रतिरर्थे सुभूषणः ॥१८॥ इति पंचांगाः पंच ।**

प्रतिरथावर तिलक केल्यास तो **विमान** प्रासाद होतो. भद्रावरती एक उरुशृंग वाढविले म्हणजे तो **विशाल** प्रासाद होतो. प्रतिरथावर एक शृंग वाढविले तर तो **सुभूषण** प्रासाद होतो. (१८) (आकृती २३).

**पाच अंग असलेल्या पाच प्रासादांची माहिती संपली.**

अनुक्रमणिका




**आकृती २३ : प्रासादाची फालना**

**चतुरस्रोऽष्टभिर्भक्ते कर्णे प्रतिरथं रथम् ।**
**भद्रार्धभागभागं च भागार्धेन विनिर्गमम् ॥१९॥**

(प्रासादाचा) चौरस आठ भागात विभागला असता कर्ण, प्रतिरथ, रथ व निम्मा भद्र एक एक भाग असतात. भद्राचे निर्गमन अर्धा भाग असते. (१९).

**वारिमार्गान्तरयुता रथाश्च तुल्यनिर्गमाः ।**
**श्रृंगयुग्मं च तिलकं कर्णे तु प्रतिरथकः ॥२०॥**

(उभ्या) जलमार्गांसह रथाचे निर्गमन त्याच्या रूंदी इतकेच असते. कर्णावर दोन श्रृंग व तिलक असून प्रतिरथावर दोन श्रृंग असतात. (२०).

[अपराजितपृच्छा १५७·३० ची मदत या श्लोकाचा अर्थ लावताना घेतली आहे.]

**त्वेकं चोपरथे भद्रे त्रीणि त्रि-त्रि-चतुर्दशः ।**
**शिखरं पञ्चविस्तारं महेन्द्रो राज्यदो नृणाम् ॥२१॥**

उपरथावर एक व चारी दिशांना भद्रावर तीन तीन उरुश्रृंग असतात. शिखर पाच भाग रुंद असते, असा **महेन्द्र** प्रासाद (बांधणाऱ्या) मनुष्याला राज्याची प्राप्ती करून देतो. (२१).

अनुक्रमणिका

[पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीत पहिली ओळ अशी दिली आहे. 'एकं चोपरथे भद्रे त्रीणी त्रीणी चतुर्दिशि।' व त्याप्रमाणे अर्थ केला आहे. अपराजितपृच्छा १५७·३१ प्रमाणे मूळ शिखर पाच भाग असते; म्हणजे प्रासादाच्या रूंदीच्या ५⁄८ रूंदी मूळ शिखराची असते.]

**कर्णे शृंगत्रयं शेषं पूर्ववद् रत्नशीर्षकम् ।**
**त्यक्त्वैकशृंगभद्रस्य मत्तालम्बन्तु कारयेत् ॥२२॥**

कर्णावर तीन श्रृंगे असून उरलेले पूर्वी - (महेन्द्रप्रासादा -) प्रमाणे असल्यास तो **रत्नशीर्षक** प्रासाद होतो. भद्रावरील एक श्रृंग कमी करावे व तेथे मत्तालम्ब (गवाक्ष) करावे. (२२).

**मस्तके तस्य च्छाद्यस्य शृंगयुग्मं प्रदापयेत् ।**
**सितशृंगस्तदा नाम ईश्वरस्य सदा प्रियः ॥२३॥**

त्याच्या (प्रासादाच्या) च्छाद्याच्या शीर्षावर श्रृंगाची जोडी ठेवावी. तेव्हां **सितश्रृंग** नावाचा प्रासाद होतो व तो महादेवाला नेहमीच आवडणारा असतो. (२३).

+ तु **तिलकं चोपरर्थेषु भूधरो नाम नामतः ।**
**छाद्यश्रृंगे तु तिलकं नाम्ना भुवनमण्डनः ॥२४॥**

उपरथावर तिलक असल्यास नावाप्रमाणे असलेला **भूधर** प्रासाद होतो. छाद्य व श्रृंगावरती तिलक असल्यास **भुवनमंडन** नावाचा प्रासाद होतो. (२४).

**श्रृंगद्वयं चोपरथे तिलकं कारयेत् सुधीः ।**
**त्रैलोक्यविजयो भद्रं शृंगेण क्षितिवल्लभः ॥२५॥ इति समांगः ।** + (प्तां ?)

उपरथावरती दोन श्रृंग व शहण्या (शिल्पीने) तिलक करावा. त्याला **त्रैलोक्यविजय** (प्रासाद) म्हणतात. भद्रावरती एक श्रृंग असल्यास त्याला **क्षितिवल्लभ** (प्रासाद) म्हणतात. (२५).

**सप्तांग प्रसादांची माहिती संपली.**

**दशभागकृते क्षेत्रे भद्रार्धभागमानतः।** + र्धं
**त्रयं प्रतिरथा कर्णे (?) भाग भाग समो भवेत् ॥२६॥**

(प्रासादाच्या चौरस) जागेचे दहा भाग केले असता निम्मा भद्र एक भाग करावा. तीन प्रतिरथ व कर्ण एक एक भागाइतके असतात (२६).

**कर्णे प्रतिरथे भद्रे द्वे द्वे शृंगे प्रकारयेत् ।**
**रथोपरथे तिलकं प्रत्यंगं च रथोपरि ॥२७॥**

अनुक्रमणिका

कर्ण, प्रतिरथ व भद्र यांच्यावर (प्रत्येकी) दोन दोन शृंगे बांधावीत. रथ व उपरथावर तिलक असावा व रथाच्या वर प्रत्यंग असावा. (२७).

**मतालम्बयुतं भद्रं प्रासादोऽयं महीधरः।**
**भद्रे शृंगं तृतीयं च कैलाशो नाम नामतः ॥२८॥**

भद्र जर मतालंबासह (गवाक्षा सह) असेल तर (या प्रासादाला) **महीधर** म्हणतात. भद्रावरती तीन श्रृंग असल्यास नावाप्रमाणे असलेला **कैलास** नावाचा प्रासाद होतो. (२८).

**भद्रं त्यक्त्वा रथे शृंगं नवमंगल उच्यते।**
**तथा भद्रे पुनर्दद्यात् तदासौ गंधमादनः ॥२९॥**

भद्रावरील शृंग काढून रथावर श्रृंग असल्यास त्याला **नवमंगल** म्हणतात. भद्रावरती पुन्हा श्रृंग ठेवल्यास तो **गंधमादन** (प्रासाद) होतो. (२९)

**भद्रं त्यक्त्वा चोपरथे शृंगः सर्वसुगन्धरः ।**
**भद्रे दद्यात् पुनः शृंगं विजयानन्द उच्यते ॥३०॥**

भद्रावरील श्रृंग काढून टाकून व उपरथावर श्रृंगर असल्यास त्याला **सर्वसुगंधर** म्हणतात. भद्रावरती पुन्हा श्रृंग ठेवल्यास त्यास **विजयानन्द** म्हणतात. (३०).

**मतालम्बयुतं भद्रं उरुशृंगं परित्यजेत् ।**
**शृंगद्वयं च छाद्योर्धे सर्वांग (?) तिलकस्तदा ॥३१॥**

भद्र मतालम्बासह (गवाक्षासह) असून त्यावरील उरुश्रृंग काढून टाकावा. च्छाद्याच्यावर शृंगांची जोडी असते, तेव्हा सर्वांगतिलक (प्रासाद) होतो. (३१).

**उरुशृंगं ततो दद्यान्मतालम्बसमन्वितम् ।**
**महाभागस्तदा नाम सर्वकामफलप्रदः ॥३२॥**

भद्रावर/मतालम्बासह उरुशृंग असावे, तेव्हा सर्व कामना फलद्रूप करणारा **महाभाग** नावाचा (प्रासाद) होतो. (३२).

**+ थे कर्णेप्रतिरथेरर्थे चैकं तूपरथादिषु। ++ धा**
**मेरुष्वपि समाख्यातः सर्व देवेषु पूजितः ॥३३॥**

कर्ण, प्रतिरथ, रथ तसेच उपरथ यावर (श्रृंग) असल्यास सर्व देवांची पूजा करण्यास योग्य असा प्रसिद्ध **मेरू** (प्रासाद) होतो. (३३).

अनुक्रमणिका

**प्रदक्षिणात्रये स्वर्णमैरौ पुंसाञ्च यत् फलम् ।**
**इष्टकाशैलजे मेरु (मेरौ ?) तत् फलं प्रदक्षिणीकृते ॥३४॥**

सुवर्णमेरुला तीन प्रदक्षिणा घातल्याने जे फल माणसाला मिळते तितकेच फल विटा किंवा दगड यांनी बांधलेल्या मेरु प्रासादाच्या एका प्रदक्षिणेने मिळते. (३४).

**वैराज प्रमुखाः येऽत्र नागरा ब्रह्मणोदिताः ।**
**वल्लभाः सर्वदेवानां शिवस्यापि विशेषतः ॥३५॥**

ब्रह्मदेवाने सांगितलेले वैराज प्रासाद प्रमुख असलेले जे नागर (प्रासाद) येथे सांगितले ते सर्व देवांना त्यातल्या त्यात विशेषत्वाने महादेवाला फार आवडते आहेत. (३५).

**इतिश्री वैराज्यादि प्रासाद पंचविंशत्यधिकारे पंचमो ऽ ध्यायः ॥५॥**

श्री वैराज इत्यादि पंचवीस प्रासादांची माहिती असलेला अध्याय पाच संपला. (५).

**तक्ता ५·१**
**पंचवीस प्रासादांची माहिती**
**त्र्यंग प्रासाद**

| प्रासादाचे नांव | कोण यावरील शृंग | भद्र | | एकंदर श्रृंगे |
|---|---|---|---|---|
| १) मुखभद्र | - | - | १ | |
| २) नन्दन | ४ | ८ | १३ | |
| ३) सिंह | ४ | ८ | १३ | कर्णावर सिंह असतात. |
| ४) श्री नंदन | ४ | ८ | १३ | कोणावरील श्रृंग पाच अंडकांचे असते. या श्रृंगाचे मूळशिखर + उरुश्रृंग = ५ अडक. |

**पंचांग प्रासाद**

| प्रासादाचे नांव | कोण | भद्र | उपरथ | एकंदर शृंगे | तिलक |
|---|---|---|---|---|---|
| ५) मंदर | ८ | ८ | ८ | २५ | - |
| ६) मलय | ८ | १२ | ८ | २९ | - |
| ७) विमान | १६ | ८ | ८ | ३३ | ८ (प्रतिरथावर) |
| ८) विशाल | १६ | १२ | ८ | ३७ | ८ (प्रतिरथावर) |
| ९) सुभूषण | १६ | ८ | १६ | ४१ | ८ (प्रतिरथावर) |

### सप्तांग प्रासाद

| प्रासादाचे नांव | कोण | भद्र | प्रतिरथ | उपरथ | च्छाद्य | एकंदर श्रृंगे | तिलक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०) महेन्द्र | ८ | १२ | १६ | ८ | - | ४५ | ४ (कोणावर) |
| ११) रत्नशीर्ष | १२ | १२ | १६ | ८ | - | ४९ | ४ (कोणावर) |
| १२) सितशृंग | १२ | ८ | १६ | ८ | ८ | ५३ | ४ (कोणावर) (भद्रावर गवाक्ष) |
| १३) भूधर | १२ | ८ | १६ | ८ | ८ | ५३ | ४ (कोणावर) ८ उपरथावर |
| १४) त्रैलोक्यतविजय | १२ | ८ | १६ | ८ | ८ | ५३ | ४ (कोणावर) ८ उपरथावर, ४ च्छाद्यावर |
| १५) भुवनमड | १२ | ८ | १६ | १६ | ८ | ६१ | ४ (कोणावर) ८ उपरथावर |
| १६) क्षितिवल्लभ | १२ | १२ | १६ | १६ | ८ | ६४ | ४ (कोणावर) ८ उपरथावर, ४ च्छाद्यावर |

### नवांग प्रासाद

| प्रासादाचे नांव | कोण शृंग | भद्र शृंग | प्रतिरथ शृंग | उपरथ शृंग/तिलक | रथ शृंग/तिलक | एकंदर श्रृंगे | शेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७) महीधर | ८ | ८ | १६ | -/८ | -/८ | ३३ | भद्रावर गवाक्ष असते. |
| १८) केलास | ८ | १२ | १६ | /८ | -/८ | ३७ | |
| १९) नवमंगल | ८ | ८ | १६ | ८/८ | -/८ | ४१ | |
| २०) गंधमादन | ८ | १२ | १६ | ८/८ | -/८ | ४५ | |
| २१) सर्वसुगंधर (सर्वांग सुंदर) | ८ | ८ | १६ | ८/८ | ८/८ | ४९ | |
| २२) विजयानंद | ८ | १२ | १६ | ८/८ | ८/८ | ५३ | |
| २३) सर्वांगतिलक | ८ | ८ | १६ | ८/८ | ८/८ | ५७ | गवाक्षाच्या च्छाद्यावर ८ श्रृंगे |
| २४) महाभाग | ८ | १२ | १६ | ८/८ | ८/८ | ६१ | गवाक्षाच्या च्छाद्यावर ८ श्रृंगे |
| २५) मेरु | १२ | १६ | २४ | १६/८ | १६/८ | १०१ | गवाक्षाच्या च्छाद्यावर ८ श्रृंगे |

***

अनुक्रमणिका

## षष्ठोऽध्यायः। अध्याय सहा

**केसर्यादि पंचविंशतिः प्रासादाः।**

**केसरी, सर्वतोभद्रो नन्दनो नन्दशालकः ।**
**नन्दीशो मन्दरश्चैव श्रीवृक्षश्चामृतोद्भवः ॥१॥**

**केसरी प्रथम असलेले २५ प्रासाद**

केसरी, सर्वतोभद्र, नन्दन, नन्दशालक, नन्दीश, मन्दर, श्रीवृक्ष व अमृतोद्भव - (१)

**+हे हिमवान् हेमकूटश्च कैलाशः पृथिवीजयः ।**
**इन्द्रनीलौ महानीलौ भूधरो रत्नकूटकः ॥२॥**

हि (हे)म वान, हेमकूट, कैलास, पृथ्वीजय, इन्द्रनील, महानील, भूधर, रत्नकूट-(२)

**वैदूर्यः पद्मरागश्च वज्रको मुकुटोज्ज्वलः ।**
**ऐरावतो राजहंसो गरुडो वृषभध्वजः ॥३॥**

वैदूर्य, पद्मराग व वज्रक, मुकुटोज्ज्वल, ऐरावत, राजहंस, गरुड, वृषभध्वज - (३)

**मेरुः प्रासादराजश्च देवानामालयो हि सः ।**
**ब्रह्मविष्णुशिवार्काणामन्येषां न कदाचन ॥४॥**

व प्रासादांचा (जणू) राजा असा मेरु, तो देवांना रहाण्यास योग्य आहे. मात्र ब्रह्मा, विष्णु, शंकर व सूर्य या शिवाय इतर देवांसाठी कधीही बांधू नये. (४)

**आद्यः पंचाण्डको देयः केसरी नाम नामतः ।**
**चतुर्णां क्रमतो वृद्धिर्यावदेकोत्तरं शतम् ॥५॥**

नावाप्रमाणे असलेल्या पहिल्या केसरी नावाच्या प्रासादाला पाच अण्डक द्यावेत. (अण्डकांची) क्रमाक्रमाने चारांनी वाढ करीत (त्यांची संख्या मेरु प्रासादासाठी) १०१ होते. (५)

[अपराजितपृच्छा १५९·१ प्रमाणे केसरी इत्यादि प्रासाद सांधार प्रकारचे, म्हणजे प्रदक्षिणा मार्ग असलेले, असतात. पण त्यांचे वर्णन देतांना ते सांधार तसे निरंधार प्रकारचे असतील तर तलविभक्ति कशी असते असे दोघांचे वर्णन दिले आहे. उदा. केसरी प्रासादाच्या चौरसाकृति तळाचे आठ विभाग पाडावयाचे. प्रासाद सांधार प्रकारचा असेल तर मध्यभागील गर्भगृह दोन विभागांचे, प्रत्येक बाजूला दोन दोन भिंती प्रत्येकी एक विभागाच्या व त्यांच्यामधला प्रदक्षिणा मार्ग देखील एक भाग रुंदीचा असतो. प्रासाद निरंधार

प्रकारचा असेल तर गर्भगृह चार विभागांचे व भिंतीची जाडी दोन विभाग असते. येथे मात्र श्लोक ६·२२ वरून निरंधार प्रकारच्या प्रासादाचे वर्णन दिले आहे असे वाटते.]

**क्षेत्रे अष्टांशे विभक्ते तु कर्णे भागद्वयं भवेत् ।**
**भद्रार्ध कर्ण तुल्यंच भागेनैकेन निर्गमः ॥६॥**

(प्रासादाच्या चौरस) जागेचे आठ विभाग केले असता कर्ण दोन भाग असावेत (त्यांचे निर्गमनही दोन भाग असते.) निम्मा भद्र कर्णाइतका असून त्यांचे निर्गमन एका भागाने असावे.(६)

(हा त्र्यंग प्रकारचा प्रासाद आहे. अपराजित पृच्छा १५९·१२ मध्ये या प्रासादाच्या चारी कर्णांवर प्रत्येकी एक, श्रीवत्स प्रकारचे शृंग असावे अशी जास्त माहिती दिली आहे. श्रीवत्स प्रकारच्या प्रासादाला फक्त एकच शिखर असते.]

**दशांशे सार्धभागं च भद्रार्धं च प्रतिरथे ।**
**(भद्रार्धे च प्रतिक्रमात् रथे ।)**
**+ र्णे कर्णो द्विभागः सुर्यांशे भद्रार्धं प्रतिरर्थके ॥७॥**

(प्रासादाच्या चौरस जागेचे) दहा विभाग केले असता कर्ण दीड भाग व निम्म्या भद्राइतका प्रतिरथ असावा. (प्रासादाच्या चौरस जागेचे) बारा विभाग केले असता कर्ण दोन भाग व निम्म्या भद्राइतका प्रतिरथ असावा. (७)

[अपराजितपृच्छा १५९·१३ - १५ मध्ये खाली दिल्याप्रमाणे तलविभाग दिले आहेत. कर्ण दोन भाग रुंद, निर्गमन दोन भाग, क्षोभणा (प्रतिरथ) एक भाग, निर्गमन एक भाग, भद्र तीन भाग रुंद, निर्गमन ½ भाग, भद्राच्या दोन्ही बाजूंना ½ भाग रूंद व ½ भाग निर्गमन असलेल्या कर्णिका असतात.

अपराजितपृच्छा (१५९·२० - २२) मध्ये तळभागाचे १२ विभाग केले असता फालनेची मापे अशी -
कर्ण, प्रतिरथ व अर्धे भद्र दोन दोन भागांचे असतात कर्ण व प्रतिरथांचे निर्गमन दोन भाग असून भद्राचे निर्गमन एक भाग असते.


अपराजितपृच्छा (१५९·१३ व २०) मध्ये तळाचे विभाग, प्रासाद सांधार प्रकारचा आहे असे दिले आहेत. तळाचा चौरस जेथे दहा भागांत विभागला आहे तेथे गर्भगृह चार विभागांचे व दोन्ही भिंती व प्रदक्षिणा मार्ग प्रत्येकी एक भागाच्या असतात. जेथे तळाचा चौरस बारा भागांत विभागला आहे तेथे गर्भगृह सहा भागांचे व दोन्ही भिंती व प्रदक्षिणामार्ग प्रत्येकी एक भागाच्या असतात. जर हे प्रासाद निरंधार प्रकारचे असतील तर दहा विभाग पाडलेल्या तळाच्या चौरसात गर्भगृह चार भागांचे व भिंती प्रत्येकी तीन भागांच्या (३/१० प्रासादाच्या रूंदीच्या) असतील. बारा विभाग पाडलेल्या तळाच्या चौरसात गर्भगृह सहा भागांचे व भिंती प्रत्येकी तीन भागांच्या (¼ प्रासादाच्या रूंदीच्या) असतील. आकृती २४.)]

**चतुर्दशविभक्ते तु कर्णाद्यं द्वादशांवत् ।**
**भद्रपार्श्वद्वयो कार्या भागभागेन नन्दिका ॥८॥**

अनुक्रमणिका

(प्रासादाच्या चौरस जागेचे) १४ विभाग केले असता कर्ण इत्यादी विभाग १२ भाग केलेत त्याप्रमाणेच असतात. (मात्र) भद्राच्या दोन्ही बाजूस एक एक भागाने नंदिका असावी.(८) (आकृति २४)

[प्रासादाच्या चौरसाचे १४ विभाग केले असता गर्भगृह आठ भाग रूंदीचे व दोन भिंती व प्रदक्षिणा मार्ग प्रत्येकी एक भागाच्या असतात. येथे कर्ण, प्रतिरथ व अर्धभद्र प्रत्येकी दोन दोन भागांचे असतात. या शिवाय एक भाग रूंदीच्या दोन नंदिका भद्राच्या दोन्ही बाजूंना असतात. भद्राखेरीज इतर फालनांचे निर्गमन त्यांच्या रूंदीइतके असते व भद्राचे निर्गमन एक भाग असते. अप.पृच्छा १५९·२३.]




**आकृती २४: अ) सर्वतोभद्र प्रासाद (६·७)(अप.पृच्छा १५९·१३-१५)**

**षोडशांशे प्रकर्तव्यः कर्ण प्रतिरर्थेऽन्तरे । + रथेतरे**
**कोणिका भागतुल्या च शेषं चतुर्दशांशवत्॥९॥**

(प्रासादाच्या चौरस जागेचे) १६ विभाग केले असता कर्ण व प्रतिरथ यांच्यामध्ये एका भागाइतकी कोणिका असावी व उरलेले (फालनेचे विभाग) १४ भाग केलेत त्याप्रमाणे असतात. (९)

[प्रासादाच्या चौरसाचे १६ विभाग केले असता गर्भगृह आठ विभागाचे असते. दोन्ही भिंतींची जाडी एक भाग असून प्रदक्षिणा मार्ग दोन भाग असतो. (अपराजित पृच्छा १५९·३३)]

**चतुरस्त्रीकृते क्षेत्रे विंशत्यंशविवर्जिते । + विभाजयेत्**
**+र्णे +कर्णो द्विभागः कोणी च सार्धांशा पृथुविस्तरैः ॥१०॥**
**द्विभागस्तु प्रतिरथो नन्दिका सार्धभागिनः ।**
**+ न्दी भद्र नन्दा भवेद् भागा भद्रार्धं युग्मभागिकम् ॥११॥**

(प्रासादाच्या) चौरस जागेचे २० भाग केले असता कर्ण दोन भाग, कोणीची रूंदी व निर्गमन १ ½ भाग, दोन भागांचा प्रतिरथ, नन्दिका १½ भाग, भद्राजवळील नन्दी एक भाग असून, निम्मा भद्र दोन भागांचा असावा. (१०, ११)

अनुक्रमणिका

[प्रत्येक फालनेचे निर्गमन तिच्या रूंदीइतके असते; भद्राचे निर्गमन मात्र एक भाग असते. गर्भगृह आठ भाग रूंदीचे, दोन भिंतींची प्रत्येकी जाडी दोन भाग व त्यांच्यामधला प्रदक्षिणामार्ग दोन भाग रूंदीचा असतो. (अप. पृच्छा १५९·५१)]

**द्वाविंशत्यके (?) नन्दी भागैका भद्रपार्श्वयोः ।**
**त्रयः प्रतिरथाः कर्णे भद्रार्धं च द्विभागिकम् ॥१२॥**

(प्रासादाच्या चौरस जागेचे) २२ भाग केले असता, भद्राच्या दोन्ही बाजूंना असलेले नन्दी एक भाग असावेत. तीन प्रतिरथ, कर्ण व निम्मा भद्र प्रत्येकी दोन भागांचे असतात. (१२)

[प्रत्येक फालनेचे निर्गमन तिच्या रूंदीइतके असते; भद्राचे निर्गमन एक भाग असते. गर्भगृह १० भागांचे असून दोन्ही भिंतींची जाडी व प्रदक्षिणा मार्गाची रूंदी प्रत्येकी दोन भाग असावी. (अप.पृच्छा १५९·५९ - ६०)]

**एकद्वित्रित्रिकं त्रीणी वेदाश्चात्वारि पञ्च च ।**
**तलेषु क्रमतोऽष्टासु के प्याहुः शिखराणि हि ॥१३॥**

कांहींच्या मताने प्रासादाच्या तळाचे जे (आठ ते २२ पर्यंत) आठ प्रकारांनी भाग पडतात ते अनुक्रमाने एक, दोन, तीन, तीन, तीन, चार व पाच असे असतात. (१३)

[पहिला केसरी प्रासाद आठ तलविभागाचा, त्यापुढील दोन, सर्वतोभद्र व नन्दन प्रासाद हे १० तलविभागांचे, त्यापुढील तीन प्रासाद १२ तलविभागांचे असे २५ प्रासादांचे तलविभाग किती असतात त्याची माहिती तक्त्यात दिली आहे.]

**अष्टादशांश भद्रस्य पार्श्वे द्वे द्वे च नन्दिके ।**
**कर्तव्यैर्भागभागैश्च शेषं स्यात् षोडशांशवत् ॥१४॥**

(प्रासादाच्या चौरस जागेचे) १८ भाग केले असता भद्राच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी एका एका भागाच्या दोन दोन नन्दिका कराव्यात. उरलेले (अंग) १६ विभागाप्रमाणे असावेत. (१४)

[हा श्लोक आठव्या श्लोकानंतर यावयास हवा. गर्भगृह आठ भाग, आतल्या भिंतीची जाडी एक भाग, बाहेरच्या भिंतीची जाडी व प्रदक्षिणा - मार्गाची रूंदी प्रत्येकी दोन भाग असते. (अप. पृच्छा १५९·४० - ४१)]

**शिखरं त्वेक -वेदैक - षष्ट - त्रि - वेद - युगद्वयम् ।**
**तलेषु क्रमतः प्रोक्तो मूलसूत्रे पराजिते ॥१५॥**

(प्रासादाच्या चौरस) तळभागाचे अनुक्रमाने एक, चार, एक, सहा, तीन, चार, तीन, तीन असे विभाग अपराजितांतील मूलसूत्रात सांगितले आहेत. (१५)

अनुक्रमणिका

[केसरी प्रासादाच्या तळाचे विभाग आठ पुढील चार प्रासादांचे तळाचे विभाग १० इत्यादि. अपराजितपृच्छातील सूत्र १५९ त ही माहिती दिली आहे. त्यात अनुक्रमाने एक, चार, एक, सहा, तीन, चार, चार व दोन असे विभाग सांगितले आहेत. या श्लोकात तसेच १३ व्या श्लोकांत शिखर हा शब्द आला आहे; त्याचा अर्थ येथे व १३ व्या श्लोकाच्या अर्थातही गाळला आहे.]

**तलेष्वष्टासु विहिताः प्रासादाः पंचविंशतिः ।**
**त्रयस्त्रयः क्रमेणैव चत्वारश्चाष्टमे तले ॥१६॥**

तळाचे आठ प्रकारांनी विभागणी होत असलेल्या २५ प्रासादांसाठी क्रमाने तीन तीन व शेवटचे चार प्रासाद अशी विभागणी असते. (१६) (तक्ता क्र. ६·१)

**त्रीणि त्रीणि स्वकीयानि (यानि ?) द्वे द्वे परः परस्य च ।**
**शिखराणि विधेयानि विश्वकर्मवचो यथा ॥१७॥**

वरील क्रमाने तीन तीन प्रासादांची तळविभक्ति (८ पासून २२ पर्यंत सांगितलेली) हे स्वतःचे (मण्डनाचे) मत आहे. व दोन दोन इत्यादि (श्लोक १८ पहा) हे विश्वकर्म्याचे मत आहे. (१७)

[येथे पुन्हा शिखर शब्द आला आहे पण त्याचा संदर्भ लागत नाही. विश्वकर्म्याचे मत अपराजितपृच्छाकारापेक्षा निराळे आहे, असे येथे दिले आहे. कारण अपराजितपृच्छातील मत श्लोक १५ मध्ये निराळे नमूद केले आहे. तेव्हा मण्डन सूत्रधार अपराजितपृच्छा शिवाय विश्वकर्म्याचे म्हणून आणखी एकादे पुस्तक आधारासाठी वापरत असावे असे दिसते.]

**द्वित्र्यैकषट्त्रयोष्टादि तलेषु पञ्चसु क्रमात् ।**
**सप्तैव सप्तमे षष्ठे शिरांसि त्रीणि चाष्टमे ॥१८॥**

दोन, तीन, एक, सहा, तीन असे आठ इत्यादि तलविभागापासून (प्रासादाच्या तळाचे) अनुक्रमाने पाच प्रकार होतात. सहावा तलविभाग एका प्रासादासाठी. सातवा सात प्रासादांसाठी व आठव्या (प्रकारचा तलविभाग शेवटच्या) तीन प्रासादांसाठी असतो. (१८)

[येथे एकंदर २६ प्रासादांचा हिशोब येतो. पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीप्रमाणे द्विद्व्यैक असा पाठ भेद घेतल्यास दोन, दोन, एक असा अर्थ लावता येतो. व मग एकंदर २५ प्रासादांचा हिशोब बरोबर येतो.]

**भेदाः पश्चदशेकैकं प्रोक्ताः श्रीविश्वकर्मणा ।**
**तेनैकस्मिंस्तलेऽपि स्युः शिखराणि बहून्यपि ॥१९॥**

श्रीविश्वकर्म्याने प्रासादांचे एकेकाचे १५, १५ प्रकार सांगितले असून त्यानुसार तलविभक्ति एकाच प्रकारची असली तरी प्रासादाला असलेल्या अनेक शिखरांमुळे ३ प्रकार होतात. (१९)

अनुक्रमणिका

[पं. भगवानदास जैन यांच्या प्रतीत भेदाः पञ्चाशदेकैकं असा पाठ आहे. तो स्वीकारला तर प्रत्येक प्रासादाचे (केसरी) इत्यादी ५० प्रकार होतात असा अर्थ होईल. पुढे श्लोक ३१ - ४५ मध्ये केसरी प्रासादाचे मेरु प्रकारचे अण्डकांची संख्या बदलून दहा प्रकार दिले आहेत.

तक्ता क्र. ६·१ यात अपराजितपृच्छा सूत्र १५९ प्रमाणे केसरी इत्यादी २५ प्रासादांच्या अण्डकांची माहिती एकत्रित करून दिली आहे.]

**रथिका सिंहकर्णं च भद्रे कुर्यात् गवाक्षकान् ।**
**प्रत्यंगैः तिलकाऽढ्यैश्च शोभितं सुरमन्दिरम् ॥२०॥**

रथिका सिंहकर्ण व भद्रावरती गवाक्षे करावीत. प्रत्यंग, तिलक यांनी देव मन्दिर सुशोभित करावे (२०).

**प्रासादाः केसरीमुखाः सर्वदेवेषु पूजिताः ।**
**पूर राज्ञो प्रजादीनां कर्तुः कल्याणकारकाः ॥२१॥**
**इति केसर्यादि प्रासादाः पंचविंशतिः ।**

केसरी (प्रासादापासून) सुरु झालेले हे (पंचवीस) प्रासाद सर्व देवांच्या पूजेसाठी योग्य आहेत. तटबंदीचे शहर, राजा, प्रजा इत्यादींचे तसेच (प्रासाद) बांधणाऱ्याचे (ते) कल्याण करणारे आहेत. (२१) (तक्ता ६·२)

**केसरी इत्यादी २५ प्रासादांची माहिती संपली.**

**षट्त्रिंशत् करतोऽधस्तात् यावद् हस्तचतुष्टयम् ।**
+भ्र **विना भ्रमैर्निराधाराः कर्तव्याः शान्तिमिच्छता ॥२२॥**

ज्याला शान्ती मिळवावयाची इच्छा आहे त्याने प्रदक्षिणा मार्ग नसलेला निराधार प्रासाद चार हातां पासून ३६ हातापेक्षा लहान (इतक्या रूंदीचा) बांधावा (२२)

**पंचविधक्षेत्राणि ।**

**वास्तोः पंचविधं क्षेत्रं चतुरस्रमथायतम् ।**
**वृत्तं वृत्तायतं चैव अष्टाश्रं देवालयादिषु ॥२३॥**

**पाच प्रकारच्या (आकाराच्या) जागा** –

देवालय इत्यादी वास्तूंच्या जागेचे (आकारानुसार) पाच प्रकार होतात. चौरस, आयत, वर्तुळाकार, वृत्तायताकार तसेच अष्टकोनी. (२३)

अनुक्रमणिका

**तक्ता क्र. ६·१**

**केसरी इत्यादी प्रादांचे तलविभाग**

| प्रासादाचे नांव | कोणा एकाच्या मते श्लोक ६·१३ | अपराजितपृच्छा प्रमाणे ६·१५ | मण्डना प्रमाणे ६·१६ | विश्वकर्म्याच्या मताप्रमाणे ६·१८ सुधारित | |
|---|---|---|---|---|---|
| १) केसरी | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| २) सर्वतोभद्र | १० | १० | ८ | ८ | ८ |
| ३) नंदन | १० | १० | ८ | १० | १० |
| ४) नन्दशालिका | १२ | १० | १० | १० | १० |
| ५) नन्दीश | १२ | १० | १० | १० | १२ |
| ६) मन्दर | १२ | १२ | १० | १२ | १४ |
| ७) श्रीवृक्ष | १४ | १४ | १२ | १४ | १४ |
| ८) अमृतोदभव | १४ | १४ | १२ | १४ | १४ |
| ९) हिमवान् | १४ | १४ | १२ | १४ | १४ |
| १०) हेमकूट | १६ | १४ | १४ | १४ | १४ |
| ११) कैलास | १६ | १४ | १४ | १४ | १४ |
| १२) पृथवीजय | १६ | १४ | १४ | १४ | १६ |
| १३) इन्द्रनील | १८ | १६ | १६ | १६ | १८ |
| १४) महानील | १८ | १६ | १६ | १८ | १८ |
| १५) भूधर | १८ | १६ | १६ | १८ | १८ |
| १६) रत्नकूट | १८ | १८ | १८ | १८ | १८ |
| १७) वैडूर्य | २० | १८ | १८ | १८ | १८ |
| १८) पद्मराग | २० | १८ | १८ | १८ | १८ |
| १९) वज्रक | २० | १८ | २० | १८ | १८ |
| २०) मुकुटोज्ज्वल | २० | २० | २० | १८ | २० |
| २१) ऐरावत | २२ | २० | २० | २० | २० |
| २२) राजहंस | २२ | २० | २२ | २० | २० |
| २३) गरुड | २२ | २२ | २२ | २० | २१ |
| २४) वृषभध्वज | २२ | २२ | २२ | २१ | २१ |
| २५) मेरु | २२ | २२ | २२ | २१ | २१ |

**तक्ता क्र. ६·२**

**केसरी इत्यादी प्रासादावरील अंडक व तिलकांची संख्या.**

| प्रासादाचे नांव | कर्ण | भद्र | प्रतिरथ | नन्दिका | रथ | उपरथ | एकंदर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) केलरी | ४ | - | - | - | - | - | ५ | |
| २) सर्वतोभद्र | ८ | - | - | - | - | - | ९ | |

अनुक्रमणिका

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३) नन्दन | ८ | +४ | - | - | - | - | १३ | भद्रावर श्रीवत्स प्रकारचे शृंग |
| ४) नन्दिशाल | ८ | ४ + ४ | - | - | - | - | १७ | + + उरुश्रृंग |
| ५) नन्दीश | ८ | $४^{H}$ | - | - | - | - | २१ | |
| ६) मन्दर | ८ | ८ | ८ | - | - | - | २५ | |
| ७) श्रीवृक्ष | ८ | १२ | ८ | - | - | - | २९ | |
| ८) अमृतोदभव | १२ | १२ | ८ | - | - | - | ३३ | |
| ९) हिमवान् | ८ | ८+४ | १६ | - | - | - | ३७ | |
| १०) हेंकूट | ८ | 12+४ | १६ | - | - | - | ४१ | नन्दिकेवर तिलक १ |
| ११) कैलास | ८ | 12+४ | १६ | ४ | - | - | ४५ | रेखेवर तिलक २ |
| १२) पृथ्वीजय | ८ | 12+४ | १६ | ४ | - | - | ४९ | रेखेवर ४ श्रृंग तिलक २ |
| १३) इन्द्रनील | ८ | १२ | १६ | १६ | - | - | ५३ | |
| १४) महानील | ४ | १२ | १६ | २४ | - | - | ७ | रेखेवर तिलक १ |
| १५) भूधर | ८ | १२ | १६ | २४ | - | - | ६१ | रेखेवर तिलक २ |
| १६) रत्नकूट | ८ | १६ | २४ | १६ | - | - | ६५ | नन्दिकेवर तिलक ३ |
| १७) वैडूर्य | ८ | १६ | २४ | १६ | - | - | ६९ | रेखेवर ४ एकश्रृंग |
| १८) पद्मराग | ? | ? | ? | ? | - | - | ७३ | रेखेवर ८ श्रृंगे |
| १९) वज्रक | ? | ? | ? | ? | - | - | ७७ | रेखेवर ८ श्रृंगे |
| २०) मुकुटोज्ज्वल | ८ | १६ | २४ | ३६ | - | - | ८१ | |
| २१) ऐरावत | ८ | १६ | २४ | ३६ | - | - | ८५ | रेखेवर ४ श्रृंग |
| २२) राजहंस | १२ | १६ | २४ | ३६ | - | - | ८३ | रेखेवर ८ श्रृंग |
| २३) गरुड | १२ | १६ | २४ | ३६ | - | - | ८३ | रेखेवर ८ श्रृंग |
| २४) वृषभ | ८ | १६ | १६(२४ ?) | ८ | २४ | १६ | ९७ | |
| २५) मेरु | १२ | १६ | २४ | ८ | २४ | १६ | १०१ | |

**विस्तारे तु चतुर्भागमायामे पंचभागिकम् ।**
**ऊर्ध्वंत्रिकलशं कुर्यात् पृष्ठाग्रे सिंहकर्णकम् ॥२४॥**

(आयताकार प्रासादाच्या जागेची) रूंदी चार भाग असल्यास लांबी पाच भाग करावी. वरती (शिखरावर)

अनुक्रमणिका

तीन कळस असून पुढे व मागे सिंहकर्ण असावेत. (२४)

**वृत्तायतं प्रकर्तव्यं व्यासार्धे वामदक्षिणे । +र्धे**
**कर्णये (?) भ्रामते वृत्तं भद्राणि चाष्ट हि ॥२५॥**

वृत्तायत प्रासादासाठी उजव्या व डाव्या बाजूंना निम्म्या व्यासाइतके वर्तुळाकार भाग असावेत. वर्तुळाकार प्रासादासाठी चौरसाच्या कर्णा इतक्या (व्यासाने) वर्तुळ आखावे. वर्तुळाकृतीत आठ भद्र असावेत (याने अष्ट कोनी प्रासाद होतो.) (२५)

**प्रासादो वर्तुलाष्टास्त्रः प्रयेणैकाण्डकः शुभः।**
**कर्णे वा श्रोण इंडानां (?) मण्डपं तत् स्वरूपकम् ॥२६॥**
**इति पंचक्षेत्राणि ।**

वर्तुळाकार व अष्टकोनी प्रासादासाठी प्रायशः एक एक अण्डक (म्हणजे फक्त मूळशिखर) असल्यास ते शुभदायक असते; किंवा कर्णापाशी शृंगांची रांग असावी. या प्रासादांचे मण्डप प्रासादाप्रमाणेच (त्यांच्या आकाराप्रमाणेच) करावेत. (२६)

**पाच (आकारांच्या) प्रकारच्या जागांची माहिती संपली.**

**विचित्रै रूपसंघातैर्भद्रैर्गवाक्षभूषितैः ।**
**वितना फालना श्रृंगैरनेकैर्नागरा मताः ॥२७॥**

चित्रविचित्र नक्षींचा जेथे संगम झाला आहे, जे भद्रांनी व त्यावरील गवाक्षांनी भूषविलेले आहे; वितान, फालना व पुष्कळ शृंगे असलेले असे प्रासाद नागर (जातीचे) समजतात. (२७)

**पीठोपरि भवेद् वेदी पीठानि त्रीणि पंच च ।**
**पीठतो द्राविडे रेखा लताश्रृंगादि संयुता ॥२८॥**

पीठावर वेदी असते, पीठांचे तीन (किंवा) पाच प्रकार असतात. रेखा पीठापासून (नागर प्रासादाप्रमाणे शिखरापासून नव्हे) सुरु होतात व लता आणि श्रृंग इत्यादींसह असलेला असा **द्राविड** प्रासाद असतो. (२८)

[अपराजितपृच्छेच्या १७३ व्या सूत्रांत द्राविड पीठांसंबंधी जास्त माहिती दिली आहे ती तेथेच पहावी. पाच पीठांची नांवे व एका पीठाच्या थरविभागांची माहिती येथे देतो.


पीठांची नांवे - (१) पादबन्धन (२) श्रीबन्ध (३) वेदबन्ध (४) प्रतिक्रम (५) खुरकबन्ध.

पादबन्धन पीठाच्या उंचीचे २० भाग पाडावेत. त्यात खुरक ५ भाग, पद्मपत्रिका २ भाग, कपोत ३ भाग, छेद १ भाग, कण्ठ २ भाग, पद्मपत्रिका ३ भाग, कपोत ३ भाग व पट्टी १ भाग असते.]

अनुक्रमणिका

**भूमिका परिभूमिश्च ऱ्हस्वावर्कनवान्तकम् ।**
**विभक्तिदलसंयुक्ता मूर्ध्नि श्रृंगेण भूमिजाः ॥२९॥**

भूमिकेवर भूमिका असे नऊ मजल्यापर्यंत भूमिका असतात व जसजसेवर (शिखराच्या पायथ्यापासून स्कंधाकडे) जाऊ तसतशी त्यांची उंची कमी होत जाते. (या भूमिकांची संख्या प्रासादाच्या) फालनेच्या संख्येप्रमाणे असून सर्वात वरती, शीर्षस्थानी (एक) श्रृंग असते. अशा प्रासादास **भूमिज** म्हणतात. (२९) (आकृती २५)



**आकृती (२५) भूमिज प्रासाद (श्लोक ६-२९)**

[अपराजितपृच्छाच्या सूत्र १७१ प्रमाणे भूमिजप्रासाद तीन आकारांचे असतात; (१) चौरस (२) वर्तुळाकार व (३) अष्टकोनी. त्र्यंग प्रासादाच्या शिखरावर चार भूमिका असतात, पंचांग प्रासादावर पाच भूमिका, सप्तांग प्रासादाच्या शिखरावर सात भूमिका व नवांग प्रासादाच्या शिखरावर नऊ भूमिका असतात (अपराजित पृच्छा १७१·२८, २९); असा फालना व शिखरांवरील भूमिकांचा एकमेकांशी संबंध आहे.]

**शृंगेणैकेन लतिनाः श्रीवत्साः वारिसंयुताः ।**
**नागराः भ्रमसंयुक्ताः साधारास्ते प्रकीर्तिताः ॥३०॥**
**इति प्रासादानां जातयः ।**

एक शृंग असेल तर ते लतिन प्रकारचे, जलवाट असल्यास ते श्रीवत्स व प्रदक्षिणामार्ग असलेले जे नागर प्रासाद असतात त्यांना **साधार** असे म्हणतात. (३०)

**प्रासादांच्या जातींची माहिती संपली. (३०)**

[अपराजितपृच्छांत प्रासादाचे १४ प्रमुख प्रकार सांगितले आहेत आणि त्या प्रत्येक जातीच्या प्रासादांचे पुन्हा उपप्रकार त्यांच्या लक्षणांसह वर्णिले आहेत. येथे फक्त त्यांची नांवे देतो -(१) नागर, (२)

अनुक्रमणिका

द्राविड, (३) मिश्रक, (४) विमान, (५) भूमिज, (६) सान्धार, (७) वराट, (८) लतिन, (९) वलभी, (१०) फांसनाकार, (११) सिंहावलोकन, (१२) दारुज, (१३) विमाननागर (१४) विमानपुष्पक]

**पंचहस्ते भवेन्मेरुरेकोत्तरं शताण्डकः ।**
**भेदाः पंचोनपंचाशत् करवृध्द्या भवन्ति ते ॥३१॥**

(कमीत कमी) पाच हात (रूंदीचा) मेरु प्रासाद असून त्याला १०१ अण्डक असतात; एक एक हाताने (रूंदी) वाढवीत त्याचे (५० हातापर्यंत) पन्नासाला पाच कमी (म्हणजे ४५) प्रकार होतात. (३१)

**हस्ते हस्ते भवेद् वृद्धिहर्यण्डकानां विंशतिः।**
**एकोत्तरससहस्त्रं स्यात् शृंगा (णा)ञ्च शतार्द्धके ॥३२॥**

(रूंदीच्या) प्रत्येक हाताच्या वाढीस अंडकांची संख्या २० नी वाढते. या क्रमाने ५० हात रूंदीच्या मेरु प्रासादाला १००१ शृंगे असतात. (३२)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| [प्रासादाची रूंदी (हात) | ५ | ६ | ७ | १० | ५० |
| अंडकांची संख्या | १०१ | १२१ | १४१ | २०१ | १००१ |

प्रासादाची रूंदी क्ष समजू तर अंडकांची संख्या = १०१ + (क्ष - ५) × २०]

**केसरी प्रमुखाः कर्णे विमानं चोरुशृंगकम् ।**
**तथैव मूलशिखरं पंचभूमिविमानकम् ॥३३॥**

(**विमान** प्रासादांत भूमिज प्रासादांप्रमाणे) पाच भूमि असतात. भद्रावर उरुश्रृंग असतात व कर्णावर केसरी प्रमुख असलेल्या प्रकारांची श्रृंगे असतात व शिवाय मूल शिखर असते - (३३)

**विमानं नागरं जातिस्तदा प्राज्ञैरुदाहृता ।**
**एक शृंगेषु शृंगाणि सम्भवन्ति बहून्यपि ॥३४॥**

तेव्हां तो **विमान नागर** जातीचा प्रासाद असे बुद्धिमतांनी सांगितले आहे. एका श्रृंगावरती (मूळशिखरावरती) अनेक शिखरे (श्रृंगे) या प्रासादात असतात. (३४)

**श्रीमेरुरष्टभागः स्यादेकोत्तरशताण्डकः ।**
**हिमशीर्षे दिशांशः स्यात् युगशार्ध (?) शताण्डके ॥३५॥**

**श्री मेरुच्या** (तळभागाचे) आठ विभाग (फालनेसाठी) असून त्यावर १०१ अण्डक असतात. हिमशीर्ष (नावाच्या मेरु प्रासादाच्या तळ भागाचे) दहा विभाग असून त्यावर १२१ अण्डक असतात. (३५)

अनुक्रमणिका

[अपराजितपृच्छ १८०·२४ - २७ मध्ये हिमशीर्ष प्रासादाची माहिती दिली आहे व तेथे शेवटी हिमशीर्ष प्रासादाची माहिती संपली असे सांगतांना तो १२० (सपाद शताण्डकः) म्हणजेच मूळ शिखर धरून १२१ शिखरांचा असतो असे वर्णन केले आहे व ते योग्य वाटते. वरती श्लोक ३२ त निरनिराळ्या रूंदीच्या मेरु प्रासादावर किती अण्डक असतात ते दिले आहे व श्रीमेरु ५ हात रूंदीचा तर हिमशीर्ष प्रासाद सहा हात रूंदीचा असून त्याला १२१ अंडक असतात अशी माहिती दिली आहे त्याशी हे संयुक्तीत आहे.]

**भागैद्वादशभिर्युक्तः सार्धद्विशतसंयुतः ।**
**सुरवल्लभनामा नाम तं (?) प्रोक्तं श्रीविश्वकर्मणा ॥३६॥**

(प्रासादाच्या तळभागाचे) १२ विभाग असलेला, २५० अण्डक असलेला व नावाप्रमाणे असलेला सुरवल्लभ नांवाचा प्रासाद श्रीविश्वकर्म्याने सांगितला आहे. (३६)

**कोणे द्विभाग एकांशा कोणी सार्धप्रतीरथः ।**
**अर्धांशा नन्दिका भद्रमर्धभागेन संयुतम् ॥३७॥**
**त्रिशतं पंचसप्तत्याधिकं यस्याण्डकानि हि ।**
**भक्तश्चतुर्दशांशैस्तु नाम्ना भुवन मण्डनः ॥३८॥**

(प्रासादाच्या तळ भागाचे १२ विभाग केले असून) कोण दोन भाग, कोणी एक भाग, प्रतिरथ १ ½ भाग, नंदिका ½ भाग व निम्मे भद्र एक भागांचे असते. (३७)

(प्रासादाच्या तळभागाचे) १४ विभाग असून ३७५ अंडक असलेल्या (त्या प्रासादाचे) नाव **भुवनमण्डन** आहे. (३८)

**कोण [:?] कोणी प्रतिरथो नन्दी भद्रार्धमेव च ।**
**द्व्येकद्वन्द्वाशैः सार्धांशैश्चतुर्दशविभाजिते ॥३९॥**

(प्रासादाच्या तळभागाचे) १४ विभाग केले असता, कोण, कोणी, प्रतिरथ, नंदी व निम्मे भद्र ही अनुक्रमे दोन, एक, दोन, दोन (की ½ ?) व १ ½ भाग असतात. (३९)

**बाणैकवेदयुग्मांशा वेदाः कर्णादिभागतः ।**
**रत्नशीर्षो भवेन्मेरुः पंचशतैकशृंगकैः ॥४०॥**

(प्रासादाच्या तळभागाचे ३२ भाग केले असता) पाच, एक, चार, दोन (व) चार हे कर्ण इत्यादिचे भाग असलेला, ५०१ शृंगे असलेला असा **रत्नशीर्ष** नावाचा प्रासाद होतो (४०)

**गुणैकयुग्मचन्द्राद्वौ (?) पुराणां विंशभाजिते ।**
**किरणोद्भवमेरुश्च सपादषट्शताण्डकः ॥४१॥**

अनुक्रमणिका

(प्रासादाच्या तळभागाचे) वीस (की १८?) विभाग करुन तीन, एक, दोन, एक, दोन असे (कर्णादींचे) विभाग असलेला व ६२५ अंडक असलेला (असा प्रासाद) **किरणोद्भव मेरु** (नावाचा) असतो. (४१)

**राम-चंद्र द्वियुग्मांशैः नेत्रैर्विंशतिभाजिते ।**
**नाम्ना कमलहंसः स्यात् सार्ध सप्तशताण्डकः ॥४२॥**

(प्रासादाच्या जागेचे) २० भाग केले असून तीन, एक, दोन, दोन, दोन असे (कर्णादींचे) विभाग असलेला, व ७५० अंडक असलेला प्रासाद **कमलहंस** नावाचा असतो. (४२)

**भागैक निर्गमाभित्तिर्वेद सार्ध्दत्रिसार्धकैः ।**
**द्वाभ्यां वै स्वर्णकेतुश्च पंच सप्तष्ट शृंगकैः ॥४३॥**

(प्रासादाच्या जागेचे २४ भाग केले असता) भिंतीचे निर्गमन एक भाग असते, चार, दीड, तीन, दीड व दोन भाग (कर्ण वगैरे फालना) असते व ८७५ अंडक असतात. तर तो **स्वर्णकेतू** (नावाचा मेरु प्रासाद) होतो. (४३)

**संभ्रमो भ्रमहीनश्च महामेरुर्भ्रमद्वयम् ।**
**साधारेषु प्रकर्तव्यं भद्रे भद्राविलोकनम् ॥४४॥**

(वर दिलेले मेरु प्रासादांचे प्रकार) प्रदक्षिणा मार्गांसह किंवा प्रदक्षिणामार्गा शिवाय असतात. साधार प्रकारच्या महामेरु प्रासादाला दोन प्रदक्षिणा मार्ग असतात; भद्रापाशी भद्राविलोकन (गवाक्षे) असावीत. (४४)

**वेदैकरामयुग्मांशे नेत्रे जनविभाजिते ।**
**वृषभध्वजमेरुश्च सैकाण्डकसहस्त्रवान् ॥४५॥**

(प्रासादाच्या जागेचे) २४ विभाग करून चार, एक, तीन, दोन व दोन भाग (कर्ण इत्यादी फालना) असलेल्या व १००१ अंडक असलेल्या (या प्रासादाला) **वृषभध्वजमेरु** म्हणतात. (४५)

[जनविभाजते हा शब्द जिनविभाजिते असा दुरुस्त करून मग अर्थ केला आहे.]

श्लोक ४६ व ४७ अनुक्रमे श्लोक ४४ व ४५ यांची पुनरुक्ति आहेत. (४६, ४७).

**राज्ञश्च प्रथमो मेरुस्ततो हीनोऽन्यवर्णजः ।**
**विना राज्ञोऽन्यवर्णेन कृतो मेरुर्महाभयम् ॥४९॥**

मेरुप्रासाद फक्त राजाने बांधावा, त्याहून कमी प्रतीचे प्रासाद इतर जातींनी बांधावेत. राजाने न बांधता इतर जातींनी मेरु (प्रासाद) बांधला असता तो भयकारी होतो. (४९)

अनुक्रमणिका

[वर दिलेल्या मेरु प्रासादांच्या माहितीचा गोषवारा खाली दिला आहे.

**फालनांची माहिती.**

| | **प्रासादाचे नांव** | **कोण** | | **भद्र** | | **उपरथ** | **विभाग** | **अण्डकांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री मेरु | २/२ | | ४/२ | | उपरथ | ८×८ | १०१ |
| २) | हेमशीर्ष | २ | | ३ | | १·५ | १०×१० | १२१ |
| | | कोण | नंदिका | भद्र | कोणी | प्रतिरथ | विभाग | अण्डकांची संख्या |
| ३) | सुखल्लभ | २ | ½ | २ | १ | १·५ | १२ ×१२ | २५१ |
| ४) | भुवनमण्डन | २ | ½ | ३ | १ | २ | १४ ×१४ | ३७५ |
| ५) | रत्नशीर्ष | ५ | २ | ८ | १ | ४ | ३२ ×३२ | ५०१ |
| ६) | किरणोदभव | ३ | १ | ४ | १ | २ | १८ ×१८ | ६२५ |
| ७) | कमलहंस | ३ | २ | ४ | १ | २ | २० ×२० | ७५१ |
| ८) | स्वर्मकेतू | ४ | १ | ४ | ½ | ३ | २२ ×२२ | ८७५ |
| ९) | वृषभध्वज | ४ | २ | ४ | १ | ३ | २४ ×२४ | १००१ |

इति श्री सूत्रधार केसर्यादि प्रासादजाति लक्षणं पंचचत्वारिंशन्मेरूलक्षणे षष्टोऽध्यायः ।

श्री सूत्रधार (मंडनाने लिहिलेल्या प्रासादमण्डनांतील) केसरी इत्यादी प्रासाद, त्यांच्या निरनिराळ्या प्रकारांची लक्षणे व ४५ मेरूंच्या लक्षणांची माहिती हा सहावा अध्याय संपला (६)

***

अनुक्रमणिका

# सप्तमोऽध्यायः । अध्याय सात

**रत्नगर्भाकणं (?) सूर्यचन्द्रतारावितानकम् ।**
**विचित्रमण्डपं येन कृतं तस्मै नमः सदा ॥१॥**

सूर्य, चन्द्र (व) तारे यांनी रत्नजडीत असे वितान असलेला चित्रविचित्र असा मण्डप ज्याने केला त्याला (परमेश्वराला) सर्वदा नमस्कार असो. (१)

[येथे वितान या शब्दावर श्लेष आहे. सूर्य, चन्द्र व तारे यांनी जणू रत्नजडीत असे आकाशरूपी जगाचे वितान निर्मिणाऱ्या परमेश्वराला नमस्कार असो. दुसऱ्या अर्थी सूर्य, चन्द्र व तारे यांची योजना वितानावर करून शोभायमान मंडप तयार करणाऱ्या शिल्पीला नमस्कार असो, असा शिल्पी नमस्काराच्या आदरास पात्र असतो. असे सूत्रधार मण्डनाने म्हणून शिल्पीची स्तुती केली आहे.]

**मन्दिराग्रे मंडपविधिः ।**

**कर्णगूढो विलोक्य (?) स्योदेकत्रिद्वारसंयुताः ।**
**प्रासादाग्रे प्रकर्तव्याः सर्व देवेषु मण्डपाः ॥२॥**

**मंदिराच्या पुढ्यातील मंडपांची माहिती –**

सर्व देवमंदिरांच्या पुढे कर्णापाशी भिंतीनी झाकलेले व (चंद्र -) अवलकोन असलेले, तसेच एक किंवा तीन दारे असलेले (गूढ) मंडप करावेत. (२)

**जिन मण्डपे विशेष –**

**गूढस्त्रीकथिता नृत्यक्रमेण मण्डपास्त्रयः ।**
**जिनस्याग्रे प्रकर्तव्याः सर्वेषान्तु बलाणकम् ॥३॥**

**जिनमण्डपाचा विशेष –**

जिन (प्रासादापुढे अनुक्रमाने गूढ, चौकी व नृत्यमण्डप असे तीन मण्डप असावेत. इतर देवांच्या (प्रासादाला) बलाणक असावा परीच्छेद पाडावा.

[बलाणक हा मुखमण्डप असून त्याला कक्षासन असतो. या मण्डपाची माहिती पुढे श्लोक ३७ - ४५ त दिली आहे.]

अनुक्रमणिका

**पंचविधमण्डपकथनम् ।**

**समं सपादं प्रासादं [:] सार्धपादोनतद्वयम् ।**
**द्विगुणं वा प्रकर्तव्या मण्डपाः पञ्चधा मताः ॥४॥**

**पाच प्रकारच्या मंडपाची माहिती-**

प्रासादाच्या रूंदीइतका, सवापट, दीडपट, पाऊणेदोन पट, किंवा दुप्पट रूंदीचे असे पाच प्रकारचे मण्डप करावेत असे मत आहे. (१)

[अप.पृच्छा १८५·२ - ३ प्रमाणे मण्डपाची रूंदी प्रासादाच्या रूंदीच्या २ ⅛ किंवा २ ½ देखील असू शकते. येथे मण्डपाची सात मापे दिली आहेत.]

**मण्डपमान कथनम्** –

**समं सपादः पञ्चाशत् पर्यन्त - दशहस्तकम् ।**
**दशान्तं पंचतः सार्धं द्विपादोनं चतुःकरे ॥५॥**

**मण्डपाच्या मापांची माहिती** –

पन्नास हातापासून दहा हातापर्यंत (रूंदीच्या प्रासादाचा मंडप प्रासादाच्या रूंदीच्या) इतक्याच (रूंदीचा) किंवा सवापट रूंदीचा असावा. नऊ हातापासून पाच हातापर्यंत दीडपट व चार हाताच्या (रूंदीच्या प्रासादाच्या मण्डपाची रूंदी त्याच्या) पाउणे दोनपट असावी. (५)


[अप. पृच्छा १८५·४ प्रमाणे ५० ते ११ हातापर्यंत रूंदीच्या प्रासादाला त्याच रूंदीचा किंवा सवापट रूंदीचा मंडप असावा व दहा ते पाच हातापर्यंत रूंदीच्या प्रसादाला दीडपट रूंदीचा मंडप सांगितला आहे.]

**त्रिहस्ते द्विगुणं द्व्येक हस्ते कुर्यात् चतुष्किकाम् ।**
**प्रायेण मण्डपं सार्धं द्विगुणं प्रत्यलिन्दकैः ॥६॥**

तीन हात (रूंदीच्या प्रासादाच्या मंडपाची रूंदी त्याच्या रूंदीच्या) दुप्पट असते. दोन व एक हात (रूंदीच्या प्रासादाला) चौकी (चतुष्किका दोन किंवा चार खांबाचा मंडप) करतात. (हा) मण्डप पुष्कळदा (प्रासादाच्या रूंदीच्या) दीडपट किंवा दुप्पट (रूंदीचा) करतात व तो अलिंदां सारखा (व्हरांड्या सारखा) मानतात. (६)

[अपराजितपृच्छा १८५·८ मध्ये, मण्डपाच्या नंतर दुप्पट रूंदीचे दोन किंवा तीन किंवा चार अलिन्द असतात अशी माहिती दिली आहे. तेव्हा या श्लोकात अलिन्दांचे अनेकवचन दिले आहे ते बरोबर आहे.]

अनुक्रमणिका




**घष्टामानम्**

**मण्डपे स्तंभपट्टार्थं मध्यपट्टानुसारतः ।**
**शुकनासासमा घण्टा न्यूना श्रेष्ठा न चाधिका ॥७॥**

**घण्टेचे माप** –

मण्डपाच्या खांबाचा पट्ट (भिंतीच्या वरच्या बाजूला असलेल्या) गर्भगृहाच्या पट्टभागाच्या समसूत्रात असतो. (ही मण्डपाच्या शिखराची, घण्टेची, खालची मर्यादा झाली). घण्टा (म्हणजे मण्डपाचे शिखर) गर्भागाराच्या शिखरावरील शुकनासिके इतकी उंच असावी. (ही घण्टेची वरची मर्यादा) याहून कमी असेल तर उत्तम परंतु जास्त असू नये. (७)

[प्रासादाच्या शिखराचे (पायथा ते स्कंध) २१ भाग पाडले असता शुकनास ९ ते १३ भागापर्यंत असते असे श्लोक ४·२५ मध्ये दिले आहे. तेव्हा मण्डपाचे शिखर (गोलाकार घुमट) प्रासादाच्या शिखराच्या ९/२१, १०/२१.... किंवा १३/२१, जशी शुकनासीची उंची असेल त्याप्रमाणे, इतक्या उंचीचे असते.

**मुखमण्डपसंघातैर्यदा भित्यन्तरे भवेत् ।**
**न दोषः स्तंभपट्टाद्यैः समं व विषमं तलम् ॥८॥**

मुखमण्डप (व गर्भगृह) यांच्या मिलन स्थली जर एका भिंतीचे अंतर असेल तर खांबावरील पट्टभाग व मण्डपाचा मध्यपट्ट हे समतल किंवा निरनिराळ्या पातळीत असलेत तरी तो दोष (समजला जात) नाही. (८)

अनुक्रमणिका

**नवाष्ट दशभागेषु त्रिभिश्चन्द्रावलोकनम् ।**
**हस्तकं अंगुलोनं वा तदूर्ध्वं मत्तवारणम् ॥९॥**

(मण्डपाच्या भिंतीच्या उंचीच्या) नऊ, आठ किंवा दहा भागांपैकी तीन भाग चन्द्रावलोकन (उघडा भाग) असावे. (आसन पट्टाच्या) वर एक हात किंवा त्यास एक अंगुल कमी (२४ किंवा २३ अंगुलांचे) मत्तवारण (बाजूचा कठडा) असावा. (९)

[अपराजितपृच्छा १८४·६ प्रमाणे मतवारणाची उंची २१ अंगुले असते.]

**सार्धपञ्चाशकैर्भक्तेः सपादं राजसेनकम् ।**
**सपादं (?) त्र्यंशको वेदि-र्भागेनासनपेटकम् ॥१०॥**

(मंडपाच्या उघड्या भागाशिवाय तळापासून जे अंतर त्याचे) ५·५ भाग केले असता १·२५ भाग (उंचीचा) राजसेनक असतो. ३·२५ भाग वेदी व एक भाग आसनपट्ट असतो. (१०)

**तदूर्ध्वं सप्तसार्धांशे यावत् पट्टस्य पेटकम् ।**
**सार्धं पंचाशकैः स्तम्भः पादोनं भरणं भवेत् ॥११॥**

त्याच्या (आसनपट्टाच्या) वरपासून च्छाद्याच्या पाटापर्यंतच्या उंचीचे ७·५ भाग करावेत. ५·५ भाग खांब असून, पाऊण भाग भरण असावे. (११)

**भागार्धं भरणं चापि सपादं सार्धतः शरः ।**
**पट्टोद्विभाग स्तस्योर्ध्वे कर्तव्या (?) छद्यकोदयः ॥१२॥**

किंवा भरण अर्धा भाग व शीर्ष (शिरावटी त्याप्रमाणे) सवा किंवा दीड भाग घ्यावे. (भरण व शीर्ष मिळून उंची दोन भाग असते.) त्याच्यावर दोन भागांचा पट्ट व त्यावर च्छाद्याची उंची असावी. (१२)


**त्रिभागे तलतछाद्यं तत् पेटं पट्टपेटकैः ।**
**अर्धांशोर्ध्वा कपोतालि द्विभागे पट्टविस्तरे ॥१३॥**

पाटाच्या पेटाभागापर्यंत च्छाद्याची उंची तीन भाग असून तेथपर्यंत (पेटाभागापर्यंत) ते (च्छाद्य) उतरते असावे. वरच्या कपोतालीची उंची अर्धा भाग व पट्टाची उंची दोन भाग असावी. (१३) (आकृती २६)

**प्रासाद -दश -रुद्राक्ष - भागेन स्तंभविस्तरः ।**
**वेदाष्ट - रवि -  विंशत्या कर्णे वृत्तस्तु पञ्चधा ॥१४॥**

प्रासादाच्या (रुंदीच्या) दहाव्या, अकराव्या किंवा बाराव्या भागाइतकी खांबाची रूंदी (जाडी) असावी. चार आठ, बारा व वीस कोनी, व वर्तुळाकार असे खांबांचे पाच प्रकार आहेत. (१४) (आकृती २७)

अनुक्रमणिका





**आकृती २७ : खांबांचे प्रकार (७·१४)**

[रुद्राक्ष या शब्दाऐवजी रुद्रार्क अशी दुरुस्ती करून अर्थ दिला आहे. अपराजितपृच्छा (१८४·३१ - ३५) मध्ये खांबांची माहिती दिली आहे. चार कोनी म्हणजे चौरस खांबांना **रुचक** म्हणतात. ज्याला आठ कोन (सर्व बाजू समान लांबीच्या) असतात त्याला **अष्टाश्र** खांब म्हणतात. ज्या खांबाला आठ कर्ण असतात (२४ कोनी) त्याला **स्वस्तिक** स्तंभ म्हणतात. भद्र असलेल्या (म्हणजेच आठ कोनी) खांबाला **भद्रक** म्हणतात. ज्या खांबाला भद्र व उपरथ असतात (म्हणजेच बारा कोनी खांबाला) **वर्धमान स्तंभ म्हणतात**.

खांबाची जाडी प्रासादाच्या रुंदीच्या १/१०, १/११× किंवा १/१२ असावी; व याशिवाय १/१३ किंवा १/१४ असू शकते असे खांबाच्या जाडीचे तीन नव्हे तर पाच प्रकार अपराजितपृच्छांत दिले आहेत. सूत्रधार मण्डनाने त्यातील जास्त जाडीच्या खांबांचीच माहिती दिली आहे.]

**द्वाराग्रे स्तम्भवेधाद्या प्रा (ग् ?) ग्रीवो मण्डपो भवेत् ।**
**द्वि द्वि स्तम्भविवृद्धयाच षोडशा च प्रकीर्त्तिता ॥१५॥**

(प्रासादाच्या) दाराच्या पुढे (दोन) खांबांची पहिल्या प्रकारची चौकी असते तिला प्राग्ग्रीव मंडप म्हणतात. दोन दोन खांबांनी वाढ करीत त्याचे सोळा प्रकार सांगितले आहेत. (१५)




**आकृती २८ : प्राग्ग्रीव मंडपाचे प्रकार (श्लोक ७·१५)**

अनुक्रमणिका

[अपराजितपृच्छा १८८·१ - ११ मध्ये प्राग्ग्रीव मंडपाची माहिती दिली आहे. त्यांची नावे आहेत (१) प्राग्ग्रीव, (२) चतुष्क, (३) सन्मुख, (४) त्रिजग, (५) श्रीधर, (६) पुष्पक, (७) श्रीपद (८) श्रियानन्दक, (९) संवर, (१०) पृथ्वीधर, (११) पुण्यभद्र, (१२) जयन्तक, (१३) शंकुपर्ण (१४) गोविन्द, (१५) महाभोगी व (१६) दिवौकस.

प्रसादाच्या पुढे (केवळ) दोन खांबांनी **प्राग्ग्रीव** मण्डप होतो चार व सहा खांबांचे अनुक्रमें **चतुष्क** व **सन्मुख** असतात; आठ खांबाचा **त्रीजग** व दहा खांबाचा **श्रीधर** असतो. यात तीन चौकी मागे असून एक पूर्वेकडे (पुढे) असते. १२ खांबाचा **पुष्पक** मंडप असतो. त्याच्या पुढे एक चतुष्किका असली म्हणजे तो **श्रीपद** मंडप. १६ स्तंभांचा **श्रियानन्द** व त्याच्या पुढे चतुष्किका असली म्हणजे संवर मण्डप होतो. पुढची चतुष्किका नसून दोन्ही बाजूंना दोन (प्रत्येकी एक) चतुष्किका असतात तो **पृथ्वीधर**. पुढची चतुष्किका नसून बाजूंना पण मध्यभागी चतुष्किका असल्यास तो **पुण्यभद्र** मंडप. त्याच्या पुढच्या बाजूला चतुष्किका असली म्हणजे **जयन्त** मण्डप होतो. पुढच्या बाजूला तीन चतुष्किका असल्या म्हणजे तो **शंकुपर्ण** मंडप. त्याच्या पुढे एक चौकी (चतुष्किका) असली म्हणजे **गोविन्द** मंडप होतो; व तीन चौक्या असतील तर तो **महाभोगी** मंडप. त्याच्यापुढे एक चतुष्किका असली म्हणजे तो **दिवौकस** मण्डप.]

**भितिः प्रासादवद् गेहे मण्डपेऽष्टविधेषु च ।**
**चतुरस्त्रशुभस्तस्य तथा प्रतिरथान्वितः ॥१६॥**

प्रासादाप्रमाणे भिंत असलेल्या मंडपाचे आठ प्रकार आहेत. चौरस, उत्तम भद्र असलेला, तसेच प्रतिरथांसह असलेला. (१६)

[शुभस्तस्यच्या ऐवजी सुभद्रश्च अशी दुरुस्ती करून अर्थ केला आहे.]

**मुखभद्रयुतो वापि द्वित्रिप्रतिरथैर्युतः ।**
**कर्णोदकान्तरे नाथ (रेणाथ ?) भद्रोदक विभूषितः ॥१७॥**

मुखभद्र असलेला किंवा दोन (अथवा) तीन प्रतीरथांसह असलेला, कोणांपाशी किंवा भद्रांपाशी जलान्तराने विभूषित केलेला (असे मण्डपाचे आठ प्रकार आहेत.)

[या श्लोकाच्या व याच्या पुढच्या श्लोकाच्या मध्ये अपराजितपृच्छा १८७·५ प्रमाणे दिलेला श्लोक पाहिजे. त्यात फालनांची माहिती दिली आहे.]

**पादोन कर्णः प्ररथः प्रभद्रो द्विगुण स्ततः ।**
**भद्रार्धे मुखभद्रं च शेषाश्चैव षडंशकाः ॥**

कर्णाच्या पाऊणपट प्रतिरथ व भद्र कर्णाच्या दुप्पट असतो. भद्राच्या निम्मे मुखभद्र असून इतर (नंदिका वगैरे) भाग (कर्णाच्या संदीच्या) सहावा भाग असतात.]

अनुक्रमणिका

**दलेनार्धेन पादेन दारस्य निर्गमो भवेत् ।**
**मूलप्रासादवद् बाह्ये पीठं जंघादि मेखला ॥१८॥**

(मंडपाच्या) फालनांचे निर्गमन स्वतःच्या (रूंदीच्या) निम्मे किंवा पाव भाग असावे. बाहेरच्या बाजूला मूळ प्रासादाप्रमाणे पीठ, जंघा (भिंत), मेखला आदी असाव्यात. (१८)

**गवाक्षेणान्वितं भद्रमथ जालकसंयुतम् ।**
**गुहश्च कर्णगूहे (हो ?) वा भद्रचन्द्रावलोकनम् ॥१९॥**

(गूढमंडपाच्या) भद्रांमध्ये जाळीसह गवाक्ष असावे. मंडप गूढ (भिंतीनी पूर्ण झाकलेला) किंवा कर्णगूढ (म्हणजे कोणापाशी फक्त भिंतीनी झाकलेला) व भद्रांपाशी चन्द्रावलोकन (उघडा, भिंतीशिवाय) असलेला असतो. (१९)

**त्रिद्वारे चैकवक्त्रेऽथ मुखे कार्या चतुष्किका ।**
**गुहे प्रकाशको वृद्धिर्मधोदय करोटकम् (?) ॥२०॥**
**इत्यष्ट गूढमण्डपाः ।**


गूढ मंडपाला तीन दारे किंवा एकच दार असून त्याच्या पुढच्या भागी चौकी (चतुष्किका) असावी. भिंतीनी झाकलेल्या किंवा उघड्या मंडपात वर्तुळाकार व व्यासाच्या निम्मे उंचीचे करोटक (घुमट) असते. (२०)

**आठ गूढमंडपांची माहिती संपली.**

[अपराजितपृच्छा १८७·११४ मध्ये दिलेली आठ गूढमंडपांची माहिती खाली दिली आहे. या आठ गूढमंडपांची नावे आहेत - (१) वर्धमान, (२) स्वस्तिक, (३) गरुड, (४) सुरनन्दन, (५) सर्वतोभद्र, (६) कैलास, (७) इन्द्रनील व (८) रत्नसंभव. वर्धमान मंडप चौरस असतो, स्वस्तिक मंडपाला भद्र असतात त्र्यंग प्रकारचा मंडप. **गुरुड** मंडपाला प्रतिरथ असतात (पंचांग मंडप), **सुरानन्द** मण्डपाला प्रभद्र असतात (सप्तांग मंडप). **सर्वतोभद्र** मंडप नवांग प्रकारचा (?) असतो. **कैलास** मंडपांत भद्रापाशी जलान्तर असतात. प्रतिरथापाशी जलान्तर असल्यास तो **इन्द्रनील** नावाचा मण्डप होतो; व तीनही फालनांपाशी (भद्र, प्रतिरथ, उपरथ) जलान्तर असल्यास तो **रत्नसंभव** मंडप होतो. (आकृती २९)

मूळप्रासादाला जितक्या फालना असतात तितक्याच फालना मंडपाला असाव्यात. तेव्हा मूळप्रासाद त्र्यंग, पंचांग.... नवांग इत्यादि फालनांचा असेल तर त्याच्या गूढमंडपाच्या फालना देखील अनुक्रमाने त्र्यंग, पंचांग.... नवांग अशा असाव्यात.]

अनुक्रमणिका




**आकृती २९ : गूढमंडप (अपराजितपृच्छा १८७·१ - १४)**

**एक - त्रि - वेद - सप्तांक - चतुष्काश्व त्रिकत्रये ।**
**अर्धभद्रं विभागेन पार्श्वयो रग्रतस्तथा ॥२१॥**
**[एक-त्रि-वेद-षट् सप्तांक चतुष्क्यास्त्रिक त्रये ।**
**अग्रे भद्रं विना प्रार्श्वे- पार्श्वयोरग्रतस्तथा ॥**
**पं. भगवानदास जैन प्रत]**

(गूढ मंडपाच्या पुढे) एक, तीन, चार, सहा, सात व नऊ चौकी असलेले, तीन चौक्या तीन रांगात असलेले मंडप असतात. पुढच्या बाजूला एक चौकी असलेला, पुढच्या बाजूला चौकी नसून, दोन्ही बाजूंना दोन चौकी असलेला, तसेच पुढच्या बाजूला व दोन्ही बाजूंना दोन चौकी असलेला- (२१)

[पं. भगवानदास जैन प्रतीतील सुधारित श्लोकाचा अर्थ दिला आहे.]

**अग्रतस्त्रिचतुष्कस्य तथा पार्श्वे (श्व ?) द्वये ऽपि च।**
**मुक्तकोणे चतुष्के द्वे इति द्वादशमण्डपाः ॥२२॥**

पुढे तीन चौकी असलेला, तसेच दोन्ही बाजूंना दोन चौक्या असलेला व पुढल्या बाजूला दोन चौकी असलेला असे मण्डपांचे बारा प्रकार आहेत. (२२)


**गृहस्याग्रे प्रकर्तव्या तथा नाना चतुष्किका ।**
**चतुरस्त्रादि भेदेन वितानैर्बहुभिर्युता ॥२३॥**

गूढमंडपाच्या पुढे निरनिराळ्या चौरसांच्या प्रकारांनी चतुष्किका कराव्यात; त्यांना पुष्कळ प्रकारची विताने असावीत. (२३)

[अपराजितपृच्छा १८७·१५ - २६ मध्ये या बारा मंडपांची माहिती दिली आहे. त्यांची नावे आहेत - (१) सुभद्र, (२) किरीटी, (३) दुन्दुभी, (४) प्रान्त, (५) मनोहर, (६) शान्त, (७) नन्द, (८) सुदर्शन, (९)

अनुक्रमणिका

रम्यक, (१०) सुनाभ, (११) सिंह, व (१२) सूर्यात्मक. गूढमंडपाच्या पुढे हे त्रिकमंडप असतात. एक चौकी असलेला **सुभद्र** मंडप; त्याच्या दोन्ही पार्श्व बाजूंना एक एक चौकी असली म्हणजे तो **किरीटी** मंडप असतो. त्याच्या पुढे, पूर्वेकडे, एक आणखी चौकी असली म्हणजे तो **दुंदुभी** मंडप; त्याच्या दोन्ही बाजूंना चौकी असल्या म्हणजे **प्रांत** नावाचा मंडप होतो. त्याच्या पूर्वेला पुन्हा चौकी आली म्हणजे **मनोहर** मंडप होतो. त्याच्या या चौकीच्या दोन्ही बाजूंना चौकी असल्या म्हणजे **शान्त** मंडप, याला सोळा खांब असतात. या मंडपाची रुंदी तसेच लांबी देखील प्रत्येकी तीन चौकींनी होते. हा चौरस मंडप असतो. या तीन चौकी रुंद असलेल्या मंडपाची रूंदी प्रासादाच्या रूंदीच्या दुप्पट असते. या सहाव्या मंडपाच्या पुढ्यात, पूर्वेकडे, एक चौकी असली म्हणजे तो **नन्द** मंडप होतो. पुढची चौकी नसून मधल्या चौकीच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी एक चौकी असली म्हणजे **सुदर्शन** मंडप व त्याच्या पुढ्यात एक चौकी असेल तर तो **रम्यक** मंडप असतो. त्याच्या दोन्ही बाजूंना चौकी असल्यास तो **सुनाभ** मंडप होतो. याच्या दोन्ही बाजूंना दोन अलिंद (ओसऱ्या) असतील तर तो **सिंह** मंडप व त्याच्या पूर्वेच्या बाजूस जर चौकी असतील तर तो **सूर्यात्मक** नावाचा त्रिक मंडप होतो. (आकृती ३०)]




**आकृती ३० : सुभद्रादि मुखमंडप (अपराजितपृच्छा १८७·१५ – २६)**

**त्रिकाग्रे रंगभूमाथ तत्र वै नृत्यमण्डपान् ।**
**प्रासादाग्रेऽच सर्वत्र न प्रकुर्याद् विधानतः ॥२४॥**
**इति द्वादशमण्डपाः ।**

अनुक्रमणिका

चौकी मंडपाच्या पुढे जेथे रंगभूमी असावयास हवी तेथे नृत्यमण्डप करावा. हा मण्डप नेहमीच प्रासादाच्या पुढ्यात करावा, इतरत्र (दोन्ही बाजूस वगैरे) करू नये असा नियम आहे. (२४)

**बारा मंडपांची माहिती संपली.**

**सप्तविंशतिरुक्ता ये मण्डपा विश्वकर्मणा ।**
**तलैस्तु विषमैस्तुल्यैः क्षणैः स्तम्भैः समैस्तथा ॥२५॥**

विश्वकर्म्याने जे २७ प्रकारचे मंडप सांगितले आहेत त्यांचे तलविभाग विषम किंवा सम संख्येचे असून खांब व तुळ्या समसंख्येच्या असतात. (२५)


**स्तंभसंख्याभेदेन सप्तविंशतिर्मण्डपभेदाः ।**

**प्रथमो द्वादशस्तम्भो द्वि द्वि स्तंभविवर्धनात ।**
**यावत् षष्टिश्चतुर्युक्ता सप्तविंशति मण्डपाः ॥२६॥**

**खांबांच्या संख्यांच्या भेदाने मण्डपाचे २७ प्रकार** -

पहिला मंडप १२ खांबांचा असतो. दोन दोन खांबानी वाढ करीत ६४ खांबांपर्यंत २७ प्रकारचे मंडप होतात. (२६) (आकृती ३१)

[अपराजितपृच्छा सूत्र १८६ त या नृत्यमंडपांची माहिती दिली आहे. या मंडपांची नावे आहेत - (१) पुष्पक, (२) पुष्पभद्र, (३) सुभद्र, (४) मृगनन्दन, (५) कौशल्य, (६) बुद्धीसंकीर्ण, (७) गजभद्र, (८) जयावह, (९) श्रीवत्स, (१०) विजय, (११) वस्तुकीर्ण, (१२) श्रीधर, (१३) यज्ञभद्र (१४) विशाल, (१५) सुश्रेष्ठ, (१६) शत्रुमर्दन, (१७) भूजय, (१८) नन्दन, (१९) विमानभद्रक, (२०) सुग्रीव, (२१) हर्षण, (२२) कर्णिकार, (२३) पदाधिक, (२४) सिंहक, (२५) सिंहभद्र (२६) समसूत्र.



**आकृती ३१ : पुष्पक नृत्यमंडप (७·२६)**

अनुक्रमणिका

ज्ञानप्रकाश दीपार्णवांत (१०·२९) नन्दन व विमानभद्रक मंडप यांच्यामध्ये मानव नावाचा मंडप दिला आहे, व तो धरला म्हणजे २७ मंडपांची संख्या पुरी होते.]

**क्षेत्रार्धस्य षडंशोना चैका स्त्राष्टास्त्रमुच्यते ।**
**कलास्त्रे क्षेत्रषड्भागास्तत् षडंशेन संयुता ॥२७॥**

जागेचे दोन भाग करून, (अर्ध्या भागातून) एक षष्ठांश भाग कमी केल्यास ती अष्टकोनांच्या बाजूची लांबी असते. जागेच्या सहाव्या भागांत त्याचा (सहाव्या भागाचा) सहावा भाग मिळविला म्हणजे सोळा कोनी आकृतीच्या बाजूची लांबी मिळते. (२७)

[चौरस मंडपाच्या बाजूची लांबी क्ष असेल तर त्यावरील अष्टकोनाच्या बाजूची लांबी = क्ष/२ – क्ष/१२ = ५/१२ क्ष; व १६ कोनी आकृतीच्या बाजूची लांबी = क्ष/६ + क्ष/३६ = ७/३६ क्ष.]

**अष्टाश्रं षोडशाश्रं च वृत्तं कुर्यात् तदूर्ध्वतः ।**
**उदयं विस्तरार्धेन तं षष्ठंवांश भाजयेत् ॥२८॥**

(चौरस मंडपाच्या वर घुमटाकृति शिखर करण्यासाठी) प्रथम अष्टकोन त्यावर १६ कोन व त्यावर वर्तुळाकार असे आकार द्यावेत. (मंडपाच्या) रूंदीच्या निम्मे (शिखराची) उंची असून तिचे सहा भाग करावेत. (२८)

[कर्णदर्दरिका, रूपकंठ, त्यावर एकमेकांवर रचलेले तीन गजतालूंचे थर व त्यावर कोलाचा थर असे सहा थर घुमटाकार शिखराचे असतात.]

**कर्णदर्दरिका सप्तभागेन निर्गमोच्चता ।**
**रूपकंठं तु पंचांशं द्विभागेनात्र निर्गमम् ॥२९॥**

कर्णदर्दरिकेचा थर सात भाग उंच व निर्गमन सात भाग असावे. रूपकंठाचा थर पाच भाग (उंच) व त्याचे निर्गमन दोन भाग असावे. (२९)

[अपराजितपृच्छा १८४·१५ - १८ मध्ये कर्णदर्दरिकेचे उपविभाग दिले आहेत. ग्रासपट्टी = २ भाग, अंतरपत्र = ⅛ भाग, द्विपट्टिका = ⅛ भाग, चिप्पिका = ½ भाग, स्कंध = १·५ भाग, अंतः पट्टी = ½ भाग, कर्णक = १ भाग, चिप्पिका = ½ भाग, कामरूपिका = ½ भाग असे एकूण सात भाग. या थरविभागांच्या निर्गमनाचा हिशोबही दिला आहे. कामरूपिकेचे निर्गमन ½ भाग, चिप्पिका – १·२५ भाग, कर्णक १·२५ भाग, द्विपट्टिका – ½ भाग व स्कंध - तीन भाग निर्गमन असते.

रूपकंठाचे थरविभाग खालीलप्रमाणे – (अप.पृच्छा १८४·१९ - २०) अंतरपट्टिका = ½ भाग, चिप्पिका = ½ भाग, कर्ण = १ भाग, रूप = २·७५ भाग, कर्ण ½ भाग, अंतपत्र ⅛ भाग, एकूण ५·५ भाग. मात्र अपराजित पृच्छांत रूप कण्ठाची उंची पाच भाग दिली आहे; निर्गमन १·५ भाग असते.]

अनुक्रमणिका

**विद्याधरैः समायुक्तं षोडशाष्टदिवाकरैः।**
**जिनसंख्यामितैर्वापि दंततुल्योवि (ल्यैर्वि) राजितम् ॥३०॥**


येथे (रूपकंठापाशी) आठ, बारा, सोळा, २४ किंवा ३२ (या संख्यांनी) विद्याधर विराजमान झालेले दाखवितात. (३०)

**विद्याधरः पृथुत्वेन सप्तांशो निर्गमोदयः ।(दश ?)**
**तदूर्ध्वे चित्ररूपाश्च नर्तक्यो नृत्यशोभिताः ॥३१॥**

विद्याधरांची रूंदी (की उंची ?) व निर्गमन दहा भाग असते त्यांच्यावरती नृत्याच्या सुंदर मुद्रांमध्ये असलेल्या स्वरूपवान नर्तकी दाखवितात. ( ३१)

**गजतालस्तु षट्सार्धा प्रथमा द्वितीया तु षट् ।**
**तृतीया सार्धपञ्चाशा कोलानि त्रीणि पञ्च च ॥३२॥**

पहिला गजताला (लू ?) चा थर ६·५ भाग, दुसरा सहा भाग व तिसरा ५·५ भाग उंच असावा. कोलीचे तीन किंवा पाच थर असावेत. (३२) (आकृती ३२)




**आकृती ३२ : शिखर (श्लोक ७, २८ – ३२)**

[गजतालु तीन असतात, त्यांची उंची खालून वर अनुक्रमे ६·५, ६ व ५·५ भाग असते. गजतालु विभागाचे उपथरविभाग अपराजितपृच्छा १८४·२२ – २३ त दिले आहेत. चिप्पिका = ½ भाग, लूमा = ४ भाग, कामरूप = ½ भाग, अंतःपत्र = ¼ भाग, एकूण ५·२५ भाग. कोलीचे थरविभाग (अपराजितपृच्छा १८४·२४ – २६) आहेत. वलिका (उंची) = १ भाग, निर्गमन – १·२५ भाग, चिप्पिका = ½ भाग, पद्म = १·५ भाग व वलिका - २ भाग.

**मध्ये वितानं कर्तव्यं चित्रवर्णविराजितम्।**
**नाटकादि कथारूपैर्न्नानाकारैर्विराजितम्॥३३॥**

अनुक्रमणिका


रंगीत चित्रांनी शोभणारे वितान मध्यभागी करावे. निरनिराळ्या प्रसंगांचे, कथांचे तेथे चित्रण असावे; व निरनिराळ्या आकारांनी ते शोभायमान करावे. (३३)

**एकादशशतान्येव वितानानां त्रयोदश ।**
**शुध्द संप्या (?) ट मिश्राणि क्षिप्ताक्षिप्तानि यानि च ॥३४॥**

वितानांचे शुद्ध, संघाट इत्यादि मिश्र तसेच क्षिप्त (लटकते) व अक्षिप्त (खोदलेले) इत्यादि मिळून १,११३ प्रकार आहेत. (३४) (आकृती ३३, ३४ व ३५)


[अपराजितपृच्छा १८९·५ अनुसार वितानांची संख्या त्रयोदशाधिकशतं सहस्रं इतकी सांगितली आहे व तीच वर अनुवादात दिली आहे. तसेच १८९·४ मध्ये वितानांचे तीन प्रकार दिले आहेत. ते म्हणजे (१) समतल, (२) क्षिप्त व (३) उत्क्षिप्त. जेथे नक्षीला उठावदार पणा नसतो ते समतल प्रकारचे वितान. जेथे नक्षीला बाहेर उठाव असतो पद्म वगैरे नक्षी लटकती असते ते उत्क्षिप्त वितान व जेथे नक्षी खोदून केलेली असते ते क्षिप्त वितान. वितानाच्या या शिवाय चार प्रमुख जाती सांगितल्या आहेत - (१) पद्मक (२) नाभिच्छन्द (३) सभामार्ग व (४) मन्दारक. त्यांच्या जाती अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा आहेत व त्यांचे वर्ण अनुक्रमे पांढरा, लाल, पिवळा व सर्व रंग हे असतात. या वितानांचे पुन्हा वरील शुद्ध जातींच्या मिश्रणाने निरनिराळे प्रकार होतात. ते असे - (१) शुद्ध (२) छन्दसंघाट (३) भिन्न (४) उद्भिन्न. वर वितानांचे पद्मक इत्यादि चार प्रकार दिले आहेत. या चार प्रकारांपैकी कोणत्याही फक्त एकाच प्रकारचे वितान असल्यास त्यास **शुद्ध** वितान म्हणतात. वितानांच्या दोन प्रकारांचे मिश्रण असल्यास त्या वितानाला **संघाट** म्हणतात. तीन प्रकारांचे मिश्रण असल्यास त्यास **भिन्न** म्हणतात व चारही प्रकारच्या वितानांचे मिश्रण असल्यास त्या वितानाला **उद्भिन्न** म्हणतात.

अनुक्रमणिका




आकृती (३३) समतल वितान- गंजिगट्टी येथील देवालयाचे वितान (श्लोक ७ – ३४)

अनुक्रमणिका



आकृती (३४) अधिप्तप्रकाराचे वितान, वाघळी (जिल्हा जळगांव) मुधाई देवीचे देवालय (श्लोक ७ — ३४)

अनुक्रमणिका



**आकृती (३५) उत्क्षिप्त वितानाचा प्रकार (श्लोक ७ – ३४)**

दोन प्रकारच्या वितानांच्या मिश्रणाचे म्हणजे **संघाट** प्रकारच्या वितानांची उदाहरणे दिली आहेत.

पद्मक + नाभिच्छंद = पद्मनाभ; पद्मक + सभामार्ग = सभापद्म; सभामार्ग + मन्दारक = सभामन्दारक; पद्मक + नाभिच्छंद = कमलोद्भव. घुमटाच्या खालच्या बाजूला पद्मक वितान व त्याच्या वरच्या बाजूला नाभिच्छंद वितान असले तर या मिश्र प्रकारच्या वितानाला **पद्मनाभ** म्हणतात.

खालच्या बाजूला सभामार्ग व त्याच्या वरच्या बाजूला पद्मक वितान असले तर त्यास **सभापद्म** म्हणतात. खालच्या बाजूला सभामार्ग व त्याच्या वरच्या बाजूला मन्दारक वितान असेल तर त्यास **सभामन्दारक** म्हणतात. नाभिच्छंद खालच्या बाजूला व पद्माची आकृति लांबविलेली (लोंबती) अशा वितानाला **कमलोद्भव** म्हणतात.

अनुक्रमणिका

वितानांच्या १,११३ संख्येचा हिशोब खाली दिल्याप्रमाणे आहे.

| **वितानांची संख्या** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वितानांचे प्रकार** | **शुध्द** | **छन्दसंघाट** | **भिन्न** | **उद्भिन्न** | **एकूण संख्या** |
| | ६४ | ३६ | २०० | २०० | **पद्मक** प्रकारच्या वितानांची संख्या = ५०० |
| | २४ | ४० | १०० | १३६ | **नाभिच्छंद** प्रकारच्या वितानांची संख्या = ३०० |
| | १६ | ३६ | ४८ | १०० | **सभामार्ग** प्रकारच्या वितानांची संख्या = २०० |
| | १० | १५ | ४० | ४८ | **मन्दारक** प्रकारच्या वितानांची संख्या = ११३ |
| | | | | | **एकूण १११३.** |

कुठल्या प्रकारचे वितान कुठल्या देवालयाला असावे त्याचीही माहिती देतात. (अपराजित पृच्छा १८९·१७ - २६ व १९०·१ - ११) **पद्मक** प्रकारचे वितान शंकराच्या मंदिराच्या मंडपासाठी योग्य असते; नाभिच्छंद विष्णूच्या मंदिरासाठी, सभामार्ग ब्रह्मदेवाच्या मंदिरासाठी, मन्दारक सूर्याच्या मंदिरासाठी, पद्मनाभ पार्वती इत्यादी देवींच्या मंदिरासाठी, सभापद्म गणपतीच्या मंदिरासाठी व सभामन्दारक जिनतीर्थंकराच्या मंदिराच्या मंडपांसाठी असावे.

मात्र पद्मक, नाभिच्छंद, सभामार्ग व मन्दारक या शुद्ध जातींच्या वितानांची माहिती, ते कसे ओळखावेत अगर त्यांची लक्षणे इत्यादी माहिती भुवनदेवाचार्यांनी दिलेली नाही. कदाचित वितानांची नक्षी इतकी जटिल आहे की ती वर्णन करून सांगता येणार नाही हेही त्याचे कारण असावे.]

**वितानानि विचित्राणि वस्त्रचित्रादि भेदतः ।**
**तानि लोके प्रवर्तन्ते तस्मादूह्यानि लोकतः ॥३५॥**

निरनिराळ्या चित्रांमुळे वस्त्रांचे अनेक प्रकार होतात त्याप्रमाणे चित्रविचित्र नक्षीने वितानांचे प्रकार होतात. ते (प्रकार शिल्पी -) जनांमध्ये प्रसिद्ध आहेत तेव्हा त्यांच्यापासून त्यांची वितानांची) माहिती करून घ्यावी. (३५)

[वितानांची नक्षी शब्दांकित करणे अवघड असल्याने हा उपाय ग्रंथकार देतो.]

**मण्डपेषु च सर्वेषु पीठान्ते रंगभूमिका (म्) ।**
**कुर्यादुत्तेन पटे (ट्टे) न चित्रपाषाणजेन च ॥३६॥**
**इति मण्डपाः ।**

सर्व मण्डपांच्या पीठाचा जो पृष्ठ भाग त्याला रंगभूमि म्हणतात. ती लांब लांब दगडांच्या रांगांनी तसेच रंगीबेरंगी दगडांनी सुशोभित करावी. (३६)

**मण्डपांची माहिती संपली.**

अनुक्रमणिका

**बलाणे देवगेहाग्रे राजद्वारे गृहे तथा ।**
**जलाशये ऽथ कर्तव्यं सर्वेषां मुखमण्डपम् ॥३७॥**

देवालयाच्या पुढच्या बाजूला, राजवाड्याच्या तसेच घराच्या दारापाशी व जलाशयापाशी या सर्व ठिकाणी बलाणक प्रकारचा मुखमण्डप करावा. (३७)

**जगतीपादविस्तीर्णं पादपादेन वर्जितम् ।**
**शालालिन्देन गर्भेण प्रासादेन समं भवेत् ॥३८॥**

जगतीच्या रूंदीच्या एक चतुर्थांश किंवा जगतीच्या रूंदीतून एकचतुर्थांशाचा एक चतुर्थांश (म्हणजे १/१६ वा भाग) कमी करून अथवा शाला, ओसरी, गर्भगृह अथवा प्रासाद यांच्या इतकी मुखमण्डपाची रूंदी असावी. (३८)

**उत्तमं कन्यसं मध्ये मध्यं ज्येष्ठे तु कन्यसम् ।**
**एक-द्वि-त्रि-चतुःपंच-रस-सप्त पदान्तरे ॥३९॥**

ज्येष्ठ प्रासादाला कनिष्ठ मुखमण्डप, मध्यम प्रासादाला मध्यम प्रकारचा व कनिष्ठ प्रासादाला ज्येष्ठ प्रकारचा मुखमण्डप (बलाणक) असावा. त्याचे (बलाणक मण्डपाचे) प्रासादापासून अंतर एक, दोन, तीन, चार, पाच, सहा किंवा सात पद अंतरावर असावे. (३९)

**मूलप्रासादवद् द्वारं मण्डपे च बलाणके ।**
**न्यूनाधिकं न कर्तव्यं दैर्घ्ये हस्ताङ्गुलाधिकम् ॥४०॥**

बलाणकमण्डपाचे दार मूळ प्रासादाच्या दाराइतकेच (मापाने) असावे. ते त्याहून कमी अथवा जास्त मापाचे करू नये (माप वाढवावयाचे असल्यास बलाणकाचे दार प्रासादाच्या दाराहून) उंचीने एका हाताला एक अंगुल या प्रमाणांत वाढविता येते. (४०)

**पेटकं चोत्तरंगाणां सर्वेषां समसूत्रतः ।**
**अंगणातु (?) समं पेटं जगत्याश्चां तरांगनम् ॥४१॥**

सर्व (दारांच्या) उत्तरंगांचे पेटाभाग समसूत्रांत (समपातळीत) असावेत. जगतीच्या दाराच्या उत्तरंगाचा पेटा भाग अंगणाच्या बरोबर असावा (?) ( ४१)

**जगत्यग्रे चतुष्की या वामनं तद् बलाणकम् ।**
**वामेऽथ दक्षिणाद्वारा द्वौकामा (?) मत्तवारणम् ॥४२॥**

जगतीच्या पुढे जी चौकी असते त्या बलाणकास **वामन** म्हणतात. त्याच्या (बलाणकांच्या) दाराच्या उजव्या व डाव्या बाजूच्या ठिकाणी वेदिका व मत्तवारण (कठडा) असावेत. (४२)

अनुक्रमणिका

[अपराजितपृच्छा १२२·२१ - २२ च्या सहाय्याने वरील अनुवाद केला आहे.]

**ऊर्ध्वा भूमिः प्रकर्तव्या नृत्यमण्डपसूत्रतः ।**
**मत्तवारणकं वेदी वितानतोरणैर्युता ॥४३॥**

बलाणकाचा वरचा मजला नृत्यमंडपाच्या समसूत्रांत असावा. (हा मजला) मत्तवारण, वेदी, वितान व तोरण यांच्यासह असावा. (४३)

**राजद्वारे बलाणे च पञ्च वा सप्तभूमिका ।**
**तद्विमानं बुधैः प्रोक्तं पुष्करं वारि मध्यतः ॥४४॥**

राजवाड्यच्या दाराच्या पुढ्यातील जो बलाणक (मंडप) तो पाच किंवा सात मजली करतात व त्याला शहाणे (शिल्पी) विमान म्हणतात. सरोवराच्या मध्ये जो बलाणक (मंडप) त्याला पुष्कर म्हणतात.

**हर्म्य राजगृहे वापि कर्तव्यं गोपुराश्रितः ।**
**एकभूमौ त्रिभूम्यन्तंगृहा (?) द्वारस्य मस्तके ॥४५॥**
**इति पञ्च विधबलाणकम्**

हर्म्य (प्रकारचा) राजवाड्याच्या दाराच्या पुढ्यात असलेला बलाणक (मंडप) गोपुराच्या आकाराचा असावा. घराच्या दाराच्या पुढे असलेला बलाणक (मंडप) एक ते तीन मजल्यांचा असावा. (४५)

**पाच प्रकारच्या बलाणक मंडपांची माहिती संपली.**

[अपराजितपृच्छा सूत्र १२२ प्रमाणे - बलाणक मंडप पाच प्रकारचे असतात. (१) वामन, (२) विमान, (३) हर्म्यशाल, (४) पुष्कर व ( ५) उत्तुंग. प्रासाद, तटबंदीची भिंत (प्राकार) म्हणजे तिच्या दारासमोर मन्दिर तसेच सरोवराच्या मध्यभागी, जगती मध्ये ज्याचा काहींसा भाग आहे (जगती ग्रस्त) तर त्यास **वामन बलाणक** म्हणतात. विमान, हर्म्यशाल व पुष्कर प्रकारच्या बलाणकांची माहिती वर आलीच आहे. विमान प्रकारचा बलाणक जास्तीत जास्त आठ मजल्यांचा करतात. सरोवरच्या मध्यभागी असलेला बलाणक मंडप, पुष्कर प्रकारचा, नऊ मजल्याहून जास्त मजल्यांचा करू नये अशी जास्त माहिती अनुक्रमे श्लोक १० व ८ मध्ये दिली आहे. उत्तुंग नावाच्या बलाणकाबद्दल काही माहिती दिलेली नाही; फक्त असा बलाणक राजवाड्याच्या प्रवेशद्वारापुढे करतात एवढेच सांगितले आहे. या मंडपाची जमीन, कुंभि, पट्ट, स्तंभ, शिरावटी वगैरे थरविभाग नृत्यमण्डपाच्या (किंवा ज्या मण्डपाला लागून हा मुखमण्डप केला असेल त्या मण्डपाच्या) त्या त्या थरांच्या समपातळीत असतात. (१८, १९)]

**संवर्णोपदेशः ।**

**संवर्णाच प्रकर्तव्या प्रथमा पञ्च घण्टिका ।**
**चतुर्घण्टाभिवृद्ध्या च यावेदेकोत्तरं शतम् ॥४६॥**

अनुक्रमणिका

**पञ्चविंशतिरित्युक्ता प्रथमा वसुभागिका ।**
**वेदोत्तरशतं यावत् वेदांशा वृद्धिरिष्यते ॥४७॥**

**संवरणाची माहिती**


(मंडपाच्या शिखरावरील) पहिली (पहिल्या प्रकारची) संवरणा पाच घंटिका असलेली असावी. चार चार घण्टिकांनी वाढ करीत १०१ घंटिकापर्यंत २५ प्रकारच्या संवरणा होतात. पहिल्या संवरणात आठ भाग असतात; ते चार चार भागांत वाढवीत १०४ भागांपर्यंत वाढतात. (४६, ४७)

**भद्रार्धे रथिकार्धेन तवंगं (?) वामदक्षिणे ।**
**अर्धोदयेन रथिका घण्टाकूटं तवंगकम् ॥४८॥**

भद्राच्या अर्ध्या मापाने व रथिकेच्या अर्ध्या मापाने डाव्या व उजव्या बाजूंना तवंग करावेत. रथिका, घंटा, कूट व तवंग हे त्यांच्या रूंदीच्या निम्मे उंचीचे असावेत. (४८)

**कलाकूटान्वितापूर्वा पञ्चभिः कलशैर्युता ।**
**भागस्तुल्यै स्तथा सिंहैरेवमन्याश्च लक्षिताः ॥४९॥**
**इति मण्डपस्य ऊर्ध्वसंवर्णः ।**

पहिल्या संवरणात सोळा कूट व पाच कलश (घण्टिका) असतात. तिचे जितके भाग असतात (पहिल्या संवरणाच्या बाबतीत आठ) तितकेच सिंह असतात. याच प्रकारची मांडणी इतर संवरणांत करावी. (४९) (आकृती ३६)




आकृती ३६ (श्लोक ७·४६ – ४९) शिखरावरील संवरणा

**मंडपाच्या (शिखरा-) वरील संवरणाची माहिती संपली.**

अनुक्रमणिका

[अपराजितपृच्छा सूत्र १९३ मध्ये संवरणाची माहिती दिली आहे. संवरणाचे एकूण २५ प्रकार आहेत. त्यांची नावे आहेत –

(१) पुष्पिका, (२) नन्दिनी, (३) दशाक्षा, (४) देवसुन्दरी, (५) कुलतिलका, (६) रम्या, (७) उद्भिन्ना, (८) नारायणी, (९) नलिका, (१०) चम्पका, (११) पद्मा, (१२) समुदभवा, (१३) त्रिदशा, (१४) देवगान्धारी, (१५) रत्नगर्भा, (१६) चूडामणी, (१७) हेमकूटा, (१८) चित्रकूटा, (१९) हिमा, (२०) गन्धमादनी, (२१) मन्दरा, (२२) मेदिनी, (२३) कैलास, (२४) रत्नसंभवा, (२५) मेरुकूटोदभवा.

पुष्पिका प्रकारची संवरणा सगळ्यात लहान आकाराची असून तीत पाच घंटा, १६ कूट ८ सिंह असतात. पुढच्या पुढच्या संवरणेत या प्रत्येक अंगाची संख्या अनुक्रमे चार, ? व चार यांनी वाढत जाते. दुसऱ्या नन्दिनी, प्रकारच्या संवरणेत ४८ कूट असतात; पण पुढील प्रकारच्या संवरणात कूटांची संख्या कशी वाढत जाते ते दिलेले नाही.

पुष्पिका प्रकारच्या, पहिल्या, संवरणेची माहिती दिली आहे. मंडपाच्या वरच्या भागातील चौरसाचे आठ भाग पाडावेत. संवरणेची एकूण उंची चार भाग म्हणजे रूंदीच्या निम्मे असते. आकृतीत दाखविल्याप्रमाणे एका बाजूच्या मधल्या दोन भागां इतकी रूंदीची रथिका असते. अशा रथिका चारी दिशांना असतात.

प्रत्येक कोनापाशी एक अशा चार कोनांपाशी चार घण्टिका असतात. त्या प्रत्येकी दोन भाग रूंदीच्या असतात; व त्यांच्या खाली त्यांच्या चारी बाजूंना एक एक भाग रूंदीचे प्रत्येकी एक कूट असते. तेव्हां घंटिका चार व कूट १६ असतात. मध्यभागी असलेली मूळ घण्टा तीन भाग रूंदीची असते. (कूटांसह चार भाग रूंदीची असते.) मूलघंटेच्या वर कळस एक भाग रूंदीचा असतो. ही तलविभक्ति झाली. आता उंचीची विभक्ति कूट, घंटिका इत्यादींची जेवढी रूंदी दिली आहे त्याच्या निम्मे त्यांची उंची असते हा उंचीबाबत सामान्य नियम. रथिकेच्या दोन्ही बाजूंना तवंग असतात. या तवंगांवर च्छाद्याचा थर असतो. च्छाद्याच्यावर कूटाच्या पायथ्याशी उद्‌गम असून तो ½ भाग असतो. त्याच्यावर ½ भाग उंच कूट असतात. कूटांच्यावर घंटिका एक भाग उंचीच्या असतात. घंटिकेच्यावर पुन्हा ½ भाग उंच कूट असतात. हे कूट मूळघंटेच्या जवळ चारी उपदिशांना असतात. या कुटांच्यावर १·५ भाग उंचीची मूळ घंटा असते. येथे घंटेची उंची (तसेच घंटिकांची उंची) पायथ्यापासून आमलसारापर्यंत असते. कळसाची उंची त्याच्यावर असते. कळसाची उंची घंटेच्या उंचीत धरली जात नाही.

रथिकांच्यावर सिंह असतात. प्रत्येक दिशेला दोन सिंह, एकावर दुसरा असे चारी दिशांना आठ सिंह असतात.]

इति. श्री मण्डपबलाणकसंवर्णाधिकारः सप्तमो ऽ ध्यायः ॥७॥
मण्डप, बलाणक, संवरणा यांची माहिती देणारा सातवा अध्याय संपला. (७)

***

अनुक्रमणिका

## अष्टमोऽध्यायः । अध्याय आठ

**अथ साधारणोऽध्यायः सर्वलक्षण संयुतः ।**
**विश्वकर्मप्रसादेन विशेषेण प्रकश्यते ॥१॥**

सर्व लक्षणांची माहिती देणारा हा साधारण अध्याय आहे. विश्वकर्म्याच्या कृपेने तो विशेषे करून सांगतो. (१)

[विश्वकर्म्याच्या कृपेने म्हणजे त्याच्या वास्तुशास्त्राला अनुसरून ही माहिती देतो.]

**मानं न्यूनाधिकं वापि स्वयंभू बाणरात्नजे ।**
**घटितेषु विधातव्यं अर्चालिंगेषु शास्त्रतः ॥२॥**

स्वयंभू, बाण व रत्नाचे लिंग यांचे माप (आय व्ययाच्या दृष्टीने) कमी अधिक असले तरी चालते मात्र पूजेसाठी घडविलेले लिंग शास्त्राप्रमाणे योग्य मापात पाहिजे. (२)

**बहुले चाल्पलेपे वा समं संधिः शिरोगुरुः ।**
**सशल्यं पाद हीनं तु तच्च वास्तु विनश्यति ॥३॥**

जास्त किंवा कमी लेप (plaster) असलेली, सारखे (एकावर एक) संधी असलेली व वरचा भाग (खालच्या पेक्षा) वजनदार असलेली, (जमिनीत) शल्य असलेली, खांबाशिवाय असलेली वास्तु नाश पावते. (३)

**अन्य वास्तूचिते द्रव्ये अन्यवस्तुनिवेशिते ।**
**प्रासादे न भवेत् पूजा गृहे तु न वसेत् पतिः ॥४॥**

दुसऱ्या वास्तूसाठी वापरलेले (दगड, वीटा, लाकूड वगैरे) पदार्थ तसेच दुसऱ्या वास्तूत राहिलेले (दारे, खिडक्या, खांब इत्यादि) पदार्थ ज्या प्रासादाकरीता वापरले जातात तेथे पूजा होत नाही व अशा घरात मालक राहू शकत नाही. (४)

[अशा वास्तूच्या बाबतीत निरनिराळी विघ्ने येऊन त्या देवालयातील देवांची पूजा होत नाही तसेच असल्या घरात मालक राहू शकत नाही.]

**स्वस्थाने संस्थितं यच्च विप्रवास्तुशिवालयम्।**
**अचाल्यं सर्व देशेषु चालिते राष्ट्रविभ्रमः ॥५॥**

ब्राह्मणाचे घर तसेच शंकराचे मंदिर जेथे आहेत तेथेच असू द्यावी. सर्व प्रदेशांत या वास्तु अचल असतात; स्थानभ्रष्ट केली असता राष्ट्रच्युति होते. (५)

अनुक्रमणिका

**वापी-कूप-तडागानि प्रासादभवनानि च ।**
**जीर्णान्युद्धरते यस्तु पुण्यमष्टगुणं लभेत् ॥६॥**

लहान व मोठ्या विहीरी, तलाव, प्रासाद (देवमंदिर) तसेच भवन (सभाभवन इत्यादी) यांचा जीर्णोद्धार करणाऱ्याला (नवीन वास्तु बांधली असता मिळणाऱ्या पुण्याच्या) आठ पट पुण्य मिळते. (६)

**जीर्णोद्धारविधिः ।**

**तद्रूपं तत् प्रमाणं स्यात् पूर्व सूत्रं न चालये त् ।**
**हीने तु जायते हानिरधिके तु धनक्षयः ॥७॥**

**जीर्णोद्धाराची विधी –**

पूर्वी जसे स्वरूप होते व पूर्वीचे जे माप होते त्याप्रमाणेच पूर्वीचे (सम -) सूत्र न हालविता (वास्तूचा जीर्णोद्धार करावा). (पूर्वीच्या मापापेक्षा) लहान केले असता ते हानिकारक होते व जास्त (मापाने) केले असता धननाश होतो. (७)

**वास्तुद्रव्याधिकं कुर्यात् मृत्काष्टे शैलजेऽपि वा ।**
**शैलजे धातुजे चैव धातुजे रत्नजे ऽ थवा ॥८॥**

(देवाची मूर्ती) ज्या पदार्थाची (पूर्वी) केली असेल त्याहून मातीची, लाकडाची अथवा दगडाची अशी (उत्तरोत्तर) चांगल्या द्रव्याची मूर्ती करावी. (पूर्वीची मूर्ती) दगडाची असेल तर ती धातूची करावी, धातूची असेल तर रत्नाची करावी (८).

**पूर्वोत्तरदिशामूढं मूढं पश्चिमदक्षिणे ।**
**तत्र मूढममूढं वा यत्र तीर्थं समाहितम् ॥९॥**

जेथे तीर्थक्षेत्र आहे तेथे पूर्वोत्तर (ईशान्य दिशेकडे) किंवा पश्चिम - दक्षिण (नैऋत्य) दिशेकडे असे अचूक (पूर्व पश्चिम) दिशांकडे नसलेले देऊळ असेल तरी ते दिशाहीन आहे असे समजू नये. (९)

**सिद्धायतनतीर्थेषु नंदीनां संगमेषु च ।**
**स्वयंभूबाणलिंगेषु तत्र दोषो न विद्यते ॥१०॥**

दिशाहीन देवालय तीर्थक्षेत्रापाशी, सिद्धाश्रमापाशी, नद्यांच्या संगमापाशी असेल अथवा (देवमूर्ती) स्वयंभू किंवा बाणलिंग प्रकारची असेल तर तेथे दिशामूढतेचा दोष लागत नाही. (१०)

**अव्यक्तं मृन्मयं चाल्पं त्रिहस्तान्तं तु शैलजम् ।**
**दारूजं पुरुषार्धं च अत ऊर्ध्वं न चालयेत् ॥११॥**

अनुक्रमणिका

अव्यक्त किंवा मातीची मूर्ती (तिच्या पूर्वीच्या स्थळापासून) थोड्या अंतरापेक्षा जास्त, पाषाणाची मूर्ती तीन हाताहून जास्त व लाकडाची मूर्ती निम्म्या पुरूष अंतराहून जास्त इतकी हलवू नये. (११)

**विषमस्थानमाश्रित्य भग्नं यत् स्थापितं सुरैः ।**
**तत्र स्थानस्थिता देवा भग्नाः पूजाफलप्रदाः ॥१२॥**

अवघड जागी (डोंगराच्या माथ्यावर, तळ्याच्या मध्यभागी वगैरे) देवांनी (म्हणजे इतके जुने) जे देवालय बांधलेले असते ते मोडकळीस आले असले तरी व तेथील देवमूर्ती भंगलेली असली तरी तिची पूजा फलदायी असते. (१२)

**यद्यथा स्थापिता वास्तु तत् तथैव हि कारयेत् ।**
**अव्यक्तं चलितं नृणां दारूणं कुरुते भयम् ॥१३॥**

जशी व जेथे (पूर्वीची) वास्तु असेल ती तेथेच व तशीच करावी. न कळेल इतके जरी तिला स्थानभ्रष्ट केल्यास त्या माणसांना फार मोठे भय असते. (१३)

**अथातः चालतः प्राज्ञो जीर्णं व्यंगं च दूषितम् ।**
**आचार्यः शिल्पिभिः प्राज्ञैः शास्त्रदृष्ट्या समुद्धरेत् ॥१४॥**

किंवा मूर्ती जर जुनी, (मूर्तीशास्त्रदृष्ट्या) व्यंग निर्माण झालेली तसेच अपवित्र असेल तर आचार्यांनी बुद्धिमान शिल्पींच्या सहाय्याने शास्त्रदृष्ट्या तिचा उद्धार करावा. (१४)

**स्वर्णजं रौप्यजं वापि कुर्यात् नागमथोवृषम् ।**
**तस्य श्रृंगेण दन्तेन पतितं पातयेत् सुधीः ॥१५॥**
**इति जीर्णोद्धार विधिः ।**

सोन्याचा अथवा चांदीचा हत्ती किंवा बैल तयार करावा; व त्याच्या दाताने (किंवा) शिंगाने ती अपवित्र मूर्ती शहाण्या (शिल्पीने) हलवावी. (१५)

**जीर्णोद्धाराची माहिती संपली.**

**मण्डलं जातकं चैव कलिकं सुशिरस्तथा ।**
**छिद्रसन्धिश्च कारश्च (?) महादोषा इति स्मृताः ॥१६॥**

वर्तुळाकार भोक, बांधताना किंवा खिळ्यांनी सच्छिद्रता येणे तसेच सन्धीच्या ठिकाणी छिद्र राहणे हे (वास्तूमधील) फार मोठे दोष समजले जातात. (१६)

[दारांच्या फळ्यांच्या जोडापाशी, भिंतीत किंवा वास्तूच्या इतर जागी छिद्रे, फटी असणे हे दोषकारक समजले जाते.]

अनुक्रमणिका

**भिन्नदोषकरं यस्मात् प्रासादमठमन्दिरम् ।**
**मुखाभिर्जातके (?) द्वारे रश्मिवातप्रभेदितम् ॥१७॥**

ज्या प्रासादात, मठात व देवमंदिरांत पुढच्या बाजूला असलेल्या दरवाजातून सूर्यकिरण किंवा वारा येत असेल तर ती (वास्तू) निरनिराळ्या (प्रकारांनी) भिन्न दोषी असते. (१७)

**ब्रह्मविष्णुशिवार्काणां भिन्नं दोषकरं न हि ।**
**जिनगौरी गणेशानां गृहं भिन्नं विवर्जयेत् ॥१८॥**

ब्रह्मा, विष्णु, शंकर व सूर्य यांची देवालये भिन्नदोष असलेली दोषकारक नाही. मात्र जिन तीर्थंकर, पार्वती (व) गणपती यांची भिन्नदोष असलेली देवालये असू नयेत. (१८).

**व्यक्ताव्यक्तं गृहं कुर्यात् भिन्नं भिन्ना (न्दा) न मूर्तिकम् ।**
**अ (य ?) था स्वामिशरीरं स्यात् प्रासादमपि तादृशम् ॥१९॥**
**इति भिन्नदोषाः ।**

ज्याप्रमाणे स्वामी व शरीर ही वेगवेगळी नसतात त्याचप्रमाणे प्रासादाच्या बाबतीत देखील अव्यक्त देव व व्यक्त मूर्ती ही निरनिराळी नसतात. (१९)

**निरनिराळ्या दोषांची माहिती संपली.**

**भिन्नं चतुर्विधं ज्ञेयमष्टधा मिश्रकं मतम् ।**
**मिश्रकं पूजितं तत्र भिन्नं वै दोष कारणम् ॥२०॥**

भिन्न (प्रासाद) चार प्रकारचे असतात तर मिश्रक प्रासाद आठ प्रकारचे असतात. त्यांच्यामध्ये मिश्रक (प्रासाद) पूजनीय (देव प्रासादाला योग्य) असतात. भिन्न (प्रासाद) मात्र दोषकारक असतात. (२०)

**छन्दभेदो न कर्तव्यो जातिभेदस्तथा पुनः ।**
**उत्पद्यते महामर्म जातिभेदे कृतं सति ॥२१॥**

(प्रासाद बांधताना) छन्दभेद तसेच जातीभेद करू नये. जातीभेद केला असताना महामर्माचा (दोष) निर्माण होतो. (२१)

[जगति, मंडोवराचे माप एक प्रकारच्या (उदा. भूमिज प्रकारच्या) प्रासादाचे व शिखर निराळ्याच मापाचे (उदा. द्रविड प्रासादाचे) असे करू नये.]

**द्वारहीने हनेच्चक्षुर्नालहीने धनक्षयम् ।**
**अपदस्थापित स्तंभो महारोगं विनिर्दिशेत् ॥२२॥**

अनुक्रमणिका

(प्रासादाला) दार नसल्यास डोळ्यांच्या नाश होतो, प्रणाल नसल्यास धनाचा नाश होतो. पदभागाशिवाय खांब स्थापिल्यास महारोग व्हायचा संभव असतो. (२२)

**स्तंभ व्यासोदये हीने कर्त्ता तत्र विनश्यति ।**
**प्रासादे पीठहीने तु नश्यन्ति गजवाजिनः ॥२३॥**

खांबाची उंची व व्यास ( शास्त्रांत सांगितल्यापेक्षा) कमी असल्यास (मंदिर) बांधविणाऱ्याचा नाश होतो. पीठाशिवाय जर प्रासाद बांधला तर (मालकाचे) हत्ती व घोडे यांचा नाश होतो. (२३)

**रथोपरथहीने तु कर्ता तत्र विनश्यति ।**
**प्रासादे पीठहीने तु नश्यन्ति गजवाजिनः ॥२४॥**

(प्रासादाला) रथ व उपरथ (ही मोडणी) नसल्यास (मंदिर) बांधविणाऱ्याचा नाश होतो. पीठाशिवाय जर प्रासाद बांधला तर (मालकाचे) हत्ती व घोडे यांचा नाश होतो. (२४)

**रथोपरथहीने तु प्रजापीडां विनिर्दिशेत् ।**
**कर्णहीने सुरागारे फलं क्वापि न विद्यते ॥२५॥**

रथ व उपरथ यांच्याशिवाय (प्रासाद बांधल्यास) प्रजेला त्रासदायक होण्याची शक्यता असते. कर्णाशिवाय देवमंदिर असल्यास (तेथील देवपूजा) कधीही फलदायक होत नाही. (२५)

**जंघाहीने हरेद् बंधुः कर्तृकान् करकादिकान्।**
**शिखरे हीनमाने तु पुत्रपौत्रधनक्षयः ॥२६॥**

जंघेशिवाय (प्रासाद बांधल्यास ते) बांधविणाऱ्याचा, त्याच्या भाऊबंदांचा वा शिल्पींचा नाश होतो. शिखर जर (शास्त्रात दिल्यापेक्षा) कमी मापाचे असेल तर मुले, नातू व धन यांचा नाश होतो. (२६)

**अतिदीर्घे कुलच्छेदो ऱ्हस्वेधिव्याधिसंभवः ।**
**तस्मात् शास्त्रैस्तु मानेन सुखदं सर्वकामदम् ॥२७॥**

(शास्त्रात दिलेल्या मापापेक्षा) जास्त लांबीचे असेल तर (कर्त्याच्या) कुटुंबाचा उच्छेद होतो; कमी मापाचे असेल तर रोगराईची भिती असते. तेव्हा प्रासाद शास्त्रात दिलेल्या मापाने बांधावा म्हणजे तो सुखदायक व सर्व इच्छांची पूर्ती करणारा होतो. (२७)

**जगत्यां रोपयेत् शालां शालायां चैव मण्डपम् ।**
**मण्डपेन च प्रासादो ग्रस्तो वै दोषकारकः ॥२८॥**
**इति दोषाः ।**

अनुक्रमणिका

जगतीवरती शाला असावी व शालेच्या पुढे मंडप असावा. मण्डप ( येव्हढा मोठा की त्याने) प्रासाद झाकला जाईल (मंडपापुढे क्षूद्र भासू लागेल) तर (ती बांधणी) दोषदायक असते. (२८)

[जगतीमुळे शाला, शालेमुळे मंडप व मंडपामुळे प्रासाद जर झाकला जाईल (क्षुद्र भासू लागतील तर ती बांधणी) दोषदायक असते.]

**(प्रासादांच्या) दोषांची माहिती संपली.**

**प्रासादोच्छ्रायविस्ताराज्जगती वामदक्षिणे ।**
**छायाभेदेन कर्तव्या तथा लिंगश्च (?) पिण्डका ॥२९॥**

प्रासादाच्या उंची व रूंदीप्रमाणे त्याच्या डाव्या व उजव्या बाजूना जगती प्रमाण मापाने करावी नाहीतर छायाभेदाचा (?) दोष लागतो. त्याचप्रमाणे शिवलिंगाला पिण्डीका त्याप्रमाणे प्रासादाला जगती असते.

**जगत्यां त्रिचतुःपंचगुणं देवपुरं त्रिधा ।**
**एक - द्वि - वेद - साहस्त्रहस्ते स्यात् राजमन्दिरम् ॥३०॥**

राजाचे मन्दिर (राजवाडा) एक, दोन किंवा चार हजार हातांचे असल्यास देवपुराची जगती त्याच्या तीन, चार किंवा पाच पटीने अशी तीन प्रकारची असावी. (३०)

**कलाष्टवेदसाहस्त्रे ऱ्हस्वे राजपुरं समम् ।**
**दैर्घ्यतुल्यं सपा [दा] ष्टं (?) सार्धांशेनाधिकं समम् ॥३१॥**

१६, आठ (किंवा) चार हजार हातांचे (रूंदीचे) राजमंदिर असल्यास देवपुर त्याच मापाचे करावे. देवपुर राजपुराइतक्या लांबीचे किंवा त्याच्या लांबीहून १ ¼, १ ¼ किंवा १ ½ पट लांबीचे करावे. (३१)

**द्वादश त्रिपुराणि स्युर्देवस्थानानि चोत्तरे ।**
**षट्त्रिंशत् षड् विवृद्ध्या च यावदे कोत्तरं शतम् ॥३२॥**

उत्तर दिशेला असलेल्या देवस्थानांत १२ त्रिपुरे असावीत. ती ३६ देवालये सहांनी वाढवीत १०१ संख्यांची करावीत. (३२)

**पुरं प्रासादगेहे स्यात् सौधैर्जालगवक्षकैः ।**
**कीर्तिस्तंभैर्जलारामैर्गेहैर्भाण्डैः सुशोभितम् ॥३३॥**
**इति - देवपुर - राजपुराणि ।**

अनुक्रमणिका

देवपुर व राजमंदिर ही चुनेगच्ची, जाळ्या व खिडक्या, कीर्तिस्तंभ, तलाव, आरामगृहे व मौल्यवान वस्तू यांनी सुशोभित केलेली असावीत. (३३)

**देवपुरे व राजपुरे यांची माहिती संपली.**

**प्रासादस्योत्तरे याम्ये तथाग्नौ पश्चिमेऽपिच ।**
**यदि नामाश्रमं कुर्यात् सततं द्वित्रिभूमिकाम् ॥३४॥**

प्रासादाच्या उत्तरेकडे, दक्षिणेकडे तसेच आग्नेय दिशेकडे व पश्चिमेकडे जर नामाश्रम (मठ) केलेत तर ते नेहमीच दोन - तीन मजल्यांचे करावेत. (३४)

**द्विशाला मध्यषड्दारुपट्टा शालाग्रशोभितम्।**
**मत्तवारणमग्रे च तदूर्ध्वं पट्टभूमिषु ॥३५॥**

(हा मठ) दोन शालांचा असावा. या शालांच्या पुढे मध्यभागी षड्दारुचा पट्ट (रांग) ठेवून (ती शाला) सुशोभित करावी. त्याच्या पुढ्यात ओसरी असावी व तेथे मत्तवारण (कठडा) असावा. (३५)

**कोष्ठागारं च वायव्ये वन्हिभागे महानसम् ।**
**पुण्यगेहं तथेशाने नैर्ऋत्ये पात्रमायुधम् ॥३६॥**

वायव्य दिशेला कोठीघर, आग्नेय दिशेला स्वयंपाकघर, दानागृह ईशान्य दिशेला व नैर्ऋत्येला (देवाची) भांडी ठेवायची जागा व आयुधागार असावे. (३६)

**छत्रागारं च पुरतो वारुण्यां च जलाश्रयम् ।**
**मठस्योपरितः कुर्याद्विद्यावा (व्या ?) ख्यानमण्डपम् ॥३७॥**
**इति मठः ।**

पुढच्या बाजूला छत्र (चामरे वगैरे) ठेवावयाची कोठी असावी, पश्चिमेला जलाशय (तलाव, विहीर वगैरे) असावीत. मठाच्या वरच्या मजल्यावर पाठशाळेसाठी (विद्वानांच्या व्याख्यानांसाठी मण्डप असावा. (३७)

**मठाची माहिती संपली.**

**पूर्वोक्ता सप्तपुण्याहप्रतिष्ठा सर्व सिद्धिदा ।**
**रवेः सौम्यायने कुर्याद् देवानां स्थापनादिकम् ॥३८॥**

पूर्वी सांगितलेल्या सर्वसिद्धीकारक अशा सात पुण्याहप्रतिष्ठा केल्यानंतर व सूर्य उत्तरायणात असतांना देव (मूर्तींची) स्थापना वगैरे कराव्यात. (३८)

[श्लोक १·३६ मध्ये या सात पुण्याहप्रतिष्ठा केव्हा केव्हा करतात ते दिले आहे.]

अनुक्रमणिका

**प्रतिष्ठा चोत्तरामूल आद्रायां च पुनर्वसौ ।**
**पुष्ये हस्ते मृगे स्वाती रोहिण्यां श्रति (?) मैत्रभे ॥३९॥**

(देवमूर्ती) प्रतिष्ठा उत्तरा, मूल, आर्दा, पुनर्वसू, पुष्य, हस्तं, मृग, स्वाती, रोहिणी, श्रवण व अनुराधा या नक्षत्रीं सूर्य असताना करावी. (३९)

**तिथिरक्तां कुजं धिष्ण्यंमं क्रूरं विध्ययुतं तथा ।**
**दग्धां तिथिं च गण्डान्तं चारभोपगृहं त्यजेत् ॥४०॥**

रिक्ता तिथी, मंगळवार, क्रूर अथवा विध्ययुत नक्षत्र असतांना तसेच दग्धा तिथी, गण्डान्त चरराशि व उपग्रह वगैरे काळ (देवमूर्ती प्रतिष्ठेसाठी) वर्ज्य असतात. (४०)

**सुदिने सुमुहूर्ते च लग्ने सौम्ययुते क्षितौ ।**
**अभिषेकः प्रतिष्ठा च प्रवेशादिकमुच्यते ॥४१॥**

(देवासाठी) अभिषेक, प्रतिष्ठा व (प्रासाद) प्रवेश इत्यादी चांगल्या दिवशी, शुभमुहूर्तावर व लग्नावर व आकाशात (सूर्य) उत्तरायणात असताना करावीत. (४१)

**मंडपस्य दिङ्निर्देशः ।**

**प्रासादाग्रे तथैशाने उत्तरे मण्डपं शुभम् ।**
**त्रि - पंच - सप्त - नन्दैकादशविश्वकरान्तकम् ॥४२॥**

**मंडप कुठल्या दिशेला असावा** –

प्रासादाच्या पुढ्यात तसेच ईशान्य व उत्तर दिशांना मण्डप शुभदायक असतो. हा मण्डप तीन, पाच, सात, नऊ, ११ ते १३ हाता पर्यंत (लांबी रूंदीचा) असावा. (४२)

**मण्डपः स्यात् करैरष्टादशसूर्यकलामितैः ।**
**षोडशहस्ततः कुण्डवशादधिक इष्यते ॥४३॥**

(यज्ञ) मण्डप सहा हातापासून ८, १०, १२ किंवा १६ हातापर्यंत (लांबी रूंदीचा) करावा. कुण्डांच्या आकाराप्रमाणे व संख्येप्रमाणे सोळा हाताहून मोठा करणे योग्य असते. (४३)

**स्तम्भैः षोडशभिर्युक्तं तोरणादिविराजितम् ।**
**मण्डपं वेदिकामध्ये पंचाष्टनवकुण्डकम् ॥४४॥**

पाच, आठ (किंवा) नऊ कुण्डांसाठी मध्ये वेदी असलेला मंडप सोळा खांबांसह व तोरण इत्यादींनी सुशोभित केलेला असावा. ( ४४)

अनुक्रमणिका

**कुण्डमानम् ।**

**हस्तमात्रं भवेत् कुण्डं मेखलायोनिसंयुतम् ।**
**आगमैर्वेदमन्त्रैश्च होमं कुर्याद् विधानतः ॥४५॥**

**कुण्डाचे माप –**

कुण्ड एक हाताचे (लांबी, रूंदी व खोली) असावे. मेखला व योनी यासह असावे. आगमातील व वेदांतील मन्त्र म्हणून विधिपूर्वक होम करावा. (४५)

**अयुते हस्तमात्रं च लक्षार्धन्तु द्विहस्तकम्।**
**त्रिहस्तं लक्षहोमे तु दशलक्षे चतुःकरम् ॥४६॥**

अतुत (दहा हजार) संख्यांचा होम करावयाचा असेल तर कुंड एक हाताचे, अर्धालक्ष होमासाठी दोन हाताचे, लक्ष होमासाठी तीन हाताचे व दहा लक्ष होमासाठी चार हातांचे (रूंदी, लांबी व खोली) कुंड करावे (४६)

**विंशलक्षे पंचहस्तं कोट्यर्धे षट् करं मतम्।**
**अशीतिलक्षेद्धि (न्धि) करं कोटिहोमेऽष्टहस्तकम् ॥४७॥**

२० लक्ष होमासाठी पाच हाताचे, अर्ध्या कोटीसाठी सहा हाताचे, ८० लक्षांसाठी सात हाताचे व कोटी होमासाठी आठ हाताचे कुंड करावे. (४७)

**ग्रहपूजाविधानेन कुण्डमेककरं भवेत् ।**
**मेखला तृतीयं वेद-राम-युग्ना (ग्मां) गुलैः क्रमात् ॥४८॥**

ग्रहपूजेसाठी एका हाताचे कुंड असावे असा नियम आहे. तिसरी मेखला चार अंगुलांची (उंची व रूंदी) व अनुक्रमाने (दुसरी व पहिली मेखला) तीन व दोन अंगुलांची असावी. (४८)

**एकद्वित्रिकरं कुर्यात् वेदिकोपरि मण्डलम् ।**
**ब्रह्मविष्णुरवीणान्तु सर्वतोभद्रमिष्यते ॥४९॥**

वेदीच्यावर एक दोन (किंवा) तीन हातांचे मंडल आखावे. ब्रह्मा, विष्णु व सूर्य (यांच्या मूर्तीप्रतिष्ठेसाठी) सर्वतोभद्र (मण्डल) योग्य असते. (४९)

**भद्र तु सर्वदेवानां नवा नाभिस्तथा त्रयम् ।**
**लिंगोद्भवं शिवस्यापि लतालिंगोद्भवं तथा ॥५०॥**

अनुक्रमणिका

सर्व देवांसाठी (सर्वतो -) भद्र (मण्डल) व तीन नाभी असाव्यात. लिंगोद्भव व लतालिंगोद्भव शिवमूर्तीसाठी देखील (असेच मण्डल असावे). (५०)

[लिगोंद्भव मूर्तीचे लक्षण शिल्परत्न (उत्तरभाग) २२·१७६ - १७९ मधे दिले आहे.]

**अथ लिंगोद्भवं वक्ष्ये लिंगाकारस्य मध्यतः ॥१७६॥**
**नलकात् पादस्य तलं लिंगे शूल समायुतम् ।**
**चन्द्रशेखरवत् सर्वं कारयेत् सुंदराकृतिम् ॥१७७॥**
**ब्रह्मा तु हंसरूपेण ऊर्ध्वगो वामपार्श्वतः ।**
**विष्णूर्वराहरूपेण दक्षिणांशे त्वधो गतः ॥१७८॥**
**हृदयेऽञ्जलि संयुक्तौ रक्तश्यामनिभौ परम् ।**
**वीक्षमाणौ परं लिंगं लिंगोद्भवं स्मृतम् ॥१७९॥**

शिवलिंग असून त्याच्या मध्यभागी चंद्रशेखर मूर्ती असते. हंसाच्या रूपाने ब्रह्मा व वराहाच्या रूपाने विष्णु तेथे दाखवितात.]

**भद्रं गौरीतिलकं च देवीनां पूजने हितम् ।**
**अर्धचन्द्रं तडागेषु वाप्राकारं तथैव च ॥५१॥**

(सर्वतो -) भद्र व गौरीतिलक हे देवींच्या पूजेसाठी हितावह असतात. तलावाच्या प्रतिष्ठेसाठी अर्धचंद्राकार तसेच पद्माकार (कमळाच्या आकाराचे) मंडल असावे. (५१)

**टंकाभं स्वस्तिकं चैव वापीकूपेषु पूजयेत् ।**
**पीठिका जलपीठेषु योन्याकारं तु कामदम् ॥५२॥**

लहान मोठ्या विहीरीसाठी टंक किंवा स्वस्तिक यांच्या आकाराचे (मंडल)? पूजेसाठी वापरावे. हीच मंडले पाण्याच्या साठी (स्थापनेसाठी) वापरावी. कामनापूर्तीसाठी (होम करावयाचा असल्यास) योनीच्या आकाराचे मण्डल करावे. (५२)

**+ (म्बं?)जगदन्तं(+) महादुर्गे प्रशस्तं मण्डलं भवेत् ।**
**टंकाभं चतुरस्त्रं च गजदन्तमिहायतम् ॥५३॥**

महादुर्गा जगदम्बेसाठी उत्तम असे टंकाच्या आकाराचे चौरस व हत्तीच्या दातासारखे, आयताकार असे मंडल करावे. (५३)

**विख्यातं सर्वतोभद्रं ज्ञेयान्यन्यानि लोकतः ।**
**पूर्वादितोरणं प्लक्ष – यज्ञाङ्गं वटपिप्पलैः ॥५४॥**

अनुक्रमणिका

सर्वतोभद्र मंडल प्रसिद्ध आहे. इतर प्रकारची मंडले लोकांकडून जाणून घ्यावीत (तेव्हा त्यांची माहिती देत नाही.) पूर्व दिशेपासून (उत्तरे पर्यंत अनुक्रमे) प्लक्ष, यज्ञांग (औदुंबर) वड व पिंपळ यांच्या पानांची तोरणे करावीत. (५४)

**द्वात्रिंशत् षोडशाष्टौ च (?) रुत्तमान् वेदपारगान् ।**
**कुलिनोऽनंगसर्वज्ञान्यज्ञार्थमभिमन्त्रयेत् ॥५५॥**

३२, १६ किंवा आठ उत्तम, वेदांत पारंगत, कुलशीलवान्, सर्वसंगपरित्यागी व सर्वज्ञ अशा (ब्राह्मणांना) यज्ञासाठी आमंत्रण द्यावे. (५५)

**मण्डपस्य त्रिभागेन उत्तरे स्तानमण्डपम् ।**
**स्थण्डिलं वालुकं कृत्वा शय्यायां स्थापयेत् सुरम् ॥५६॥**

मण्डपांच्या उत्तरेस त्याच्या एक तृतीयांश इतका स्नानमण्डप असावा. तेथे वाळूचे स्थण्डिल करून शय्येवरती देवमूर्तीला स्नान घालावे. (५६)

**पंचगव्यैः कषायैश्च वल्कलैः क्षीरवृक्षजैः ।**
**स्नापयेत् पंचकलशैः शतवारं जलेन च ॥५७॥**

पंचगव्य व क्षीरवृक्षांच्या सालींचा कषाय यांच्या पाच कळशांनी व पाण्याच्या शंभर कलशांनी (देवमूर्तीला) स्नान घालावे. (५७)

**वेदमन्त्रादि - वादित्र - गीतमंगलनिःस्वनैः ।**
**वस्त्रेणाच्छादयेद्देवं वेद्यां तं मण्डपं नयेत् ॥५८॥**

वेदमन्त्र, वाजंत्री, मंगल गीते यांच्या घोषात त्या देवमूर्तीला कपड्याने आच्छादून मंडपातील वेदीवर न्यावे. (५८)

**तल्पमारोपयेद्वेद्यामुत्तरान्हि न्यसेत्ततः ।**
**कलशं तु शिरोदेशे पाद्स्थाने कमण्डलुम् ॥५९॥**

तेथे मध्यान्हानंतर वेदीवरती दर्भ ठेवावेत (व त्यावर मूर्ती ठेवावी.) मूर्तीच्या डोक्याच्या बाजूला कलश व पायापाशी कमण्डलू ठेवावा. ( ५९)

**वज्रवैदूर्यकं मुक्तामिन्द्रनीलं सुनीलकम् ।**
**पुष्परागं च गोमेदं चन्द्रं पूर्वादितो न्यसेत् ॥६०॥**

वज्र, वैदूर्य, मोती, इन्द्रनील, उत्तम नील, पुष्पराग, गोमेद व सोमकान्त ही (रत्ने अनुक्रमाने) पूर्व दिशेपासून ठेवावीत. (६०)

अनुक्रमणिका

**व्यजनं दक्षिणे देशे दर्पणं वामतः शुभम् ।**
**रत्नन्यासं ततः कुर्यात् दिक्पालादिकपूजनम् ॥६१॥**

देवमूर्तीच्या उजव्या हाताला पंखा व डाव्या बाजूला शुभदायक आरसा ठेवावा. नंतर (वर दिलेली) रत्ने दिक्पालांची पूजा करून (त्या दिशांना) ठेवावीत. (६१)

**सुवर्णं रजतं ताम्रं कांस्यं रीतिं च सीसकम् ।**
**बंगं लोहं च पूर्वादि सृष्ट्या धातूनिह न्यसेत् ॥६२॥**

सोने, चांदी, तांबे, कांसे, पितळ, शिसे, बंग (कथिल), लोखंड हे धातू पूर्वदिशेकडून सृष्टीक्रमाते (प्रदक्षिण क्रमाने) ठेवावेत. (६२)

**वज्र वन्हिसहदेवी विष्णुक्रान्तेन्द्रवारूणी ।**
**शंखिनी ज्योतिष्मती चैव स्वरिक्तानी क्रमान् न्यसेत् ॥६३॥**

वज्र, अग्नी, सहदेवी, वैष्णवी, क्रान्ता, इन्द्राणी, वारुणी, शंखिनी, ज्योतिष्मती यांच्या (मूर्ती पूर्वादी दिशांपासून) प्रदक्षिण क्रमाने जागा असेल त्याप्रमाणे ठेवाव्यात. (६३)

**यवो व्रीहिस्तथा कङ्गु जुर्णाव्हा च तिलैर्युता ।**
**शालिमुद्गा समाख्याता गोधूमाश्च क्रमेण तु ॥६४॥**

यव, तांदूळ, कङ्गु, जुर्ण, तिल, साळी, मूग व गहू ही अनुक्रमाने (पूर्वदिशेकडून) ठेवावीत. (६४)

[कङ्गु - आपटे यांच्या शब्दकोषात अर्थ दिला आहे; A kind of panic seed, 4 kinds of it are mentioned.]

**यद् देवाभरणं पूजावस्त्रालंकारभूषणम् ।**
**तत् सर्वं शिल्पिने देयं आचार्याय तु याज्ञिकम् ॥६५॥**

जे देवाचे वस्त्र, पूजेचे वस्त्र, अलंकार व भूषण (पूजेच्या वेळी मूर्तीवर घातलेली असतात) ते सर्व शिल्पीला द्यावे. यज्ञातील पदार्थ आचार्याला द्यावेत. (६५)

**ततो महोत्सवं कुर्यात् नृत्यगीतैरनेकशः ।**
**नैवेद्यैरार्तिकं पूजामंगन्यासादिकं तथा ॥६६॥**

नंतर नाच, गाणी आणि इतर अनेक प्रकारांनी महोत्सव करावा. तसेच नैवेद्य, देवाची करुणा भाकणे, अंगन्यास इत्यादि पूजा भाग करावेत. (६६)

अनुक्रमणिका

**क्षीरं क्षौदं घृतं खण्डं पक्वान्नानि बहून्यपि ।**
**षड्रसा स्वादुभक्ष्याणि समन्तात् परिकल्पयेत् ॥६७॥**

दूध, मध, तूप, साखर व खूप प्रकारची षड्रसपूर्ण व गोड अशी पक्वान्ने व खाद्ये (देवमंदिराच्या) आसमंतातच तयार करावीत. (६७)

**विप्राणां संप्रदायाच्च वेदमन्त्रैस्तथागमैः ।**
**संकलीकरणं देवं न्यासं कृत्वा प्रतिष्ठयेत् ॥६८॥**

ब्राह्मणांच्या समुदायाने वेद व आगमातील मन्त्रांनी, सकलीकरण व न्यास करून, देव (मूर्ती) ची प्रतिष्ठापना करावी. (६८)

[सकलीकरण - स्नान करून उटणे लावणे, अत्तर लावणे, वस्त्रालंकार धारण करणे वगैरे क्रियेला सकलीकरण म्हणतात.]

**प्रासादे देवतान्यासं स्थावरेषु पृथक् पृथक् ।**
**खरशिलायां च वाराहं पौत्र्यां च (?) नागकुलानि च ॥६९॥**

(प्रासादाच्या निरनिराळ्या भागी कोणाच्या मूर्ती असाव्यात ते देतात -)

प्रासादाच्या (निरनिराळ्या) भागांपाशी वेगवेगळ्या देव (मूर्ती) चा न्यास करावा. खर (खुर ?) शिलेपाशी वराह व पौलीपाशी (?) नागकुटुंबाचा न्यास करावा. (६९)

**प्रकुंभे जलदेवांश्च पुष्पके किंसुरांस्तथा ।**
**नन्दिनीं जाड्यकुम्भे च कणाल्पाल्यां (?) स्थापयेद् हरिम् ॥७०॥**

कुंभापाशी जलदेवतेची, तसेच पुष्पकंठापाशी किंपुरूषाची, जाड्यकुंभापाशी नन्दिनी (गाईची) व कणीपाशी हरीची स्थापना करावी. (७०)

[विष्णुमूर्तीच्या उजव्या खालच्या हातात शंख, वरच्या हातात चक्र, डाव्या वरच्या हातात गदा व खालच्या हातात कमळ असले म्हणते ती हरीची मूर्ती होते.]

**गणेशं गजपीठे च अश्वपीठे तथाश्विनौ ।**
**नरपीठे नरांश्चैव क्षमांच क्षुरके यजेत् ॥७१॥**

गजपीठापाशी गणपतीची, अश्वपीठापाशी (अश्वथरापाशी) अश्विनीकुमारांची, नरपीठावरती मनुष्याकृतीची व क्षुरका - (खुरा -) पाशी पृथ्वीचा न्यास करावा. (७१)

अनुक्रमणिका

**भद्रे संध्यांतरं कुंभे पार्वतीं कलशे स्थिताम् ।**
**कपोताल्यां च गंधर्वान्मंचिकायां सरस्वतीम् ॥७२॥**

भद्रापाशी, (तेथील थरांमधील) अंतरितापाशी, कुंभापाशी व कलशावर उभ्या पार्वतीची, कपोतालीवर गंधर्वांची व मंचिकेवर सरस्वतीची स्थापना करावी. (७२)

**जंघायां च दिशापालानिन्द्रमुद्गमसंस्थितम् ।**
**सावित्रीं भरणे देशे शिरावट्यां च वेदिकाम् ॥७३॥**

जंघेवरती दिक्पालांची उद्गमावरती इंद्र (- मूर्ती) ची स्थापना करावी. सावित्रीची भरणीपाशी, शिरावटीवर व वेदिकेवर स्थापना करावी. ( ७३)

**विद्याधरान् कपोताल्यामन्तराले सुरांस्तथा ।**
**पर्जन्यं कूटछाद्ये च ततो मध्ये प्रतिष्ठयेत् ॥७४॥**

कपोतालीपाशी विद्याधरांची व अंतरितांत देवांची कूटच्छाद्याच्या मध्यभागी पर्जन्यदेवतेची (वरूणाची) स्थापना करावी. ( ७४)

**शाखयोश्चन्द्रसूर्यौ च त्रिमूर्तिश्चोत्तरांगके ।**
**उदुम्बरे स्थितं यक्षमश्विनावर्धचांद्रके ॥७५॥**

(दरवाजाच्या) शाखांवर चंद्र व सूर्यांची व उत्तरंगावर त्रिमूर्तीची, उंबरठ्यावर यक्ष व अर्धचंद्रावर अश्विनीकुमारांची (मूर्तींची) स्थापना करावी. (७५)

**कौलिकायां धराधारं क्षितिं चोत्तानपट्टके ।**
**स्तंभेषु पर्वतांश्चैवमाकाशं च करोटके ॥७६॥**

कौलीवर पृथ्वीधारण करणारा शेष (नाग) व वरच्या पट्टावर पृथ्वीची स्थापना करावी. खांबांवरती पर्वत व करोटकावर आकाश दाखवावेत. (७६)

**मध्ये प्रतिष्ठयेद्देवं मकरे जान्हवीं तथा ।**
**शिखरस्योरूशृंगेषु पंच पंच प्रतिष्ठयेत् ॥७७॥**

मध्यभागी देवाची प्रतिष्ठा करावी व (प्रणालीवरील) मकरापाशी गंगादेवीची स्थापना करावी. शिखरावरील उरूश्रृंगांवर पाच पाच देवांची प्रतिष्ठापना करावी. (७७)

**ब्रह्मा विष्णुस्तथा रुद्र ईश्वरश्च सदाशिवः ।**
**शिखरे चेश्वरं देवं शिखायां तु सुराधिपम् ॥७८॥**

अनुक्रमणिका

(शिखरावरील उरुश्रृंगावरती) ब्रह्मा, विष्णु तसेच रुद्र, ईश्वर, सदाशिव ह्या देवमूर्ती असाव्यात. शिखरावरती ईश्वराची मूर्ती असून शिखेवरती देवांच्या राजाची (इंद्राची) मूर्ती असावी. (७८)

**ग्रीवायाममरं देवं मण्डपे च निशाकरम् ।**
**पद्‌माक्षं पद्‌मपत्रं च कलशे च सदाशिवम् ॥७९॥**

ग्रीवेवरती अमर देवाचा, मंडपावरती चंद्र, पद्‌मपत्रावर पद्‌माक्षाचा - विष्णुचा - न्यास करावा व (मण्डपाच्या) कळसावर सदशिवाची मूर्ती असावी. (७९)

**सद्योवाम अघोरस्तत् पुरुष ईश एव च ।**
**कर्णादिभद्रपर्यंतं पंचांगे तान् प्रतिष्ठयेत् ॥८०॥**
**इति स्थावर प्रतिष्ठा**

कर्णापासून भद्रापर्यंत सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईश (या शंकराच्या निरनिराळ्या मूर्ती) कर्णापासून भद्रापर्यंत पाचही अंगावर (कर्ण, कोणिका, रथ, प्रतिरथ, भद्र) स्थापाव्यात. (८०)

**स्थावर मूर्तींच्या स्थापनेची माहिती संपली.**

[वर आलेल्या निरनिराळ्या देवमूर्तींची लक्षणे देतो.

**ब्रह्मा** - आषाढदण्ड स्फटिकाक्षमाला सुवर्णकुण्डी सरसीरुहाणि ।
बिभ्राणमारक्तजटाकलापं चतुर्मुखं पीतरुचं नमामि ॥२५·३६॥ (शिल्परत्न)

**विष्णु** - चतुर्भुजं द्विनेत्रं च प्रशान्तं कृष्णसंनिभम् ॥३॥
किरीटमुकुटं दिव्यं राजभूषणभूषितम् ।
संपातस्थातकं पद्‌मपीठस्योपरि संस्थितम् ॥४॥

अभयं दक्षिणे पूर्वहस्ते वामे तु दण्डधृक् ।
दक्षिणे परहस्ते च चक्र वामे तु शंखधृक ॥५॥

पीताम्बरधरं नानाचित्रवस्त्रविभूषितम् ।
दक्षिणेऽदक्षिणे श्रीर्भूः संस्थिते हरिदीक्षिते ॥६॥

तथोरङ्घ्री हरेः प्राश्वे सुस्थितावन्यकुञ्चितौ ॥ ६ ½ ॥

रौखागम भाग २, पटल ३६

**रुद्र**-चतुर्भुजास्त्रिनेत्राश्च जटामुकुटमण्डिताः ।
श्यामवस्त्रधराः सर्वे शुक्लवर्णाः

अनुक्रमणिका

प्रकीर्तिताः ॥४८·६२॥

समपादस्थानकाश्च पद्मपीठोपरि स्थिताः ।
सर्वाभरणसंयुक्ताः सर्वपुष्पैरलंकृताः ॥४८·६३॥

अभयं परशुं सव्ये कृष्णं वरद वामके ।
महादेवो शिवो रुद्रः शंकरो नीललोहितः ॥४८·६४॥

ईशानो विजयश्चेशो देवदेवो भवोद्भवः ।
कपालीशस्त्विति ज्ञेया रुद्रास्त्वेकादशः स्मृतः ॥४८·६५॥

काश्यप शिल्पम्

**सदाशिव**-बहुरुपो दधत् दक्षे डमरुं च सुदर्शनम् ।
सर्पं शूलांकुशौ कुम्भं कौमुदीं जपमालिकाम् ॥४·२३॥
घण्टा कपाल खट्वाङ्ग तर्जनी कुण्डिकां धनुः ।
परशुं पट्टिशं चेति वामोर्ध्वादि क्रमेण हि ॥४·२४॥ रूपमण्डन

**इन्द्र**-वरं वज्रांकुशौ चैव कुण्डीं धत्ते करेस्तु यः ।
गजारुढः सहस्राक्ष इन्द्रः पूर्वदिशाधिपः ॥२·३१॥ रूपमण्डन

**चन्द्र** - चंद्र श्वेतवपुः कार्यः तथा श्वेताम्बरःप्रभुः ।
चतुर्बाहुः महातेजाः सर्वाभरणवात् तथा ॥१॥

अध्याय ६८, तिसरा भाग विष्णुधर्मोतर पुराण.

**सद्योजात** – शुक्लाम्बरधरं देवं शुक्लमाल्यानुलेपनम् ।
जटाभारयुतं कुर्याद बालेन्दुकृतशेखरम् ॥४·१॥

त्रिलोचनं सौम्यमुखं कुण्डलाभ्यामलंकृतम् ।
सद्योजातं महोत्साहं वरदाभयपाणिनम् ॥४·२॥ रूपमण्डन

**वामदेव** - रक्ताम्बरधरं देवं रक्तयज्ञोपवीतिनम् ।
रक्तोष्णीषं रक्तनेत्रं रक्तमाल्यानुलेपनम् ॥४·३॥
जटाचंद्रधरं कुर्यात् त्रिनेत्रं तुंगनासिकम् ।
वामदेव महाबाहुं खड्ग खेटक धारिणम् ॥४·४॥ रूपमण्डन

**अघोर** - दंष्ट्राकरालवदनं सर्पशीर्षं त्रिलोचनम् ।
रुण्डमालाधरं देवं सर्पकुण्डलमण्डितम् ॥४·५॥

अनुक्रमणिका

भुजंगकेयूरधरं सर्पहारोपवीतिनम् ।
योनसं कटिसूत्रेण गले वृश्चिकमालिकम् ॥४·६॥

नीलोत्पलदलश्याममतसीपुष्पसन्निभम् ।
पिंगभूपिंगजटिलं शशांककृतशेखरम् ॥४·७॥

तक्षकं मुष्टिकं पादयोस्तस्य नूपुरौ ।
अघोररूपकं कुर्यात् कालरूपमिवापरम् ॥४·८॥ रूपमण्डन

**तत्पुरूष** - पीतांबरस्ततत्पुरुषः पीतयज्ञोपवीतवान् ।
मातुलिंगं करे वामेऽक्षमाला दक्षिणे तथा ॥४·१२॥ रूप मण्डन

**ईश** - शुद्धः स्फटिकसंकाशो जटाचंद्रविभूषितः ।
अक्षास्त्रिशूलहस्तौच कपालं वामतः शुभम् ॥४·१३॥ रूपमण्डन]

**प्रथमं देवतादृष्टेर्दर्शयेदन्तपर्वतम् ।**
**विप्रं कुमारिकां वस्तु ततो लोकान् प्रदर्शयेत् ॥८१॥**

देवमूर्तीला दृष्टी आल्यानंतर प्रथम दूरच्या पर्वतांचे दर्शन तिला करवावे. नंतर ब्राह्मण, कुमारी (व शुभ) वस्तूंचे दर्शन देऊन नंतर ती मूर्ती सामान्य जनांना दाखवावी. (८१)

**ईज्यानन्तरतः कुर्यात् सूत्रधारस्य पूजनम् ।**
**वस्त्रालंकार-भू-वित्त-गो-महिष्यश्च वाहनैः ॥८२॥**

यज्ञविधी झाल्यानंतर सूत्रधाराची पूजा करावी. त्याला वस्त्रे, अलंकार, जमीन, धन गाई, म्हशी व वाहने द्यावीत. (८२)

**अन्यषां शिल्पिनां पूजा कर्तव्या कर्मकारिणाम् ।**
**स्वाधिकारानुसारेण वस्त्रताम्बूलभोजनैः ॥८३॥**

इतर शिल्पींची व काम करणाऱ्यांची पूजा करावयास हवी. त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार (शिल्पविद्येतील पारंगतेनुसार) त्यांची कापड, विडा व जेवण देऊन संभावना करावी. (८३)

**काष्ठपाषाण निर्माणकारिणो यत्र मन्दिरे ।**
**भुञ्जते तत्र भक्तासौ शंकरस्त्रिदशैः सह ॥८४॥**

ज्या मंदिरांत (-साठी) लाकूड व दगडावर काम करणारे यांना जेवण दिले जाते तेथे शंकर देवासह भोजन केल्यासारखे होते. ( ८४)

अनुक्रमणिका

**पुण्यं प्रसादजं स्वामी प्रार्थयेत् सूत्रधारतः ।**
**सूत्रधारो वदेत् स्वामिन्नक्षयं भवतात्तव ॥८५॥**
**इति सूत्रधार पूजा ।**

सूत्रधारापाशी (प्रासादाच्या) मालकाने प्रासाद बांधल्यामुळे मिळणाऱ्या पुण्याची प्रार्थना करावी व सूत्रधाराने हा प्रासाद अक्षय तुमचाच राहील असे मालकाला सांगावे (८५)

**सूत्रधाराच्या पूजेची माहिती संपली.**

**आचार्यपूजनं कृत्वा वस्त्रस्वर्णधनैः सह ।**
**दानं दद्याद् द्विजातिभ्यो दीनान्ध दुर्बलेषु च ॥८६॥**

वस्त्र, सोने व धन ही देऊन आचार्याची पूजा करावी. ब्राह्मणांना, गरीब दुबळ्यांना व आंधळ्यांना दान करावे. (८६)

**सर्वेषां धनमाधारः प्राणिनां जीवनं परम् ।**
**वित्ते दत्ते प्रतुष्यन्ति मानुषाः  पितरः सुराः ॥८७॥**
**इति प्रतिष्ठाविधिः ।**

धन हे सगळ्यांचा आधार आहे. (मनुष्य -) प्राण्यांचे ते केवळ प्राण आहेत. पैसा दान केला असता, मनुष्य, पितर व देव हे फार संतुष्ट होतात.

**प्रतिष्ठाविधीची माहिती संपली.**

**प्रतिष्ठा वीतरागस्य जीनशासन मार्गतः ।**
**नवकारैः सूरमन्त्रैश्च सिद्धिके नलभाषितम् ॥८८॥**

वीतराग देवाची (सर्वसंगपरित्याग केलेल्या महावीराची) प्रतिष्ठा जैनपद्धती प्रमाणे करावी. सिद्ध व केवळ ज्ञानी लोकांनी सांगितलेला नवकार मंत्र व सूरिमंत्र यांनी स्थापना करावी. (८८)

**ग्रहाः सर्वज्ञदेवाश्च पादपीठे प्रतिष्ठिताः ।**
**येतानन्तविभेदेन मुक्तिमार्ग उदाहृतः ॥८९॥**

ज्याने निरनिराळ्या अनंत मार्गांनी मुक्तीचा रस्ता सांगितला अशा (जिनतिर्थंकराच्या मूर्तीच्या) पादपीठापाशी ग्रह व सर्वज्ञानी देव ह्यांची उपस्थिती असते. (८९)

**जिनानां मातरो यत्र यक्षिणी गौतमी तथा ।**
**सिद्धाः कालत्रयो जाताश्चतुर्विंशतिमूर्तयः ॥९०॥**

अनुक्रमणिका

मातृगण, गौतमी यक्षिणी तसेच कालत्रय सिद्ध यासह जिनांच्या २४ प्रकारच्या मूर्ती असतात. (९०)

**इति स्थाय जिनावारे त्रिप्राकारं गृहं तथा ।**
**सावन्तशिखिरं मन्दिररसर त्वष्टा पदादिकम् (?) ॥९१॥**
**प्रासादो वीतरागस्य पुरमध्ये सुखावहः ।**
**कल्याणकारि गृहस्य चतुर्दिक्षु प्रकल्पयेत् ॥९२॥**
**इति जिन प्रतिष्ठा ।**

वीतरागाचा प्रासाद गावाच्या मध्यभागी असणे सुखदायक असते. घराच्या चारी दिशांना असल्यास ते घराचे कल्याण करणारे असते (९२)

**जिन प्रतिष्ठेची माहिती संपली.**

**माघादि पंचमासेषु वापीकूपादि संस्मृतम् ।**
**तडागस्य चतुर्मासं कुर्यादाषाढमार्गयोः ॥९३॥**

माघ इत्यादि पाच महिन्यात (माघ ते वैशाख) लहान मोठ्या विहीरींचा प्रतिष्ठाविधि करावा असे सांगतात. आषाढ इत्यादि चार महिन्यात (आषाढ ते अश्विन) तलावाचा प्रतिष्ठाविधि करावा. (९३)

**असंस्कृतं जलं देवाः पितरो न पिबन्ति ते ।**
**संस्कृते तृप्तिमायान्ति तस्मात् संस्कारमाचरेत् ॥९४॥**

(प्रतिष्ठाविधीचा) संस्कार न झालेले पाणी देव व पितर पीत नाहीत. संस्कारित पाणी पिऊन त्यांची तृप्ती होते म्हणून प्रतिष्ठाविधीचा संस्कार करावा. (९४)

**जीवनं वृक्षजन्तूनां यः करोति जलाशयम् ।**
**दत्ते वा स लभेत् सौख्यमुर्व्यां स्वर्गे च मानवः ॥९५॥**

वृक्ष व प्राणी यांचे पाणी हे प्राण आहेत तेव्हा जो तलाव बांधील किंवा पाणी देईल त्या माणसाला या पृथ्वीवर व स्वर्गात देखील सुखाचा लाभ होईल. (९५)

**पुरान्धकवधे रुद्रललाटात् पतितः क्षितौ ।**
**स्वेद स्तस्मात् समुद्भूतं भूतमत्यन्त दुःसहम् ॥९६॥**

पूर्वी अन्धक राक्षसाला ठार मारताना शंकराच्या कपाळावरील घाम जमिनीवर पडला, त्यापासून अत्यंत भयंकर असे (कोणी एक) भूत तयार झाले. (९६)

**गृहीत्वा सहसा देवैर्न्यस्तं भूमावधोमुखम् ।**
**जानुनी कोणयोः पादौ रक्षोदिशि शिवे शिरः ॥९७॥**

अनुक्रमणिका

देवांनी त्याला एकदम पकडून जमिनीवर खाली तोंड करून (आडवे) पाडले व गुडघ्यावर, कोपरांवर व पायांवर ते बसलेत व ईशान्य दिशेला शंकर त्याच्या डोक्यावर बसला. (९७)

**चत्वारिंशद् युताः पंच वास्तुदेहे स्मिताः सुराः ।**
**देव्योष्टौ बाह्यगास्तेषां वसनाद्वास्तुरूच्यते ॥९८॥**

या वास्तु (पुरुष) देहावर ४५ देव बसलेत व त्याच्या बाहेर आठ देवी बसल्यात. (देव येथे) वास करतात म्हणून (प्रासाद, भवन इत्यादिंना) वास्तु म्हणावयाचे. (९८)

**अधोमुखेन विज्ञप्तैस्त्रिदशैर्विहितो बलिः ।**
**तेनैव बलिना शान्ति  कुरुते हानिमन्यथा ॥९९॥**

खाली तोंड असलेल्या त्या भूताला बली मिळावा अशी मान्यता देवांनी दिली तेव्हा त्याला बली देऊन त्याची शांती करावी; न केल्यास हानी होते. (९९)

**प्रासाद भवनादीनां प्रारंभे परिवर्तने ।**
**वास्तुकर्मसु सर्वेषु पूजितः सौख्यदो भवेत् ॥१००॥**

प्रासाद, भवन इत्यादि वास्तू बांधावयास सुरुवात करताना किंवा त्यात बदल करावयाच्या अगोदर अशा सर्ववेळी त्याची पूजा केल्यास ती (वास्तू) सौख्यदायक होते. ( १००)

**एकपदादितो वास्तुर्यावत् पदसहस्त्रकम् ।**
**द्वात्रिन्मंडलानि स्युः क्षेत्रतुल्याकृतीनि च ॥१०१॥**

एका पदा (कोष्ठा -) पासून हजार पदां – (कोष्ठां -) पर्यंत अशी ३२ मंडले असून त्यांचा आकार वास्तूच्या आकाराप्रमाणे असतो. (१०१)

[वास्तु चौरस, आयताकार, वर्तुळाकार वगैरे ज्या आकाराची असेल त्याच आकाराचे मंडले आखावे.

शिल्परत्न (६·१ – २३ ½), मयमत (७·१ - २१), मानसार (७·९ - २५).

या ग्रंथात ३२ मंडलांची नावे दिली आहेत ती अशी :--

| **पदांची संख्या** | **मंडलाचे नाव** | **पदांची संख्या** | **मंडलाचे नाव** | **पदांची संख्या** | **मंडलाचे नाव** |
|---|---|---|---|---|---|
| १×१=१ | सकल | ११×११=१२१ | स्थानीय | २१×२१=४४१ | सुसंहित |
| २×२=४ | पेचक | १२×१२=१४४ | देशीय | २२×२२=४८४ | सुप्रतिकान्त |
| ३×३=९ | पीठ | १३×१३=१६९ | उभयचण्डित | २३×२३=५२९ | विशाल |

अनुक्रमणिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४×४=१६ | महापीठ | १४×१४=१९६ | भद्रमहासन | २४×२४=५७६ | विप्रगर्भ |
| ५×५=२५ | उपपीठ | १५×१५=२२५ | पद्मगर्भ | २५×२५=६२५ | विश्वेश |
| ६×६=३६ | उग्रपीठ | १६×१६=२५६ | त्रियुत | २६×२६=६७६ | विपुलभोग |
| ७×७=४९ | स्थण्डिल | १७×१७=२८९ | व्रतभोग | २७×२७=७२९ | विप्रतिकान्त |
| ८×८=६४ | मंडूक | १८×१८=३२४ | कर्णाष्टक | २८×२८=७८४ | विशालाक्ष |
| ९×९=८१ | परमशामिक | १९×१९=३६१ | गणित | २९×२९=८४१ | विप्रभक्ति |
| १०×१०=१०० | आसन | २०×२०=४०० | सूर्यविशाल | ३०×३०=९०० | विश्वेशसार |
| ३१×३१=९६१ | ईश्वरकान्त | ३२×३२=१०२४ | इन्द्रकान्त | | |

**एका शीतिपदो वास्तुश्चतुःषष्टि पदोऽथवा ।**
**सर्ववास्तुविभागेषु पूजयेन्मण्डलद्वयम् ॥१०२॥**

वास्तुमण्डल ८१ किंवा ६४ पदांचे असावे. वास्तूंच्या सर्व प्रकारात या दोन्ही मण्डलांची पूजा करतात. (१०२)

**ईशो मूर्धनि पर्जन्यो दक्षिणं कर्णमाश्रितः ।**
**जयस्कन्धे महेन्द्राद्याः पंचलक्षणबाहुगाः ॥१०३॥**

(वास्तुपुरुषाच्या) डोक्यापाशी (असलेल्या कोष्ठात) शंकर व (त्याच्या) उजव्या कानापाशी पर्जन्य असतो. (उजव्या) खांद्यापाशी जय असून महेन्द्र इत्यादि पाच देव हातावर असतात. (१०३)

**महेन्द्रः सूर्यसत्यश्च भृश आकाशमेव च ।**
**वन्हिर्जानुनिपूषाद्याः सप्त पादनली स्थिताः ॥१०४॥**

महेन्द्र, सूर्य, सत्य, भृश व आकाश (हे ते पाच देव). (उजव्या) गुडघ्यापाशी अग्नी असून (उजव्या) पायाच्या जळीवर पूषा इत्यादि सात (देव) असतात. (१०४)

**पूषा च वितथश्चैव गृहक्षतयमावुभौ ।**
**गंधर्वो भृंगराजश्च मृगः सप्त सुरा इति ॥१०५॥**

पूषा, वितथ, गृहक्षत, यम, गंधर्व, भृंगराज व मृग हे ते सात देव आहेत. (१०५)

**पादयोः पितरस्तस्मात् सप्तपादतलस्थिताः।**
**दौवारिको ऽ थ सुग्रीवः पुष्पदन्तो जलाधिपः ॥१०६॥**

पायांपाशी पितर असून तेथून (डाव्या) पायाच्या नळीवर सात देव असतात. ते दौवारिक, सुग्रीव, पुष्पदन्त, जलाधिप (वरुण) - (१०६)

अनुक्रमणिका

**असुरः शोषयक्ष्मा च रोगो जानुनि संस्थितः।**
**नागो मुख्यश्च भल्लाटः सोमोऽङिगराश्च बाहुगाः ॥१०७॥**

असुर, शोष (व राज -) यक्ष्मा असून (डाव्या) गुडघ्यावर रोग (देव) स्थापित असतो. नाग, मुख्य, भल्लाट, सोम व अंगिरा हे (डाव्या) हातावर असतात. (१०७)

**अदितिस्त्वधदेशे (?) च वामे कर्णे दितिः स्थिता।**
**द्वात्रिंशत् बाह्यगा देवा नाभिपृष्ठे स्थितो विधिः ॥१०८॥**

डाव्या कानावर दिती असून तिच्या खालच्या पदांत अदिति असते. बाहेरच्या कोष्ठांत ३२ देव असून नाभीच्या पाठीमागच्या बाजूला ब्रह्मदेव असतो. (१०८)

**अर्यमा दक्षिणे वामे स्तने तु पृथिवीधरः ।**
**विवस्वानथ मित्रश्च दक्षवामोरूगावुभौ ॥१०९॥**

उजव्या स्तनापाशी अर्यमा व डाव्या स्तनापाशी पृथिवीधर असतो. विवस्वान व मित्र हे अनुक्रमे उजव्या व डाव्या मांडीवर असतात. (१०९)

**आपस्तुमलकावास्तु (?) राय (प?) वत्सो हृदि स्थितः ।**
**सावित्रः सविता तद्वत् करं दक्षिणमाश्रितौ ॥११०॥**

आप वास्तुपुरुषाच्या (डाव्या, तळ -) हातावर व आपवत्स हृदयावर असतो. त्याचप्रमाणे सावित्र व सविता उजव्या हातावर असतात. (११०)

**इन्द्र इन्द्रजयो मेढ्रे रुद्रोऽसौ वामहस्तके ।**
**रुद्रदासोऽपि तत्रैव इति वेदमयं वपुः ॥१११॥**

इन्द्र व इन्द्रजय मेढ्रावर असून रुद्र त्याच्या डाव्या हातावर असतो. रुद्रदास तेथेच असतो. अशा रितीने (त्या वास्तुपुरुषाचे) शरीर वेद - (देव ?) मय झालेले आहे. (१११)

**ईशान्ये चरकी बाह्ये पिलिपिच्छस्तु पूर्वतः ।**
**विदारिकाग्निकोणे च विजुम्भाचां दिगामिता ॥११२॥**

(वास्तुपदमण्डलाच्या) बाहेर ईशान्येला चरकी, पूर्व दिशेला पिलिपिच्छ, आग्नेय कोणी विदारिका व दक्षिण दिशेला विजृम्भा असते. (११२)

**नैर्ऋत्ये पूतना स्कन्धे पश्चिमे वायुकोणके ।**
**पाप राक्षसिका सौम्येर्यमं वै सर्वतो ऽ र्चयेत् ॥११३॥**

अनुक्रमणिका

नैर्ऋत्य दिशेला पूतना, पश्चिमेला स्कन्ध(न्द) व वायव्य कोनापाशी पापराक्षसी असते. उत्तरेला अर्यमा असून सर्वांची पूजा करावी. (११३). (आकृती ३७, ३८)

**देवि क्ररान्ममन्दीश्च माषान्नैः सुरयामिषैः ।**
**अपरात् वृकानैश्च (?) सर्वान् स्वर्णसुगन्धिभिः ॥११४॥**
**इति वास्तुपुरुषन्यासः ।**

देवी व यम इत्यादी क्रूर देवांना उडदाचे पदार्थ, दारु व मांस द्यावेत. इतर सर्व देवांना तूप व पक्वान्ने तसेच सोने व सुगंधी पदार्थ देऊन त्यांची पूजा करावी. (११४)

**वास्तुपुरुषाच्या स्थापनेची माहिती संपली.**


**एकेन शास्त्रेण गुणाधिकेन विना द्वितीयेन पदार्थसिद्धिः ।**
**तत् प्राकारान्तरतो विलोक्यं मणी गुणाढ्योपि सहायकांक्षी ॥११५॥**

खूप गुण असलेले हे शिल्पशास्त्रावरील पुस्तक शिल्पशास्त्राचे इतर ग्रंथ पाहून त्यांच्या सहाय्याने तयार केले आहे. त्यांच्या मदती शिवाय हे पुस्तक पुरे होऊ शकले नसते. दोऱ्यात ओवलेला मणी देखील (त्याचे सौंदर्य खुलविण्यासाठी) इतर पदार्थांच्या सहाय्याची अपेक्षा करतोच. (११५)


**श्रीविश्वकर्म गणनाथ महेश चण्डी श्रीविश्वरूप जगदीश्वर सुप्रसादात् ।**
**प्रासादमण्डनमिदं रूचिरं चकार श्रीमण्डनो गुणवतां भुवि सूत्रधारः ॥११६॥**

श्रीविश्वकर्मा, गणपती, शंकर, पार्वती, श्रीविश्वरूप जगदीश्वर यांच्या कृपेमुळे या पृथ्वीवरील गुणी सूत्रधार श्रीमण्डन याने हे सुंदर प्रासादमण्डन (नावाचे पुस्तक) रचिले. (११६)

अनुक्रमणिका




**आकृती ३७ वास्तुपुरुष (८·१०५-११३)**




**आकृती ३८ वास्तुपुरुष (८·१०५-११४)**

इति श्रीसूत्रधार मण्डन विरचिते वास्तु शास्त्रे प्रासादमण्डने अष्टमोऽध्यायः समाप्तः ॥८॥

श्रीसूत्रधार मणडनाने रचिलेल्या प्रासादमण्डन या वास्तुशास्त्रातील अध्याय आठ संपला (८).

## अनुक्रमणिका

# संदर्भ ग्रंथ सूची


अपराजितपृच्छा (१९५०) - लेखक - भुवनदेवाचार्य, संपादक - पो. अ.मंकड, गायकवाड ओरिएण्टल सिरीज क्रमांक ११५, बडोदा

आपटे वि. स. (१९५७) - संस्कृत - इंग्रजी डिक्शनरी, संपा. पी. के. गोडे व सी. जी. कर्वे, पुणे.

काश्यपशिल्पम् (१९२६) - संपादक - श्री कृष्णराय वझे. आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलि क्र. ९५, पुणे

(या संस्कृतमध्ये लिहिलेल्या पुस्तकाचे भाषांतर डॉ. र. पु. कुलकर्णी यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीमण्डळाने ते प्रकाशित केले).

कुण्डरत्नावली (१८६८) - रा. कृ. दिक्षीत (जडे), वाराणसी

दीपार्णव (१९६०) संपादक - प्रभाशंकर ओघडभाई सोमपुरा, प्रका - बलवंतराय प्रभाशंकर सोमपुरा.
प्रासादमण्डन (१९६१) संपादक - पं भगवानदास जैन, जयपूर.

रूपमण्डन (१९६५) लेखक - सूत्रधारमण्डन, संपादक - बलराम श्रीवास्तव, प्रकाशक – मोतीलाल बनारसीदास, दिल्ली

रौरवागम (भाग २) (१९७२) संपादक - एन. आर. भट्ट - इन्स्टिट्युट फ्रान्साझ ड इंडॉलॉजी पॉण्डीचेरी.

वास्तुसारप्रकरणम् (१९८७) लेखक - ठक्कुर फेरु, इंग्लिश भाषांतरकार - डॉ. र. पु. कुळकर्णी, ज्ञानप्रबोधिनी, पुणे.

विष्णुधर्मोत्तर पुराण (१९१२) प्रकाशक - खेमराज कृष्णदास, मुंबई

Engineering Geometry of Yajn akundas and Yajna- Mandapas (1998) डॉ.र.पु. कुलकर्णी, पुणे


अनुक्रमणिका

# स्थपत्य विषयक शब्दांचे अर्थ

(कंसातील आकडे अध्याय व श्लोक क्रमांक देतात.)

**(अ)**

अधिष्ठान (२·१) - जोते नेहमीच नक्षीदार असते
अक्षमाला - रुद्राक्षाची माळ
अलिंद (७·६) - सोपा
अंडक (५·५) - शृंग, लहान शिखर
अंग (१·४१) - विभाग, अवयव
अंगुल (१·२५) - लांबीचे एकक
अंतरपत्रक (२·१३) - अंतरित (३·८) - अंतर्गमन असलेला थरविभाग
अर्धचंद्र (३·४१) - उंबरठ्यापाशी अर्धवर्तुळाकृती नक्षी
अर्क (२·९) - १२ ही संख्या
अष्टापद (२·२४) - आठ पायऱ्या असलेले देवकुल
आमलसारक (४·३१) - आवळ्याच्या आकाराचा कळसाखालील अवयव

**(उ)**

उच्छ्रय (२·७) - उंची
उद्गम (३·२४) - भिंतीचा एक थर विभाग
उदुम्बर (३·३७) - उंबरठा
उत्क्षिप्त (७·३४) - उठावांची नक्षी नसलेले
उत्तरंग - दरवाजाची वरची पट्टी

**(क)**

कलश (१·३८) - कळस
कला (४·२) - १६ ही संख्या
कमंडलु - कमंडलु
कणक (२·११) - कणी
कपिलि (४·२७) - अंतराळ मंडपावरील शृंग
कपोतालि (२·१३) - कबुतराच्या शरीराप्रमाणे असलेला थरविभाग
कर्ण - कोपरा
कर्णकूट - शिखराच्या कोपऱ्यावरील लहान शृंग
करोट (३·२६) - घुमट
खट्वांग - दंड किंवा लांब हाड, याच्या वरच्या अंगाला कवटी बसविलेली असते
खातविधि (१·२४) - पायासाठी खड्डा खणणे
खुर (१·३७) - अधिष्ठान, उपपीठ किंवा भिंत यांचा सर्वात खालचा थरविभाग
कीर्तिवक्त्र (२·३९) - कीर्तिमुख - सिंहमुख, या मुखातून मोत्याच्या माळा टांगलेल्या दाखवितात -
कोणिका (३·५९) - रूपस्तंभाचा उपविभाग
कुंभ (१·३७) - कुंभाच्या आकाराचा थरविभाग, अधिष्ठान व भिंतीचा एक थरविभाग
कूट (७·४८) - श्रृंग

अनुक्रमणिका

कुटच्छाद्य (३·२५) - शिखरावरील शृंगाच्या खाली वळचणीसारखा भाग

**(ग)**

गजतालु (७·३२) - घुमटाकृती शिखराचा वरचा थरविभाग

गंधर्व शाखा (३·६१) - दरवाजाच्या चौकटीतील एक नक्षीदार विभाग

गर्भगृह (२·१७) - गाभारा

गवाक्ष (८·३३) - झरोका

गोपुर (७·४५) - दक्षिणेकडील देवालयांचे अनेक मजली प्रवेशद्वार

ग्रास पट्टिका (३·८) — वेली, फुले यांची नक्षी असलेला पट्ट

ग्रीवा (४·२) - मान, गळा, अंतर्गमन असलेला थरविभाग

**(घ)**

घंटा (१·३८) - मंडपावरील घुमट

**(ज)**

जगति (२·१) - जोते

जाड्यकुंभ (२·११) - जगतीचा एक थरविभाग

जलनिष्कास (२·१५) - पाणी वाहून नेणारी गटार

जालक (७·१९) - जाळी

जंघा (३·२२) - भिंत, भिंतीचा प्रमुख थरविभाग

**(च)**

चंद्र (३·१५) - १ ही संख्या -

चंद्रिका (४·३२) - आमलसाराचा एक थरविभाग

चंद्रावलोकन (७·९) - मुखमंडपाचा वरचा मोकळा, भिंती शिवायचा भाग -

चतुष्किका (२·१९) - चौकी

च्छाद्य (१·३८) - वळचणीची पट्टी

**(त)**

तल (६·१५) - जमीन, मजला

तवंग (४·२९) - दरवाजाच्या दाराची वरची खो बण

तोरण (२·१६) - नक्षीदार कमान

त्रिभंग - तीन ठिकाणी वाकलेले (शरीर)

त्रिपुरुष (२·४६) - त्रिमूर्ती

त्र्यंग (५·१५) - तीन विभागांचा अधोच्छंद; याला एक भद्र असतो असेच भद्र, उपरथ वगैरेची संख्या वाढवून पंचांग, सप्तांग व नवांग अधोच्छंद मिळतात.

**(द)**

दल (७·१८)- कमळाच्या पाकळीसारखा थरविभाग

दर्दरिका (७·२०) - मंडपावरील घुमटाच्या आतील बाजूचा एक थरविभाग

देवपुर (८·३१) - देवालय केंद्रीयस्थानी असून त्याच्यामुळे निर्मिलेले शहर

दृष्टिवेध (२·३०) - दोन देवमूर्ती समोरासमोर आल्यास हा दोष होतो

**(न)**

नंदि (५·१२) - भद्राच्या दोन्ही बाजूला असणारा उपविभाग

नागवस्तु (१·२४) - शेष नागाचे मुख व शेपूट विरुद्ध दिशांना दाखविणारी आकृती. याच्या मुखाच्या

स्थितीवरून देवालयाच्या दाराची दिशा समजते.
नासिका (१·३९) - शुकनास पहा.
निरंधार (४·९) - प्रदक्षिणा मार्ग नसलेले देवालय

**(प)**

पद्मकोश (४·२२) - कमळाच्या कळीच्या आकाराचे देवालयाचे शिखर
पद्मशिला (१·३६) - खांभाच्या खाली असलेली आधार शिला
पर्व (४·४२) - बांबूच्या दोन गाठीमधील अंतर, पेर
पाद (४·२८) - एक चतुर्थांश
पत्रशाखा (३) - दरवाजाच्या चौकटीतील एक नक्षीदार उपविभाग
पेडक (किंवा पेटक) (३·३४) - पट्ट
फालना (२·८) - अधोच्छंदाचे भद्र, उपरथ इत्यादी विभाग
पीठ (२·१) - जोते
पोटक (३·५९) - दरवाजाचा उभा खांब
प्रणाल (२·३५) - देवाच्या अभिषेकाचे पाणी गर्भागाराबाहेर वाहून नेणारी नाली
प्रासाद (३·१९) - देवालय, राजवाडा
प्रतिभद्र (३·३२) - भद्राजवळील विभाग
प्रतोलि (२·१६) – दरवाजा, चौकीसहित असतो
पुष्पकंठ (२·१३) - फुलांची नक्षी असलेला पट्ट
पूर्वसूत्र (८·७) - जुन्या देवालयाची आखणीची प्रमुख रेखा

**(ब)**

बलाणक (२·२४) - एक प्रकारचा मंडप
बीजपूरक (४·३८) - कळसाचा सर्वोच्च थर विभाग

**(भ)**

भिन्नच्छंद (२·२६) - निराळ्या प्रकारचा -
भिट्ट (३·१) - जोत्यांची उंची वाढविण्यासाठी त्यांचा सर्वात खालचा थर विभाग
भ्रम (२·७) - प्रदक्षिणा मार्ग
भद्र (३·३२) - भिंतीच्या लांबीच्या मध्यभागी पुढे आलेला भाग

**(म)**

मकर (२·१५) - मगर मात्र शरीर माशा प्रमाणे असते
मंची (३·२१) - भिंतीचा एक थरविभाग
मंडप ( २·६) - मंडप
मंदारक (३·३४) - उंबरठ्या जवळील अर्धचंद्राची नक्षी
मंडोवर (३·२३) - नक्षीदार भिंत
मत्तवारण (७·४३) - कठडा
मुखमण्डप - सर्वात पुढील मंडप

**(य)**

यान (३·४५) - वाहन

**(र)**

रंगभूमिका (७·३६) - रंगभूमि

अनुक्रमणिका

राजपुर (८·३१) - राजधानी
राजसेनक (७·१०) - मुखमंडपाच्या भिंतीतील एक थरविभाग
रथशाला किंवा रथरंध्र (२·२५) - रथशाला
रथिका (५·१३) - कोनाडा
रूपस्तंभ (३·६१) - दरवाजाच्या चौकटीतील नक्षीदार खांब
**(व)**
वलन (४·१३) - शिखराचे अंतर्गमन
वास्तुपदमंडल (१·१३) - वास्तुच्या आकारातील मंडलात असलेली निरनिराळ्या देवांची स्थाने
वेदि (७·४३), वेदिका (२·१८) - पीठ
वितान (५·४७) - वितान
वीतराग - जैन मुनी
**(श)**
शुद्ध - भेसळ नसलेले
शयनार्चा - आडव्या पडलेल्या स्थितीतील मूर्ती. उदा. शेषशयन विष्णू
शाखा - दरवाजाच्या चौकटीतील उभे पट्ट
शिखर - शिखर
शिलान्यास - पायात पहिली शिला ठेवावयाची क्रिया
**(ष)**
षड्दारुक - पडदी
**(स)**
समसूत्र (१·४०) - एकाच पातळीत, आखणीची प्रमुख रेखा
सरपत्रिका (२·१२), शिरापट्टी (३·२२), शिरावटी (३·२६) - भिंतीच्या वरच्या भागातील थर विभाग
संवरणा (२·२२) - मंडपाच्या घुमटाच्या बाहेरील बाजूवरील नक्षी
संधार (७·८) - संधि
संधाऱ (७·३४) - वितानाचा एक प्रकार
सांधार (३·१३) - प्रदक्षिणा मार्ग असलेला प्रासाद
सिंहशाखा (३·६१) - दरवाजाच्या चौकटीतील एक सिंहाच्या नक्षीची पट्टी
सौध - चुनेगची - घर
सोपान (२·१५) - जिना
सूत्र (१·३०) - दोरी, आखणी करताना वापरावयाची दोरी
सूत्रधार (१·३) - स्थपति
स्कन्ध (४·१३) - खांदा, शिखराची वरची बाजू
स्तंभ (२·१७) - खांब
स्थापन (१·२०) - स्थापना
स्थावर (१·४०) - कुंभ, च्छाद्य वगैरे थरविभाग
**(ह)**
हस्त (१·२५) - एक हाताचे माप (२४ अंगुले)
हर्म्य (७·४५) - अनेक मजली घर

अनुक्रमणिका

# प्रासादमण्डन – सूची


| | |
|---|---|
| आमलसार | ४·३१ – ३४ |
| आय, व्ययादी | १·१९ – २२ |
| कपिली | ४·२८ |
| कळस | ४·२४४, ३६ – ३८ |
| काळ, शुभ-आखणीस, | १·३० |
| बांधावयास | १·३१ |
| गर्भगृह | ३·३२ - ३६ |
| जगति | २·१ – १५२·२६ |
| जमीन, पाहणीस शुभकाल, | १·११ |
| जमीन, पाहणीस - परीक्षा, | १·१२ |
| जमीन, पाहणीस - पूजाविधि | १·१३ – १६ |
| जागा - प्रासादासाठी | १·३२ |
| जिनालये ७२,५२ किंवा २४ | २·२३ |
| जीर्णोद्धारविधि | ८·७ – १५ |
| तोरण | २·१६ – १८ |
| त्रिमूर्ती | २·४६ - ४७ |
| दार - उत्तरंग, | ३·६६ |
| - उंबरठा, अर्धचन्द्र | ३·३७ – ४२ |
| - इतर प्रासादांचे | ३·४९ – ५१ |
| - द्राविड प्रासादांचे | ३·४८ |
| - दिशा | ५·९ – १० |
| - नागर प्रासादांचे | ३·४३ – ४५ |
| - भूमिज प्रासादांचे | ३·४३ – ४७ |
| - शाखा | ३·५२ – ६५ |
| देवमूर्ती, दृष्टि देणे | ८·८१ |
| - दृष्टि स्थान | ४·१ – ७ |
| देवतान्यास | ८·६९ – ८० |
| देववाहन, चौकी | २·१९ – २० |
| - दृष्टिस्थान | २·२१ |
| दिशासाधन | १·२३ |
| ध्वज | ४·४४ – ४८ |
| ध्वजाधार | ४·३५ |
| ध्वजदण्ड | ४·३९ – ४३ |
| नाभिवेध | २·२७ – ३१ |
| नाली | २·३२२·३४ - ३६ |
| पञ्चायतन - गणेश, | २·४२ |
| - चण्डी, | २·४४ |
| - विष्णु | २·४३ |
| - शिव | २·४५ |
| - सूर्य | २·४१ |
| पाया, किती खोल खणावा | १·२४ |
| पीठ - उंची | ३·५ – ७३·१९ |
| - थरविभाग, | ३·८ – १४ |
| पूजा – आचार्यांची | ८·८६ – ८७ |
| - शिल्पींची | ८·८२ – ८५ |
| प्रासाद - बांधावयास निषिध्दकाल | १·१७ – १८ |
| - द्रव्य | १·३३ |
| - बांधल्याचे पुण्य | १·३४ – ३५ |
| प्रासाद - प्रकार, - १४ | १·६ |
| - मूळ ८ | १·७ – ९ |
| - त्र्यंग | ५·११ – १५ |
| - पञ्चाङ्ग | ५·१६ – १८ |
| - सप्ताङ्ग | ५·१९ – २५ |
| - निरंधार | ६·२२ |
| - आकार | ६·२३ – २६ |


अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| - प्रतिष्ठाकाल | ८·३८ — ४१ |
| प्रतिष्ठाविधि | ८·५६ — ६८ |
| मुखाची दिशा | २·३७ — ४० |
| - महाभाग | ५·३२ |
| - महीधर | ५·२६ — २८ |
| - महेन्द्र | ५·१९ — २१ |
| - मुखभद्र | ५·११ — १२ |
| - मेरू | ५·३३ |
| - विजयानन्द | ५·३० |
| - सर्वसुगन्धर | ५·३० |
| - सर्वांगतिलक | ५·३१ |
| - सितश्रृंग | ५·२२ — २३ |
| - सिंह | ५·१३ — १५ |
| - केसरी इत्यादि २५ नावे | ६·१ — ४ |
| - माहिती | ६·६ — २१ |
| - मेरू | ६·३१ — ३४ |
| - कमलहंसमेरू | ६·४२ |
| - किरणोद्‌भवमेरू | ६·४१ |
| - भुवनमण्डन मेरू | ६·३७ — ३८ |
| - महामेरू | ६·४४ |
| - रत्नशीर्षमेरू | ६·३९ — ४० |
| - वृषभध्वजमेरू | ६·४५ |
| - सुरवल्लभ | ६·३६ |
| - स्वर्णकेतू | ६·४३ |
| - हिमशीर्ष | ६·३५ |
| - प्रतिष्ठाविधी, देवमूर्ती | ८·५६ — ६८ |
| - जिनमूर्ती | ८·८८ — ९२ |
| - जाती कैलास | ६·२७-३०५, २६-२८ |
| गंधमादन | ५·२९ |
| - क्षितिवल्लभ | ५·२५ |
| - नन्दन | ५·१२ ½ |
| - नवमंगल | ५·२९ |
| - भुवन | ५·२४ |
| घण्टेचे माप | ७·३ |
| जिन | २·२२ |
| प्रकार व स्थाने | ७·२५ — २६ |
| प्रकार, खांबांच्या संख्येवरुन | ७·१६ — २० |
| गूढ | ७·२१ — २४ |
| चौकींच्या संख्येने | ७·३९ — ४५ |
| बलाणक | ७·८ — १५ |
| मण्डोवर इत्यादि | ७·४ — ६ |
| मापे | ७·२८ — ३६ |
| शिखर | ७·४६ — ४९ |
| संवरणा | ३·१५ — १८ |
| मंडोवर, प्रासाद, उंची | ३·२० — ३० |
| प्रकार व थरविभाग | ३·३१ |
| जाडी | ८·४२ — ४४ |
| यज्ञमण्डप | ८·४५ — ५५ |
| यज्ञकुण्ड | ८·२९ — ३३ |
| राजपुर | ८·१६ — २८ |
| वास्तुदोष | १·१३ — १६ |
| वास्तुपदमण्डल | ८·१०१ — ११४ |
| वास्तुपुरुष | ८·९६ — १०० |
| शान्ति, विधि | १·३६ — ३८ |
| शिखर, रेखा इत्यादि | ४·५४ — ५७ |
| शिला, आधार | ३·१ — २ |
| कूर्म, माप | १·२५ - २७ |
| - स्थापना | १·२८ — २९ |


## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| - विहीर, तलाव | ८·९३ – १५ | | |
| **फालना** | १·४१ – ४२ | शुकनास | ४·२५ – २७ |
| **बलाणक** | २·२४ | षड्दारूक | ८·३५ |
| भिट्ट | ३·३ – ४ | | |
| मत्तवारणी | ७·९ | स्थापना | १·२५ – २९ |
| मठ | ८·३५८·३४-३७· | | |
| मापे – प्रासादाच्या थरविभागांची कशीघ्यावीत | १·३९ - ४० | | |
| मंडप | ७·२ | | |


**अनुक्रमणिका**